प्रत महाराष्ट्रभाषा बरीच कोती आहे व तद्द्वारा ग्रंथ लिहिणारांना, इंग्रजी भाषा निकट परिचित असल्यामुळें स्वभाषेनें आपले विचार प्रकट करणें कठीण पडतें, अशी गोष्ट वारंवार घडते. अशांनीं नवीन होणारे मराठी ग्रंथ वाचलेच पाहिजेत; कां कीं, नवीन शब्दांच्या व वाक्यांच्या, महाराष्ट्र भाषेच्या पद्धतीस अनुसरून, किंवा संस्कृत भाषेचें साहाय्य ... स्वभाषेच्या पूर्णतेस्तव महाप्रयासें ग्रंथकार ... लागतें हें

दा.क्र. २०१४८

म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक | सन |
|---|---|---|
| चरित्र | निळकंठ जनार्दन किर्तने | १८९४ |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव | |
| १५३ | छत्रपति महाराज | |

2098

... साहेबां ...
आहे, साहेब मजकूर ... आहेत
एक मत आहे किंवा आपसांत कांहीं

प्रत महाराष्ट्रभाषा बरीच कोती आहे व तद्द्वारा ग्रंथ लिहिणारांना, इंग्रजी भाषा निकट परिचित असल्यामुळें स्वभाषेनें आपले विचार प्रकट करणें कठीण पडतें, अशी गोष्ट वारंवार घडते. अशांनीं नवीन होणारे मराठी ग्रंथ वाचलेच पाहिजेत; कां कीं, नवीन शब्दांच्या व वाक्यांच्या, महाराष्ट्र भाषेचे पद्धतीस अनुसरून, किंवा संस्कृत भाषेचें साहाय्य घेऊन, ज्या ग्राह्य योजना स्वभाषेच्या पूर्णतेस्तव महाप्रयासें ग्रंथकार करितात, त्या ध्यानांत ठेवणें व योग्यवेळीं त्यांची योजना करणें हें महाराष्ट्र भाषेच्या उन्नतीचें केवळ हद्दतच समजलें पाहिजे. तेव्हां हा या योजनांचा लाभ महाराष्ट्र ग्रंथ लक्ष्यपूर्वक न वाचल्यास अन्यरीत्या कसा होईल?

ही गोष्ट मनांत आणून आमचे नवीन विद्वान् व इतर सामान्य प्रतीचे लोक स्वभाषेच्या सुधारणेकडे व स्वभाषेंतील ग्रंथकारांच्या उन्नतीकडे लक्ष्य देतील अशी आशा आहे.

वरील सूचना मध्यम प्रतीचे लोकांस केली आहे. आतां राजेरजवाडे, संस्थानिक व त्यांचे कारभारी यांस विनयपूर्वक सूचना करणें आहे; ती अशी कीं त्यांणीं स्वकीय उपयोगास विशेष मदत केलीच पाहिजे. जर परदेशीय लोक या कामिं पाहिजे करतात तर आपले म्हणविणाऱ्या राजादिकांनीं म्हणण्यासारखी मदत न करणें हें त्यांस केवळ लज्जास्पद आहे. आतां मागच्या प्रमाणें मोठमोठ्या फौजा पाळाव्या लागत नाहींत, तशांत संस्थानांचीं उत्पन्नेंही वाढलीं आहेत; तेव्हां अशा स्तुत्य कामीं खर्च करण्यास त्यांस पुष्कळ जागा आहे. "फौजांचा खर्च तुटला परंतु विद्यादि खात्यांचा खर्च वाढला आहे," असें कोणी म्हणतील; परंतु हें म्हणणें आमचे मतें खरें नाहीं. जितका खर्च वांचला आहे तितका वाढला नाहीं; व ज्या शाळा व जे दवाखाने स्थापित झाले आहेत त्यांचा खर्च व त्यांच्या संख्या, उत्पन्नाच्या मानानें प्रशस्त आहेत असें म्हणतां येणार नाहीं असें पक्कें वाटतें. शिवाय जो कांहीं खर्च या कामीं राज्यांतून आहे, त्यावरून सुधारणुकीच्या कामीं राजे लोकांची प्रीति किती आहे हें स्पष्ट होऊं शकत नाहीं. रेसिडेंट साहेबांची अशा कामीं किती भक्ति आहे, साहेब मजकूर अशाग्रही आहेत किंवा कसे, राजे लोकांचें त्यांचें एक मत आहे किंवा आपसांत कांहीं चरस. शिवाय तसें झाल्यावर

नुमान मात्र यावरून बरेंच सूक्ष्मरीतीनें करतां येतें; व लोकही बहुशः या दातृत्वाविषयीं अशाच प्रकारचीं अनुमानें करितात. अशा प्रसंगीं चांगल्या ग्रंथकारांच्या कृतीस मान व आश्रय दिल्यास विद्यादि स्तुत्य कऱ्यांला साहाय्य करण्याच्या कामीं आपली दक्षता किती आहे हें दाखविण्यास राजे लोकांस तें एक स्वतंत्र, मोठें साधन होईल; व अशा आश्रयदात्यांची कीर्ति चिरकाल राहील. **विक्रमादित्य, मुंज, भोज, श्रीहर्ष** प्रभृति राजांची कीर्ति ह्मटली ह्मणजे, त्यांनीं ज्यांचा अंगीकार केला अशा कवींच्या चमत्कृतीमुळेंच या भूतळीं अवशिष्ट राहिली आहे. केवढा हा सरस्वतीपुत्रांचा प्रभाव ! पहा ! या राजांनीं अनेक युद्धें केलीं असतील, अनेक साहसें केलीं असतील, अनेक विलासमंदिरें, आराममंदिरें बांधलीं असतील, किंबहुना अनेक लोक वाढवून बहादुरी मिरविली असेल; परंतु नांव घेण्यास त्यांतील आज कांहींच कीं राहिलें नाहीं ! कालकालांतरीं त्यांची कीर्ति रक्षून या कालरूपी महासागरांत तरविण्यास एक सरस्वतीचे लाल जे कवी तेच दक्ष नाविक निघाले. विद्वान् ग्रंथकारांस आश्रय देणें केवढें श्लाघ्य [illegible] होय हें विस्तारें लिहावें असें नाहीं. **बिल्हण** कवीनें ह्मटलें [illegible], कवि ह्मणजे विद्वान् याचा प्रभ[illegible] [illegible] आहे, व राजां[illegible] उपेक्षा करणें अगदीं ठीक नाहीं; कार[illegible]

> लंकापतेः संकु[illegible] यशो यद् यत्कीर्तिपात्रं रघुराजपुत्रः ।
> स [illegible]वाद्यकवेः प्रभावो न कोपनीयाः कवयः क्षितींद्रैः ॥

हें इतकें लिहिण्याचें कारण, आमचे भाषेंतील ग्रंथकारांची हीन स्थिति होय. कोणत्याही विषयाचा ग्रंथ करूं ह्मटल्यास प्रथम अडचण खर्चाची उभी राहून हिंमत खचून जाते. मग अर्थात् पुढील व्यवस्था बंद होते व ग्रंथ होऊन भाषेची सुधारणा व्हावी ती होत नाहीं. खरोखर ही अडचण नाहींशी करणें हें सर्व देशबांधवांचें कर्तव्य होय. या गोष्टीचें प्रतिपादन करण्यास आह्मांस हा उत्तम समय वाटतो; कारण ज्या ग्रंथांचे संबंधें प्रसंगवशात् आह्मीं हें लिहिलें तें आमचे स्वकृतीचें नसल्यामुळें स्वार्थबुद्धीचा दोष आह्मांस क्षुद्रबुद्धीचे लोक लावूं शकणार नाहींत. पुनश्च या लिहिण्यावरू[illegible] यां आह्मी आरंभिलेला व्यवसायही ठीकच आहे हेंही सर्वांचे लक्ष[illegible] बरेच श्रम व खर्च

१ [illegible]नेक मराठ्यांच्या बखरी [illegible]विल्या आहेत त्या या [illegible] अभिरुचि करून [illegible]

तसें पुढें सर्वांचें एक पुस्तक छापवितां येईल. सध्यां ह्या छापविलेल्या साधनांचे सर्व हक्क आह्मीं आह्मांकडे ठेविले आहेत हें सांगणें इष्ट आहे.

ज्या बखरी आह्मीं छापविणार त्या तीन जातींच्या आहेत. ( १ ) मुसलमानाचे कारकीर्दीविषयींच्या. ( २ ) सातारकर छत्रपतीचे कारकीर्दीविषयींच्या. ( ३ ) पेशवे आदि मराठे सरदारांचे कारकीर्दीविषयींच्या.

प्रकरणाचे संबंधानें असे तीन प्रकार होतात. काळाचे संबंधानें पाहिल्यास दोनच प्रकार दृष्टीस पडतात. पहिला **ग्रांट डफकृत** मराठ्यांचे इतिहासापूर्वीं लिहिलेल्या बखरांचा; दुसरा त्या ग्रंथाचे समकालीं किंवा मागून लिहिलेल्यांचा.

इतिहास शिकण्यापासून कोणकोणते फायदे होतात ते आतां बहुतकरून महाराष्ट्र वाचकांस सांगण्याची गरज राहिली नाहीं. परंतु ही गोष्ट मोठी शोचनीय आहे, कीं हिंदुस्थानाच्या व विशेषतः महाराष्ट्रदेशाच्या इतिहासाच्या अध्ययनापासून कांहीं उपयोग नाहीं, असें प्रतिपादन करणारे आह्मांमध्यें अद्यापि पुष्कळ लोक आढळतात; व या वर्गांत कित्येक विद्वान् लोकांचीही गणना आहे. प्रस्तुत ग्रंथ प्रसिद्ध करण्याचे पूर्वीं त्यांचे अध्ययनापासून उपयोग आहे व ते प्रसिद्ध करण्यास योग्य आहेत हें सिद्ध करून दाखविलें पाहिजे. महाराष्ट्र देशाचे इतिहासाचें अध्ययन केल्यापासून कांहीं लाभ नाहीं, ही जी कित्येकांची गैरसमजूत आहे ती दूर करण्यास त्यांचे मताचें नुस्तें खंडन करून उपयोग नाहीं. या व्यतिरिक्त त्यांचें समाधान केलें पाहिजे. त्यांच्या दुराग्रहरूप वृक्षाचे मूळावरच घाव घातला पाहिजे. फांद्यांची छाटाछाट केल्यानें अरिष्ट टळणार नाहीं. या दुराग्रहाचें मूळ ह्मटलें ह्मणजे विवक्षित विषयाचें समूळ अज्ञान हेंच होय. ह्या अज्ञानाचे नाशास्तव महाराष्ट्र देशाचे इतिहासाचें चांगलें पुस्तक करून तें स्वदेशबंधु वाचतील असें तरी करावें; किंवा या विषयावर पूर्वीं जे ग्रंथ लिहिलेले असतील ते सर्वांस उपलब्ध तरी करावेत; हे दोन प्रशस्त उपाय आहेत. पहिला उपाय हल्लींच न करण्याचें एक कारण वर सांगितलेंच आहे. दुसरें तसें करणारास पक्षपाती असल्याचा दोष कदाचित् लोक लावूं पहातील. ह्मणून पूर्वीं लिहिलेल्या बखरा प्रथम प्रकट कराव्या ह्मणजे विषयाची माहिती मूळग्रंथावरून सर्वांस होईल व त्या मूळग्रंथांतून कोणाची किती योग्यता हें कळून येईल. शिवाय तसें झाल्यावर

पुढें इतिहास लिहिणारास मोकळा मार्ग होईल. आमचा इतिहास स्वकीय लोकांनीं कसा लिहून ठेविला आहे हेंही समजण्यास स्वल्प मार्ग होईल. कोणत्याही लोकांचा इतिहास त्यांचा त्यांणीं जसा लिहून ठेविला असेल तसा जाणणें ह्मणजे इतिहासाचें ह्रद्गत जाणणें होय. हा सिद्धांत प्रसिद्ध आहे, तेव्हां त्याचे विवेचनांत काळ घालविणें नको. कोणताही सुधारलेला देश आपला इतिहास जसा परकीय लोक लिहून ठेवितील तसाच, सत्यासत्याचा शोध केल्याशिवाय, ग्रहण करणार नाहीं. त्यांतही तिऱ्हाईत परकीय असल्यास कदाचित् चालेल; परंतु ज्यांणीं आपणांस जिंकिलें किंवा ज्यांस आपण जिंकिलें ते आपणाविषयीं निःपक्षपातबुद्धीनेंच लिहितील असें मानणें फार भोळेपणाचें काम होय. क्वचित् इतिहासकार परम सत्यप्रिय व निःपक्षपाती, वर सांगितल्या कारणांनीं विकारबद्ध न होणारे, असेही सांपडतील असें जरी मानिलें, तरी ज्या इतिहासकारांचे लेख क[illegible]सोटीस लाविले गेले नाहींत तेही त्याच प्रतींतील असें मानून चालणें व त्यांचे लेखांस " बाबावाक्याची ", योग्यता [illegible] हें प्रशस्त नाहीं. मराठ्यांचा इतिह[illegible] आहे तो मुसलमान इतिहासकारांनीं लिहिल्याप्रमाणें व इंग्रज इतिहासकार यांणीं लिहिल्याप्रमाणें आहे. मुसलमान लोकांस आह्मीं जिंकलें, व इंग्रज लोकांनीं आह्मांस जिंकलें, तेव्हां या दोनही इतिहासकारांचे लेख सर्वस्वी ग्राह्य ह्मणतां येत नाहींत. ज्यांचे विषयीं हे ग्रंथ आहेत त्यांचें ह्मणणें काय आहे हें जाणणें अवश्य आहे. तें आमच्या प्रस्तुतच्या प्रयत्नानें शक्य होईल, हाही ह्या व्यवसायाचा एक उद्देश होय.

महाराष्ट्र देशाच्या इतिहासाचे निंदकांच्या दुराग्रहाचें खंडन करण्याचा मूळ मार्ग वर सुचविलाच आहे. परंतु ज्या अर्थीं त्या निंदकांत कित्येक प्रसिद्ध विद्वानांची गणना आहे त्या अर्थीं त्यांचें ह्मणणें काय आहे, व ते त्यास काय आधार दाखवितात, व त्यांचें खंडण कसें होतें इत्यादिकांचें केवळ दिक्प्रदर्शन करणें येथें इष्ट आहे.

आह्मी एका प्रसिद्ध विद्वानांशीं बोलत असतां त्यांणीं आपलें मत या विषयाचे संबंधें आह्मांस सांगितलें. तें असें:—"मला हिंदुस्थानचा इतिहास चांगलासा माहित नाहीं. मी जातीचा महाराष्ट्र ब्राह्मण पडलों ह्मणून मला पुष्कळ इंग्रजलोक आमच्या संस्थानाच्या इतिहासाच्या सं-

वंशानें प्रश्न करितात तेव्हां त्यांचे उत्तराची मी हेळसांडच करितों. या विषयावर नवीन ग्रंथ होतात ते वाचण्याचे खटपटींतही मी पडत नाहीं. लहानपणीं शाळेंत असतां मी 'मरेज ब्रिटिश इंडिआ' हा ग्रंथ वाचला तेवढाच कायतो. हिंदुस्थानाच्या इतिहासाचें अध्ययन करावें असें मला वाटत नाहीं; कां कीं कोणी स्वदेशाचा किंवा कांहीं सुमताचा अभिमान धरून सत्याची निष्ठा बाळगून जन्मादारभ्य मेहनत केल्याचीं उदाहरणें त्यांत मुळींच सांपडत नाहींत. जिकडे पहावें तिकडे स्वार्थ व आपलपोटपणा प्रबल दिसतो. एका राजानें दुसऱ्यास मारावें, त्यास आणखी कोणी येऊन मारावें, व केवळ आपमतलबाकरितां त्याचें राज्य हिरावून घ्यावें, अशा ज्यांच्या कृति, ज्यांच्यापासून लोककल्याण झालेंच नाहीं, अशांचा इतिहास परिश्रम करून शिकणें ह्मणजे काळ व्यर्थ घालविणें होय. मराठ्यांच्या इतिहासाविषयीं ह्मणाल तरी हेंच माझें मत आहे. जिकडे पहावें तिकडे लूट व आपमतलब यांवांचून त्यांचे कृतींत कांहीं दिसत नाहीं. शिवाजी झाला तरी काय? तो दगेखोर कपटी होता. **अफजुलखानास** कसें त्यानें विश्वासघात करून मारिलें?"

ज्या गृहस्थाचें हें मत आह्मी वाचकांपुढें सादर केलें ते कोणी साधारण मनुष्य नव्हत. ते मोठे विद्वान् असून ज्यांस राजकार्यधुरंधर हा किताब दिल्यास केवळ शब्दालंकारसाच होणार नाहीं असे आहेत. यांचें जसें हें मत आहे असेंच पुष्कळांचें आहे. तेव्हां त्यांचे मताचा विचार केलाच पाहिजे.

वर सांगितलेले मताचा जर पूर्ण विचार केला तर त्यावरून प्रथम एक गोष्ट लक्षांत येते, ती अशी कीं, ज्यांचें मत वर लिहिल्याप्रमाणें असतें त्यांस या विषयाची माहिती फारच जुजबी ह्मणजे थोडी असते. या गोष्टीस इलाज त्यांना "अधिक अध्ययन करा" ह्मणून सांगणें याशिवाय दुसरा नाहीं. आतां त्यांचें आपमतलबाविषयीं जें ह्मणणें आहे त्यास आमचें उत्तर असें आहे कीं, आपमतलब आमचेच देशाचे इतिहासांत बलवत्तर आहे असें नाहीं. सर्वत्र हीच गोष्ट नजरेस येते, व जग जितकें या मनोविकारानें भरलें आहे तितकें दुसरें कशानें भरलें नाहीं. जितक्या लढायांचें मूळ हा विकार आमचे देशांत ठरेल तितकाच दुसरेही देशांत ठरेल. शिवाय आपमतलब किंवा स्वार्थ या शब्दास इतकें कां कंटाळावें हेंही आह्मांस पुरतें कळत नाहीं. स्वार्थ ज्यास

चांगला समजेल त्यांस पुष्कळ समजलें असें ह्मटल्यास चालेल. तत्रापि हिंदुस्थानांत सत्याचा अभिमान धरून कोणीच परिश्रम केले नाहींत असें एक अज्ञानी लोकांनीं मात्र ह्मणावें. आमच्या लोकांस जरी इतिहासाची गोडी नव्हती, व इंग्रजलोकांप्रमाणें जरी आमचे लोकांस आपले राष्ट्रांतील महान् व प्रतापी लोकांचें स्तोम मिरविण्याची संवय नाहीं, व ज्यास इंग्रजींत 'डिइफिकेशन' ह्मणजे देव बनविणें ह्मणतात, तेंही जरी आमचे लोकांस आवडत नाहीं, तरी सत्याची श्रद्धा बाळगून धनाची व प्राणाची कांहीं एक फिकीर न बाळगतां शतशः उदार कृत्यें केलेल्या पुरुषांचीं उदाहरणें आमच्या बखरांतून कमी सांपडतात असें नाहीं. तीं ज्यांस माहीत आहेत असे लोक आमच्या लोकांस एकाएकीं नांवें ठेवण्यास सिद्ध होणार नाहींत. आमचे लोकांचे इतिहास बहुधा परकीय लोकांनींच लिहिलेले सर्वत्र प्रसिद्ध असल्यामुळें पुष्कळ गोष्टी ज्या आह्मांस भूषणास्पद आहेत त्यांचा उल्लेख कोठें नसतां, ज्यांच्यायोगें आह्मांस कलंक लागणार तेवढ्या मात्र वारंवार लिहिलेल्या असतात. असल्या लेखांपासून आमच्या देशबांधवांच्या मनावर जे ग्रह होतात ते केवळ शोचनीय होत. त्यांस वाटूं लागतें कीं "आह्मी लो... यांचीच ... वंचक आहों. आमची सुधारणा कधीं व्हा... कशास करावी ?" उघडच आहे कीं एकदां फळ चांगलें येण्याची ... अशी समजूत झाली त्यांचे हातून ह्मणण्यासारखें महत्कृत्य होणें दूरापास्त आहे. ते केवळ भूमीस भार होत. कठीण प्रसंगीं, आपण सत्यास न ढळतां, आपले राष्ट्राचा व आपल्या कुळाचा नक्षा राखावा अशी हिंमत त्या बिचाऱ्यांच्या मनांत कोठून उद्भवणार ? ज्यांस आपलें कर्तव्य करणें हाच आपले राष्ट्राचा किंवा कुळाचा उदारक्रम आहे असें वाटणार नाहीं, त्यांचे हातून कठीण प्रसंगीं अश्लाघ्य वर्तनावांचून काय होणार आहे ? स्वामिकार्यावर प्राण अर्पण करणें हें आपलें कुलव्रत होय असें ज्यांस वाटणार नाहीं, त्यांचे हातून **बाबाजी प्रभु देशपांडे** यांप्रमाणें आमचे देशाचे शत्रूवर तुटून कसें जाववेल ? ज्या प्रजेस आपलें महत्त्व वाटत नाहीं, जीस स्वदेशांतील महान् पुरुषांचा अभिमान नाहीं, ती प्रजा धिक् होय, व त्या प्रजेचा प्रभु अतिदीन होय. आपआपल्या लोकांच्या महत्कृत्यांची आठवण ठेवणें सर्वराष्ट्रांस अवश्य आहे, व जो हा सर्वांस

उचित क्रम तो आह्मांसही आचरिला पाहिजे. या अवश्य कृत्यास जर आमच्या बखरा साधनीभूत होत असतील तर त्या प्रसिद्ध करण्यास आणखी दुसरें योग्य कारण तें कोणतें पाहिजे ?

याप्रमाणें आह्मीं जे लेख प्रसिद्ध करणार त्यांचे उपयुक्ततेविषयीं विवेचन झालें. आतां त्यांचें इतिहाससंबंधें महत्त्व कसें काय आहे व त्यांची भाषापद्धति कशी काय आहे याविषयीं थोडेसें लिहून ही प्रस्तावना पुरी करितों.

आमच्या बखरी बहुधा गांवठी शाळांतून मुलांस लिखितें ह्मणजे हातानें लिहिलेले कागद, मोडी वाचतां यावें ह्मणून दिलेल्या असतात. ह्या मुलांस त्यांचें महत्त्व बिलकुल माहित नसल्यामुळें त्या बखरांची जी दुर्दशा उडते ती सांगतां पुरवत नाहीं. सबंध बखर मिळणें कठीणच. त्यांत बहुधा प्रथमचीं व शेवटचीं पत्रें गाहाळ झालेलीं. यामुळें ती बखर कोणी लिहिली व केव्हां लिहिली ? लिहिणारास कोणकोणत्या लेखांची मदत मिळाली, वगैरे कांहीं समजत नाहीं. अर्थातच अशी ज्या लेखांची दुर्दशा झाली त्यांजवर किती भरंवसा ठेवावा याचा निश्चय करतां येत नाहीं. मध्यंतरीं कित्येक पानांवर मुलें आपल्या हातानें वेडे वांकडे मसुदे व माने लिहितात, व बखरांचे बंद बहुधा सुटे असतात ते उतरण्यास देतात तेव्हां त्यांतूनही कांहीं हरविले जातात. एतावता साद्यंत ग्रंथ मिळणें कठीण.

याशिवाय आणखीं कित्येक न्यूनता या लेखांत आहेत. हे ग्रंथ बहुशः कारकुनी वाणा वाळगणाऱ्या ह्मणजे साधारण कारकुनास जितकें ज्ञान असावें तितकें ज्ञान असणाऱ्या लोकांनीं लिहिले आहेत; ह्मणून यांची भाषा व्याकरणरहित व फारसी शब्दमिश्रितही असते; व भलतेच ठिकाणीं त्यांत जमाखर्ची डौल मिरविलेला आढळतो. अमक्यास पांच मुलें होतीं असें सांगणें असल्यास "तपसील" ह्मणून खालीं मुलांचीं नांवें जमाखर्चासारख्या सदरांत घालून एक ओळ ज्यास्त लिहून प्रसंगीं तेथें "लंग" असा शब्द लिहिलेला असतो. याचप्रमाणें सैन्याच्या यादी, मालाच्या झडत्या, कोट, दुर्ग यांचीं नांवें, बहुधा जमाखर्ची तोरावर दिलेलीं असतात. हरिभक्तिपरायण **हेमाडपंत** यांणीं जो शिक्षाक्रम आपल्या नीतींत सांगितला आहे त्या क्रमास अनुसरून या बखरी लिहिलेल्या आहेत. तेव्हां यांस एकरीत्या 'हेमाडपंती' हें

नांव दिल्यास अयोग्य होणार नाहीं. वाक्यें बहुधा लहान लहान असतात, व कित्येक ठिकाणीं त्यांपासून भाषा उद्दामसी वाटते, परंतु कोठें कोठें वाक्यें इतकीं लांब व असंबद्ध असतात, कीं त्यांस कोणतेही प्रकारचें आळें घालूं ह्मटल्यास तसें होऊं शकत नाहीं. एकदा लिहिणाराची लेखणी घसरली कीं तीस सांवरण्याचा उपायच नाहीं. आलीकडे मराठींत ग्रंथ लिहिण्याचा पाठ इंग्रजीचीं भाषांतरें करण्यामुळें पडला आहे, व जेथें भाषांतर करणारास यत्किंचित् अडचण पडते तेथें तो इंग्रजींतील एका वाक्याचीं वेळेवर दहा वाक्यें करण्यास मागें पुढें पहात नाहीं व असें करण्याचें कारण देशभाषेचें दौर्बल्य ह्मणून तो सहज सांगतो. परंतु आपल्या बोलण्यांत हमेशा लहान वाक्येंच येतात असें नाहीं, व जीं वाक्यें बोलण्यांत येतात तीं बहुधा भाषापद्धतीस सोडून नसतात, तेव्हां लांब वाक्य झालें ह्मणून व त्याचा अन्वय थोडा दूर झाला ह्मणूनच त्यास दोष देणें योग्य नाहीं. त्यांत हल्लीं इंग्रजीप्रमाणें विरामचिह्नें देण्याचा प्रघात पडला आहे यामुळें तर अशीं वाक्यें जरी प्रथमदृष्ट्या दुर्घट भासतात तरी तीं विरामचिह्नांवर लक्ष्य देऊन वाचल्यास झटकर सुगम होतात. आह्मांस वाटतें अशा वाक्यांचा अविच्छिन्न त्याग करणें ह्मणजे भाषेची शक्ति कमी करणें होय. बखरांतील वाक्यें जीं बहुधा लांब असतात तीं बहुशः व्याकरणरहित असतात. तशीं जर नसतीं तर आह्मीं त्यांस दूषण मुळींच दिलें नसतें. याशिवाय वाक्यामध्यें कार्यकारणभाव नसतो किंवा विपरीत असतो असें ह्मटलें पाहिजे. उदाहरणार्थः—"संभाजी महाराज दिलेलखानाकडून आलियावरी शिवाजी महाराज यांणीं बोध करून पनाळियावरी रहावें असा निश्चय करून तेथें ठेविले. त्यांस कारभारी विठ्ठल त्रिंबक महाडकर देशपांडे बाजी मुरार यांचे नातू हे खासनिशी करून देऊन पनाळियावरी महाराजांचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करून राहिले." या वाक्यांत 'देऊन' याचा संबंध महाराजांकडे व 'राहिले' याचा संबंध देशपांडे यांजकडे आहे. याप्रमाणें **ऊन** प्रत्ययांत अव्यय आल्यास कार्यकारणाचा संबंध लिहिणाराचे मनांत वागत नाहीं. बहुधा जे जुने मराठी लेख आह्मी पाहिले आहेत त्यांत ही चूक आढळतेच. फारसी व उर्दूभाषेंत असे असंबद्ध प्रयोग वारंवार नजरेस येतात; तेव्हां ही सड आमचे कारकून मंडळीनें मुसलमान ग्रंथकारांपासून घेतली असावी. तसेंच स्वकीय लोकांस गलीम

किंवा गनीम ह्मणजे लुटारू असें जें बखरींत ह्मटलेलें असतें तेंही फारसी ग्रंथकारांच्या पद्धतीस अनुसरून असतें. कदाचित् मुसलमानी तवारिख ह्मणजे इतिहास यांच्या आधारानेंही आमच्या बखरा क्वचित् लिहिलेल्या असाव्यात, असाही संशय यावरून उत्पन्न होतो. मराठी कवितेमध्यें ज्याप्रमाणें स्त्रीलिंगीं तृतीय पुरुषीं सर्वनामाचे ठिकाणीं तृतीय पुरुषीं नपुंसकलिंगीं सर्वनाम योजिलें असतें, त्याप्रमाणें या लेखांतही पुष्कळ ठिकाणीं असतें. व "कीं" च्या ठिकाणीं "जे" लिहिलेलें असतें. पत्रांत 'विज्ञापना ऐसी जे' ह्मणजे 'विज्ञापना कीं' हें जसें लिहिलें असतें तसें. बहुत ठिकाणीं तृतीयांत कर्ता ईकारांत आढळतो.

हिंदुलोकांत वास्तविक ज्यास इतिहास ह्मणावें असे ग्रंथ नाहींत ह्मटल्यासही चालेल. कल्हणकृत 'राजतरंगिणी' नामक काश्मीर देशाचा वृत्तान्त मात्र इतिहासाच्या तऱ्हेवर कवितेंत लिहिलेला आहे. तसेंच अलीकडे बिल्हण कविकृत 'विक्रमांकचरित' ह्मणून कवितारूप इतिहास डाक्तर बुह्लर साहेब यांणीं प्रसिद्ध केला आहे, व आमचे ऐकण्यांत 'कालिंदीमाहात्म्य' ह्मणून दिल्लीकडील राजांचा इतिहास संकृत भाषाबद्ध आहे, परंतु तो उपलब्ध नाहीं. तथापि या ग्रंथांस इतिहास ही संज्ञा देतां येत नाहीं; कारण त्यांचे कर्ते कवि होते, व त्यांचें लक्ष इतिहास लिहिण्यापेक्षां आपलें कवित्व प्रकट करण्याकडेस जास्त होतें. पुराणें हींही आमच्यांत एका प्रकारें इतिहास मानिले आहेत. यापुढें मुसलमानांनीं लिहिलेले इतिहासाचा आमचे लोकांस परिचय झाला. या दोन्ही प्रकारच्या इतिहासाचे व कारकुनी बाण्याचे मासले मराठी बखरांत सांपडतात. ज्याप्रमाणें पुराणाचे आरंभीं विवक्षित कथा कोणी एक ऋषि कोणे एकादे राजास सांगत आहे असें वर्णन केलें असतें; तसेंच कित्येक बखरांत लिहिलेलें असतें. व ज्याप्रमाणें पुराणांत क्वचित् स्थळीं पुराणाची कथा सांगणारे मुनि मध्येंच अल्प स्वल्प आपल्या तर्फेचीं वाक्यें घालतात व तेणेंकरून कोण कोणास ही कथा सांगत आहे त्याची वाचकांस स्मृति होते, तोच प्रकार आमचे बखरांचा आहे. कित्येक बखरा साताराकर भोंसल्यांच्या वंशांतील कित्येक राजांच्या हुकुमावरून त्यांच्या पदरच्या लोकांनीं पूर्वींचे कागदपत्र पाहून लिहिल्या आहेत, व सर्वांहून विश्वासास्पद आहेत. कित्येक बखरांत महाराष्ट्र लोकांविषयीं मुसलमान ग्रंथकारांनीं लिहिलेलाच मजकूर जमेस धरून पाल्हाळ केलेला असतो. अशा

प्रकारच्या बखरा बहुधा फारशी लेखांवरून उतरल्या असाव्या असा सं-
शय येतो, व त्या विश्वासार्ह नाहींत. कित्येक बखरांत, त्या कोणी व कशा
केल्या, याविषयीं आरंभीं कांहीं वृत्तांत लिहिला नसून, साधारण "राज-
मान्य राजश्री" हा प्रसिद्ध पत्राचा माना आरंभीं लिहिला असून फला-
ण्यानें फलाण्याच्या लिहिण्यावरून फलाण्यास ही बखर पाठवून दिली
आहे इतकेंच लिहिलेलें असतें. आमचे गांवठी शाळांतील मुलें अक्षर घ-
टावें ह्मणून बखरांच्या नकला करितात व कारकुनाचें काम मिळावें या-
पेक्षां दुसरा त्यांचा उद्देश नसतो. त्यांस साधारण पत्रें लिहितां यावीं ह्म-
णूनच असे माने दिलेले असतात.

केवळ मराठ्यांनीं जे ग्रंथ केले त्यांत त्या बखरांची गणना करणें योग्य
आहे. उत्तम इतिहास कोणता याविषयीं मतभेद आहे. यांतील एका म
ताचें असें ह्मणणें आहे कीं, इतिहासकारांनीं आपला अभिप्राय ह्मण ... र गून
देऊंच नये. जें काय झालें तें इत्थंभूत सांगितलें ह्मणजे झालें. ... प्रमाणें मत
ज्यांस मान्य असेल अशा वाचकांस आमच्या मराठी बखरा ... वाचून ब-
राच आनंद होईल, ... शूरत्वाचीं ... बारीक ... सांगण्याची शर्थ
... जीं महाराष्ट्र लोकांनीं केलीं व
ज्याचा मागमूस इंग्रजी ग्रंथांत, ... पुरुषाचें नांव लिहिण्याच्या व वाच-
ण्याच्या अडचणीमुळें ह्मणा, किंवा आणखी अशाच दुसऱ्या अडचणी-
मुळें ह्मणा,—कांहीं लिहिलेला नाहीं, अशा कृत्याविषयीं लहान लहान
चटकदार गोष्टी लिहिलेल्या असतात. त्या लोकांस माहित असाव्या
हें केवळ जरूर आहे व या कथा बखरांच्या साहाय्यानेंच आह्मांस उ-
पलब्ध आहेत ह्मणून बखरा छापविणें फार प्रशस्त आहे. के साहेबानीं
केलेला १८५७चे बंडाचा इतिहास ज्यांनीं वाचला असेल त्यांचे लक्षांत
सहज येईल कीं त्या ग्रंथामध्यें बंडाचे दुर्घट प्रसंगीं मोठ्या सेनाधिपती-
पासून तों साधारण शिपायापर्यंत ज्या कोणी ह्मणून मर्दुमकीचें कांहीं
काम केलें त्याचें त्याचें यथायोग्य वर्णन ग्रंथकारानें केलें आहे. कोणा-
चीही हेळसांड केलेली नाहीं. याचें कारण उघडच आहे. आपल्या लो-
कांत पूर्वींच्या लोकांनीं केलेल्या महत्कृत्याची आठवण राहून त्यांना
प्रसंगीं त्यांच्या प्रमाणेंच वर्तण्याचा उत्साह रहावा.

जें हें वर आह्मीं बखरांचें बरेंच तपसीलवार वर्णन दिलें यावरून ए-
खाद्यास असें वाटेल कीं या लेखाची भाषा वगैरे पाहतां तींत गुण ह्मण-

ण्यासारखा विशेष कांहीं नाहीं; व ते केवळ अर्वाचीन होते, ह्मणून ते प्रसिद्ध करण्यांत विशेष अर्थ नाहीं. परंतु ज्यांची अशी समजूत होईल त्यांणीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं या लेखांत तूर्तच न जपल्यास ते नाहींसे होतील व ते प्राचीन होण्याचा वेळ आला ह्मणजे ते मिळणारच नाहींत व आपले प्राचीन इतिहासाची जी दुर्दशा झाली आहे तीच अर्वाचीन इतिहासाचीही होईल. आह्मांस असेंही वाटतें कीं प्राचीन इतिहासाचीं साधनें मिळविण्याच्या खटपटींत पडावें त्यापेक्षां अर्वाचीन इतिहासाविषयीं साधनें मिळविण्यांत श्रम करावे यांतच फळप्राप्ति जास्त आहे. हिंदुस्थानांतील प्राचीन इतिहासाचीं साधनें अति कष्ट करूनही उपलब्ध होत नाहींत व उपलब्ध झाल्यासही तीं अशा प्रकारचीं असतात कीं त्यांपासून विशेष लाभ होत नाहीं. या सर्व विचारांवरून पाहतां आह्मांस प्रस्तुतचा व्यवसाय पुष्कळ अंशीं उपयुक्त वाटतो. इतकेंच नाहीं, परंतु असेंही वाटतें कीं या व्यवसायास आमचे राजेरजवाडे व इंग्रजसरकार यांणींही मदत करण्यासारखा हा आहे. **सर. एच्. यम्. इलियट** साहिब यांणीं "History of India, as told by its own historians" ह्मणून सुमारें पांचपांचशें पानांचें अष्टपत्री सांच्याचें एक एक पुस्तक अशा आठ पुस्तकांचा ग्रंथ इंग्रजींत केला आहे. त्यांत बहुतेक उपलब्ध मुसलमान इतिहासकार, ज्यांनीं हिंदुस्थानाविषयीं कांहीं लिहिलेलें आहे त्यांचे ग्रंथांतील उतारे दिलेले आहेत. या ग्रंथांतील उतारे ज्यांनीं वाचले असतील त्यांस माहितच असेल कीं ते उतारे किती अल्प योग्यतेचे आहेत; असें असतांही तो ग्रंथ छापण्यास इंग्रज सरकारानें बहुत मदत केली होती. परंतु प्रस्तुतच्या व्यवसायास तशी मदत मिळेल अशी आशा करितां येत नाहीं. पुष्कळ इंग्रज लोकांची अशी समजूत आहे कीं आमचे लोक जितके हतवीर्य होतील तितके चांगलेच ही समज किती कोती आहे हें सिद्ध करणें अगदीं सोपें आहे. पहा कीं इंग्रज लोकांस सुमारें एक लक्ष काळी फौज ठेवावी लागते व हिचा खर्च निदान दोन चार कोट रुपये सरकारास पडत असेल. या फौजेंतील लोकांस अनुकरण करण्यास त्यांचे मेजर सुभेदार बहादर कदाचित् जातीचे महार किंवा चांभार, या शिवाय दुसरा नमुना नसतो. त्यांस त्यांचे देशांतील महान् पुरुषांचा वृत्तांत माहित नसल्यामुळें तद्द्वारें त्यांस स्फुरण येण्यास कांहीं आधार नसतो, व ज्या सरकाराचे ते नोकर असतात, त्या

सरकाराचे संबंधाचे वीर पुरुषांची महिती त्यांस नसते. तेव्हां कठीण प्रसंगीं अशा फौजेपासून तिच्या पोशिंद्यास किती उपयोग होईल हें सुज्ञ वाचणारांस सांगणें नलगे. जर आमचे काळे फौजेंतील लोकांस त्यांच्या जातीच्या वीर पुरुषांचीं चरित्रें माहित होतील, जर त्यांस कळेल कीं आपल्या जातीमध्यें शतशः असे पुरुष होऊन गेले कीं ज्यांनीं स्वामिकार्यावर त्यक्तप्राण होऊन मुनिलोकांसही जी गति अलभ्य ती संपादिली, तर ते सरकारचे आहेत यापेक्षां योग्य नोकर बनतील यांत आह्मांस तर बिलकुल संशय नाहीं. तथापि वर सांगितलेला विपरीत ग्रह सरकारचे कामदारांचा आजच जातो असें नाहीं तेव्हां सांप्रत प्रस्तुतसारख्या उद्योगास स्वकीयांनींच आश्रय दिला पाहिजे, ही विज्ञप्ति करून आमचे जवळील मराठ्यांचे इतिहासाचीं साधनें प्रसिद्ध करण्यास आरंभ करितों. आमच्या जवळ जीं साधनें आहेत त्यांशिवाय आणखी इतर ज्यांचे पाशीं असतील त्यांणीं तीं आह्मास पाठविल्यास त्यांचा आभारपूर्वक स्वीकार करून याच प्रमाणें त्यांचीही सोय केली जाईल.[१]

१ "विविज्ञान विस्तार"मध्यें ही शिव छत्रपतींची बखर छापण्यास सुरुवात झाल्यानंतर लवकरच "काव्येतिहाससंग्रहा"चा उदय झाला, त्यांत मराठी बखरींचा आणि मराठ्यांच्या इतिहासाच्या अन्य साधनांचा स्वतंत्र रीतीनें समावेश होऊं लागल्यामुळें वरील बखर छापून समाप्त झाल्यावर वि० ज्ञा० विस्तारनें पुढील काम आपल्या नव्या भावंडावरच सोंपविलें, आणि तें त्यानें उत्तम रीतीनें बजाविलें हें मराठी वाचकांस सांगावयास नकोच. काव्येतिहाससंग्रह अझूनही जर जिवंत असता तर आणखीही बरींच इतिहासाचीं साधनें सर्वांस उपलब्ध झालीं असतीं. परंतु जीं सध्या उपलब्ध आहेत तीं हीं एकादा स्वतंत्र मराठ्यांचा इतिहास लिहिणारास पुरे आहेत, मात्र लिहिणारास इच्छा पाहिजे आणि त्याच्याठायीं योग्यता पाहिजे.

२०७४८

# श्रीशिवछत्रपतिमहाराज

## यांचें चरित्र.

### शिवछत्रपति यांचें जन्म व पूर्वजवर्णन प्रकरण प्रथम.

स्वस्ति श्री राज्याभिषेक १३७ प्रमोदी नाम संवत्सरे ज्येष्ठ बहुल ६ भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजाधिराज श्रीमहाराज प्रतापी शाहूनृपति छत्रसिंहासनाधीश्वर स्वामी यांनीं राजमान्य राजश्री मल्हार रामराव चिटणीस यांस आज्ञा केली ऐसी जे,—'तुह्मी पुरातन सेवक लेखनाधिकारी, याजकरितां पूर्वीपासून महाराजांचे कुळाचे ठायीं परमप्रतापी पूर्वज होत आले, त्यांनीं पराक्रम केले, सार्वभौम राज्यें केलीं, तदनंतर काळेंकरून म्लेंछ राजे होऊन संपूर्ण पृथ्वींतील धर्मोच्छेद केला, श्रीदेवब्राह्मण तीर्थें व क्षेत्रें गायी व प्रजा यांस पीडा नानाप्रकारेंकरून बहुत केली असतां, पुन्हां श्रीशिवछत्रपतिअवतार होऊन धर्मस्थापना केली, व राज्य आक्रमण केलें; त्यांजपासून आजपर्यंत राज्योपभोग वंशपरंपरागत दक्षणेचे ठायीं कसे केले, पराक्रम काय केले, हें चरित्र पूर्वील दाखले वगैरे लिहून ठेविले असतील त्यांअन्वयें लिहून आणावें, जें श्रवण पठण मनन केलें असतां सकलविद्या व गुणसंपन्नता व शौर्य औदार्य गांभीर्य दया धर्म नीति हे सहज उत्पन्न होत असावे,' ह्मणून आज्ञा झाली. त्याजवरून शास्त्राधार विष्णुपुराणादि पुराणांतील भाव, दंडनीति, राजधर्म, राजमयूख व रमलशास्त्र व कारकोर्दी वडिलार्जित होत्या, दिनचर्या, पराक्रमकथा त्यांचे आश्रयेंकरून [मीं] लिहून निवेदन केलें कीं, पूर्वीं तीन युगें होऊन गेलीं. सांप्रत कलियुग प्राप्त झालें. त्याची संख्या वर्षें सुमार ४३२०००, त्यांत गतकलि वर्षें ४९११ प्रमोदी संवत्सर चालला आहे यापर्यंत झालीं. कलियुगास प्रारंभ झाल्यापासून युधिष्ठिरशक प्रथम झाला. वर्षें ३०४४ चालला. त्यांत प्रथमपासून राजे— आधीं युधिष्ठिर ह्मणजे धर्मराज याचे नातू परीक्षितिपासून पुढें वंशाचे ३० पुरुष झाले त्यांचा तपशील.—

| | | व० | म० | दि० |
|---|---|---|---|---|
| १ | परीक्षिति, अर्जुनाचा नातू.. | ६० | १ | ० |
| २ | जनमेजय. .. .. .. | ८४ | ५ | २७ |
| ३ | शतानीक. .. .. .. | ८२ | ८ | २४ |
| ४ | अश्वमेध. .. .. .. | ८८ | २ | ८ |
| ५ | कृष्ण. .. .. .. | ८१ | ११ | २४ |
| ६ | नेमीचक्र. .. .. .. | ७५ | ८ | ८ |
| ७ | प्युष्ण. .. .. .. | ७५ | १० | ८ |
| ८ | चित्ररथ. .. .. .. | ७७ | ७ | २४ |
| ९ | शुचिरथ, .. .. .. | ७९ | ८ | ६ |
| १० | वृष्णिमान्. .. .. .. | ६१ | ५ | २ |
| ११ | सुषेण. .. .. .. | ६५ | १० | २९ |
| १२ | सुनीथ. .. .. .. | ६४ | ७ | ३ |
| १३ | रुचि. .. .. .. | ६५ | ८ | १९ |
| १४ | नृचक्षु. .. .. .. | ६२ | ० | ३ |
| १५ | सुखीबल. .. .. .. | ६१ | ५ | ४ |
| १६ | परिप्लव. .. .. .. | ७२ | ११ | ३ |
| १७ | सुनय. .. .. .. | ५८ | ० | ८ |
| १८ | मेधावी. .. .. .. | ५० | ३ | २० |
| १९ | नृपंजय. . .. .. | ५२ | ४ | ७ |
| २० | मृदु. .. .. .. | ४८ | १० | २९ |
| २१ | तिग्म. .. .. .. | ४७ | १० | २९ |
| २२ | बृहद्रथ. .. .. .. | ४७ | ११ | ० |
| २३ | वसुदास. .. .. .. | ४४ | ८ | १७ |
| २४ | शतानीक (दुसरा) .. .. | ५६ | ० | ० |
| २५ | उदयन. .. .. .. | ५४ | १० | २ |
| २६ | अहीनर. .. .. .. | ५१ | ११ | ८ |
| २७ | दंडपाणी. .. .. .. | ४८ | ७ | ४ |
| २८ | निरमित्र. .. .. .. | ५८ | ५ | १५ |
| २९ | क्षेमक. .. .. .. | ३८ | ११ | २२. |

असे युधिष्ठिरापुढें परीक्षितिपासून क्षेमकापर्यंत २९ व युधिष्ठिरसुद्धां ३० झाले. तेव्हां कलियुगाचा प्रादुर्भाव, बहुत अधर्मप्रवृत्ति झाली. याजमुळें [क्षेमक राजा] उत्तरेस कलापग्रामीं जाऊन कलीचे योगें योगारूढ होऊन राहिला. जातेसमयीं राज्य सुनीकप्रधान यास दिलें. तोही [राज्य] आपले पुत्रास देऊन राजाबरोबर तपास गेला. त्याचे वंशीं महानंदापर्यंत १९ पुरुष झाले ते.—

| | | व० | म० | दि० |
|---|---|---|---|---|
| १ | प्रद्योत. .. .. .. | १७ | ७ | ५ |
| २ | पालक. .. .. .. | ३२ | ८ | ११ |
| ३ | विशाख. .. .. .. | ३७ | ८ | २२ |
| ४ | जनक. .. .. .. | ३२ | १० | १० |
| ५ | नंदिवर्धन. .. .. .. | ३५ | ९ | १७ |
| ६ | शिशुनाग. .. .. .. | ४३ | २ | ४ |
| ७ | काकवर्ण. .. .. .. | ४२ | ९ | २४ |
| ८ | क्षेमधर्मा. .. .. .. | ३८ | २ | २५ |
| ९ | क्षत्रौज. .. .. .. | ३५ | ४ | २४ |
| १० | बिंबिसार. .. .. .. | ३० | ८ | ११ |
| ११ | अजातशत्रु. .. .. .. | १५ | १० | ८ |
| १२ | दर्भक. .. .. .. | २७ | ७ | १५ |
| १३ | शोच्योदन. .. .. .. | २६ | २ | १३ |
| १४ | नंदिवर्धन (दुसरा) .. .. | ३५ | ४ | १ |
| १५ | महानंद. .. .. .. | ३५ | ८ | ७ |

हा महानंद राजा सोमवंशीं झाला. तो कलीचे योगेंकरून परमउग्रस्थिति, अधर्मवासना, विषयलंपट, परस्त्रियागमनकर्ता झाला. त्यानें शूद्रवर्ण व वैश्यवर्णाच्या स्त्रिया करण्यास अधिकार आहे असा धर्म स्थापून शूद्रवर्णाच्या स्त्रिया विवाहित केल्या. त्यांजपासून पुत्र झाला त्याचें नांव महापद्मानंद असें ठेऊन त्यासच राज्याधिकार देऊन राज्य दिलें. शूद्रवर्णीत व्यवहारसंपर्क अन्नादि होऊं लागला. सूर्यवंश सोमवंश या कुळीं संपूर्ण राजे यांतही व्यवहार झाला. त्या दिवसापासून राजपुत्र झाले ते 'रजपूत' ह्मणवून क्षत्रधर्मेंकरून उत्तरदेशीं राज्य करिते झाले ते.—

| | | व० | म० | दि० |
|---|---|---|---|---|
| १ | महापद्मानंद. .. .. .. | २८ | ८ | १० |
| २ | कौटिल्य चंद्रगुप्त. .. .. | २८ | ११ | १० |
| ३ | बिंदुसार. .. .. .. | २९ | ७ | २१ |
| ४ | अशोकवर्धन. .. .. | ३२ | ५ | १० |
| ५ | सुयश. .. .. .. | २२ | ० | ११ |
| ६ | दाशरथी. .. .. .. | २३ | ६ | २७ |
| ७ | संगत. .. .. .. | १८ | ७ | २९ |
| ८ | शालिशुक. .. .. .. | ३५ | २ | २० |
| ९ | सोमशर्मा. .. .. .. | २३ | ८ | १५ |
| १० | धृतधन्वा. .. .. .. | ११ | २ | २ |
| ११ | ब्रह्मरथ. .. .. .. | १० | २ | १० |

महापद्मानंद याचा वंश ब्रह्मरथापर्यंत ११ पुरुष होऊन राज्य केलें. पुढें निर्वंश झाला. त्याचा सेनापति पुष्पमित्र यानें राज्य आक्रमण करून [तें] करूं लागला. त्याचा वंश.—

| | | व० | म० | दि० |
|---|---|---|---|---|
| १ | पुष्पमित्र. ... .. .. | २४ | २ | ० |
| २ | अग्निमित्र. .. .. .. | १६ | ९ | २४ |
| ३ | ज्येष्ठ. .. .. .. | २४ | ४ | १८ |
| ४ | वसुमित्र. .. .. .. | १९ | १ | २१ |
| ५ | दशाद्रक. .. .. .. | १८ | ४ | ४ |
| ६ | पुलिंद. .. .. .. | १८ | २ | २२ |
| ७ | घोषवसु. .. .. .. | ३७ | १ | १२ |
| ८ | वज्रमित्र. .. .. .. | २८ | ७ | २७ |
| ९ | भागवत. .. .. .. | १६ | १० | १३ |
| १० | देवमूर्ति. .. .. .. | १६ | ७ | १९ |

देवमूर्तिपर्यंत १० पुरुष झाले. त्यांचा निर्वंश झाला. त्याचा प्रधान वसुदेव यानें राज्य आक्रमिलें, आणि [तें] करूं लागला. त्याचा वंश.—

| | | व० | म० | दि० |
|---|---|---|---|---|
| १ | वसुदेव. .. .. .. | १२ | ५ | २७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | भूमित्र. .. ... .. | १४ | ९ | २२ |
| ३ | सुशर्मा. .. .. .. | १३ | ४ | ८ |
| ४ | नारायण. .. .. .. | १७ | ७ | १९ |

नारायणापर्यंत ४ पुरुष झाले. त्यांनीं राज्य केलें. त्यांचा निर्वंश झाला. तेव्हां कोणी शूद्रज्ञातीय क्षिप्रक यानें राज्य घेऊन सार्वभौमपद करूं लागला. त्याचा वंश.—

| | | व० | म० | दि० |
|---|---|---|---|---|
| १ | क्षिप्रक. .. .. .. | २४ | १ | १० |
| २ | कृष्ण. .. .. .. | ३१ | ० | १२ |
| ३ | शातकर्ण. .. .. .. | २ | २ | ८ |
| ४ | पूर्णेच्छ. .. .. .. | १२ | ७ | १९ |
| ५ | शातकर्ण (दुसरा) .. .. | ४ | ५ | ९ |
| ६ | लंबोदर. .. .. .. | १३ | १० | ७ |
| ७ | दिवीलक. .. .. .. | १५ | २ | २५ |
| ८ | मेघस्वामी. .. .. .. | १९ | ११ | १३ |
| ९ | शठमान् .. .. .. | १० | ५ | ४ |
| १० | अरिष्टकर्मा. .. .. .. | २६ | ३ | २१ |

अरिष्टकर्मापर्यंत १० पुरुषांनीं राज्य केलें. तोंपर्यंत युधिष्ठिरशक ३०४४ वर्षं झाला. नंतर उज्जनींत राजा विक्रम होऊन त्याचा शक रक्ताक्षि नाम संवत्सरीं झाला. त्यांत हस्तनापुरीं राजे झाले ती संख्या. क्षिप्रक याचे वंशींचा अरिष्टकर्मा, त्याचा पुत्र हल, याचे वंशीं राजे झाले ते.—

| | | व० | म० | दि० |
|---|---|---|---|---|
| १ | हल. .. .. .. | १४ | ९ | १४ |
| २ | प्रविलसेन. .. .. .. | १६ | २ | १ |
| ३ | सुंदर. .. .. .. | २१ | ७ | १२ |
| ४ | चकोर. .. .. .. | १ | ० | १५ |
| ५ | गोमती. .. .. .. | ७ | ५ | १५ |
| ६ | पुलुमान्. .. .. .. | १८ | २ | १७ |
| ७ | शिवश्री. .. .. .. | ७ | ७ | १९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ विजय. .. .. .. | १५ | ७ | ८ |
| ९ चंद्रश्री. .. .. .. | १८ | ४ | ८ |
| १० पुलोमा. .. .. .. | १४ | १ | ११ |

पुलोमापर्यंत १० पुरुष झाले. तेव्हां विक्रमशक एकटाच पृथ्वीवर १३५ वर्षें चालला. नंतर प्रतिष्ठान ह्मणजे पैठण गंगातीर येथें शालिवाहन राजा शककर्ता निर्माण झाला, आणि उभयतां एकावर एक चालून गेले. ते समयीं उभयतांनीं प्रतिज्ञा केली कीं, 'एकानें मृत्तिकेचे घोडे करावे, व एकानें काष्टाचे करावे. ज्याचे घोडे पैलतीरास जातील त्यानें आपला शक चालवावा.' तेव्हां शालिवाहनानें मृत्तिकेचे केले. तेव्हां ईश्वरसत्तेनें दोघांचेही घोडे वाहवले, [व] बुडाले. याजवरून उभयतांनीं तह केला कीं, 'नर्मदापैलतिरीं विक्रमशक चालावा.' याप्रमाणें [ते शक] चालते झाले. त्यांत ५१२ वर्षे शालिवाहन शकांत राजे हस्तनापुरीं झाले. प्रथम आंध्रदेश ह्मणजे तेलंगण [येथून] आंध्रजातीय कोणी राजा मलुकसेन याचा पुत्र सुरसेन हा येऊन पुलोमा यास मारून राज्य घेऊन [तें] आपण करूं लागला. त्याचे वंशीं.—

| | व० | म० | दि० |
|---|---|---|---|
| १ सुरसेन. .. .. .. | १५ | ७ | १२ |
| २ माधवसेन. .. .. .. | १२ | १ | ३ |
| ३ देवसेन. .. .. .. | १० | १ | ५ |
| ४ भूसेन. .. .. .. | ५ | १० | ५ |
| ५ कल्याणसेन. .. .. .. | ४ | ८ | २६ |
| ६ हरिसेन. .. .. .. | १२ | ० | २५ |
| ७ ब्रह्मसेन. .. .. .. | ८ | ११ | ३ |
| ८ नारायणसेन. .. .. .. | ६ | ० | १५ |
| ९ लक्ष्मीसेन. .. .. .. | १६ | ७ | १५ |
| १० दामोदरसेन. .. .. .. | ११ | ५ | १६ |

दामोदरसेनपर्यंत १० पुरुष झाले. तेव्हां अभीर ह्मणजे गौड या जातीचा माधवशिंग ह्मणून उत्तरेकडून येऊन [त्यानें] दामोदरसेन यास मारून राज्य घेतलें. त्याचा वंश.—

| | | व० | म० | दि० |
|---|---|---|---|---|
| १ | माधवशिंग. .. .. .. | १७ | ६ | ६ |
| २ | दीपाशिंग. .. .. .. | १४ | ५ | २८ |
| ३ | राजशिंग. .. .. .. | १२ | ३ | २४ |
| ४ | शेराशिंग. .. .. .. | १० | ८ | ११ |
| ५ | हरिशिंग. .. .. .. | २५ | २ | १५ |
| ६ | नृपाशिंग. .. .. .. | ८ | ४ | ४ |

नृपाशिंगापर्यंत ६ पुरुषांनीं राज्य केलें. तदनंतर धीरधर रजपूत राजा यानें त्यास मारून, राज्य करूं लागला. त्याचा वंश.—

| | | व० | म० | दि० |
|---|---|---|---|---|
| १ | धीरधर. .. .. .. | २२ | ७ | ० |
| २ | सेन. .. .. .. | ३५ | १० | ० |
| ३ | कौनी. .. .. .. | ३५ | २ | ८ |
| ४ | महानु. .. .. .. | २१ | ३ | ९ |
| ५ | बीरनाथ. .. .. .. | २६ | ५ | २५ |
| ६ | जीवन. .. .. .. | २२ | ५ | २५ |
| ७ | उदाईशिंग. .. .. .. | २७ | ४ | २९ |
| ८ | कुळानंद. .. .. .. | २१ | ३ | २८ |
| ९ | विक्रमचंद. .. .. .. | १३ | २ | २६ |

विक्रमचंदापर्यंत [९ पुरुषांनीं] राज्य केलें. ते समयीं पृथ्वीपाळ पाठार प्रभू ह्मणून राजा रजपूत यानें पूर्वेकडून येऊन विक्रमचंद याजला मारून राज्य घेतलें, आणि इंद्रप्रस्थ येथें राजधानी करून राज्य करूं लागला. त्याचा वंश.—

| | | व० | म० | दि० |
|---|---|---|---|---|
| १ | पृथ्वीपाळ. .. .. .. | १४ | ७ | १७ |
| २ | उजेनपाळ. .. .. .. | ११ | ६ | १३ |
| ३ | उदेपाळ. .. .. .. | १३ | ७ | १४ |
| ४ | चेनपाळ. .. .. .. | १९ | २ | १९ |
| ५ | पिटोर. .. .. .. | ३५ | ४ | २५ |

असे ५ पुरुष राज्य करिते झाले. तों शालिवाहन शकाचीं ५१२ वर्षें

झालीं. तोंपर्यंत धर्मेंकरून हिंदु राज्य करीत असतां कलिप्रभावेंकरून ईश्वरसत्तेनें यवनी राज्य दक्षणप्रांतीं व हिंदुस्थानीं व्हावें हा योग प्राप्त झाला.

ते समयीं पूर्वी पृथ्वीच्या ठायीं सात पैगंबर अवलिया फकीर प्राप्त झाले होते, तेव्हां सुलतान रुकदीनपाशीं तिमीरलंग ह्मणून कोणी यवन पुण्यवान् होता. त्याची [व] पैगंबर याची गांठ पडून त्यानें त्याची सेवा बहुत निष्ठेनें केली. तेव्हां त्यास पैगंबर यानें बारा लंगर पाटीवर मारिले ते [त्यानें] सोशिले, आणि 'बस' असें ह्मटलें. तेव्हां त्यानें वर दिला कीं, 'बाराशें वर्षें राज्य तुजला वंशपरंपरेनें इंद्रप्रस्थ हस्तनापूरचें दिलें [तें] तूं करशील. तेसमयीं धर्मराज्य, तेथें आपली देवता प्रवेश कसा करावा, राज्य कसें घ्यावें, ह्मणून पैगंबर व सुलतान रुकदीन यांनीं विचार करून कांहीं यवनांस हिंदूंचे वेश देऊन नगरांतील देवता भ्रष्ट केल्या, हिंदुधर्म भ्रष्ट केला, आपली देवता प्रवेश करविली, आणि वरप्रयोगेंकरून फौज जमा करून पिठोर राजाशीं युद्ध केलें. त्यानेंही बहुतप्रकारेंकरून युद्ध केलें. परंतु जय न घडे. आसमंताद्भागीं सर्व राज्य त्यानें सोडविलें; तेव्हां [पिठोरराजानें] निश्चय केला कीं, 'ईश्वरानें वर देऊन राज्य त्यास दिलें, त्या अर्थी राज्य जातें ह्मणून कबिलें पुरीं करून आपण केशरी पोषाख करून, लढाईंत बहुत शर्त करून गर्दीस मिळाला. राज्य गेलें [तो] शक ५१२ साधारण नाम संवत्सर. नंतर इंद्रप्रस्थ याचें नांव दिल्ली असें ठेऊन [तो यवन] पादशाहा होऊन तख्त करून राज्य करूं लागला. त्याचा वंशविस्तार आजपर्यंत राज्य करीत आहे.

त्याच्या वंशांत मोठेमोठे पराक्रमी पादशाहा झाले. समुद्रवलयांकित पृथ्वीचे राजे जिंकून ते राज्यें घेऊं लागले. जयपूर वगैरे राजे रजपूत यांस [त्यांचा] पराभव करून आपले ह्मणवावे. शिक्क्यांत नांव आपलें घालावें, आपलीं चिन्हें निशाणें वागवावीं, सेवा करावी, कन्या पादशाहास द्यावी, असें आपल्या ह्मणण्याप्रमाणें राहावेसे करून ठेविलें. सर्व पृथ्वी यवनमय करून, आपल्या देवताही स्थापून, आपला धर्म चालवून मोठेमोठे प्रताप केले. बाराशें वर्षांत पंचावन छप्पन पुरुष यांनीं पादशाही करून आपला शक करिते झाले. तो शक 'सन' ह्मणून मृग[नक्षत्रा]वर चालू झाला. त्यास 'इहिदे' ह्मणून आजपर्यंत इहिदेपासून चालतो. त्या वंशीं अकबरशाहा व शाहाशाहा असे बहुत झाले. त्यांचे पराक्रमें 'शाहा' नांव झालें.

दक्षणदेशीं शालिवाहन शके १२०० या शकांत किस्किंदानगर वाली सुग्रीव यांची राजधानी, त्यास हल्लीं विंध्यानगर अनागोंदी ह्मणजे त्या राजाचें हत्ती बांधण्याचें स्थान यास त्या भाषेनें ह्मणावें अशी आख्या आहे, तेथें त्याच स्थानीं किरीटि रामराजा ह्मणून क्षत्रीय होता झाला. त्यानें सहा सुभे दक्षणचे यांत हिंदुधर्म स्थापिला. पुनः देवब्राह्मणभक्त, सुवर्णाची वृष्टी राज्यांत झाली, व श्रीपंढरीहून पांडुरंग भक्तियोगें नेले, अशी जगविख्यात कीर्ति आहे. त्या समयांत ज्ञानेश्वर व भानुदास ब्रह्मनिष्ठ सिद्ध होते. असा [तो] राजा परम धार्मिक धर्माभिमानी झाला. त्यानें एकादशीचे दिवशीं म्लेंछस्पर्श करूं नये ह्मणून निराळें बसावयास घातलें. तेव्हां मातवर यवन सरदार यांस विकल्प येऊन [त्यांनीं] त्याचा प्रधान वैश्य होता त्यास वश करून घेतलें. कलिधर्में धर्मोच्छेद होणें त्या योगें [त्यानें] यवनांस अनुकूल होऊन राजाचा उच्छेद केला. [राजा] दक्षणेस निघोन गेला. नंतर कानडा रामराजा वैश्य यवनाशींसह राज्य करित असतां त्यासही सहाजण म्लेंछ त्या राजांतील सरदार वगैरे होते त्यांनीं धरून कैद केलें. राज्य हरण केलें. तोही दक्षणेस गेला. तेव्हां सहाजण यवनांनीं सहा सुभे वांटून घेऊन पादशाहा असे ह्मणवून [ते] राज्य करूं लागले. त्यांचे वंशांत पादशाहती करूं लागले ते सुभे.—

१ हैदराबाद भागानगर सरकार दारूल खिलाफत.
१ दौलताबाद खुदस्त बुनियाद हल्लीं औरंगाबाद.
१ महंमदाबाद बेदर बिजापुराखालीं.
१ बिजापूर दारूल जफर.
१ सुभे आलनपूर.
१ सुभे गोंडवन नागपूर चांदे.

हे दक्षण साडेसहा सुभे. त्यांचे पोटीं महाल, प्रांत, तालुके, किल्ले, देश, दुर्ग आहेत. त्याप्रमाणें सहाजण वांटून बेदर बिजापुराखालींच घेतलें. सहा पादशाहा मोठे प्रतापी होऊन २७५ वर्षपर्यंत, कोणी २५०, असे पादशाही करिते झाले असतां सूर्य व सोमवंश या कुळांचे ठायीं राजपुत्र रजपूत असे ह्मणवून मोरे, पवार, यादव, जाधव, कछवे, तुवर, भट असे क्षत्रियधर्मेंकरून राज्य करीत आले. तुवर, मोरे, पवार, चव्हाण यांनीं इंद्रप्रस्थीं हस्तनापुरीं राज्य केलें. कछवे जयपुरीं राज्य करि-

तात. जोदपुरीं बलीचा वंश ह्मणून राज्य करितो. बुंदेलखंड गोहदप्रांतीं यादव सोमवंशी राज्य करितात. सूर्यवंश कुलीच्या ठायीं शिसोदे पाठारे प्रभु राजपुत्र हे कोसलदेश अयोध्याप्रांतीं राज्य करीत असतां, त्यांतून कोणी पुरुष दक्षणप्रांतीं येऊन अश्वत्थामा याचें स्थान अशिरी ह्मणतात येथें कलियुग गतकली १५०० प्रमादी नाम संवत्सर युधिष्ठिर शक पंधराशें वर्ष गेला या समयांत येऊन राज्य आक्रमण करून नर्मदा दक्षणतीर विंध्याद्रि व सर्व दक्षणप्रांतींचें राज्य करीत आला. तो सुमार १६८० वर्षे. त्या वंशानें राज्य येथें केलें. तों ३१८० वर्षे कलियुगाचीं झालीं. ते समयीं शालिवाहन राजा शककर्ता झाला. त्यानें प्रमादी नाम संवत्सरीं प्रतिष्ठानीं युद्ध करून [तें] राज्य हरण केलें.

तेसमयीं राजपत्नी, एक राजपुत्र पांचसात वर्षांचा राहिला तो घेऊन नर्मदा उत्तरतीरीं मेवाडप्रांतीं विंध्याद्रिपर्वताचे ठायीं गेली आणि आपण राजस्त्री व हा राजपुत्र हा खेद करून एका ब्राह्मणाच्या घरीं, पुत्रास गायी राखण्यास ठेऊन त्याचे आश्रयानें राहिली. त्यानंतर गोरक्षण करून त्या पर्वतांत असतां त्या मुलास एक लिंग श्रीसदाशिवाचें अकस्मात् अपूर्व दिव्य असें दृष्टीस पडलें. त्यानें ती जागा नीट करून त्या लिंगास नित्य दुग्धाभिषेक करून पूजा करावी. चंदनवृक्ष तोडून गंध करावें. फळें मेळवून नैवेद्य करावा. प्रातःकालापासून सायंकालापर्यंत लिंगाचें आराधन पूजन सेवा करावी. गायी अरण्यांत सोडाव्या. त्या गायींनीं सायंकालीं आपण होऊन पुन्हां त्याजपाशीं यावें. त्यांतें घेऊन ब्राह्मणाचे घरीं यावें. याप्रकारें त्यानें सेवा बहुत निष्ठेनें केली. हें पाहून श्रीसांब प्रसन्न होऊन सादृश्य झाले, आणि वर दिला कीं, 'पर्वतांतील मेवाडप्रांत याचें राज्य तुजला दिलें. तूं महावंशींचा रजपूत राजा आहेस. ज्या ब्राह्मणाचे घरीं राहतोस तोच ब्राह्मण [तुला] अनुकूल होईल, व द्रव्य अमुक स्थानीं आहे हें घेऊन राज्य साध्य कर. धर्मेंकरून प्रजापालन कर.' असें वरप्रदान व त्या ब्राह्मणासही स्वप्नगत दृष्टांत झाला कीं, 'तुझ्या गायी राखितो हा राजपुत्र आहे; यास मीं त्याचे भक्तीकरून प्रसन्न होऊन मेवाडराज्य दिलें. त्यास तूं अनुकूळ होऊन त्यास सांगितलें त्या स्थानींचें द्रव्य घेऊन राज्य साध्य करावें.' याप्रमाणें दृष्टांत होतांच त्या ब्राह्मणानें त्या राजपुत्रापासून गोरक्षण मना करून

द्रव्य सांगितलें तें काढून आपण त्याचें पुरोहितत्व घेऊन त्या पर्वतामध्यें उत्तम स्थान श्रीभवानीचें होतें तेथें किल्ला बांधला. त्याचें नांव चित्रकूट असें ठेविलें. त्यास चितोड असें ह्मणतात. ती भवानी देवी व एकलिंग यांची परमभक्ति कुलदैवत स्थापून सर्व राज्य प्रांत आक्रमण केला. भिल्ल राजे होते ते प्रतिकूल यांस मारिलें, अनुकूल ते रक्षून आपले असे करून स्थापिले. श्रीएकलिंग सांब याचें देवालय तीर्थ बांधिलें, व श्रीचितोड भवानीचें देवालय बांधिलें. त्याची पूजा अर्चा यथास्थित चालावी असें स्थान करून देऊन एकलिंगजीचें राज्य आणि आपण सेवक दिवाण असें करून राहिले. पुढें त्याचा वंश ५०० वर्षे त्या अन्वयें राज्य तेथेंच करिता झाला.

तों शालिवाहान शक वर्षे ९१२ झालीं. ते समयीं पिठोर राजा याजपासून इंद्रप्रस्थचें राज्य सुलतान रुकदीन यानें घेऊन 'दिल्ली' असें नांव ठेऊन पादशाहात करूं लागला. त्याच्या वंशानें यांशीं बहुवेळ युद्धें केलीं. परंतु बहुत पराक्रमें आपलें राज्य रक्षून राहिले. त्या वंशांत श्रेष्ट व पराक्रमी राजे थोर थोर झाले. वरकड जयपूर जोदपूर वगैरे यांजवर पादशाहानें स्वाऱ्या करून [त्यांना] जेर केलें. तेव्हां [ते] कन्या पादशाहास देऊन 'डोले पाठवूं' असें कबूल करून पादशाहाचें नांव शिक्क्यांत घालून सेवक ह्मणवून त्याचें निशाण माहीमरातव नालकी घेऊन त्याचे ह्मणवून राज्य रक्षून राहिले. एक यानें मात्र आपलें व हिंदुधर्म [राज्य] पृथक् रक्षून गोवध बांगमुलाणा यानें राज्यांत न व्हावी असें रक्षून चाकर न ह्मणवणें, निशाण शिक्का आपला, असे अटीनें राहिले. त्यांनीं स्वारी करून उपद्रव केले असतां पर्वतांत जावें. पुन्हां राज्य सोडवावें. असें करीत आले. श्रीएकलिंगजी सांब व चितोड भवानी देवी यांची भक्ति करून राज्य रक्षण करीत असतां त्या वंशांत १०१२ शालिवाहन शक प्रमोद संवत्सर यांत श्रीगडमंडळ मेवाड येथें लक्ष्मणशिंग महाराणा ह्मणून झाले. यांनीं सिंव्हलद्वीपींहून पद्मिणी स्त्री आणिली. हें वर्तमान दिल्लीचे पादशाहास कळल्यावरी चालोन चितोडावर आले. दहाबारा वर्षे मोहिम करून बसले. युद्धें ही झालीं. कालवशेंकरून जेरदस्तींत आणिलें. तेव्हां कट करून १४०० शिसोदे रणांत पडले. एक राजस्त्री, दोन पुत्र-आरसिंहजी महाराणा

एक व **सजणसिंहजी** महाराणा, ऐसे **भिल्लाकडे** घेऊन गेले. किल्ला **चितोड** पादशाहानें घेतला. सर्व राजचिन्हें लुटून घेऊन गेले. नंतर पुन्हां **आरसासिंह** व **सजणसिंह** यांनीं वयस्क होऊन राज्य सोडवून **चितोड** घेऊन आपण राजनगर ह्मणून दुसरा किल्ला करून राज्य आक्रमिलें. **चितोडचा** दरवाजा पंचरसी होता तो पादशाहानें नेला. **आगरे** **वारुणावत** नगर **अकबराबाद** येथें लाविला, व नौबद नेली ती **ख्वाजासाहिब** पीर संस्थान **अजमीर** येथें पिरास दिली. आणखीही दौलत राजचिन्हें गेलीं याजमुळें प्रतिज्ञा केली कीं, 'जे समयीं दिल्लीच्या **यवनाचें** पारिपत्य करून आपली नौबद, दरवाजा व चिन्हें सोडवावीं तेव्हांच **चितोडची** पायरी चढावी; तोंपर्यंत निशाणें मागें चालवावीं; ताटांत भोजन करूं नये; पलंगावर निद्रा, स्मश्रु करूं नये; जिलबींत सिंदीचे फड चालवावे; असे नेम करून ठेविले. याप्रकारें **आरसासिंहजी** यांचे वंशानें दोनशें वर्षपर्यंत जागां जागां किल्ले व महालाईत करून वस्ती केली. नंतर **उदेपूर** शहर किल्ला करून तेथें त्याचा वंश याप्रमाणें नेम करून **यवनां**[illegible] [illegible] करून त्यांचे न ह्मणविता [illegible] मोठे प्रतापें श्री[illegible]जी **सांब** व श्री**चितोड** **भवानीची** भक्ति करून राज्य हाकालपर्यंत करीत आहे. त्याच्या वंशीं हल्लीं **भीमासिंहजी** महाराणा राज्य करीत आहेत.

श्रीमहाराणा **सजणसिंहजी** हे राज्य सोडून अलिकडे त्यालगत **सोंध**वाडा प्रांत आहे तेथें संस्थान करून त्याचे वंश तेथें राज्य करित आले. **सजणसिंह** याचा पुत्र दिलीपासिंह महाराणा, त्याचे पुत्र **सिंहजी** महाराणा, त्याचे पुत्र **भोसाजी** महाराणा असे चार पुरुष राज्य तेथें करीत, तों **य**वनाचा उपद्रव झाल्यामुळें वंशांतील एक घर तेथें राहून, शालिवाहन शक १२०० बहुधान्यनाम संवत्सर यांत दक्षणप्रांतीं आले. एक पुरुष **आरसासिंहजी** याचे घराण्यांतील **कच्छभूजप्रांतीं** जाऊन मोठ्या पराक्रमें तें राज्य सोडवून करिते झाले. **सजणसिंह** याचे घराण्यांतील एका पुरुषानें हिमालयांत नेपाळ येथें जाऊन मोठे पराक्रमें पर्वतांतील चौसष्ट राज्यें घेऊन किन्नरखंड यास वाट काढून एकदोन राजे यांजवरी स्वारी केली. तेसमयीं लहंबगुरु ह्मणून सहस्रावधि वर्षांचे पुरुष मध्यें आहेत, त्यांनीं त्यासि सांगून पलीकडील खंडाची मर्यादा रक्षावी ह्मणून तह करून दिला. असे महान् प्रतापी राजे झाले. त्यांचा वंश **वीरविक्रमसिंह**

समशेरजंगबहाद्दर या नांवें राज्य करितो. भोसाजी महाराणा यांचे पुत्र देवराजजी महाराज दक्षणप्रांतीं आले. ते भोसावंत भोसले असें ह्मणवून गंगा व भीमातीरीं पाळेगारी करून, जसे जसे प्रसंग तसे राहात. दिवसां-दिवस यवनाचें प्राबल्य. याजमुळें देशमुख्या व पाटीलक्या करून श्री-सिंगणापूर महादेव हाच एकलिंग कुलस्वामी, व श्रीतुळजापूर भवानी ही चितोडदेवी असें जाणून परमभक्ति करून सिंगणापूरची पाटीलकी [त्यानें] साध्य केली. खानवट, हिंगणी, बेरडी, देऊळगांव, वेरूळ, वावी, मुंगी अशी वृत्ति साध्य करून त्याचा वंश परम धर्मशील व शूरप्रतापी असा होत गेला. त्याच्या मुख्य वंशीं वंशधर झाले ते—श्री-लक्ष्मणसिंहजी महाराणा, यास दोन पुत्र—एक भारतसिंह महाराणा, दुसरा सजणसिंह महाराणा.

१ सजणसिंह महाराणा मूळपुरुष.
२ दिलीपसिंहजी महाराणा.
३ सिंहजी महाराणा.
४ भोसाजी महाराणा. यांजपासून 'भोसले' उपनांव.
५ देवराजजी महाराणा.
६ इंद्रसेनजी महाराणा.
७ शुभकृष्णजी महाराणा.
८ रूपसिंहजी महाराणा.
९ भूमींद्रजी महाराणा.
१० धापजी महाराज.
११ बरबटजी महाराज.
१२ खलाजी महाराज. यास 'खलकर्ण' ह्मणत होते.
१३ कर्णसिंह महाराज. यास 'जयकर्ण' ह्मणत.
१४ संभाजी महाराज.
१५ बाबाजी उर्फ शिवजी महाराज.

याप्रमाणें राणाजीचे वंशांतून देवराजजी महाराज दक्षणेंत आले.

दक्षणेंतील धर्म उच्छेद झाला. ब्राह्मणांस पीडा बहुत; गोवध अपरिमित; देवस्थानें क्षेत्रें यज्ञयागादि यांचा उच्छेद झाला. दिल्लीपति यानें, हिंदु-राजाचे तहामुळें, बहुत धर्मोच्छेद केला नाहीं, परंतु सहा यवनांनीं फार

अमर्यादा केली, तें ईश्वरास न साहे. दहा सहस्र वर्षें कलयुगांत वेदधर्म राहावा;–दक्षणेंत गोदावरीतीरीं, कृष्णातीरीं, तुंगातीरीं विशेष राहावा–हें पुराणप्रसिद्ध; त्यायोगें सिसोदे भोसले राणाजी इकडे आले. त्यांचे कुळीं पुन्हां अवतार होऊन धर्मस्थापना करावी; असा उदयकाल प्राप्त होऊन संभाजी महाराज यांचे उदरीं १४५५ विजयनाम संवत्सर शालिवाहन शकांत, बावाजीराजे, परमभले धर्मशील देवब्राह्मणभक्त होते झाले. शिखरशंभु व तुळजापूर येथील भवानी [या] कुलदैवतांची भक्ति करीत, त्यायोगें त्यांचे उदरीं मालोजी राजे वडील, कनिष्ठ विठोजी राजे शके १४७९ प्रमादिनाम संवत्सरीं शालिवाहन शकांत उत्पन्न होते झाले. त्यापूर्वी मालोजीचा जन्म शके १४७२ साधारण संवत्सरीं झाला. कनिष्ठ विठोजीराजे यास आठ पुत्र झाले. त्याचा विस्तार निराळा लिहिला आहे.

मालोजीराजे बहुत चतुर, पुण्यशील, देवाचे ठायीं भक्तिमान्, सर्वविद्यासंपन्न झाले, आणि आपण स्वतः पराक्रम करावा ह्मणून, १४९९ ईश्वर संवत्सर या शकांत लुकजी जाधवराव याचे विद्यमानें दौलताबादचे पादशाहापाशीं घरचीं घोडीं लोक बारगीर ठेऊन, सरदारी करिते झाले. त्यास निंबाळकर यांची कन्या दिली. तिचें नांव दीपाबाई असें ठेविलें. चाकरीमुळें वेरूळ पाटिलकीचें गांव येथें राहिले. कुटुंबासहवर्तमान असतां विठोजीराजे यांस पुत्र झाले. आपणांस संतति नाहीं त्याकरितां दीपाबाईनें बहुत नवस देवधर्म अनुष्ठानें केलीं. त्यांत नगरचे पीर शाहाशरीफ बहुत चमत्कारिक आहेत, त्यांस नवस केला—'पुत्र झाले ह्मणजे तुझें नांव ठेऊं.' ईश्वरसत्तेनें प्रथम पुत्र शके १५१६ जय नाम संवत्सरीं झाला. त्याचें नांव शाहाजीराजे ठेविलें. तदनंतर दुसरे पुत्र झाले. त्यांचें नांव शरफजी ठेविलें. त्यांत शाहाजी हे रूपेंकरून गुणेंकरून परम सुंदर, वय पांच वर्षांचें असून, बोलणार चतुर, घोड्यावर बसणें, शस्त्रविद्यादि अभ्यास करण्याचा हव्यास, याप्रमाणें होते झाले. पूर्वब्रह्मसूत्रयोगें जाधवराव यास शके १५१८ यांत कन्या उत्पन्न झाली. शाहाजीराजे गुणसंपन्न पाहून मालोजीराजे [त्यांस] बराबर घेऊन हिंडूं लागले. मालोजीराजे यांनीं पादशाहींत कामकाजें केलीं. दिवसांदिवस योग्यता वाढत चालली.

तों कोणे एके दिवशीं लुकजी जाधवराव देशमुख सरकार दौलताबाद

शिंदखेडकर निजामशाही मनसबदार यानें, शिमगा प्राप्त झाला त्यास, पंचमीचा रंग खेळावयाचा समारंभ करून सर्व मातबर बोलावून आणून नाचरंगाचा समारंभ आरंभिला. त्यांत सर्व आप्तविषय वगैरेंत मालोजीराजास बोलावून नेलें. त्यानें शाहाजीराजास बराबर नेले. शके १५२१ विकारी संवत्सर या शकांत. तेव्हां शाहाजीराजे परम सुंदर गुणवान् पाहून आपलेजवळ जाधवराव यानें बसविले. जाधवराव यास कन्या एकच तीन वर्षांची, ती सभेंत आली. तिजलाही जवळ बसविलें. उभयतांही सुंदर समानवय पाहून जाधवराव बोलले जे, 'मुली, तुला हा भ्रतार पाहिजे कीं काय? उभयतां जोडा योग्य दिसतो.' याप्रमाणें हर्षेकरून त्यांचा त्यांचा जन्मांतरयोग ईश्वरीसूत्र होणार तदनुरूप, जाधवराव याचे चित्तांत येतें झालें. उभयतां मूलस्वभावेंकरून एकमेकावरी रंग गुलाल टाकिते झाले. त्या समयीं सभेंत आप्तवर्ग बसले तेही हास्य करून 'जोडा योग्य युक्त आहे' असें बोलले. तेव्हां मालोजीराजे सर्वांशीं बोलले जे, 'जाधवराव आमचे व्याही झाले. त्यांचें बोलणें तुह्मी सर्वांनीं ऐकिलेंच आहे', ह्मणतांच सर्व 'प्रमाण आहे' असें बोलले. जाधवराव उत्तर न करितां स्तब्ध राहिले. या प्रकारें समारंभ झाल्यावर दुसरे दिवशीं जाधवरावानें सर्वांस भोजनाचें आमंत्रण केलें. राजे यांसही केलें. तेव्हां यांनीं उत्तर केलें कीं, 'आह्मीं तुह्मी व्याही झालों. या उपरीं भोजन लग्नसमयींच होईल.' असें झालें असतां हें वर्तमान जाधवरावाचे स्त्रीस कळलें. तेव्हां तिनें जाधवराव याशीं, 'सोयरीक या मुलीस करणें ती मातबर मनसबदार पाहून ही कन्या बहुत समारंभें ज्याचे घरीं फार दौलत, वस्त्रें, अलंकार तेथें द्यावयाची; आपण सभेंत बोललां हें अनुचित, यास देणें आमचे चित्तास येत नाहीं' ह्मणून आग्रह धरिला. ते समयीं जाधवराव [यानें], 'आह्मीं स्वाभाविक बोललों, वचन कांहीं गुंतलें नाहीं,' ऐसें स्त्रीचें समाधान करून राजे यांस निरोप पाठविला कीं, 'शरीरसंबंधाची गोष्ट आपण बोलूं नये. आमचे घरांत कोणाचे विचारास येत नाहीं. ब्रह्मसूत्र तेथें घडेल.' त्याचें उत्तर राजे यांनीं सांगून पाठविलें जे, 'इतकी सभा समक्ष असतां आपण बोललां तें अप्रमाण कसें होईल? आह्मांस हें जरूर कर्तव्य आहे.' अशीं परस्पर आग्रहाचीं बोलणीं वाढत चाललीं. मध्यस्थरीतीनें निश्चयास गोष्ट नये. दुराग्रह दोहींकडे वाढला.

असा प्रसंग प्राप्त झाला. आग्रह करून राजे बहुत प्रयत्नास लागले. श्रीदेवीची प्रार्थना करिते झाले. शके १५२५ शोभकृत नाम संवत्सर माघ शु॥ १५ ते दिवशीं दैवयोगें आपला वेरूळचा बागमळा होता तेथें एकटेंच जावें, असें मनांत येऊन जाते झाले. अस्तमानसमय झाला त्या समयीं एकाग्रचित्तें 'जाधवराव याचा आपला कलह श्री कसा सिद्धीस नेईल? आह्मास भाग्य नाहीं' ह्मणून वचनें केलीं. सोयरीक दुसऱ्यास देणार. तेव्हां पुरुषार्थ काय उरला? याहून मरण श्रेष्ठ' असें चिंताग्रस्त असतां, अकस्मात् श्रीदेवी भगवती स्त्रीरूपें, परमलावण्य, शुभ्रवस्त्र परिधान, नानाप्रकारचे सुवर्णमय अलंकारें युक्त, भालीं कुंकुम, नासिकीं मुक्ताफल, देदीप्यमान अशी दर्शन देती झाली. तें अवलोकन करून नेत्र झांकिले. भयशंकित होऊन भ्रांतिगत दशा झाली असतां भगवतीनेंच आश्वासन दिलें, 'मी देवी आहें. तूं भय पावूं नको, सावध हो. तुझा भाव शुद्ध जाणून तुजवरी कृपा करावी ह्मणून प्रसन्न होऊन दृश्य झालें. तुझे कुलीं श्रीसांब अंशेंकरून अवतार घेऊन धर्मस्थापना करणार. देवब्राह्मणांस पीडा झाली ती दूर करणार. तुजवर प्रसन्न झालें ह्मणतांच साष्टांग नमस्कार करून अंजली जोडून खालीं पहात उभे राहिले. हर्षें गद्गद रोमांच होऊन राहिले. ते समयीं श्रीभगवतीनें वरप्रदान दिलें कीं, 'तुझे वंशीं अवतार शककर्ता निर्माण होईल. तो दुष्टांचा संहार करून धर्मरक्षण करील. तुझे वंशीं सत्तावीस पुरुष राज्य करतील' असा वर देऊन जवळ वारूळ होतें, 'त्यांत द्रव्य विपुल आहे [तें] घे; तुझे मनोरथ सिद्धीस जातील' असें सांगून अदृश्य झाली. नंतर राजाची भ्रांति जाऊन देवीचा साक्षात्कार झाला असतां आपण विस्मृति पावलों, भाषण केलें नाहीं, ह्मणून बहुत व्याकुलता [प्राप्त झाली]. व देवीची प्रसन्नता होऊन दर्शन झालें, कृतकृत्यता मानून उठणें, घरास जाणेंचें, विसरलें. प्रहररात्र झाली असतां विठोजीराजे यांनीं 'कां अद्याप आले नाहींत?' ह्मणोन समाचारास सेवक पाठविले. तों 'राजे अरण्यांत बागेंत आहेत, येण्याचा मनोदय नाहीं' ह्मणून सेवक गेले होते त्यांनीं येऊन कळविलें. त्यावरून आपणच निघून बागेंत गेले. ते वेळेस जवळ श्रीचा प्रसाद साक्षात्कार झाला हें सांगितलें. तेही बहुत हर्षायमान होऊन 'रात्र फार झाली. घरास चलावें' ह्मणून बोलले, आणि घेऊन आले. त्याजवरी

दुसरे दिवशीं श्रीनें वारूळ दाखवून द्रव्य सांगितलें तें आहे नाहीं पहावें; परंतु द्रव्य साध्य झाल्यास कसें आणावें, कोठें ठेवावें, राज्य यवनाचें, द्रव्य जाऊन प्राण व प्रतिष्ठा दोनीही जाणार, असें चिंतन केलें, तों तें दिवशीचे रात्रीं दृष्टांत झाला कीं, 'तूं भय कां पावलास? मीं प्रसन्न होऊन द्रव्य दिलें त्यास विघ्न कदापि होणार नाहीं. द्रव्येंकरून दानधर्म कर. संपन्नता विशेषात्कारें वाढेल. भय वाटत असल्यास द्रव्य काढून श्रीगोंदें येथें शेषावा नाईक पुंडे, त्रिवर्ग बंधु, परमभले, द्रव्यवान् आहेत यांचे घरीं ठेव. तो तुझें द्रव्य ठेवून तुजला पाहिजे तसें देईल'. याप्रमाणें दृष्टांत झाल्यावरी मालोजीराजे यानें बंधूस हें वर्तमान सांगून तिसेरे दिवशीं रात्रीं आपण उभयतां बांधव, एक दोन विश्वासू [माणसें] घेऊन जाऊन, खणावयास लागले; तों आंत मोठा भुजंगसर्प पाहिला. ते समयीं सर्वही भयाभीत होऊन पळाले. मालोजीराजानें त्या सर्पापुढें दूर उभें राहून हात जोडून प्रार्थना केली कीं, 'श्रीदेवीनें द्रव्य मजला दिलें हें प्रमाण आहे, तरी तुह्मी कृपा करून द्यावें, [व] हें स्थल सोडून जावें' ह्मणतांच सर्प निघोन गेला. नंतर खणून सर्व द्रव्य घेऊन आले.

ते दिवशीं घरीं येऊन विचार केला जे, 'श्रीगोंद्यांत श्रीनें सांगितलें तेथें नेऊन ठेवावें.' शेषावा नाईक याचे घरीं गेले. त्यानें सन्मानयुक्त नेऊन बसविलें. 'कां आलांत?' असें विचारिलें. एकांतास घेऊन गेले. त्यासही दृष्टांत झाला होता—'याचें द्रव्य ठेऊन घेऊन पाहिजे तसें देत जावें.' हें वर्तमान कळविलें. नंतर राजे यानें द्रव्य ठेवावयाचें तें त्यानें मान्य केलें. घरीं येऊन आदरेंकरून जेवण झाल्यावर 'तुह्मांस श्रीनें द्रव्य दिलें, तेव्हां तुमचा भाग्योदय दिसतो. तुह्मांस दौलत राज्य प्राप्त झाल्यावर तुमची पोतेदारी वतनी आह्मांस वंशपरंपरागत करून द्यावी' असें बोलल्यावर मान्य करून, परस्परें आणशपथ करून घरास आले, आणि द्रव्य नेऊन त्याचे घरीं ठेविलें. श्रीचे वरेंकरून आपले घरीं द्रव्य झालें त्या प्रभावेंकरून दिवसांदिवस अधिकच योग्यता वाढली. सर्वांसही मान्यता, जेथें जावें तेथें हे 'थोर आहेत,' असें उदित भाग्य वाढूं लागलें. निजामशाही चाकरी करित होतेच. घरीं घोडीं आणखी खरेदी करून पागा वाढविली. हजारपांचशें केलीं. श्रीशिखरमहादेव येथें चैत्री यात्रा बहुत येणें, उदक नाहीं, यात्रेस फार श्रम हो-

तात, जाणून मोठें विस्तीर्ण तळें बांधिलें. त्यांत उदक अपरिमित राहूं लागलें. याजमुळें यात्रेस फार सुखावह झालें. श्रीवेरूळ येथील कृष्णेश्वराच्या देवालयाचा जीर्णोद्धार केला, व शिवालयतीर्थ बांधिलें. असें जागोजाग देवालयें क्षेत्रीं धर्मही देवीचे आज्ञेप्रमाणें करिते झाले, आणि जाधवराव याचे शरीरसंबंधाचा प्रयत्न कसा करावा हें बहुत चिंतन लागलें.

त्यानंतर निंबाळकर अनुकूल साह्य करून वर्तमान पादशाहास श्रुत केलें कीं, 'जाधवराव यांचें आमचें सर्व सभेंत या रीतीनें बोलणें झालें असतां ते आग्रहास पडून शरीरसंबंध करीत नाहीं ह्मणतात.' तेव्हां पादशाहानें जाधवराव यांस आज्ञा सांगून पाठविलें कीं, 'भोसले यांचा तुमचा करार शरीरसंबंधाचा असतां आग्रह करितां तो करूं नये. मूल द्यावी.' त्याजवरून जाधवराव यानें उत्तर पाठविलें. तेव्हां 'अनमान काय निमित्य करितां?' हें विचारावयास पाठविलें. त्या समयीं 'यांचें भाग्य वैभव आमचे बराबरीचें नाहीं, वरकड शरीरसंबंधीच आहोंत. आमचे घरांत सर्वांचे विचारास समानस्थल पाहून कन्या द्यावी असें आहे.' तेव्हां पादशाहाचे मनास आलें कीं, 'आह्मीं सांगितलें असतां आग्रह करितात, त्या अर्थीं मालोजी भोसले यास त्याहून सवाई मनसब देऊन ही गोष्ट करावी. भोसले मनसब द्यावयास योग्य व शूर कामेंकाजेंही केलीं आहेत.' ह्मणून पंचहजारी मनसब, 'राजे' असा किताब लिहून, शिवनेरी जुन्नर वगैरे तालुके सरमजाम साहेब नौबत दिली. जाधवरावाहून भाग्यवान् केले, आणि याउपरी 'यांचे पुत्रास कन्या द्यावी' अशी आज्ञा केली. जाधवराव यास व स्त्रीस हर्ष होऊन पादशाहाचें मनोगत, व मूल ही सुंदर गुणवान् कुलीन, मान्य करिते झाले. दौलताबादेसच लग्नसमारंभ करिते झाले. शके १५२६ यांत केलें. लग्नांत खासा पादशाहा येऊन योग्यता दिली. फारच लग्न समारंभें करून, बहुत तरतुदीनें पादशाहास व वजीर सरदार यांस मेजवान्या द्रव्य खर्चिलें. साडे करून त्या मुलीचें नांव जिजाबाईसाहेब ठेविलें.

पुढें कांहीं दिवस गेल्यावर पादशाहा वारले. मुलें दोन–आठ वर्षांचा एक, व सहा वर्षांचा एक, असे होते. मुलांची आई बेगम इणें 'कारभारी कोण करावा?' अशी सारे मनसबदार जमा करून मसलत केली. त्यांत साबाजी अनंत, चतुर ज्यास ह्मणतात ते, होते. त्यांनीं शाहाजीराजे गुणें-

करून बुद्धिवान् मर्द शूर द्रव्याढ्य इत्यादि सर्वगुणसंपन्न असे पाहून 'वजीरी यांसच देणें तर ही पादशाहात जतन होईल,' याप्रमाणें निश्चय करून बेगमेस अर्ज केला. त्यांनींही 'फार उत्तम आहे, हेंच कर्तव्य,' असा निश्चय करून शाहाजीराजे यांस वजीरीचीं वस्त्रें दिलीं. बहुमान केला. शके १५४१ यांत सांगीतली, आणि पादशाहाजादे यांस शाहाजीराजे यांच्या मांडीवर बसविलें. 'राजे' असा किताब होता तो 'महाराज' असा पत्रीं लिहूं लागले. याजवर राजे, सर्व पादशाहातीचा आटोप करून, साबाजी चतुर याचे अनुमतें दौलत चालवूं लागले. याप्रमाणें कांहीं दिवस चालले.

नंतर सारे मनसबदार एकत्र होऊन विचार करिते झाले. मलिकांबर विजापूरचे सरदार चागसखान याचे कारभारी, खावंद वारले त्यायोगें निघोन दौलताबादेंत फकीर[वेशें राहिले]. अवलिया दिसतात परंतु बहुत शहाणे, कोणी मातबर आहेत, [अशी] परीक्षा करून दौलतींत शहाणे राखण्याजोगे ह्मणून त्यास आणून सरमजाम देऊन ठेविलें. त्यानें सर्व यवनांशीं भेद केला—'नांव पादशाहा, परंतु सर्व आक्रम हिंदूंनीं केला, हें चांगलें नाहीं.' व शाहाजीराजे वजीर होऊन धनी त्यास अनुकूळ, बहुत वजीर योग्यता वाढली, हें सर्व यवनांस दुःसह व जाधवरावास 'आपणांहून अधीक झाले, वजीर, तेव्हां त्यांचे घरीं जाणें येणें असह्य,' ह्मणून यवनांचे संमतांत मिळोन समस्त याशीं द्वेष करूं लागले.

महाराजापाशीं नारायण त्रिमल हनुमंते मजमदार इख्त्यार कारभारी होते. शिवनेरी किल्ला व जुन्नर तालुके वगैरे राजे यांजकडे होते, त्यालगत चाकण ठाणें मातबर त्याखालीं प्रांतही चांगला जाणून महाराजांनीं आपणांकडे तालुका ठाणेंसुद्धां करून घेतला. धोडप, सत्तावीस किल्ले सुद्धां चाकणचें ठाणें, पूर्वीं बरार हबशी होता त्यानें शके १२०० सालीं जय नाम संवत्सरीं बांधिलें. [तो हबशी] पाळेगारी करून होता. तो मेल्यावर तालुका निजामशाही झाला. त्या समयीं राजे यांनीं आपलेकडे घेतला. त्याचे बंदोबस्तास दादाजी कोंडदेव कुळकर्णी, मौजे मलठन, ता० पाटस, प० पुणें, यास पाठविलें.

जिजीबाईसाहेब यांस प्रथम पुत्र झाला. त्याचें नांव संभाजी ठेविलें. शाहाजी याचा द्वेष कारभारी मनसबदार मातबर करूं लागले. तथापि यां-

ची जड भारी. मनसुब्यानें हरएक प्रकारें राजास हारीं आणावें हें न घडे. ते समयीं 'ही पादशाहात बुडाली तरी बुडो, परंतु हिंदु राजे यांचा कारभार चालूं न द्यावा' असा सर्व यवनांनीं कट केला. त्यास जाधवराव अनुकूल, आणि दिल्लीस राजकारण करून अलमगीर पादशाहा याची फौज मदतीस आणविली. तें राजकारण सिद्ध होऊन मीर जुमला सरदार व पंचवीस हजार फौज आली. ते समयीं साबाजी अनंत यांचा व राजे यांचा घरोबा; त्यांणीं सला दिली, 'पादशाही चाकर निमकहराम होऊन दौलत बुडवितात. तुह्मी विचार पाहून चालावें.' याप्रमाणें सांगितल्यावर राजे यांचें ह्मणणें पडलें, 'काय चिंता आहे? दिल्लीची फौज आली तरी मनसब करून युद्ध करून पराभव करितां येईल. धनी मात्र कायम पाहिजे.' असें हिम्मतीनें सांगितलें असतां साबाजीपंत याचे सलेस नये. 'घरफुट चांगली गोष्ट दिसत नाहीं. धनी बायको व मुलें पडलीं. आपलें राजकारणही दुलग असावें.' त्याजवरून राजे यांनीं, नारोपंत मजमदार याचा भाऊ बाळकृष्णपंत हनुमंते यास, 'विजापूरचें राजकारण असावें' ह्मणून सुलतान सिकंदर पादशाही करित होते त्याचे मुख्य इख्त्यार कारभारी मुरार जगदेव यांसि भेटविलें. राजकारण सिद्ध केलें. त्याचाही आदर बहुत पडला, जे—'मातबर सरदार काबिल यांचें राजकारण अनायासें आलें, त्यांस आणून ती पादशाहात क्षीण झाली आहे त्यांतील प्रांत आपण साध्य करावा,' हें चित्तीं आणून जाहागीर मनसब देण्याचा करारनामा ठरवून दिला आणि वकिलास बहुमान वस्त्रें देऊन राजे यांजकडे पाठविलें. त्याजवर दिल्लीची फौज मीर जुमला घेऊन आला, तीही समीप येऊन पोंचली. त्यास सारे सरदार जाधवराव, मलिक वगैरे सामोरे जाऊन ते व हे एक होऊन चालून आले. ते समयीं राजानें विचार केला जे, 'दौलताबाद मैदानमुलुख यांत लढाई घेणें चांगलें नाहीं.' हा विचार करून कोकणांत माहुली किल्ला येथें पादशाहा व बेगमसाहेब यांस घेऊन गेले. नंतर सारी फौज माहुलीस चालून गेली. तेथें सहा महिने सुद्धां सामग्री तयारी करून युद्ध केलें. त्यांत फौजेवर छापे घालणें, मोर्चे लावणें, व लढाई इत्यादिकें फौज बहूत हैराण केली. असें असतां [बेगम]-साहेब इजकडे राजकारण करून भेद केला. त्याजवरून हिम्मत खचली. जाधवराव यानें बुद्धिभ्रंश केला. तेव्हां आपले सारे सरदार यांनीं याजकडे

राजकारण लाविलें, हें वर्तमान शाहाजीराजे यांस समजतांच 'खावंद दुलग झाला, यावर आपण आग्रह करणेचें प्रयोजन नाहीं. आपण याचे ह्मणविले; निमक खाऊन पादशाहात आपलेसाठीं खराब केली, बुडविली, हें अपयश कशास घ्यावें? खावंदच त्यास अनुकूल झाला, त्याचे दैवेंकरून घडणें तें घडो; ह्मणून, विजापूरचें राजकारण सिद्ध झालेंच होतें तिकडे जावें, ही पादशाहांत सोडावी,' असा विचार करून आपली जमीयत फौज कुटुंब घेऊन शके १५४८ त निघून चालले. ते समयीं शरफजीराजे यांस सरदारी सरमजाम निराळा होता, त्यांस 'तुह्मी मिळोनच असावें,' असें सांगून ते पादशाहींतच राहविले. जाधवराव फौज कांहीं घेऊन पाठलाग करित आले. त्यांची मुजाका न धरितां शिवनेरी तालुक्यांत येऊन, जिजाबाई ठेविली होती त्याचा बंदोबस्त यथास्थित करून त्यास नेणें ठीक नाहीं ह्मणून ठेविली. बराबर पुत्र संभाजीराजे घेतले. बाईसाहेब यांजपाशीं कारभारी कृष्णाजीपंत हनुमंते व संक्राजी नीळकंठ व सोनपंत व रघुनाथ बल्लाळ कोरडे असे कांहीं सरदार ठेविले. आपण दरमजल चालले. जाधवराव फौज मागें आली असतां फलटनपर्यंत आले. फौजही पोंचली. फलटणीं जगपाळ नाईक निंबाळकर पुंडपणा करून दहा हजार फौजेचे सरदार महाराजांचे आप्त होते ते हे एक झाले. याजमुळें आपला परिणाम नाहीं समजोन जाधवराव माघारें निघोन गेले. पादशाहा बेगम यांस [ते] दौलताबादेस घेऊन गेले. दिल्लीची फौज कुमकेस आणली होती त्यांसि करारमदार होता त्याप्रमाणें देऊन परत लावून दिली. राजे विजापुरीं निघोन आले. ते समयीं दौलताबादेकडील शिवनेरी व धोडप तालुका होता त्याचा बंदोबस्त करून कायम राखिला. विजापुरीं पावले तेव्हां मुरारपंत सामोरे येऊन घेऊन गेले. पादशाहाची भेट झाली. करारप्रमाणें कर्नाटकप्रांत बेगरूळ बोसकोटा बाळापूर शिरकटे वगैरे तालुके हवालीं केले. त्यांजवर बंदोबस्तास कारभारी नारोपंत हनुमंते ठेविले. दौलताबादेंतील मातबर कर्ते नामांकित वजीर सरदार आले त्यांस पादशाहाच आक्रम करावयास येईल जाणोन शाहा व मुरारपंत हर्ष मानिते झाले.

त्या समयांत इकडे जिजाबाईसाहेब गरोदर ह्मणून शिवनेरी येथें ठेविली होती त्यांस, शिवनेरी येथें शिवाई देवी बहुत जागृत आहे

तिजला बाईनीं नवस केला कीं, 'पुत्र झाला ह्मणजे तुझें नांव ठेवीन.' [त्या अन्वयें] दिवस पूर्ण होऊन प्रसूत झाली. शके १५४९ प्रभव नाम संवत्सरे वैशाख शुद्ध २ गुरुवार. तो पुत्र झाला शुभ चिन्हें झालीं. विजापुरीं महाराज यांस शुभशकुन झाले. सहा ग्रह उंच पडले. सर्वलक्षणसंपन्न नांव शिवाजी ठेविलें. शाहाजीराजे यांस स्वप्नगत दृष्टांत झाला कीं, 'तुझे वंशीं अवतारी पुरुष होणार तो निर्माण झाला.' हुजरे कारकून विजापुरास गेले त्यांस सोन्याचीं कडीं वस्त्रें दिलीं. गोप्रदानादि दानधर्म बहुत केला. साखरा वाटल्या. संतोष झाला. पादशाहास कळोन त्यानेंही मुलास दागिने वस्त्रें पाठविलीं. याप्रकारें झालें.

नंतर शके १५५२ यांत मोहिते यांची कन्या निश्चय करून शाहाजीराजे यांनीं दुसरें लग्न केलें. त्यांचें नांव तुकाबाईसाहिब ठेविलें. त्यांचे उदरीं पुत्र झाला [त्याचें] नांव व्यंकोजीराजे असें ठेविलें. आणि जाहागीर बाळापूर होसकोटे होते तिकडे गेले असतां विजयराघव ह्मणून चंजावरकर संस्थानी होते, त्यास पांच शत स्त्रिया होत्या, त्याचे व त्रिचनापलीकर संस्थानिक याचे कलह वाढले. त्रिचनापलीकरानें राजे यांसि राजकारण केलें जे, 'विजयराघव याजवर मसलत करावी. त्यांत ठाणें हस्तगत करून आह्मांस द्यावें. फौजेचा खर्च पांच लक्ष रुपया व लूट आपण घेणें.' त्याजवरून त्याचे कुमकेस जाऊन चंजावरकरावर चालून गेले. विजयराघव [यानें] बाहेर येऊन युद्ध बहुत केलें. महाराजांनीं फौज निवडे घोडे सुद्धां कजाकीन विजयराघव यास रणांत मारिलें. फौज लुटून ठाणें घेतलें. संस्थान बहुत चांगलें पाहून आपण बंदोबस्त केला. त्रिचनापलीकराचा तह 'ठाणें आपणांस द्यावें, द्रव्य घ्यावें,' असा होता. तें 'द्रव्य आह्मांस नको, संस्थानच ठेवावें' असें बोलोन ठेविलें. राजधानी योग्य पाहून कांहीं दिवस राहिले.

दौलताबादेस [बेगम]साहेब व साबाजी अनंत, जाधवराव, वगैरे मनसबदार यांनीं विचार करून मलिकांस वजीरी देऊन ते कारभार चालवीत असतां दिल्लीची फौज मीर जुमला दौलताबादेस कुमकेस आला होता तो माघारें गेला. त्यास पादशाहानें बहुत निषेधिला कीं, दौलताबादेची पादशाहात कमकुवत झाली, शाहा पादशाहा ह्मणवितात, तें सारें बंड मोडून सुभे सोडवावयाचे माहित असून, त्या दौलतींत प्रवेश झाला असतां सोडून आला ह्मणोन, आणखी फौज देऊन पुन्हां [त्यास]

रवाना केलें. फौज परतोन आली हें वर्तमान मलिक वगैरेंस कळल्यावर फौज जमा करून चालून गेले. बऱ्हाणपुरीं गांठ पडून युद्ध झालें. मलिकास जखमा लागल्या, फार शर्त केली. दिल्लीची फौज मोडली. पळूं लागली, तिचा पाठलाग करून नर्मदेपर्यंत घालविली. हत्ती घोडे लूट करून यश घेऊन आले. फते पावले.

मलिकाचा शिक्का 'बंदे दरगाह यगानी मलिकंबर चागसखानी' याप्रमाणें होता. प्रांत वगैरे धारे बांधून लावणी केली. ते धारे 'मलिकंबरी' अद्यापि ह्मणतात. न्यायमनसुबी हरएक करावी. अशाप्रकारें पादशाहात मुलें दाबून आपणच करिते झाले. यामुळें मुरारपंतीं विचार केला जे, 'दौलताबादेचे पादशाहाचीं मुलें दाबून मलिक आपण पादशाही करितो हें ठीक नव्हे.' ह्मणून त्याजवर सरज्याखान वगैरे सरदार फौज देऊन दौलताबादेस रवाना केले. ते भातोडीचे तलावावर चालून मुक्कामास गेले. हें मलिकास समजल्यावर तेही चालून आले. युद्ध बहुत झालें. तळें फोडून पाणी बंद केलें. फौज घाबरी झाली. सरज्याखान वगैरे सरदार पाडाव करून नेले. फौज लुटली. फते पावले. सरदार नेले त्यांस वस्त्रें देऊन पाठविलें. नामोहोरम होऊन विजापुरीं आले.

शाहाजीमहाराज चंजावरीं असतां कनकगिरीकर संस्थानिक यानें महाराजाकडील तालुका बाळापूर वगैरे त्यांत उपद्रव केला. हें वर्तमान समजल्यावर संभाजीराजे वडील पुत्र फौज कारभारी सरदार बरोबर देऊन पाठविले. त्या प्रांतीं सरसुभा अफजलखान विजापूरपादशाहाकडून होता त्यानें कनकगिरीकर याजपासून द्रव्य घेऊन आंतले हातें त्यास मदत दिली. त्या युद्धांत संभाजीराजे होणारानुरूप गोळा लागून ठार झाले. याजवरून शाहाजीमहाराज चालून जाऊन पाळेगार कनकगिरी यांचें पारिपत्य केलें. कनकगिरी घेतली. अफजलखान आपले पादशाहींतील असोन ही गोष्ट केली, वाईट, ह्मणोन यासि कांहीं करावें तर पादशाहास वांकडें भासेल हें जाणून सबूर केली. अफजलखान यानें आपली निखालसता दाखविली. तेव्हां प्रसंगें पादशाहापाशीं गेल्यावर पाहून घेऊं ह्मणून टाळा दिला आणि चंजावरास गेले.

या समयांत पादशाहा व मुरारपंत यांनीं आपली फौज मलिकावर गेली ती नामोहोरम झाली हा विचार करूनमातबर सरदार रवाना केले. आणि ही मसलत शाहाजीराजे यांवांचून सिद्ध होणार

नाहीं ह्मणून [त्यांसि] येणेविषयीं पत्र पाठविलें. तेव्हां महाराज तुकाबाई व व्यंकोजीराजे यांस तेथें ठेऊन आपण विजापुरीं निघोन येते झाले. पादशाहानें व मुरारपंतानें वर्त्तमान सांगोन मलिकाचें पारिपत्य करावें हें जरूर बोलले असतां यांसही अवश्यकच ह्मणून पादशाहा व पंत व महाराज व बाजे उमराव सर्व बसोन मसलत ठरविली जे, 'आपली फौज बुडविली याचा सूड यथास्थित घ्यावा.' या प्रकारें मनसुबा केला. राजे यांचें मानस, 'मलिक अमर्यादा करून पादशाहास दाबून पादशाही करितो हें अयुक्त. आह्मीं त्याचें निमक पूर्वी खाल्लें आहे त्या अर्थी यास गर्दीस नेऊन मुलांची स्थापना करावी हें युक्त आहे.' याजवरून सर्व जमीयत एक करून मुरार जगदेवराव व राजे [व] सर्व सरदार निघोन जाऊन मलिकावर मोहिम केली. मलिकही बमयफौज चालून आले. मार्गीं येतां पुणे लुटलें. जाळिलें. कोट पाडून गाढवाचा नांगर फिरविला. त्याची यांची गांठ मसवडानजिक पडली. पंत व महाराज व अफजलखान व रणदुल्लाखान व सरज्याखान व बाजे सरदार पोख्त सामानानिशी होते. त्यांनीं तोफा चालवून युद्धास प्रारंभ केला. दोनप्रहरपर्यंत युद्ध केलें. दोहींकडेही मोगलपठाण अटून उभे राहून और तऱ्हेचें झुंज झालें. शाहाजी महाराज यांनीं हजार दोन हजार धारकरी निवड करून 'तुह्मी शूर आहां, हा समय परीक्षेचा, मलिक बुडविला पाहिजे. आमचे सोबती व्हावें ह्मणजे जसें काम कराल तसें बक्षीस पावाल' ह्मणून घोडे चालवून तरवारा केल्या. लोक रणास फार आले. तेव्हां राजे यांस जखमा अंगावर झाल्या असतां रणदुल्लाखान व अफजलखान यांसि सांगून पाठविलें जे, 'ये समयीं सर्वांनीं चालून घ्यावें.' आणि आपण ही पुढें घोडे घातले. लढाईची शर्त करून तरवार तोफा व तीरंदाजी चालती झाली. तेव्हां मलिकाचा मोड करून उखटून काढिला. फौज उधळून दिली. पळूं लागले. तेव्हां विजापूरची फौज पाठलाग करीत चालली. मलिक भीमातीरपर्यंत नजिक कोरेगांव तेथें पिटला, तों नदीस पाणी चढलें, उतार न सांपडे, असें पाहून, मलिकानें नदीस शरण येऊन प्रार्थना केली. शत्रूला जिवंत सांपडणें याहून हलाल होणें बरें, ह्मणून उतार जागा पाहून 'या नशीब या ताला' ह्मणून ईश्वराचें स्मरण करून घोडा पुढें चालविला, तों उतार लागून पार झाले.

श्रीनें व भीमानदीनें मार्ग दिला. मागें सारी फौज उतरोन पैलतीरीं गेली. तों इतक्यांत विजापुरची फौज येऊन पोंचली; पाहतात तों नदीस पूर असंभव्य! 'मलिक पैलतिरीं पावला! हें पाहून 'श्रीनें त्यास मार्ग दिला. याउपर आपण प्रयत्न करून पाठलाग करणें युक्त नव्हे. वाजतवरसात पाहून घेतां येईल' ह्मणोन तेथेंच मुक्काम करून राहते झाले.

शके १५५५ श्रीमुख नाम संवत्सरे भाद्रपद वद्य ३० सूर्यग्रहण सोमवती असा उत्कृष्ट पर्वकाल प्राप्त झाला. ते समयीं मुरार जगदेव यानें भीमाइं-द्रायणीसंगमीं नागरगांव येथें जाऊन त्यास्थलीं पर्वाचे ठायीं तुळा सुवर्णा-दिकेंकरून वहुत केल्या. धर्म फार केला. ब्राह्मण आले त्यांस व क्षेत्रोक्षेत्रीं तुळेचें द्रव्य पाठविलें, आणि 'नागरगांव' असें नांव होतें तें 'तुळापूर' असें ठेविलें, आणि त्या पर्वकालांतच तो गांव ब्राह्मणांस अग्रहार करून दिला. राजे यांनीं आपली तुळा सुवर्णद्रव्येंकरून केली, आणि धर्म केला. त्याप्र-माणें गांव ब्राह्मणांकडे नांव तुळापूर असें चालत आहे. 'हत्तीची तुळा कशी करावी?' ह्मणून मातवर सरदार वगैरे जमा करून प्रश्न केला अ-सतां कोणी उत्तर न केलें. तेव्हां महाराजांनीं उत्तर केलें कीं, 'हत्ती ना-वेंत घालून हत्तीचे भारें नाव जितकी पाण्यांत बुडेल तेथें खुण करून हत्ती काढून द्रव्य त्यांत घालून खुण जमली ह्मणजे तुळा झाली.' ते स-समयीं पंत राजे यांवर संतोषी होऊन तारीफ केली, आणि विजापुरास माघारें जाण्याचा निश्चय केला. याप्रमाणें शिवछत्रपतिजन्मकथन व पूर्वजवर्णन प्रथम प्रकरण समाप्त.

---

## शिवछत्रपति शककर्ते यांनीं राज्य आक्रमण करून सज्जन-सेवन केलें तें प्रकरण द्वितीय.

श्रीशाहाजीमहाराज व मुरार जगदेव यांनीं विजापुरास परतोन जा-ण्याचा निश्चय केला असतां, शाहाजीमहाराज यांस, पूर्वीं माहुली कि-ल्यांतून दौलतावादचे पादशाहींतून जातेसमयीं, जिजाबाईसाहेब ग-रोदर निभावणार नाहीं ह्मणून शिवनेरींत ठेवावी लागली. तेथें तीस शिवाजीराजे झाले. तसेंच पुढें चंजावरप्रांतीं जाहागिरींत राजे गेले ते तिकडेच राहिले. तेव्हां जिजाबाईसाहेब व पुत्र यांचे भेटीस फार दिवस झाले. पुत्राचें वय सात वर्षांचें झालें. त्यांस अवलोकन करावें अशी

इच्छा शाहाजीमहाराजास झाली. सात वर्षांचे वयांत विद्याभ्यास केला. बहुत स्वरूपेंकरून सुंदर, गुणवान् होत्साते, लिहिणें, घोड्यावर बसणें, तालिम करणें, शस्त्रविद्या, तिरंदाजी करणें, बंदूक मारणें व शास्त्राभ्यास करणें यांस आरंभ केला; बोलणें, कल्पनाचातुर्य असे बहुत गुण पुत्राचे श्रवण करून बहुत उत्कंठित झाले; त्यांत वडील पुत्र संभाजीराजे युद्धांत पडले. राज्यास अधिकारी हे व श्रीचा दृष्टांतही याचे जन्मकाळीं झाला. तो पुत्र हा. वरही श्रीचा पूर्वीं झाला आहे, ह्मणून बोलावणें पाठवून त्यांस घेऊन गेले. भेट झाली. दानधर्मही बहुत केला.

नंतर किल्ले व जहागीर यांचे बंदोबस्तास कारभारी होते तेच ठेवून विजापुरीं आल्यावर मुरार जगदेवराव यानें राजे यांचा पराक्रम पादशाहास निवेदन करून तारीफ केली. सन्मान हत्ती घोडे जवाहीर देऊन पुणे देश, बारा मावळें, बारामती, इंदापूर सरमजाम दिला. त्यांचा कारभार शिवनेरी दादाजी कोंडदेव होते त्यांसच सांगितला. त्यांनीं मावळ येथें लांडगे बहुत व शामलांचे उपद्रवें करून उजाडी झाली होती; प्रांत ही जागांजागां मोगली अमल इजाऱ्याचा त्याजमुळें पडला होता, त्यास कौलकरार करून लावणी केली. आणि मावळचे जमीदार आणून मावळचे बरकंदाज ठेऊन, जो लांडगा मारून आणील त्यास बक्षीस द्यावें, असें करून वस्ती लावणी केली. निमताने वगैरे धारे बांधून कौल दिला. शामलांकडील उपद्रवाचा बंदोबस्त जागां जागां चौक्या ठेऊन केला.

इकडे महाराज शाहाजीराजे यांनीं शिवाजीराजे विजापुरीं नेल्यावर जसे गुण ऐकिले त्याहून अधीक गुणवान्, मसलतींत बहुत चमत्कारिक बोलावें, विद्याभ्यास जो केला तो शीघ्रच प्रयास न करितां साध्य व्हावा, स्वरूपेंकरून सुंदर, शरीर पाठ व्यापार चांगले, सद्दढ लक्षणवान, दौलतीचे ठायीं हत्ती घोडे, सर्वकाल कारखाने पाहाणें, कारभारी थोरमाणसें शाहाणीं यांस माहीतगारी विचारणें, सन्मान करणें, लघुमनुष्य दुर्गुणी यांचा त्रास, संगति न करणें, दुर्व्यसन कांहीं नाहीं, विशालनेत्र, आजानबाहू, वय अल्प असोन प्रौढीनें चालतात, असे पाहून फारच हर्षायमान होऊन 'हा पुत्र भाग्यवान होईल. वडिलांस दृष्टांत झाला, वरप्रदान झालें, तो पुरुष हाच व दौलतीचे अधिकारी हेच,' हा कृतनिश्चय झाले. मुरारराव वजीर यांच्या भेटीस बरोबर न्यावें. महाराजांचें वय विशेष नसतां मर्यादा आज्ञा पालन करून वडील ईश्वर त्याची आज्ञा तोच धर्म हें लक्ष धरून वडि-

लांची आज्ञा अवज्ञा न करितां ते वर्तते झाले. त्यावरून शिवाजी महाराज यांस पादशाहाचे दर्शनास न्यावें असा निश्चय केला. पंतांनीं-ही पादशाहापाशीं राजे यांचे पुत्र फार योग्य, गुणसंपन्न, वजीरी करण्यास दौलत चालविण्यास योग्य, ह्मणून तारीफ केली. 'दर्शनास आणावें' अशी आज्ञा झाली तें पंतानीं कळविल्यावर सुमुहूर्त पाहिला. तेव्हां शिवाजी-राजे यांनीं महाराजांस सांगून पाठविलें कीं, 'आपण हिंदु, हे यवन, परम नीच, यांपरते नीच नाहींत, त्यांचें आर्जव करणें, नमस्कार करणें, हा माझे प्रकृतीस त्रास उत्पन्न होतो. गोवधादि करितात. ब्राह्मण व धर्मनिंदा पाहणें परम अनुचित. रस्त्यानें जातां गोवध होतो. त्यांचे शिरच्छेद करावेत असें वाटतें व श्रम वाटतात. गायींस पीडा करणारांचा शिरच्छेद करावा असें मनांत येतें, परंतु वडील काय ह्मणतील हें चित्तांत वागतें यास्तव उपाय नाहीं. नाहींपेक्षां केलाच असता. मुसलमानांशीं संसर्ग करणें, अमीर वजीर यांचे घरीं जाणें, हें माझे चित्तास योग्य वाटत नाहीं. एकादे समयीं स्पर्श झाल्यास दुसरीं वस्त्रें घ्यावीं.' याप्रमाणें सांगून पाठविलें. तेव्हां पुत्रास निषेध करून सांगितलें, 'वडिलोपार्जित यांची सेवा करून वैभव आपण संपादिलें. तुह्मी वडील पुत्र, सर्वजाण असतां हें बोलणें तुह्मास नीट नव्हे. असें करूं नये.' ह्मणून कारभारी यांजपासून बोध करविला. तथापि त्यांचे विचारास नये. तेव्हां समानवयस्क यांज-पासूनही बोध केला, व जिजाबाईनेंही पुष्कळ सांगितलें. आपणही समक्ष सांगितलें, समाधान केलें.—'पृथ्वीचे अधिकारी ते, तेव्हां आपला धर्म आपण रक्षून सेवा करून असावें. पूर्वींपासून देवादि दैत्यांचे प्राबल्यें रावणाचे घरीं कालप्रतीक्षा करून जसें ह्मटलें तसें चालले. ईश्वरास असें करणें नसतें तर तुमचे वंशांतील सार्वभौमपद कां जातें ? असो. याकाळीं तसेंच चालून वैभव आह्मीं श्रम करून तुह्मांसाठीं मेळविलें तें जतन करून पादशाहाची कृपा संपादन करावी.' असें बहुतरीतीनें समजूत केली. तथापि खंबीर वृत्ति ढळेना. 'गायीदेवब्राह्मणांस पीडा करितात यापरता प्राण गेला तरी जावो; वडीलांची आज्ञा शिरसावंद्य; परंतु हें पाहणें नाहीं' असें उदासपणें उत्तर केलें. तेव्हां राजे यांनीं विचार केला जे, 'हे म्लेंछ ह्मणतांच अधिक तिरस्कार करितात. आह्मीं पादशाही चाकर. यांची बुद्धि दैव विचित्र दिसते. ईश्वरनिर्मित काय न कळे. यास्तव यांला लांब ठेवणें युक्त.'

एके दिवशीं आग्रह करून पादशाहाचे भेटीस नेले असतां मुजरा न करितां जाऊन बसले. तेव्हां पादशाहानें पंतांस विचारिलें कीं, 'राजाचे पुत्र हेच कीं काय?' पंतांनीं उत्तर केलें कीं, 'बहुत गुणवान् विद्वान आहेत. निशस्त तो बरखास्त दरबार अद्यापि पहिला नाहीं, परंतु आपले सेवेशी योग्य आहेत.' विडे देऊन निरोप दिला. राजे यांचे पुत्र प्रथम भेटीस आले याकरितां पोशाख जवाहिर दिलें. ह्यांनीं घरीं आल्यावर स्नान करून तीं वस्त्रें टाकिलीं. हें वर्तमान पंत यांस राजे यांनीं कळवून 'प्रौढ होत तोंपर्यंत लांब ठेवितों' ह्मणून सांगितलें. त्यांनींही सल्ला दिली. तारीफ केली. त्यासमयीं शिवाजीमहाराज यांचें लग्न शिरके यांची कन्या करून बहुत समारंभें केलें. नांव सईबाई ठेविलें. दादाजी कोंडदेव, पुणें येथील सुभेदार, मोजबा देण्यास आले होते त्यांबराबर जिजाबाई साहेब व राजे देऊन रवाना केलें. शके १५५९. बराबर कारभारी शिवनेरींत होते ते दिले.

दिल्लीमध्यें अलमगीर होते त्यांस पुत्र औरंगजेब उत्पन्न शक १५४० त झाले. शिवाय तीन पुत्र होते. त्यांत औरंगजेब बालवय असतां परमक्रूर, पराक्रमी, ज्याचें शरीर मोठें, दराज जो मनसबदार, बहुत उद्दाम, दैत्यांश, उग्र, असा शूर प्रौढ होता झाला. हें पादशाहानें पाहून त्यास अमदाबादेचे सुभ्यावर फौज देऊन रवाना केलें. तो सुभा घेऊन कांहीं दिवस तेथील दौलतीचा उपभोग करून होता. तों मलिकानें पादशाहाची फौज नामोहोरम करून घालविली. त्याजवरून पादशाहानें [औरंगजेबास] अमदाबादेहून आणविलें, आणि दौलताबादेवर फौज मातबर सरदार बराबर देऊन रवाना केलें. त्या संधींत मलिकंबर व साबाजीपंत निवर्तले. पादशाहात कमकुवत पडली. मलिकाचे लेक फतेखान कारभार करूं लागले. हें वर्तमान कळल्यावर औरंगजेब दरमजल चालून येऊन त्यानें बऱ्हाणपूर अशीरो घेतली व खानदेश हस्तगत करून दौलताबादेस मोर्चे लाऊन खडकी ह्मणून गांव नजीक होता, तेथें मलिकानें पेठ वसविली होती, ती जागा चांगली ह्मणून आपण खडकीवर राहिले. तेथें शहर वसवून नहर आणिले. रस्ते वगैरे करून त्याचें नांव औरंगाबाद ठेविलें. शके १५६० यांत. व नगरचा किल्लाही बांधिला. नंतर कांहीं दिवसांनीं दौलताबाद घेऊन सर्व पादशाहात आक्रमून खानदेश वऱ्हाड सुभे खुदस्त बुनयाद औरंगाबाद येथील सुभेदारी करून औरंगजेब राहाते झाले.

शिवाजीमहाराज पुण्यास आल्यावर रंगमहाल ह्मणून वाडा दादाजीपंतीं बांधिला होता तेथें राहिले. पूर्वीं प्रांताची आबादानी त्यांनीं केलीच होती, व महाराजांची मर्जी रक्षून आज्ञेप्रमाणें वागून यांस माहितगारी व दौलतीची रीति सांगून ते वागत होते. राजे दौलतीचे अधिकारी यांचे गुण, शहाणपण, विचित्र दैव जाणून आज्ञेंत [त्यांनीं] चालावें. महाराजांनींही वडिलीं ठेविलेले सेवक आणि कर्ते बहुत पोक्त इतबारी जाणून त्यांची मर्यादा वडिलाप्रमाणें ठेऊन भिडेनेंच त्यांशीं वागावें, असें मनांत आणून वागते झाले.

एके दिवशीं दादाजीपंतांनीं सरकारबागेंतील एक पाडाचा आंबा आपले हातानें महाराजांची स्वारी बरोबर असतां तोडिला आणि आपणच 'आज्ञेखेरीज हा विचार केला ह्मणून आह्मांस शासन असावें, हात तोडावा,' असें बोलले; आणि तोडावयासि चाकरास सांगितलें. तेव्हां सर्व बरोबर होते. महाराजांनीं सांगितलें, 'हें करणें श्रेयस्कर नव्हे. तुह्मी मालकच आहां.' असें ह्मटल्यावरून पंतांनी एक अस्तनी लांडी केली आणि सर्वांस सुचविलें जे, 'याप्रमाणें महाराजाचे आज्ञेखेरीज चालूं नये.' असें निष्ठेनें व इतबारीनें स्वामीचें कार्य तें प्राणापरतें जाणून पंत करीत होते.

या समयीं महाराजांनीं विचार केला जे, 'आपण वडिलांनीं मेळविलें तें खाऊन राहाणें योग्य नाहीं. आपण हिंदु. सर्व दक्षणदेश म्लेंछांनीं ग्रासिला. देवब्राह्मणगायींस क्षेत्रांस पीडा केली. धर्म बुडविला. हा रक्षणार्थ प्राणही वेंचून धर्म रक्षूं व आपले पराक्रमें नवीन दौलत संपादूं, तें अन्न भक्षूं. नवें साधावें हें या कुळांत जन्मल्याचें सार्थक. दैवावर भार घालून पुरुषप्रयत्न बळवत्तर अधिक होय. दैव पंगू आहे. यास्तव प्रयत्नें अलबल करावें. त्यास दैव जसजसें साह्य होईल तसतसें अधीक करित जावें. दैव परिणामास नेणार समर्थ आहे.' याप्रकारें मनांत कल्पना पूर्वजन्मांतरयोगें आणून निश्चय करिते झाले. 'वय व्यर्थ घालवणें नीट नव्हे.' ही सल्ला दादाजी कोंडदेव यांस विचारली. त्यांनीं 'आपण ह्मणतां परंतु याचा शेवट लागणें परम दुर्घट आहे. सर्व पृथ्वी यवनांनीं पादाक्रांत केली; स्थळें, किल्ले, जागा, फौज त्यांची भरली; या करण्यास आपणांस मातबर स्थळें असावीं, हिंदुराजे व हिंदुफौजा जागाजागा साह्यकर्त्या असाव्या, आपण परमश्रम साहसांनीं दुष्कर्म करावें, त्यासमयीं ईश्वराची

अनुकूलता व सिद्धपुरुषांचा आशीर्वाद असतां अशा गोष्टी घडतील. साहेब मनांत आणितात हें कठीण. वडिलें यवनांची सेवा करून योग्यता मेळवून दौलत संपादन केली. याचा विचार ह्मणावा तरी हें युग विपरीत. तेव्हां दिवसेंदिवस धर्म क्षयास जाणार, तेव्हां हें घडणें दुरासाद. कालदेशवर्तमान तींहींकरून मनसब्यास येत नाहीं. वडिलीं दौलत संपादिली ती गमाविली, हें वांट्यास न यावें' अशा प्रकारें सांगितलें असतां महाराजांनीं चित्तांत मसलत करण्याचे गुण सांगितले तितके मात्र घेऊन दोष ठेविले नाहींत. 'उपेक्षा करणें ठीक नाहीं. आपण चित्तांत आणिलें तसें करावें. धर्म वृद्धिंगत करण्यासाठीं प्राण दौलत गेली तरी जावो. प्रयत्न करावा' हेंच मनःपूर्वक आणून पहिलीं दौलतींतील माणसें संक्राजी नीळकंठ व बाळकृष्ण मजमदार व सोनोपंत व रघुनाथ बल्लाळ कोरडे शिवाय सरदार वगैरे ममतेंत मसलतींत येतील त्याप्रमाणें घेऊन आणखी चांगले मर्द शिपाई पाहून त्यांस जवळ ठेवावे. कारकून चांगला कर्ता लिहिणार पाहून त्यास ठेवावा. असें करूं लागले. तशींच राजकारणें करावीं; मातबर चहूं जागाचे मराठे यांसि आप्तपणा करावा; पत्रें लिहावीं; त्यांस आणून भेट घ्यावी; आपण त्यांजकडे जाऊन 'आह्मांस अनुकूल असावें' असें बोलावें. असें करण्यांत ज्यांनीं महाराजांचें बोलणें परम आदराचें व पराक्रमाचें ऐकावें त्यांस वेध लागून वाटावें कीं, 'हे परम थोर होत. यांचेच संमतें चालावें. हे सांगतील तसें चालावें. प्राणही गेले तरी जावोत परंतु सेवा करून यांचे आज्ञेंत चालावें.' अशीं सर्वांचीं चित्तें वेधून घेतलीं. शके १५६२ यांत या मसलतीचा आरंभ करिते झाले.

तों वय तेरा वर्षांचें झालें. तेव्हां तोरणा किल्ला विजापुरी पादशाहींतील तेथें राजकारण करून मावळे लोक, पासलकर, कंक, मालुसरे, वगैरे सरदार ठेऊन ममतेंत ठेविले. त्यांचे हातें वरील नामजात लोक यांस वश करून 'किल्ला आमचे निसबतींत द्यावा, आह्मीं पादशाहापासून आपलेकडे करून घेऊं' ह्मणून वश करून घेतला. आणि पहावयास जाऊन 'प्रचंडगड' असें नांव ठेविलें. दुरजादेवीचा डोंगर त्याच संनिध फार चांगला पाहून तेथें वस्ती करून तेथें किल्ला करावा असें चित्तांत आणून सांप्रदायानुरूप केला. हवलदार कारकून नेमून दिले. त्या पर्वतास तीन माच्या होत्या त्या चांगल्या त्यांसही काम लावून बांधल्या. किल्यास इमारत करविली. त्याचें नांव 'राजगड' ठेविलें. माच्याचें नांव

एक 'सुवेळा' व 'संजीवनी' व 'पद्मावंती' असें ठेवून चार किल्लेच असे केले. राजधानीस राहण्यास योग्य अशी कल्पना करून बांधिते झाले. हें वर्तमान पादशाहास कळल्यावर शाहाजीमहाराज यास विचारिलें. त्यांनीं सांगितलें जे, 'त्या किल्यावर दुसेरकडील कांहीं गडबड आढळली, यावर बंदोबस्त तोरण्याचा केला. त्यालगती जागा चांगली दिसली तेथेंही किल्ले बांधून जागा करविली. आमचे जहागिरीलगत चांगली जागा आह्मांकडे असावी' असें बोलोन सरपोष राखिला. आणि शिवाजीराजे यांस व दादाजी कोंडदेव यांस निषेध करून लिहिलें, 'हें करणें चांगलें नाहीं, व तुह्मी जवळ असोन हें कसें करितां?' तेव्हां त्यांनीं आंतील पर्याय लिहून पाठविले व शिवाजीराजे यांसही विनंती केली. परंतु त्यांचे चित्तांत तें कांहीं नये.

पादशाही खजीना विजापुरीं जात होता त्याची वातमी राखून त्याजवर लोक पाठवून आणिला. प्रचंडगडावरीही द्रव्य सांपडलें. तेव्हां दादाजीपंत यांनीं विनंती केली, 'आपण पाया घातला हा युक्त नव्हे. दैवावर भरंवसा ठेवून हें कर्म आरंभिलें. आपलें स्वामित्व तें किती? पादशाहती चार चहूंकडे. दिल्लीचा साहिबजादा येऊन औरंगाबादेंत राहिला आहे. महाराज वारंवार लिहितात. केलें कर्म सिद्धीस न गेल्यास फार गैर. तथापि साहेब दैवाचे दिसतात. कर्तृत्वबुद्धि ही विचित्र. फार सावधपणें जें करणें तें करावें. याउपरी 'यांजपाशीं कारभार करणें युक्त दिसत नाहीं. यांचे करण्यानीं महाराजांस पेंच पडणार. अपयश आपणांवर येईल' ह्मणून क्षीण झाले. देहावसानसमयीं महाराजांस जवळ नेलें. 'आह्मीं बहुतां दिवसांचे सेवक, आमचा शेवट झाला, परंतु वडिलीं मेळविली दौलत माणसें द्रव्य जतन करावें' ह्मणून आपले पुत्र स्वाधीन केले, आणि वारले. त्या संधीस दादाजीपंतांस महाराजांचें पत्र आलें कीं, 'द्रव्य जमलेलें पाठवावें.' तों हे वारले. नंतर महाराजांनीं उत्तर पाठविलें जें, 'येथें खर्च वाढला आहे. याउपर खर्चास खजीना आणणें तो कर्नाटक प्रांतींचा आणावा. येथील पाठवीत नाहीं' असें लिहिलें. तेव्हां 'सर्व आटोप पुत्रानें केला, अचाट कर्म करूं लागले, द्रव्य मुलुख त्यांचाच आहे' हा संतोष मानते झाले. आपण विजापुरीं राहणें ठीक नाहीं, ह्मणून चंजावरीं जाण्याची मसलत काढून जाते झाले.

यानंतर चाकणचें ठाणें येथें फिरंगोजी नरसोला हवलदार होता तो

महाराजांस येऊन भेटला. संतोषी होऊन ठाणें त्याचे स्वाधीन केलें. वरकड जे जेथें होते ते आज्ञेंत चालले, त्यांचीं कामें त्यांचे स्वाधीन करून पूर्वीचे कौल यथास्थित प्रांत वहिवाटींत चालले........ बिजलपाग्या जुना होता त्यास प्रशस्त न वाटे ह्मणून शाहाजीमहाराजांकडे गेला. बाजी मोहिते, तुकाबाईसाहेबाचे भाऊ, यांचे स्वाधीन सुपें ठाणें तालुका होता, त्यास भेटीस बोलाविलें असतां न आले ह्मणून स्वारी केली. त्यास धरून आणून पागा वगैरे घेऊन महाराजांकडे बंगलोरास पाठवून दिलें. शामराजपंत रांझेकर यास 'पेशवे' असें पद दिलें, आणि तीनहजार पागा व मावळे लोक दहाहजार जमा केले. मोगलाचे किल्ले प्रांत घेतलेले ते जतन केले पाहिजे त्यास द्रव्य पाहिजे. द्रव्येंकरून लोक राजी राहतात. किल्ले काव्यानें मुलुख जेरदस्तींत येतो. मुलुख मिळाल्यावर राज्य साध्य होतें. मोगलाई राज्यांत बिकट जागा सह्याद्रि बंधारा. हा त्यांची फौज आली असतां आपणांस आश्रय. त्यांस असाध्य यास्तव साधावा. आणि त्या मुलुखांतील लोक माहितगार. पावसांत डोंगरांत चढणें, झाडींत शिरणें, यांस मावळे व कोंकणेवांचून घडणें नाहीं, हेच आधीं ठेवावे, त्यांस सरदार एसजी कंक व तानाजी मालुसरे व पासलकर देशपांडे, मुसेखोरे पौंडखोरे व हिरडस मावळ वगैरे प्रमुलोक यांस किताबा 'सरदार' असे देऊन नावनशी लोक शिपाई ठेविते झाले, आणि विचार केला कीं, 'किल्ले कोट घ्यावे; प्रांतांत अमल बसवावा; नीतीनें रयेतेस वागवावें; त्यांनीं अशी प्रार्थना करावी— ईश्वरा, याचें राज्य चिरकाल असो. अशी लावणी कौल देऊन करावी. यवनांचा उत्कर्ष यास्तव त्यांची मोठमोठीं शहरें तेथें द्रव्य बहुत आहे, त्याची पाळद राखून आणावें, ह्मणजे दुष्ट यवन आयास येतील. द्रव्यवान् ते जेरदस्तींत आणून त्यांजपासून खंड अथवा कर्ज ह्मणून घ्यावें. तो सहजच द्रव्यहीन होतो. आपणांस उपयोग' जाणून या रीतीनें करिते झाले. लोकांस द्रव्य पावूं लागलें असतां राजी राहतात. नामांकित मनुष्य शिपाई असेल तेथून आणावा. याप्रकारें किल्यांचीं राजकारणें करून किल्ले घेण्यास आपणच खासे जावें. धारकरी यांबरोबर पुढें व्हावें. भेदानीं व माहितगार यांचे युक्तींनीं घ्यावें. कोटघेऱ्याचे गांवाचा शेकार आगोटीस जाणार तों किल्यावर जाण्यापूर्वी त्या दिवसांत धारकरी निवड करून किल्याचे घेरांतील गांव तेथें लोक आपले मजूर

करून डोईवर भारे घ्यावे त्यांत तलवार घालून आपणही त्यांत जावें. वर जाऊन किल्ला घ्यावा. असे अनेक प्रकारें महाराज किल्ले घेत चालले. कागारी, दुर्ग, तिकोना, लोहगड, राजमाची, कुवारी, भोरप, घनगड, केलना आदिकरून किल्ले घेतले. मावळें सारीं सोडविलीं. जवळ जवळ पुंड देशमुख पाळेगार होते ते ममतेंत घेऊन आपले केले. राज्य साधून म्लेंछाचें पारिपत्य करून महाराष्ट्रधर्म रक्षणें, तेव्हां त्यांस जसे आपले होतील तसें करावें; विपरीत दिसल्यास पारिपत्य करावें. ते समयीं मोरोपंत पिंगळे कारभारी, संकाजीपंत वगैरे साहसकर्मांत जवळ होते तेही बहुत धाडसेंकरून उपयोगी पडूं लागले. असें राज्यसाधन दिवसेंदिवस अधिक करोत चालले. बंदल देशमुख ता॥ हिरडस हे येऊन न भेटत, तेव्हां त्यांजवर स्वारी करून धरून आणून मारिलें. रोहिडा किल्ला घेतला. त्याजवरून दहशतही पडली. किल्ले कोट घेतले त्यांजवर विश्वासू आणि मर्द असे हवलदार सरनोवत, घाडगे, निंबाळकर, गुजर, पालकर, जगताप, किती, शिर्के, मोहिते, यवले, सरदार व स्वार लोक ठेविले. योग्यतेनुरूप वाढविले. फौजेचा जमाव केला., विजापुरचे पादशाहींतून पांचशें सातशें पठाण बदलून चाकरीस राहण्यास आले. त्यांस ठेवावें न ठेवावें असा विचार पडला. 'विजापूरकरांचा आपला द्वेष. हे मुसलमान. भरंवसा कसा करावा ?' हें ह्मणतात तों गोमाजी नाईक पानसंवळ हवालदार, हे जिजाबाईचें लग्न झालें तेव्हां जाधवराव यांनीं सेवेशी दिले, त्यास विश्वासू जाणून अब्रू वाढवून त्याजपासून सेवा घेऊं लागले, त्यांनीं उत्तर केलें कीं, 'सरकार राज्य आक्रमण करणार, आले लोक न ठेवतील तर राज्यांतील चांगलीं मनुष्यें कशीं येतील ?' ही सल्ला फार चांगली जाणून ठेविले. त्यांची सरदारी राघो बल्लाळ अत्रे यांस सांगितली. नंतर सोडवेलकर व कोंडवेलकर हबशी यांचे चाकर मर्द जमादार होते त्यांचें सांगणें आलें कीं, 'आपली स्वारी कोंकणांत यावी ह्मणजे तळाघोसाळा घेऊन देतों;' व वजीर याचेंही राजकारण आलें. यांजवरून खासा स्वारी जाऊन दोन्ही किल्ले घेतले. प्रांतांत अमल बसविला. बीरवाडीस खाचीमेट चांगले पाहून किल्ला केला. याप्रमाणें करून नंतर हरिहरेश्वराचें दर्शन करून मागें येतां गोवलकर सावंत भेटले त्यांस नावाजून आपले चाकरीस ठेविलें. त्यांजपाशीं तीनशें होनांची नामांकित तलवार होती ती महाराजांस कळल्यावर तीनशे होन व पोषाख देऊन घेऊन तिचें

नांव 'भवानी' ठेविलें. ती आल्यावर बहुत यशस्वी झाले, ह्मणून तिची पूजा नित्यनेमें करीत. हरिहेश्वरास जाण्यांत जंजीरेचें व राजापूरचें राजकारण पक्कें न दिसल्यामुळें माघारे आले.

राजापुरीं बाळाजी आवजी प्रभु, पूर्वीं हवशी यांचे दिवाण, मजमदार, आवजी प्रभु याजवर इतराजी होऊन मारिलेमुळें तेथें मामाचे घरीं द्रव्य देऊन सोडविलेले होते. राजकारणी पत्र आलें तें अक्षर फार चांगलें व मजकूरही बहुत सुंदर पाहून येण्याविषयीं पत्र पाठविलें. तेव्हां 'कर्ज फिटल्यावांचून जाणें ठीक नव्हे,' याकरितां न गेले. स्वारी वरघाटीं येतां दळवी पाळेगारी करीत होते ते मोडून प्रांत जागे घेतले. राजगडास येऊन 'शिवपट्टण' असें नाम ठेऊन तेथील घरें रस्ते नीट करविले. पेठ करविली. आंबराई तेथें व पुणें येथें लाविली. रायगडचें राजकारण आलें तेथें जाऊन भेदानें किल्ला घेतला. तो पूर्वीं हवशी याजकडे होता. शके १५६८. किल्ला बहुत नामी उंच बिकट पाहून फार संतोषी झाले. त्याजपाशीं चांगला डोंगर होता तो किल्ला केला. नांव 'लिंगाणा' ठेविलें आणि राजगडास आले.

कल्याणावर स्वारी करावी, प्रांत घ्यावा, ह्मणून आबाजी सोनदेव पाठविले, त्यांनीं फौजेसुद्धां जाऊन प्रांत किल्ले घेतले; ह्मणून त्यांसच सुभा सांगून ते त्यांजकडे ठेविले. शहरांत मुलाणा हयाती सुभेदार होता तो दस्त केला. त्याची सून परम सुंदर होती ती आबाजीपंतीं ठेऊन घेऊन वस्त्रें देऊन तीस निरोप दिला. तो बोभाटा विजापुरीं कळला.

जंजीरे येथील राजकारण त्यास सांगितलेप्रमाणें न झालें. नाकतें असा शब्द ठेऊन मोरो त्रिमल पिंगळे राजगडीं पेशवाई देऊन ठेविले. निळो सोनदेव कामावर पडले जाणून बाळकृष्णपंतांची मजमी काढून दिली. अण्णाजी दत्तोस सुरनिशी दिली. गंगो मंगाजीस वाकनिशी सांगितली. माणकोजी दहातोंडे यांस सरनोबती होती ते वारले, पागा शिलेदार वाढत चालले, याजवरून नेताजी पालकर यास सरनोबती दिली. राघो बल्लाळ यास फौजेची सबनिशी दिली. पायलोकांची सरनोबती एसजी कंक यास सांगितली. याप्रमाणें सरदारलोक गांठ करून घाट चढून चंदनवंदन, केळणा, पांडवगड, नादगिरि, हे किल्ले घेऊन साताऱ्यास आले. महाराजांचे पुण्यें सातारा परळी हे स्वल्प

प्रयासें साध्य होऊन बंदोबस्त किल्लेदार वगैरे यथास्थित करून अण्णाजी दत्तो सुरनीस व माल सावंत यांस पन्हाळाप्रांतीं महाराजांनीं पाठविलें. त्यांनीं पन्हाळा वगैरे घेतले. हें वर्तमान महाराज यांस कळतांच पन्हाळप्रांतीं जातां 'वसंतगड' घेतला. पुढें शिरोळें वगैरे ठाणीं घालीत पन्हाळ्यास जाऊन पावनगड, विशाळगड, बावडा, रांगणा असे किल्ले घेतले, आणि कोंकणांत जाऊन राजापूर शहर लुटलें. तेथें बहुत द्रव्य सांपडलें. महाराजांचे प्रभावें जेथें जावें तेथें कार्य होऊं लागलीं. त्या प्रांतींचे किल्ले ठाणीं जंजीरे यांत ठाणीं घालून सुभा रावजी सोमनाथ यास सांगून ठेविलें. 'बाळाजी आवजी लिहिणार येथें आहेत त्यांस आणवा' ह्मणून सांगून आणविलें. अक्षर लिहिणार व बोलणार शहाणे असे पाहून कर्ज होतें तें देऊन चिटणिसीचीं वस्त्रें साडेतीन देऊन कलमदान रुप्याचें देऊन चिटणिशी सांगितली. त्यांचे बंधु दोघे होते. चिमणाजी आवजीस जमाखर्ची लिहिणार पाहून फडनिशी दफ्तरदारी दिली. शामजी आवजीस कारखानिशी रायगडची सांगितली. शके १५७० त पाठविलें.

स्वारी माघारी येतां शृंगारपूर ५५ सुरवे पाळेगारी राज्य करून होते. दहाहजार निवडक लोक ठेऊन होते. त्यांजपाशीं सुरवे कारभारी पिलाजी व तानाजी शिर्के होते. पिलाजी महाराजाकडेस वकिलीस होते. न जमे ह्मणून वकील पस्त करून ठेविले. फौज पाठवून संस्थान घेतलें. सुरवे बुडविले. शिर्के पळून गेले. कांहीं अनुकूल झाले त्यांस ठेऊन घेऊन कामें सांगितलीं. जे बहुत निष्ठेनें चालूं लागले त्यांस वाढविलें. जेथें कर्ते शिपाई कारकून असतील तेथून आणवून ठेवीत; कारण महाराज गुणग्राहक पद्महस्ती. माणसांनीं काम उमेदीनें अधीकच करावें. याप्रमाणें दाभोळापासून राजापूरदेश सर्व किल्ले सुद्धां घेतला, तेथील लोक महाराजांस धर्मशील ह्मणून यांचें राज्य वृद्धीस पावावें अशी इच्छा करिते झाले. कांहीं महाराजांचा आश्रय करिते झाले. प्रभाकरभट्ट उपाध्ये यांचे चिरंजीव बाळंभट व गोविंदभट्ट यांस उपाध्यपणा सांगून जवळ ठेविले. उपाध्यपणा परंपरा दिला.

कल्याणापासून राजापूरपर्यंत घेतल्या मुलखाचा बंदोबस्त करून राजगडाहून पायगडीं आले. तेथें सर्व जमीयत एक करून सरदार

फौजेची निवड करून चउलावरी स्वारी करून शहर लुटलें. सोनें, रुपें, मोत्यें, हिरे वगैरे बहुत द्रव्य सांपडलें. तीन दिवस मुक्काम करून कोट घेतला. रामेश्वराचें दर्शन केलें. खोजोजी ठाणेदार कैद केला.

हें वर्तमान वरचेवर विजापुरीं जातें झालें. मुलाणा हयाती कल्याणाहून गेला त्यानें पादशाहास सांगितलें कीं, 'शिवाजीराजे यांनीं बहुत फंद केला, किल्ले कोट फार घेतले, खजीने मारिले, शहरें लुटलीं, वगैरे बेभाट फारच गेले. यांचें लवकर पारिपत्य करावें. दिवसें दिवस चळावत चालले हें चांगलें नाहीं.' त्याजवरून सारे अमीर बोलावून विचार केला आणि बाजी शामराज ह्मणून सरदार होते त्यांस दहाहजार फौज देऊन पाठविलें, आणि '[शिवाजीस] धरून आणावें' असें सांगितलें. ते महाडापर्यंत गेले तों महाराज स्वारी करून चउल लुटून ठाणीं घालून राजगडास पावले. हें कळल्यावर खराबा होऊन माघारे फौजेसुद्धां विजापुरास गेले. तेव्हां पादशाहानें शाहाजीराजे यांस लिहून पाठविलें कीं, 'तुमचा बेटा अफरी होऊन बेकैदी करितो. किल्ले कोट ठाणीं घेतलीं. शहरें लुटलीं. तुह्मी पादशाहांचे उमराव विश्वासू असोन हें करणें ठीक नाहीं. यास हुजूर आणवावें.' त्यानें उत्तर पाठविलें कीं, 'लेक आपलें मानीत नाहीं. जसें पाहिजे तसें पारिपत्य करावें' असें लिहून पाठविलें. तेव्हां रोष येऊन इतबार न पडे. राजे यांनीं शिवाजीराजे यांस पत्र लिहिलें, 'तुमचे वर्तणुकीनें आह्मांवर इतराजी झाली व करितां हें नीट नव्हे. याउपरी पादशाहास जाऊन भेटावें, आणि त्याचे आज्ञेप्रमाणें किल्ले कोट मुलुख सोडून द्यावा.' असें बहुतप्रकारें लिहिलें. ते समयीं महाराजांनीं विचार केला जे, 'वडील देवाप्रमाणें. त्यांची आज्ञा ती शिरसावंद्य; परंतु सर्व धर्म बुडाला, सर्व म्लेंछमय झालें, यांचा उच्छेद करून धर्म रक्षण्यास जीवादारभ्य श्रम करावे तें आह्मांस करणें, तेव्हां वडिलीं लिहिलें तसें कसें चालावें ? हें मनांत आणि त्याहून हें श्रेयस्कर ह्मणून हा मार्ग अवलंबिला. आह्मांकरितां वडिलांवर पादशाहाची गरमर्जी, यास्तव वाडिलांस श्रम वाटत असतील याचा विचार कसा करावा ?' असे विचारग्रस्त होते. जवळ स्त्री सईबाईसाहेब होती, त्यांसही स्वमत सांगितलें. 'वडिलांचीं पत्रें आलीं यास विचार काय करावा ?' त्यांनीं उत्तर केलें, 'आह्मीं स्त्रिया. "स्त्रीबुद्धिः प्रलयं गता" असें शास्त्र. साहेबांजवळ मोठेमोठे विचारकर्ते कारकून

व सरदार आहेत त्यांची सला घ्यावी, परंतु विचारिलें त्याअर्थी आमचें मत राज्य साधावें, देवब्राह्मणांची स्थापना करावी, धर्म रक्षावा ही इच्छा धरिली तें योग्य. देवावर भार घालून चालावें. यश देणार तो समर्थ आहे. राज्य साधणें त्याअर्थी मोह काय उपयोग? महाराज दूरदेशी, नाहीं तर त्यांसही या गोष्टीचा संतोषच होता.' असें बोलल्यावरी महाराजांचे मनांत तेंच, तेव्हां संतोष पावले. आणि सरदार कारभारी वगैरे आणून त्यांसही हा प्रश्न केला. त्यांचीही सला तशीच पडली. तेव्हां हा विचार ठरला. 'आह्मीं गेल्यावर पादशाहा गौरव करतील ह्मणावें तर आह्मीं किल्ले कोट त्यांचे घेतले ते सोडीत नाहीं. अधीकच घेणार. हें त्यांस सुखावह कसें वाटेल?' अशीं उत्तरें दाखवावयाजोगीं पाठविलीं. आंतून महाराजांस 'तो प्रांत बळावून फौज जमीयत करून हिंदुराजे यांचीं राजकारणें करून असावें तों आह्मीं इकडील बंदोबस्त करून लवकरच येतों; नंतर इकडे येण्याचें करावें; तोंपर्यंत सावधानतेनें असावें' असें लिहिलें. तेव्हां त्यांनीं दाखवावयाजोगीं पत्रें होतीं तीं पादशाहाकडे पाठऊन आपल्यास्वाधीन लेक नाहीं, अशी खातरजमा करविली. परंतु राजे यांचा विश्वास पडून संशय न जाई. तेव्हां बाजी घोरपडे त्याप्रांतीं होते त्यांस सांगितलें कीं, 'राजे यांस हरतऱ्हेनें कैद करून शाहाजीस आणावें.' राजे तेसमयीं त्रिवापीनजीक चंजाउरीं होते. घोरपडे यानें भोजनास बोलावून निखालसपणा दाखवून जेवणास नेलें. तेथें दगा करून धरिलें, आणि पादशाहापाशीं नेलें.

त्या संधींत दिल्लीहून औरंगजेब याची बहिण औरंगाबादेस होती तिणें लिहिलें जे, 'पादशाहा बेहोष झाले तरी तुह्मी सत्वर येऊन पादशाहीचा बंदोबस्त करावा.' हें कळतांच महकूबासिंह (मोहकमसिंग) यास सुभेदारीवर ठेऊन आपण फौजेसुद्धां दिल्लीस जाण्याचा मनसुबा केला. 'शिवाजीराजे बहुत प्रतापी बळावले; सामान, लोक चांगले जथविले; आपले किल्ले कोट घेतले आणि पुढे ते अधीकच घेतील; आपण असतां हिसाब धरीत नाहींत; मागें सुभे ठेविले असतां त्यांशीं सुरळीत चालणार नाहींत, हें एक; दुसरें मर्द शिपाई यांची मसलत पडली, त्याअर्थी आपले सेवक करून बरोबर घ्यावे, सुभाही सांगावा,' ह्मणून राजकारण पाठविलें. 'तुह्मी बराबर

यावें' असें सांगून पाठविलें असतां महाराजांनीं अनादर करून सांगितलें, 'तूर्त आह्मांस विजापूरची मसलत पडली; शाहाजीमहाराजांवर इतराजी होऊन ते पेचांत पडले, त्यांचें कांहीं तरी केल्याशिवाय कांहीं करणें नाहीं' असें सांगोन वकिलास निरोप दिला.

औरंगजेब दरमजल करून दिल्लीस निघोन गेले. अलमगीर पादशाहास कैद करून डोळ्यांत सळ्या घालून आपण स्वतः तख्तावर बसून पादशाहात चालवूं लागले. या गलबलींत चार अमीर औरंगजेब याचे भाऊ होते त्यांनीं लढाई केली. त्यांत उमराव माहूरकर देशमुख हे युद्धांत पडले. त्यांची स्त्री इणें, आपली सरदारी, हिमतीनें युद्ध केलें. फते पावली. यावर वर्तमान कळलें, त्याजवरून तिजवर संतोषी होऊन 'रायबागीण' ह्मणून किताब औरंगजेबानें दिला. माहूरचे देशमुखीचे फरमाने तिजला करून दिले. 'कांहीं दिवस औरंगाबादचे निजबतीस चाकरी करावी,' असें सांगून पाठविलें. मुरादबक्ष व सुजादशाहा व दाराशुक्र असे तिघे भाऊ होते ते औरंगजेबानें मारून आपणच पादशाही बळकाविली.

इकडे शाहाजीमहाराज विजापुरीं आणल्यावर पादशाहानें सांगून पाहिलें व मुरारपंतापासूनही सांगाविलें असतां 'पुत्र स्वाधीन नाहीं' हेंच बोलणें पडलें. यावर भिंतीस कोनाडा करून त्यांत एक चिरा बसविला. आंत एक बसणेची जागा राखून चिणिलें. कारण, 'जर तुह्मी त्याचा मुलुख न द्याल तर असें करणार' असें लिहिलें. नित्य एक दोन वेळ काढावें आणि पुन्हा ठेवावें असें करूं लागले. उत्तर आल्यावर चिरा बसवावा असा निश्चय केला. हें महाराजांस कळल्यावर पश्चात्ताप झाला. 'न जाऊन परिणाम नाहीं. धर्मस्थापनेसाठीं हें कर्म केलें. श्रींनीं आपलेमुळें वडिलांस हा समय प्राप्त केला. आतां जाऊन अगर मसलत करून कांहीं होत नाहीं. महाराजांस तसा प्रसंग प्राप्त झाल्यास आपण देहत्याग करावा, यापरती तोड दिसत नाहीं. चालून जाऊन युद्ध केलें तरी अधीक पीडा करतील.' असे तर्क करून चिंता करीत असतां श्रीचा दृष्टांत झाला कीं, 'राजे यांस भय कांहीं लागूं देत नाहीं. हें संकट परिहार करितें.' यावरी संतोषी होऊन आंतून सर्व कळविलें. उत्तरें पाठविलीं कीं, 'आपले दैवीं जसें असेल तसें होईल. आमचे दैवीं असेल तसें आह्मीं करणार.' अशीं उत्तरें आलीं तीं दाखविलीं, आणि सांगि-

तलें, 'पुत्र स्वाधीन नाहीं. पाहिजे तसें करावें.' तेव्हां पादशाहानें विचार केला, 'याचे प्राणावर आलें असतां याचे हातून कांहीं होत नाहीं, यावरून पुत्र याचे स्वाधीन नाहीं. जर कांहीं इलाज असता तर हस्तन्हेनें कैद करून आणिता. याउपरी याचा अपराध नाहीं.' खातरजमा झाल्यावरून रणदुल्लाखान व मुरारपंत व सरज्याखान यांनीं अर्ज केला जे, 'यांचे स्वाधीन बेटा नाहीं हें प्रमाण. शाहाजीराजांसारिखे अमीर नाहींत, व मर्द शिपाई यांस विनाकारण मारूं नये. मोठ्या कामावर पाठवून मारावें' अशी फार त्रिवर्गांनीं रदबदली करून वांचविले. रणदुल्लाखान जामीन होऊन स्वाधीन घेतले. जहागीर कायम राखिली. असा त्रिवर्गांनीं उपकार केला. त्यांस वाई कन्हाड हिम्मतपूर जहागीर होती.

नंतर कांहीं दिवशीं सुलतान शिकंदर पादशाहा शरीरीं पीडा होऊन वारले. त्यांचे लेक अल्ली इदलशाहा लहान होते. परंतु बेगम बडी साहेबीण त्याची मातुश्री इणें पादशाहा लहान त्यास घेऊन सर्व आक्रम केला. स्त्रीबुद्धि; 'मुरारपंतांवर कांहीं अंतर आणून दस्त करावे, मारावे,' असें चार द्वेषी होते त्यांनीं सांगितल्यावरून, विचार न करितां, बोलावून आणून कैद करून मारविसे केलें. हें त्यास कळतांच जवळ हौद होता त्यांत स्नान करून शिक्का त्याग करून त्यांनीं संन्यास घेतला असतां तसेच त्यास मारिलें. याप्रमाणें राज्य स्त्रीबल पाहून शाहाजीराजे निघोन कर्नाटकांत गेले.

शिवाजीराजे यांनीं कोंडाणा किल्ला भेद करून तानाजी मालुसरे यानें आणिल्यावरून त्यासच घेण्यास पाठविलें. किल्लेदार उदयभान रजपूत होता. मालुसरे यानें भेद केला. वरते चढतात असें कळल्यावर हुशार होऊन चालून आला. युद्ध झालें. उभयतांकडील लोक रणीं पडले. महाराजांच्या दैवेंकरून उदयभान रणीं पडला. फते होऊन किल्ला घेतला. हें वर्तमान महाराजांस कळतांच किल्ला पहावयास गेले. किल्ला फार चांगला पाहून किल्ल्याचें नांव 'सिंहगड' ठेविलें. मालुसरे याचे भाऊ सूर्याजी मालुसरे यास तेथील सुभा देऊन ठेविलें. नंतर नगरशहरावर गेले. पुरा मारिला. तेथें माल पुष्कळ सांपडला. हत्ती व पांच सातशें घोडे पाडाव झाले. लोकांस बक्षीस दिले. लोक संतोषी झाले. कामें करूं लागले.

निळकंठ हैबतराव मर्द शाहाणे कूर यांजकडे किल्ला पुरंधर दौलत मो-

गल पादशाही, मुरारपंतीं बांधिला तो, इनाम गांव हक्करसूम चालत होता, तो निजामशाही केला. पादशाही शिबंदी ठेऊन चालूं लागले. त्याजवरून औरंगाबादेचे सुभ्याची फौज चालून किल्ल्यावर आली. 'खावंदाशीं निमकहरामी न करावी' असें लोकांनीं सांगितलें तें न ऐकिलें; ह्मणून स्त्रीनें सांगितलें असतां तीस तोफेचे तोंडीं उडविली. हें वर्तमान पादशाही फौजेंत समजल्यावर फौज उठोन गेली. असे क्रूर पुंडावे करून किल्ला वळकावून होते ते वारले. त्यांस पुत्र निळो निळकंठ व पिलाजी निळकंठ व संकाजी निळकंठ असे तिघे भाऊ चावलीकर नाईक ब्राह्मण तिघेही भांडूं लागले. निळोपंत याचा व दादाजी कोंडदेव याचा घरोबा चालत होता, त्याजवरून महाराजांशींही स्नेहानेंच होते. महाराज राजगडचे निघोन सुपेंदेशीं जाण्यास पुरंधरावरून चालले. नारायणाचे देवालयाजवळ मुक्काम केला. तेसमयीं किल्ल्यावरील लोकांनीं विचार केला जे,'घरकलह करितात, तेव्हां किल्ला हरकोणी घेईल, याकरितां शिवाजीमहाराज थोर व भोंवता मुलूख त्यांचा, त्यांचे पदरीं पडावें.' असा बेत करून त्रिवर्गांस बोलले, 'राजेसाहेबांचा व तुमचे वडिलांचा स्नेह आणि किल्ल्याचे जवळ आले. तुह्मी जाऊन भेट घेणें. त्यांचा आदर करावा. भांडतां हें त्यांस बोलावें, ते सांगतील तसें चालावें.' त्यांचे मनांस येऊन जाऊन भेटून ठेऊन घेतलें, कारण दिपवाळीचे दिवस, तेव्हां स्नानास वर बोलाविलें. तेसमयीं 'च्यार मातबर सोडून येणें ठीक नाहीं' असें सांगितल्यावर 'सर्वांस घेऊन यावें' ह्मणोन आग्रह केला, त्यावरून वर गेले. तीन दिवस वरतेच राहिले. त्या दिवसांत तिघांचें प्रकरण ऐकिलें. वडील भाऊ दोघांस कांहीं न देत, यावरून दोघांचे विचारें महाराजांचे पदरीं पडावें. तसें राजकारण केलें. लोक पूर्वींच अनुकूल. तिसरे दिवशीं निरोप घेऊन यावें, तों 'निळोपंत निजावयास गेले' ही बातमी उभयतांनीं कळविली. वरील लोक संधानांत होते ते व आपले लोक पाठवून निळोपंतास दस्त केलें आणि त्रिवर्गांस किल्ल्याखालीं बरोबर आणिलें. किल्ल्याचा बंदोबस्त केला. 'इनाम गांव व हक्क त्रिवर्गांनीं यथाविभाग घ्यावा आणि सुखरूप राहावें' असें सांगून बराबर घेतले. सेवा सांगितली. हिरोजी फरजंद व हरबाजी व तुळाजी असे तिघे शिपाई जाणून वाढविले.

सुप्यास जाऊन श्रीजेजुरीं देवदर्शन करून राजगडास माघारे आले. जेजुरींत राजवाडा बांधविला. कल्याण प्रांत पाहावयास गेले. यावर माळ

सांपडली ती मोजदाद करून राजगडास पाठविली. बहुत द्रव्य पाहून संतोषी झाले. हें पाहून आबाजीपंतीं अर्ज केला जे, 'एक स्त्री बहुत सुंदर, लावण्यवान्, महाराजांचे सेवेशीं योग्य जाणून ठेविली आहे.' असें बोलल्यावर मातबर दरबार करून आबाजीपंतास 'तुह्मी स्त्री चांगली आहे बोललां, ती पाहण्यास घेऊन येणें' ह्मणून सांगितलें. यावरून तिला वस्त्रें भूषणें देऊन आणिली. तिला पाहून महाराज संतोषी झाले आणि बोलले जे, 'इचें लावण्य असें आमचे मातुश्रीचें असतें तर आमचेंही स्वरूप असेंच झालें असतें.' असें सर्वांत बोलल्यावर सर्वांस आश्चर्य वाटतें झालें. आबाजीपंतास सांगितलें कीं, 'ज्यास यश पाहिजे त्यानें परस्त्रीअभिलाष करूं नये. राजानें उच्छिष्ट स्त्री अंगीकारूं नये. परस्त्रीअभिलाषइच्छेकरून रावणादि क्षयास गेले. राजास प्रजा सर्व अपत्याचे जागां. स्त्रिया करणें तर शतावधि कराव्या.' राजधर्म असा बोलले, तेव्हां महाराज थोर होत असें सर्वांनीं मानिलें. त्या स्त्रीस अलंकार वस्त्रें देऊन तिचा सासरा विजापुरास गेला तिकडेस पाठविली. जागा चांगली पाहून तेथें इमारत करविली. त्याचें काम आबाजीपंतासच सांगितलें, आणि राजगडास आले. मोरो त्रिमल पेशवे नाशिकप्रांतीं फौज सरदार देऊन रवाना केले. त्यांनीं जाऊन सत्ताविस किल्ले बांधारीचे घेतले. त्यांजकडेसच तेथील बंदोबस्त सांगितला.

महाराजांनीं आपलीं लग्नें करावीं ह्मणून तीन लग्नें तीस वर्षांत केलीं. शरीरसंबंध जाधव, मोहिते, गाईकवाड यांचा केला.

चंद्रराव मोरे जावलीकर दहा हजार लोकांसह असून किल्ले खोरें बळावून होते. त्यांसी सलुख लावून 'तुह्मी आमचे ह्मणावें. आज्ञेंत वागावें' असें राजकारण करविलें असतां मुदाईनें महाराजांस खातरेंत न आणितां चालूं लागले बद्दल विचार केला. मावळे लोकांचा सरदार हातीं न लागे. कावेबाजीचे हुनरें हातीं घ्यावा ह्मणून त्याजकडे बोलण्यास राघो बल्लाळ सबनीस यास पाठविलें. दोनशें लोक निवडक बराबर दिले. त्यानें जाऊन शरीरसंबंधाचें बोलणें लाविलें; आणि राहिले. विचार पाहिला. चंद्रराव कैफी, लोकाची ही फूट पाहून, राजकारण करून महाराजांनीं लिहून पाठविलें, 'आपले पुण्येंकरून चंद्रराव याचें काम करितों. साहेबीं हरएकनिमित्यें यारोखें येण्याचें करावें. येथील संकेताप्रमाणें कार्य करून सूचना करितों तसें घा-

टाखालीं उतरोन यावें.' त्याजवरून उत्तर पाठविलें, 'तुमचे लिहिल्याप्रमाणें आह्मी राजगडाहून पुरंधरीं येऊन श्रीमहाबळेश्वराचें दर्शन घेतलें' असें कळविलें. त्या अवसरांत रघुनाथपंतानें चंद्रराव याचे भाऊ सूर्यराव या दोघांस खलबतास ह्मणून नेलें तेथेंच मारिलें, आणि दरवाजास आले, तों लोक कांहीं सावध झाले. थोडे होते त्यांस मारामार करून सांभाळून आपले लोकांत आले. तेथून निघतां संभाजी कावजी मोरे याचे कारभारी हनुमंतराव ह्मणून नामी सरदार होते त्यांस मारिलें. महाराज महाबळेश्वरीं होते तेथें देवाचें दर्शन घेऊन सूचना येतांच निसणीचे घाटें जावलीस गेले. दोनप्रहरपर्यंत युद्ध केलें. नंतर ठाणें घेतलें. चंद्रराव याचे लेक बाजीराव [व] कृष्णराव धरिले. पुरंधरीं कैदेंत नेऊन ठेविले. आणि कबिलें आणि फक्त उभयता लेक पुण्यास नेऊन दक्षिणेकडे निमजागा आहे तेथें मारिले. कांहीं दिवसांनीं कबिलें सोडिलीं. जावली घेतली. शके १५७७. मत्ता बहुत हातीं लागली. वासोटा किल्ला घेतला, त्याचें नांव 'व्याघ्रगड' असें ठेविलें. सावतरे खोरें येथें दादाजीपंत ह्मणून मोरे याजकडील राहात होते त्यांस दस्त करून खोरें घेतलें. याप्रमाणें मोरे यांचीं ठाणीं प्रांत ही सर्व घेतला. नंतर प्रतापगड येथें मठ बांधिले. ते जागा चांगली पाहून किल्ला वसविला. इमारत केली. त्याचें नांव 'प्रतापगड' ठेविलें. कांहीं दिवस राहून बंदोबस्त करून राजगडीं आले. पुढें बेदरावर स्वारी करावी असें करून जमाव करून गेले. बेदरशहर मारून माल घेऊन ठाणीं घालीत माघारे आले. मध्यें जुन्नर व चाकण एथें औरंगजेबाकडील सुभ्यानें ठाणीं घातलीं होतीं तिकडे जाऊन जुन्नर मारून अम्मल वसविला. चाकण घेतला.

वडील स्त्री सईबाई गरोदर होती ती प्रसूत झाली. पुत्र झाले. शके १५७९ हेमलंबी संवत्सर ज्येष्ठ शुद्ध १२. तो समारंभ दानधर्मादिकें करून नांव 'संभाजीराजे' ठेविलें.

पूर्वीं धर्माची ग्लानी झाली. देवब्राह्मणगायींस पीडा झाली असतां पूर्वयुगांतरीं देवानें मनुष्यवेशें अवतार धरून, महान् ऋषि हे भूदेव होऊन धर्मस्थापना करावी, तसेंच कलयुगाचे ठायीं धर्मउच्छेद झाला असतां ईश्वरी अंशरूप राजे होऊन कर्मज्ञानउपासना कांडत्रयात्मक वेदमार्ग दहा हजार वर्षेंपर्यंत स्थापावा असें विष्णुपुराणाचे ठायीं आहे, त्या अन्वयें म्लेंछमय पृथ्वी झाली, धर्मउच्छेद झाला, गायीब्राह्मणांस

पीडाही झाली, याकरितां, शिवाजीराजे हे पूर्वीं श्रीचे वरदानें निर्माण झाले. त्यांस बुद्धि म्लेंछांचा उच्छेद करावा आणि धर्म स्थापावा ही झाली. त्या आधारेंच त्यांस साह्यभूत ऋषिअवतार सत्पुरुष, पूर्व-कालाचे ठायींप्रमाणें, बहुत निर्माण झाले. कलयुगाचे ठायीं मुख्य धर्म उपासना नामस्मरण कीर्त्तन हे सुलभ उपाय यांची स्थापनाही ते स्थापिते झाले. चिंचवडचे ठायीं मोरयादेव धरणीधर, श्रीगणपतिउपासक, साक्षात्कारी, ज्यास प्रत्यक्ष दर्शन व्हावें व भोजनादि ज्यांचें एकेठायीं व्हावें असे जे परम सिद्ध, त्यांनीं कीर्तन धर्म उपासना स्थापिली. निगडी येथें रंगनाथ स्वामी, व विठ्ठलराव यांचे बंधु, हे बेदरीं पादशाहाची सेवा करीत असतां, श्रीदत्तात्रयसंप्रदाय, श्रीचा साक्षात्कार, असे रंगनाथ स्वामी ब्रह्मचारी व विठ्ठलराव गृहस्थ यांनीं कीर्त्तनभक्ति उपासना स्थापिली. वारणातीरीं शिंगाटाचे जोश वामन, दहिटणीं निंबाजीबावा थोर सिद्ध झाले. तसेच बोधलेबोआ झाले. जयरामस्वामी ब्रह्मचर्यव्रतें तीर्थ तप करून भगवद्भक्तियोग परमसिद्ध कृष्णउपासक शाक्तसंप्रदाय, महायोग्य असे वडगांवीं झाले. केशवस्वामी भागानगरीं परमसिद्ध कीर्त्तन भक्तिज्ञान स्थापिते झाले परमानंदबोआ पोलादपुरीं बहुत योग्य तपस्वी सिद्ध झाले. तसेच त्र्यंबक नारायणाश्रमबोआ झाले. पाटगांव येथें मानीबोआ झाले. अचलपुरी गोसावी परमसिद्ध संगमेश्वरीं झाले.

श्रीतुकारामबोआ लोहगांवीं देहू येथें जन्मांतरयोगें शूद्रवर्णांत मोरेकुळीं उत्पन्न झाले. श्रीपांडुरंगाचे परमभक्तधुरीण होऊन पांडुरंगाचा साक्षात्कार प्रत्यक्ष पूर्ण कृपा त्यायोगें अभंग पदें करून सकल पुराणप्रमेय रचना करून जगदुद्धार करिते झाले. त्यांचें कीर्त्तन ऐकावें ह्मणून शिवाजी महाराज सिंहगडाहून रात्रीस घोड्यावर बसून कीर्त्तन ऐकून जात, असें होत्साता, एके-दिवशीं नित्याप्रमाणें पुणें येथें वाण्याचे घरीं तुकोबाचें कीर्त्तन चाललें. शिवाजी महाराज जाऊन ऐकत बसले तों, अविंधाचें प्राबल्य, 'महाराज कीर्त्तनास येतात,' ही बातमी राखून चाकणच्या ठाण्यांतून दोन हजार पठाण पाठऊन ते तो वाडा वेढून उभे राहिले; तों हें लोकांस कळून कथेंत गलबल झाली. 'शिवाजीराजे यांस धरून न्यावें तर ओळख पुरत नाहीं, याकरितां सर्वांसच धरून न्यावें, मारावें,' असें पठाण बोलूं लागले. तें तुकोबांस कळतांच 'सर्व स्वस्थ बसावें, कीर्त्तन ऐकावें,' असें

सांगून त्यांनीं श्रीपांडुरंगाचा धांवा केला. शिवाजीराजे भय न पावतां कीर्त्तन ऐकत बसले. इतक्यांत श्रीपांडुरंग शिवाजीमहाराजांचें स्वरूप धरून घोड्यावर बसून वाड्यांतून पठाणाचे अंगावरून बाहेर निघाले. ते पाहून राजे जातात त्यांचे मागें सारे पठाण लागून गेले. त्यांस अरण्यांत घेऊन जाऊन नाशातें पावविलें आणि गुप्त झाले. इकडे महाराज कीर्त्तन ऐकून आर्ती झाल्यावर सिंहगडास निघोन गेले.

तसाच सर्व जगाचा उद्धार घडावा ह्मणून श्रीमारुतीअवतार श्रीरामदास उपासक कलियुगीं, जसे पूर्वीं अगस्तिमुनि श्रीरामउपासनास्थापक झाले, असेंच तदंश श्रीरामदासस्वामी निर्माण झाले. गंगातीरीं जांब ह्मणून गांव आहे तेथील वृत्तिवंत कुळकर्णी परंपरा श्रीरामभक्त, त्यांत सूर्याजीपंत परमधर्मशील तपस्वी श्रीसूर्यउपासक झाले. श्रीरामचंद्र व मारुतीची परम भक्ति करिते झाले. त्यायोगें ब्राह्मणरूपें सूर्य प्रत्यक्ष येऊन दर्शन झालें. सन १५२६ रामनवमींत श्रीचे देवालयीं साक्षात्कार होईल सांगून प्रसाद देऊन अदृश्य झाले. त्यानें ह्याअन्वयें मध्यरात्रीं मारुतीचे देवालयीं असतां श्रीरामचंद्रसाक्षात्कार होऊन पंचायतन पूजेस दिलें, व 'दोन पुत्र होतील ते जगविख्यात कीर्ति करून जगाचा उद्धार करतील, भगवद्भक्त होतील,' आज्ञा झाली. त्या अन्वयें दोन पुत्र झाले. ज्येष्ठानें प्रपंच व परमार्थ करून, भगवद्भक्ति करून कीर्ति केली. दुसरे रामदासस्वामी वलन्विचू, विरक्त, व्रतबंध झाला असतां 'सावधान' ह्मटलें तेव्हां 'प्रपंच कशास करावा ?' ह्मणून तपश्चर्या अरण्यवास करिते झाले. गायत्रीपुरश्चरणें उपासना अष्टांगयोगसाधनें व ज्ञानसंपन्न असे होत्साता गंगातीराचे ठायीं अरण्यांत फलाहार पर्णाहार सीतोष्णपर्जन्यसहना उग्र तप करिते झाले. तदनंतर पंचवटीं बारा वर्षें राहून उपासना केली. तेव्हां मारुतीनें उपदेश केला. श्रीरामचंद्राचें दर्शन झालें. श्रीमारुतीचें नित्य दर्शनभोजनादि एके ठायीं. तेथें आज्ञा झाली कीं, 'तुह्मास जगदुद्धारास्तव निर्माण केलें, तरी संचार करून जगास उपासनेस लावावें.' त्यायोगें श्रीकृष्णातीरीं येऊन चाफळ येथें पर्वतांत घळींत राहून श्रीकृष्णास्नान करून 'मनाचे श्लोक'ही केले. पांच सात घरीं भिक्षा करावी. एक श्लोक होई तों उभे राहावें. पीठ येईल तें खडकावर मळून पाणगे करून भक्षावे. केव्हां निरशनव्रतें पर्वतांतच असावें.

कोणे एके समयीं महाराज महाडचे मुक्कामीं कार्याचे उद्देशें असतां

तेथें सत्पुरुषाचें कीर्तन झालें. त्यांत 'ध्रुवाख्यान' झालें. तेव्हां श्रीनारदानें उपदेश केला त्यायोगें भगवद्दर्शन होऊन या लोकीं राज्य करून ध्रुवपद प्राप्त, भक्तशिरोमणी, मुक्तीस अधिकार झाला' हें श्रवण करून आपणांस असेप्रकारें नारदासारिखे सत्पुरुषाची कृपा होऊन धर्मस्थापनेचा संकल्प सिद्धीस जाऊन भगवत्कृपा होई असें घडावें,' हा निजध्यास प्राप्त झाला. साधूंचीं दर्शनें घेऊन त्यांचे त्यांचे निर्वाह महोत्सव अन्नदानें यांची स्वस्थता भूमि आदिकरून दिल्या. सर्वांचे आशीर्वाद घेतले. रामदासस्वामीची कीर्ति श्रवण केली. दर्शनप्रसाद व्हावा हा बहुतच वेध लागला आणि भेटीविषयीं एकदोन वेळ प्रयत्न केला. दर्शन न घडे; कारण पर्वतांचे ठायीं असोन निश्चय पाहाणें. यास्तव अन्य ठिकाणीं जावें. रात्रंदिवस दर्शनाविषयीं चिंतन. तेव्हां एके दिवशीं स्वप्नगत दर्शन होऊन प्रसाद श्रीफल दिलें. 'तुमचा हेतु पूर्ण होईल. किल्ल्याचा उद्योग करितां तोही उदईक हस्तगत होईल' असें सांगून अदृश्य झाले. जागृत होऊन पाहतात तों नारळ हातीं! स्वामी नाहींत! हें पाहून चित्तवृत्ति उद्विग्न झाली. प्रातःकालीं किल्लाही हस्तगत झाला तेव्हां पुन्हां कारकून पाठविला. 'आपणांस दर्शन द्यावें नाहीं तर राज्यत्याग करून येऊं' असा निरोप पाठविल्याचें उत्तर 'आह्मीं निःस्पृह अरण्यचर; तुह्मी राजे, धर्मस्थापना करितां; तुमचें कल्याण चिंतून तुमचे राज्यांत येऊन वास केला. समयानुरूप दर्शनही होईल.' नंतर तुकोबासही पत्र पाठविलें, 'येऊन दर्शन द्यावें.' तसेंच चिंचवडकर देवाचें दर्शन घेऊन वृत्तांत सांगितला. तुकारामबावा यांनीं पत्राचें उत्तर अभंग पाठविले, आणि 'रामदासाचे ठायीं निश्चय केला तो दृढ करा, आह्मीं तेच. ते भेद नाहीं. त्यांजपासून सर्व कार्य मनोरथ शेवटास जावे असें निर्मित आहे. तेथें विश्वास ठेऊन मनोरथ पूर्ण करावे.' निरोप सांगून कारकून गेले होते त्यांजपाशीं पत्राचें उत्तर अभंग करून पाठविलें. तें आणून महाराजांस सर्व निरोप यथास्थित सांगून पत्रही पुढें ठेविलें.

**"विरंचीनें केलें ब्रह्मांड सकळ ।**
**तयामाजी खेळ नानायुक्ती ॥ १ ॥**
**युक्तीचे चाळक तपोनिष्ठ ज्ञानी ।**
**गुरुभक्ति मानी विश्वासेंची ॥ २ ॥**

ऐसा तुझा प्रेमा कल्प कांहीं एक ।
पाहुनीया लेख पत्रिकेचे ॥ ३ ॥
शिवनाम तुझें ठेविलें पवित्र ।
छत्रपति सूत्र विश्वाचें कीं ॥ ४ ॥
व्रत तप नेम योगध्यान कळा ।
करोनी मोकळा झालाशी तूं ॥ ५ ॥
हेत लागला हा आमुचीये भेटीं ।
पत्रामाजी गोष्टी हेचि थोरी ॥ ६ ॥
याचें हें उत्तर ऐकें गा भूपती ।
लिहितों विनंती हेताचीये ॥ ७ ॥
अरण्यवासी आह्मीं फिरों उदासीन ।
दर्शन हें हीन अमंगळ ॥ ८ ॥
वस्त्रावीण काया झालीसे मळीण ।
अन्नरहित क्षीण फळाहारी ॥ ९ ॥
रोड हात पाय दिसे अवकळा ।
काय तो सोहळा दर्शनाचा ॥ १० ॥
तुका ह्मणे माझी विनंति सलगीची ।
वार्ता हे भेटीची करूं नको ॥ ११ ॥

ऐसी माझी वाणी दीनरूप पाहे ।
करुणा त्या आहे हृदयस्थासीं ॥ १ ॥
नव्हे केविलवाणे नाहीं आह्मीं दीन ।
सर्वदां शरण पांडुरंगा ॥ २ ॥
पांडुरंग आह्मां पाळीता पोषीता ।
आणीकाची वार्त्ता काय तेथें ॥ ३ ॥
तुझी भेटी घेणें काय हो मागणें ।
आशेचेंही शून्य केलें तेणें ॥ ४ ॥
निराशेचा गांव दिधला आह्मांशी ।
प्रवृत्ति भावासी सांडीयली ॥ ५ ॥
पतिव्रतेचें मन पतीसच भेटो ।
तैसे आह्मीं विठोमाजी नांदों ॥ ६ ॥

विश्व हें विठ्ठल नाहीं कांहीं दुजें ।
देखणें हें तुझें तुजमाजी ॥ ७ ॥
तुज ही विठ्ठल व्हावें असें वाटे ।
परि एक मोठें आडवेंची ॥ ८ ॥
सद्गुरु श्रीरामदासाचें भूषण ।
तेथें घालीं मन चळूं नको ॥ ९ ॥
बहुस्थानीं वृत्ति चालविल्या जेव्हां ।
रामदास्य तेव्हां घडे कैंची ॥ १० ॥
तुका ह्मणे बापा चातुर्यसागरा ।
भक्ति एक थारा भावीकांशीं ॥ ११ ॥"

याप्रकारें तुकाराम याचें उत्तर आलें.

चिंचवडचे श्रीदेवाचें दर्शन करून त्यासही प्रश्न केला कीं, 'आमचा मनोरथ श्रीनारदानें ध्रुवास कृपा केली तशी सद्गुरुकृपा घडावी. चित्तीं धरिला धर्म सिद्धीस जावा. श्रीहरिप्राप्ति व्हावी.' तेव्हां त्यानें सांगितलें, 'रामदासस्वामीचे ठायीं निश्चय धरावा. तुह्मी चित्तीं धरिलें तसे अधिकार सर्व गुण तपेंकरून ज्ञानभक्तियोग उपासनेंकरून पूर्णत्वास येऊन सिद्धदशा प्राप्त झाली; आह्मां सर्वांस मान्य वंद्य आहेत. तुमचे मनोरथ त्याजपासून सिद्धीस जाणार.' याजवरून बहुत उद्युक्त झाले असतां त्यांचा वेध पाहून स्वामींनीं पत्र पाठविलें तें:—

"निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसी आधारु ।
अखंड स्थितिचा निर्धारु । श्रीमंत योग ॥ १ ॥
परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयाशी ।
जयाचे गुणा महत्वाशी । तुलना कैंची ॥ २ ॥
नरपति हयपति गजपति । गडपति भूपति जलपति ।
पुरंदर आणि शक्ति । पृष्ठीं भागीं ॥ ३ ॥
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥ ४ ॥
शिव आचारशील विचारशील । दानशील धर्मशील ।
सर्वज्ञपणें सुशील । सर्वां ठायीं ॥ ५ ॥
धीर उदार सुंदर । शूर सत्क्रियेसी तत्पर ।
सावधानपणें नृपवर । तुच्छ केले ॥ ६ ॥

तीर्थक्षेत्रें तीं मोडलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ।
सकल पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ ७ ॥
देव धर्म गो ब्राह्मण । करावयासी रक्षण ।
हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ॥ ८ ॥
उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर वैदिक याज्ञिक ।
धूर्त तार्किक सभानायक । तुमचे ठायीं ॥ ९ ॥
या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी- ऐसा नाहीं ।
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुह्मांकरितां ॥ १० ॥
आणखी कांहीं धर्मकृत्यें चालती । आश्रित होऊन कितेक असती ।
धन्य धन्य तुमची कीर्ती । विश्वि विस्तारली ॥ ११ ॥
कितेक दुष्ट संहारिला । कितेकांशी धाक सुटला ।
कितेकांशी आश्रय झाला । शिव कल्याण राजा ॥ १२ ॥
तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ।
ऋणानुबंधें विस्मरण झालें । काय नेणों ॥ १३ ॥
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणें काय तुह्मांप्रति ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळिली पाहिजे ॥ १४ ॥
उदंड राजकारण तटलें । तेथें चित्त विभागलें ।
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ॥ १५ ॥"

याप्रमाणें पत्र आल्यावरून महाराजांस निश्चय झाला कीं, 'याउपरी स्वामींचें दर्शन घडतें आणि कृपाही करितात.' ह्मणून चाफळ येथें पर्वतांत गेले असतां अकस्मात् भेट झाली. नमस्कार केला. स्वामींनीं मस्तकीं हात ठेविला, आणि 'सर्व मनोरथ सिद्ध होतील' ह्मणून आशीर्वाद दिला. राजे यांनीं 'अनुग्रहप्रसाद वडावा' [अशी विनंति केली.] तेव्हां स्वामींनीं उत्तर केलें कीं, 'आह्मी निःस्पृह, अरण्यचर. तुह्मी या छंदीं पडूं नये.' तेव्हां उत्तर केलें कीं, 'याबद्दल राज्यत्याग करीन. स्वामीपरता लाभ मानीत नाहीं.' असा दृढ निश्चय पाहून बहुत संतोषी होऊन महाराज तृषाक्रांत झालेले जाणून तेथेंच कुबडीनें खणून उदक केलें. तें पिण्यास सांगितलें. चूळ भरून नेत्रांस लाविलें, आणि खालीं सिंगणवाडी येथें आंबराईंत आले. महाराजांस स्नान करवून श्रीमारुतीस अकरा नमस्कार करविले, आणि उपदेश केला. नंतर चार घटिका उभयतांचा एकांत झाला. तें वृत्त उभयतां जाणत. महाराजांनीं

लक्ष रुपयांचे होन व पुतळ्या यांची खिचडी, त्यांत मोत्यें रत्नें घालून स्वामींस अभिषेक पूजा सर्व सुवर्णाचीच केली. स्वामींनीं तें द्रव्य सर्व अरण्यांतच उधळून टाकिलें. असें झाल्यावर गुरेराखीं पोरें आणून त्यांस नेण्यास सांगितलें. अद्यापि त्या स्थानीं कोणास कांहीं सांपडतें. त्यानंतर वानरें भोंवतीं होतीं त्यांत एकास प्रसाद आणण्यास आज्ञा केली. त्यानें झाडावर जाऊन दोन आंबे आणिले ते दिले. [तेव्हां महाराज ह्मणाले,] 'सेवा व नित्य सहवास घडावा. राज्य संपादिलें त्यांतील उपभोग माझे हातें होत असावा. येविषयीं आज्ञा व्हावी.' 'आह्मांस उपाधीचें कारण नाहीं, अरण्यवास पर्वतवास करणें हा सोडावयाचा नाहीं' [असें स्वामींनीं] ह्मटल्यावरून 'कांहीं तरी सेवा घडावी' असा आग्रह केला. ते समयीं 'अकरा मारुती यांस नैवेद्यपूजेबद्दल ज्या गांवचे त्या गांवीं देऊन पूजा करवावी. जेथें श्रीरामस्थापनाभक्ति तेथें उत्साह पूजा नैवेद्यसाहित्य करित असावें' अशी आज्ञा केली, आणि 'सर्वही सेवा यथावकाशें घडेल. पूर्वीं श्रीकुलदेवतावर झाला तोच भीमावतार. तुह्मी संकटसमयीं श्रीदेवीचें स्मरण करावें. हृदयस्थ होऊन आज्ञा करील तसें करीत असावें. नित्य नेम चालवावा. परमार्थग्रंथ 'दासबोध' अवलोकन श्रवण करीत असावें. मानसपूजा सगुणमूर्तिपूजा जप तीर्थ सेवन असे पांच नेम चालवावे. धर्म स्थापिले ते दृढ चालवावे. समागम इच्छाल तेव्हां घडेल.' याप्रमाणें आज्ञा करून घोड्याची लीद होती ती ओंजळ भरून पदरीं घातली, आणि लेंड्या मोजविल्या. आठ होत्या. त्या पाहून 'ऐशीं हजार पागा होईल. यवन, दीपावर पतंग तसे, क्षयास जातील,' अशी आज्ञा करून निरोप दिला. ते समयीं कल्याण शिष्य समीप होते, त्यांस आज्ञा केली कीं, 'तुह्मीं बरोबर जाऊन श्रीरामचंद्रजीचें दर्शन राजे यांस करवावें, व प्रार्थना करावी कीं, राजे यांस तुरा प्रसाद द्यावा.' त्याप्रमाणें येऊन पूजा करून प्रार्थना केली, तों तुरा घरटून खालीं पडला, तो महाराजांनीं घेऊन कृतकृत्य झाले. नमस्कार केला. या रीतीनें महाराजांस अनुग्रह झाला. शके १५७१ विरोधिनाम संवत्सरे वैशाख शु॥ ९ मुक्काम चाफळ येथें. पुढें स्वामीच्या आज्ञेप्रमाणें भक्तिनेमनिष्ठज्ञानपरमार्थराज्यवैभव दिवसेंदिवस उदय प्राप्त होता झाला. ज्या कालीं स्मरण करावें तेव्हां एकांतीं सादृश्य स्वामींचें दर्शन घडावें. असे परमभक्त राजे तसेच दहा पांच शिष्य वगैरे त्यांत यांची गणना झाली.

राजनीति व क्षात्रधर्म व राजधर्म पाहाणेंस पाठविले, आणि 'मुख्य प्रजापालन या अंगें उपभोग सेवन करावे. हाच तुमचा मुख्य योग. तपश्चर्या येणेंकरून सफल होईल. सर्वांचें पोषण करून राज्य करून श्रीची भक्ति करीत असावी.' [अशी] आज्ञा झाली ती मान्य करून महाराज प्रतापगडास आले.

नंतर श्रीतुकारामबावाकडे पत्र व कारकून पाठविले जे, 'आपण एक वेळ कृपा करून दर्शन द्यावें. श्रीरामदासस्वामींनीं कृपा करून मनोरथ सिद्धीस नेले. हें सर्व वृत्त आपणांस निवेदन करण्याचा हेतु बहुत लागला आहे.' त्याजवरून 'शीघ्र कालें कारणेंकरून भेटी होणें तें सहज रीतीनें होईल' ह्मणून सांगून पाठवून उत्तर अभंग करून पाठविले तेः—

"तुह्मांपाशीं आह्मीं येउनियां काय ।
वृथा शीण होय चालण्याचा ॥ १ ॥
मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर ।
वस्त्राचिये थार चिंध्या बिंदीं ॥ २ ॥
निद्रेशी आसन उत्तम पाषाण ।
वरी तें प्रावर्ण आकाशाचें ॥ ३ ॥
तेथें काय करणें कोणाचीये आशें ।
वाया व्यर्थ नाश आयुष्याचा ॥ ४ ॥
राजगृहां यावें मानाचिये आशें ।
तेथें काय वसे समाधान ॥ ५ ॥
राजाचिये घरीं भाग्यवंतां मान ।
इतरां सन्मान नाहीं तेथें ॥ ६ ॥
देखोनीया वस्त्राभूषणांचे जन ।
तात्काळ मरण येतें आह्मां ॥ ७ ॥
ऐकोनीया मनीं उदास व्हाल जरी ।
तरी आह्मां हरी उपेक्षीना ॥ ८ ॥
आतां हेंचि तुह्मां सांगेन कौतुक ।
भिक्षे एवढें सुख नाहीं नाहीं ॥ ९ ॥
तप व्रत याग महा भले जन ।
आशाबद्ध लीन वर्तताती ॥ १० ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...... वि: .......
क्रमांक ...... ग्रं ......


तुका म्हणे तुम्ही श्रीमंत नामाचे ।
पूर्वील दैवाचे हरिभक्त ॥ ११ ॥

आतां एक योग साधावा हा नीट ।
भल्याचा हा वीट मानूं नये ॥ १ ॥
जेणें योगें तुम्हां लागू पाहे दोष ।
ऐसा हा सायास करूं नका ॥ २ ॥
निंदक दुर्जन सांगाते असती ।
यांची युक्त चित्तीं आणूं नका ॥ ३ ॥
परीक्षावे कोण राज्याचे रक्षक ।
विवेकाविवेक पाहूनीया ॥ ४ ॥
सांगणें नलगे सर्वज्ञ तूं राजा ।
अनाथाच्या काजा साह्य होसी ॥ ५ ॥
हेंचि ऐकूनीया पावूं समाधान ।
आतां या दर्शना काज नाहीं ॥ ६ ॥
घेऊनीया भेटी कोण हो संतोष ।
आयुष्याचे दीस गेले गेले ॥ ७ ॥
एकदोनी कर्मै जाणोनियां वर्मै ।
आपुलीया भ्रमें राहूं आतां ॥ ८ ॥
कल्याणकारक अर्थ याचा एक ।
सर्वा भूतीं देख एक आत्मा ॥ ९ ॥
आतां रामीं मन ठेवूनीयां राहें ।
रामदास पाहें आपणची ॥ १० ॥
तुका म्हणे राया धन्य धन्य स्थिती ।
त्रैलोकीं हे ख्याती कीर्ति तुझी ॥ ११ ॥

आतां हे विनंती प्रधानअष्टका ।
प्रभूसी विवेका ऐशा सांगा ॥ १ ॥
प्रतिनिधि मनरक्षक चतूर ।
सात्विकाचें घर तुम्हांपाशीं ॥ २ ॥
मुजुमुचे धणी लेखनकारक ।
पत्रींचा विवेक समजावा ॥ ३ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्रमांक २०७४९
(स्थळ प्रत)
... ... मुते, रा. ठाणे
यांनी ... संग्रहालयास देणगी

पेशवे सुर्नीस चिटणीस डबीर ।
राजाज्ञे सादर सेनापति ॥ ४ ॥
भूषणमंडित विद्या अध्ययन ।
वैदिकां नमन माझें असो ॥ ५ ॥
पत्राचा हा अर्थ अंतरीं जाणोनी ।
श्रवणीं विवचोनी घाला राया ॥ ६ ॥
सात्विक प्रेमळ दृष्टांताचें मत ।
बोलावें बहुत कळावया ॥ ७ ॥
यथास्थित नेम सांगणें ते राया ।
अर्थ पाहावया नेदा भीड ॥ ८ ॥
भिडे ऐसा बोल गाळोनीया अर्थ ।
अनर्थकारी तुह्मां होईल तें ॥ ९ ॥
सत्य तुह्मीं जन असाल भूषणें ।
अर्थ हा सांगणें वाचोनीया ॥ १० ॥
तुका ह्मणे तुह्मां नमन अधिकाऱ्यां ।
सांगावेत राया पत्र माझें ॥ ११ ॥

राया छत्रपति ऐकावें वचन ।
रामदासीं ध्यान लावा वेगीं ॥ १ ॥
रामदासस्वामी सोयरा सज्जन ।
यासी तनमन अर्पीं बापा ॥ २ ॥
मारुती अवतार स्वामी प्रगटला ।
उपदेश केला तुजलागीं ॥ ३ ॥
रामनाम मंत्र तारक केवळ ।
झालासे शीतळ उमाकांत ॥ ४ ॥
उफराटीं नामें जपतां वाल्मीक ।
झाला पुण्यश्लोक तात्कालीक ॥ ५ ॥
तेंच बीज त्यासि वसिष्ठ उपदेश ।
त्याहूनि विशेष काय आहे ॥ ६ ॥
आतां धरूं नका भलत्याचा संग ।
राम पांडुरंग कृपा करी ॥ ७ ॥

धरूं नको आस आमची भूपाळा ।
रामदासीं डोळा लावीं वेगीं ॥ ८ ॥
तुह्मी चाड नाहीं आह्मां छत्रपति ।
आह्मी पत्रपति त्रैलोक्याचे ॥ ९ ॥
चारी दिशीं आह्मां भिक्षेचा अधिकार ।
नेमिली भाकर भक्षावया ॥ १० ॥
पांडुरंगीं आमुची झाली पूर्ण भेटी ।
हातांत नरोटी दिधली देवें ॥ ११ ॥
आतां पडूं नको आमुचीया काजा ।
पवित्र तूं राजा रामभक्त ॥ १२ ॥
विठ्ठलाचे दास केवळ भिकारी ।
आह्मांलागीं हरि उपेक्षीना ॥ १३ ॥
शरण असावें रामदासालागीं ।
नमन साष्टांगीं घाली त्यासी ॥ १४ ॥
तुका ह्मणे राया तुज असो कल्याण ।
सद्गुरू शरण असे बापा ॥ १५ ॥"

या प्रकारें उत्तर व निरोप आल्यावर बहुत समाधान पावून कृतार्थ झाले. स्वामींनीं आज्ञा केली, त्या अन्वयें परमार्थ व प्रपंच राज्यप्रजापालन धर्मस्थापना करिते झाले. पृथ्वीचे ठायीं दिगंत कीर्ति संपादन करून श्रीरामदासस्वामीचे अनुग्रहें सर्व संतमंडळींत परम पवित्र अशी योग्यता संपादिली. याप्रमाणें राज्य संपादून सत्कीर्ति व्यय धर्मेंकरून करिते झाले. आणि म्लेंछ यांचा पराभव करून गोब्राह्मणांस पीडा होती ती दूर करून धर्म स्थापिला, आणि राज्य संपादिलें. तें राज्य धर्मांप्रमाणें चालविण्यासारखीं मनुष्यें योजून त्यांजवर आपण पाहात; आणि कांहीं परत्र साधन करावें याकरितां साधूंचा सहवास वरचेवर जाणें येणें तेंही करीत, आणि श्रीरामदासस्वामींनीं उपदेश केला व त्यांनीं नित्य नेम सांगितल्याप्रमाणें गुरुआज्ञा मान्य करून करीत या योग्य सर्वांसच गणणें. स्वस्थ अंतःकरणेंकरून स्वामींचे चरणीं दृढनिश्चय झालेवरून योग्य झाले. याप्रमाणें राज्यआक्रमण व उपदेशकथन द्वितीय प्रकरण समाप्त.

---

## श्रीमन्महाराज शिवछत्रपति शककर्ते यांचा यवनांशीं युद्धप्रसंग झाला तें प्रकरण तृतीय.

श्रीशिवाजीमहाराज यांनीं राज्य आक्रमण करून राज्य चालविण्याच्या मर्यादा राजनीतिप्रमाणें केल्या. श्रीरामदासस्वामीची कृपा होऊन उपदेश व्हावा अशी इच्छा होती ती त्यांची सिद्धीस गेली. यानंतर त्यांनीं प्रतापगडीं इमारत बहुत चांगली केली. ह्यांतच महाबळेश्वर येथील देवालयाचा जीर्णोद्धार व श्रीकृष्णाउगमाचें देवालय व पोवळी केली.

बेगम बडेसाहेबीण व अली इदलशाहा पादशाहा यांनीं, 'शिवाजी राजे बहुत आफरीं झाले, त्यांनीं प्रांत किल्ले कोट घेतले, व बेदरपर्यंत स्वारी करूं लागले; त्याजवळ फौज, लोक, खजिनाही फार झाला; याचा विचार पोख्त मनसबा मसलत करून कोणी उमराव सरदार पाठवून त्याचें पारिपत्य केल्यावांचून ठीक नाहीं. बापाचेंही ऐकत नाहीं; कसें करावें?' असें विचारितां ते समयीं अफजलखान यानें प्रतिज्ञा केली कीं, 'शिवाजीचा मजकूर इतका कशास पाहिजे? आपणांस आज्ञा करावी ह्मणजे जाऊन धरून आणितों किंवा मारून टाकितों.' याप्रमाणें बोलल्यावर नवाजीस करून वस्त्रें बहुमान देऊन फौज वगैरे सामान पोख्त देऊन त्याची रवानगी केली. तेव्हां पायदळ मावळे लोक त्या प्रांतांतील माहितगार नवे तीन हजार ठेवून एकंदर तीस हजार जमावानिशीं अफजलखान मोठे अहंकारें निघून मजल दरमजल तुळजापुरीं आला आणि श्रीदेवीस उपद्रव करणार तों देवी भोपे यांनीं पळविली. पुढें पंढरपुरीं आला. त्या स्थळीं उपद्रव केला; परंतु देव बडवे यांणीं लपवून ठेविला. तेथून महादेवाचे रोखें देवब्राह्मणांस उपद्रव करीत जवळ आला.

महाराज राजगडीं होते. मोगली फौज; झुंज बाहेर करणें चांगलं नाहीं ह्मणून सर्व कारभारी वगैरे मिळवून विचार ठरविला आणि राजगडचे निघून प्रतापगडास आले. तमाम किल्लेकोटांचा बंदोबस्त करून पागा वगैरे जमा केल्या. प्रतापगडास गेले. हें वर्तमान खानास कळतांच पुण्याकडील रोख सोडून इकडेच जाण्यास ते मजल दरमजल येऊन वाईस राहिले, आणि विचार केला जे, 'शिवाजी राजे झाडींत शिरले, त्यांस इनेंकरून काढावें अथवा इतबार पडेल तसें करून समक्षता झाली ह्मणजे जसें कळेल तशा रीतीनें पादशाहास चाकरी करून दाखवूं.' असा

कापट्यविचार करून वकीलीस कृष्णाजी भास्कर यास सविस्तर आपलें मनोगत कळवून त्यांनीं पाठविलें.

इकडे महाराजांनीं अफजल वाईस येऊन भिडेल ह्मणून सर्व मुत्सदी जमा करून, 'यासी कोणते प्रकारें लढाई द्यावी, विचार कसा करावा, मोगली फौज, प्रथमच गांठ घालून लढाई केली तर माणूस खराब होईल, याकरितां हुनरेंकरून आपले लोक कायम राहून त्याचा नाश व्हावा. पठाण ज्ञात हट्टी, उभे राहून आडून माणूस खराब करतील, याकरितां हुनरेंकरून जेर करावा' हा विचार चांगला जाणून श्रीदेवीची प्रार्थना केली. ते समयीं देवी महाराजांचे आंगीं आविर्भाव होऊन सांगितलें जे, 'अरे मुला, चिंता कां करितोस? तुजला वर माझा आहे. अरिष्ट दूर करीन. तुजला ही शिकारच साधून देत्यें. चिंता न करणें.' असें आश्वासन दिलें. 'महाराजांचे अंगीं श्री आविर्भाव करण्यास आरंभ करील, तेव्हां बाळाजी आवजी चिटणीस व वांकनीस यांनीं एकांतीं असून लिहून ठेवून दाखवीत असावें' असें सांगितलें होतें, त्याप्रमाणें संचार होऊन सांगितलें तें दाखविलें. तें पाहून फारच हर्षायमान होऊन बोलते झाले, 'अफजलाचें काम आपण करितों. चिंता नाहीं. श्रीनींही आश्वासन दिलें, तेव्हां फत्ते होते. आमचे मनाचा उल्हास व शुभचिन्हें दिसतात. कारभारी व शूर यांचा उत्साह दिसतो.' असें बोलल्यावर सर्वांची सला पडली जे, महाराजांचे मनांत करणें येतें तें आह्मांसही अवघड वाटत नाहीं. अफजलाचा मजकूर काय? जर समरांगणीं युद्ध करण्यास आज्ञा होईल तरी करून कावेशींत आणून ताडणी लावून धरून जेर करा ह्मटलें तरी करूं. महाराजांनीं स्वस्थ असावें.' याप्रकारें उमेदीनें एकविचारें बोलणें झालें, तों खानाकडील वकील येऊन पोंचले. कळल्यावर परवानगी देऊन किल्ल्यावर नेले. भेट झाल्यावर आगतस्वागत विचारोन राहण्यास स्थल देवविलें. 'भोजनोत्तर बोलणें होईल' ह्मणून निरोप दिला. त्यांची मुदारत फार चांगली आदरपूर्वक करविली. दुसरे दिवशीं सर्व मातबर सरदार बोलावून कचेरी करून वकिलास बोलावणें करून आणविलें, आणि बोलण्यास आरंभ केला कीं, 'खान येण्याचें कारण काय? व येतां देवब्राह्मणांस फार उपद्रव केला.' तेव्हां त्यांनीं उत्तर केलें कीं, 'खानाचें सांगणें आहे कीं, तुमचे वडील व आह्मीं एक पादशाहींतील असोन उ-

भयतांचा स्नेह, दुसरा विचार नाहीं, त्या पादशाहींतील उमराव तुह्मी असोन किल्ले कोट घेऊन शहरें मारितां, रुजू होत नाहीं. पादशाहाचे मनांत राजे यांचा बेटा मर्द बहुत काबिल झाला. आह्मांस संतोष झाला आहे. यास्तव आमचेकडील प्रांत घेतला तो त्यानें सोडावा, दुसऱ्याचा घेतला तो त्याकडेसच राखावा. आमचे पदरीं पूर्वींपासून शाहाजी राजे असोन त्यास आह्मीं वाढविलें. त्यांचे बेटे हे, यांस मोठी योग्यता देऊन मोठीं कामें यांचे हातून घ्यावीं. त्यांनीं आमचे आज्ञेंत चालावें. बापाचें ते मानीत नाहींत असें नसावें. त्यांजवर कृपा करून विशेष सर्व वजीरी त्यांचे स्वाधीन करून चालावें. हें जाणोन खानास तुह्मांकडे पाठविलें. तुह्मी बेकैदी करितां हें वांकडें पादशाहास वाटून खानास सर्व गोष्टी सांगून घेऊन येण्यास सांगितलें आहे. खानाचें ह्मणणें कीं, झाली गोष्ट बरी, याउपरी पादशाहाचे आज्ञेंत सरळ चाललें असतां आह्मीं सर्व गुन्हे माफ करूं. मनसब सरमजाम आणखी विशेष करून देण्याचा जिम्मा आमचा आहे. पाहिजे तशी खातरजमा करून घ्यावी आणि भेटीस यावें. तुमचे वडील पादशाहींतील मनसबदार, तुह्मीं गुन्हे केले असतां त्यांजवर कृपा करून जहागीर चालवितात त्याहून अधिक तुमचें चालवूं.' या अन्वयें बोलणें पडल्यावर सर्व ऐकून घेऊन 'बहुत चांगलें आहे. खान ह्मणतात ही आमच्या बऱ्याची गोष्ट आहे. आह्मांसही तेंच कर्तव्य. आह्मी केलें तें, कितेक पुंड पाळेगार मोडिले; सरकारी मुलखाची आबादानी बंदोबस्त केला; दुसरें, पादशाहींतीलही मुलूख घेतला, किल्ले वगैरे बांधिले, लोक फौज नामी माणूस जमा केले. ही सर्व पादशाहाचीच दौलत वाढविली आहे.' असें सांगून निरोप दिला. ते बिऱ्हाडास गेले.

दुसरे दिवशीं आणखी एकांतीं नेऊन, 'तुह्मी ब्राह्मण आणि भले आहां. आह्मीं राज्य महाराष्ट्र करून, धर्म बुडाला, देवब्राह्मणांस पीडा झाली, सर्व म्लेंछमय, सर्वांस पीडा, ही दूर करणार. त्यास तुह्मी अनुकूल असल्यास खानाचें अंतःकरण कसें व मनसब काय हें अकृत्रिमपणें आह्मांस सांगावें. तुह्मांशीं आमचा दुसरा विचार नाहीं,' असें राजे बहुत गौरव करून बोलले. वकील ब्राह्मण, राजा धर्मरक्षक होणार, यांचें दैव व पराक्रम व माणसें विचित्र दिसतात, पुण्य व तेज विचित्र दिसतें, यास्तव वृद्धीसच पाववावें, ह्मणून मनांत येऊन त्यानें 'खानाचा विचार भेट जशी घडेल तशी निखालसता करून देऊन घ्यावी, आणि त्यांतच दगाबाजी करावी

हें चित्तांत खंबीर दिसतें,' ह्मणून सांगितलें. त्याजवरून महाराजही अवतारी पुरुष, सर्वजाण, 'हा त्याचा (खानाचा) मनसबा, परंतु धर्मवृद्धि होणें प्रमाण आहे तरी आमचा मनसवा सिद्धीस जाईल; आह्मी भेटींतच त्यांचा विचार करूं; श्रीकृपें कार्य करूं. याउपरी आह्मांकडील बोलणें सांगितलें, त्या अन्वयें आह्मांस पादशाहाची सफाई करणें जरूर. विकल्प वाटले ते दूर होण्याची खंबीरी खानानें खातरजमा करून घ्यावी. खानाचें बोलणें झाल्यावांचून होणार नाहीं. हे निरोप सांगून हरतऱ्हेंकरून किल्यानजीक भेट व्हावी असें करून घेऊन यावें,' याप्रमाणें महाराज बोलले. त्याजवरून कृष्णाजीपंत यांनीं महाराजांचा प्रभाव पाहिला जे, 'असें दुर्घट कर्म करून कार्य सिद्ध करतील. स्वतः वुद्धि व शौर्य यांचें मोठें, व माणसेंही यांचे पदरीं मोठीं मोठीं मनसबवान व शूर एकदिल दिसतात,' असें मनांत आणून पंतीं महाराजांस उत्तर केलें कीं, 'हरतऱ्हेंकरून खानास भेटीस घेऊन येतों. आपण याचा विचार पोख्त करणें तसा करावा.' याप्रमाणें परस्पर बोलणें होऊन वकिलास वस्त्रें देऊन त्याजबरोबर आपणांकडील दत्ताजीपंत वोकील हिवेरकर यांस देऊन लवाजम्यासुद्धां महाराजांनीं रवाना केलें. उभयतांनीं खानापाशीं येऊन महाराजांचें बोलणें सांगितल्यावर, खानाचा मृत्यु, त्या योगें त्यानें तें सर्व मान्य केलें. 'भेटी शिवाजीराजे घेतात हें सिद्ध करून आला ही मोठी गोष्ट झाली; काम झालें,' ह्मणून वकिलाची खान फार तारीफ करून खुष झाले, आणि विचारिते झाले जे, 'राजे पहाडाखालीं येतात न येतात ? पहाडांत लोक जाण्यास अवघड, त्याअर्थीं खालीं यावें.' ते समयीं इकडील वकील व कृष्णाजीपंत यांनीं सांगितलें जे, 'लाख फौज राहावी अशी जागा व पाणी पाहिजे तसें पहाडांत आहे. नदीच चालली आहे. तेथें राजे आहेत. आपण एकवेळ भेटून निखालसता झाली ह्मणजे पाहिजे तेथें येतील.' यावरून जावलींत जावें असें करारांत आलें. फौजेसुद्धां जावलींत भेटीस येतात हीं पत्रें वकीलांनीं लिहिलीं. 'आपण भेट [करणेची] तर खुद करावी,' असें सांगून पाठविलें.

याजवर महाराजांनीं सर्व कारभारी सरदार आदिकरून विचार केला जे, 'मोगल खालीं येतो तेव्हां भेटी घेणें वगैरे कसें करावें ?' ह्मणून गौरवून सर्वांशीं विचार पुसला, व मातुश्री जिजाबाई साहेब यांस विनंति केली. त्यांनीं उत्तर केलें जे, 'तूं जें मनीं धरितोस तें देव सिद्धीस नेईल.

कुलदीपक आमचे पोटीं निर्माण तूं झाला आहेस. करशील, मनीं धरशील, तें देव शेवटास नेईल. सावधतेनें चार माणसें तुह्मांजवळ कर्ती शाहाणीं आहेत, त्यांचे विचारें करणें तें करावें. देवाचे आमचे आशिर्वादें विजयी होशील,' अशी बोलली. वरकड सर्व बोलले, 'महाराज आज्ञा करतील ती शिरसा वंदून प्राणापरती मेहनत करून शेवटास लावूं.' असें सर्वांचें लक्ष्य व सर्वांचा विचार घेऊन मातबर कारभारी व आपण बसोन ठरविलें कीं, 'खान येणार त्यांस झाडी तोडून मैदान करावें. घाटाची वाट हत्ती घोडे येण्याजाण्यास रस्ता चांगला करावा. जागां जागां गुप्त व प्रकट चौक्या, धारकरी नामी लोक, त्यांत कारकून योजून झाडीमुळें नाक्यांस ठेवाव्या.' किल्ल्याखालीं बुरजानजीक जागा होती तेथें मंडप किनखापी करविला. फार आराष करून एकापुढें एक थोर लहान बैठका खलवतास करविल्या. मेजवानीची मुक्कामचे मुक्कामीं तरतुद करविली. हें वर्तमान खानास कळल्यावर शिवाजीराजे साफदिल, आणि भेटीचा फार आदर करितात, असें मानून त्यांनीं कापट्यबुद्धीनें, 'बरें आहे, भेट मात्र व्हावी, मनांत आहे असें करून पादशाही चाकरी करूं,' असें मनांत योजिलें. महाराजांचें मनांत 'यास फार स्वस्थता दाखवून खालीं आणावें, आणि भेटींतच कार्य साधन करावें.' याप्रमाणें परस्परें अंतःकरणांत धरून बाह्य बहुतच सफाई दाखविते झाले.

तदनंतर वकिलास पत्रें पाठविलीं, 'येण्याचा बेत करावा, वाटा वगैरे तयार झाल्या आहेत.' त्यावरून तोफा वगैरे वाईनजीक ठेऊन सडे निवडक लोक करून रडतोंडीचा रस्ता नीट केला होता त्यामार्गें उतरोन पारानजीक कोयनेचे कांठीं खानानीं मुक्काम केला. महाराजांनीं मुक्कामाची जागा नेमली होती तेथें मंडप, सामान, साहित्य सर्व फौजेच्या बेगमीचें ठेविलें होतें. खान येऊन उतरल्यावर बहुत समाधान पावले, व महाराजांनीं मनीं आणिलें कीं, 'वडील भाऊ संभाजीराजे यांचा घात यानेंच केला तो सूड याचा घेईन.' असा बेत यांचा. खान वकिलास 'मुक्कामचे जागा राजे यांनीं भेटीस यावें' ह्मणून बोलल्यावर त्यांनीं सांगितलें कीं, 'भेटीची जागा तरतुदीनें फार चांगली केली आहे. आपण इकडून व त्यांनीं तिकडून यावें असें राजे यांचें मानस आहे. भेटी झाल्यावर जाणें येणें पाहिजे तसें घडेल. आपण सडे भेटीस जावें. तेही सडेच येणार,' असा सिद्धांत केला आणि वकिलानें महाराजांस कळविलें. तेव्हां वडील

पुत्र संभाजी राजे यांस व मातुश्री जिजीबाई यांस किल्ल्यावर ठेविलें. जागां जागां नाकेबंदी, जेथें जमाव जसा पाहिजे तसा टोळ्या करून भोंवतीं दुरून कोसाचे अंतरें ठेविले. त्यांस इशारत करणें तें सरदार यांस सांगितलें. 'आह्मीं किल्ल्यावरून उतरल्यावर करणा वाजला ह्मणजे आपलाले जमावानें पुढें चालत यावें, आणि बाणाचे टप्प्यांत उभें राहावें. याप्रमाणें त्यांनीं सावध असावें,' अशी ताकीद केली. आपण खासा किल्ल्यावरील 'बंदोबस्त केला. 'दरवाज्यांत लोक मोठे मोठे सरदार असावेत, त्यांनीं आह्मीं कचेरीस पावल्यावर पुढें चालून यावें; बराबर निघण्यास हजार दोन हजार धारकरी असावेत, त्यांनीं जागचे जागां उभें राहावें. पुढें नेमले तितक्यांनीं यावें,' याप्रमाणें सांगोन किल्ल्याचे गिर्दनवाईस लोक, तोफा, दारूगोळा वगैरे ठेवून खासा जाऊन सर्व फिरोन पाहून सांगितला तसा बंदोबस्त करविता झाला. रघुनाथ बल्लाळ सबनीस यास नाकेच्या चौक्यांस ठेविलें. नेताजी पालकर सरनौवत यांस 'फौज सारी संकेताप्रमाणें सिद्ध करून खान खालीं बुडवितांच फौजेनें तोफखाना वुणगे फस्त करावे; घांटावरून येऊं न द्यावें; मार्ग नीट केला तो एकच, त्यांत झाडें मोठीं टाकून बंद करावा. चढून जाऊं लागतील ते जाऊं देऊं नये,' याप्रमाणें करविलें. मोरोपंत पेशवे, व अण्णाजी दत्तो सुरनीस, बाळाजी आवजी चिटणीस, रावजी सोमनाथ, गंगो मंगाजी वाकनीस, रघुनाथ बल्लाळ कोरडे, शिवू पाद्धे, कृष्णाजी नाईक, सुभानजी नाईक, गोमाजी नाईक, [पान]संबळ हवलदार, त्र्यंबक भास्कर वगैरे कारभारी व मावळे सरदार व मराठे सरदार एक करून विचार केला, ते समयीं सर्वांचें मनोदय 'महाराजांचे चित्तांत येईल तें करतील व होईल' असें पडलें. 'जी आज्ञा ती प्राणापरती अंगेजणीं करावी' हीच सर्वांची सला व एकनिष्ठता. 'महाराज धर्मस्थापन करणार, वुद्धि व वय हीं दिवसांदिवस अधिकच होवो,' अशी सर्वांची इच्छा. 'अफजलखान तो विषय किती?' ऐसा सर्वांस हर्ष वाटून महाराजांचे करण्यास सर्वांचें अनुमोदन, व त्या अन्वयें तरतूद मजबुदी करिते झाले; आणि ते समयीं किल्ल्यावर कारभारी जिजाबाई साहेब व संभाजी राजे यांजपाशीं पेशवे, सुरनीस, चिटणीस असावे ह्मणून ठेविले, आणि मातुश्रीस व राजे यांस त्यांचे हवालीं केलें. 'आह्मीं ही होड आरंभिली, श्री सिद्धीस नेईलच. कदाचित् वांकडेंही पडल्यास तुह्मीं घाबरे न होतां बेत

केला त्याप्रमाणें गर्दी करून शत्रूस बुडवावें, राज्य रक्षावें,' असें सांगितलें. सर्वांचेही चित्तीं 'अफजलखान खालीं आला यास कधीं बुडवूं.' ही उत्कंठा पाहून महाराजांस अधिकच हर्ष उत्पन्न होऊन, लोकांस नांवाजून, दिलासा देऊन, 'तुह्मीं सर्व शूर पराक्रमीच आहां, आमची मदार तुह्मांवरच आहे, या यवनाचा पाड तो काय ? मोठ्या मस्त हस्तीच्या मस्तकींचा मणी प्रयत्नेंकरून आणणें हें मनुष्यांचे अनुकूलतेनें घडतें, तेव्हां तुह्मी सर्व अनुकूल असतां याचा हिशेब काय आहे ?' असें सर्वांस स्फुरण व्हावयाजोगें गौरवून महाराज बोलले. 'या समयीं सर्वांनीं आपली शर्त करावी, राज्य वृद्धीस पावेल तसतसें तुमचेंच आहे,' असें नावाजून, एक एक सरदार नेमून देऊन आपण अंगांत जिरें घालून त्याजवर झगा घातला. तसेंच डोईस जिरेटोप घालून वरतें पागोटें घातलें. चोळणा काच्या घालून उजवे हातीं भवानी तलवार घेऊन बिचवा डावे हातीं, वाघनखें, पाठीशी ढाल, याप्रमाणें राजे सिद्ध झाले. ते समयींचें तें ध्यान बहुतच उग्र अपूर्व सर्व अवलोकन करिते झाले.

फौज भोंवतीं जागां जागां ठेविली. रानझाडी, सावजाचें भय, इत्यादि निमित्यें चौक्या ठेविल्या होत्या. 'खानास सूचना भेटीची करावी,' अशी वकिलास चिठ्ठी लिहिली. त्याप्रमाणें कळविल्यावरून भेटीची जागा कशी आहे हें पाहण्यास आपलेकडील विश्वासू येऊन खानानीं चौकशी केली. त्यांनीं सर्व जाऊन 'जागा चांगली आहे. जवळ फौज लोक नाहींत. मैदान आहे,' असें कळविल्यावर फौज सारी ठेऊन मातबर शिपाई निवडून घेऊन निघावें तों वकिलानें अर्ज केला जे, 'बहुत लोक नेले असतां राजे यांस विश्वास वाटणार नाहीं; याकरितां नेमानें आपआपल्या मनुष्यांनिशीं जावें,' असें कळविल्यावर खालीं सर्व ठेवून खानाची उमेद 'नजरेस मात्र पडावें. त्याचा हिसाब काय ?' असें वाटून खान चढूं लागले. मधें मधें बराबरचे लोक जिलिबी आदिकरून ठेविले. खासा एक व पांचपन्नास लोक याप्रमाणें भेटीचे जाग्यानजीक आले. ते पाहून महाराजांनीं सर्वांस हुशार करवून देवास व मातुश्रीस नमस्कार केला. त्यांनीं 'विजयी भव !' असा आशीर्वाद दिला. तेव्हां महाराजही बोलले, 'वडील भाऊ संभाजी राजे यांस दग्यानें मारविलें, त्याचें उसणें घेतों. साहेबांचे उदरीं जन्म घेतला. साहेबांचे मनोदय तेंच देव सिद्धीस नेईल,' असें बोलून महाराज दरवाज्यानजीक आले, आणि इशारतीचा

करणा वाजविला पालखींत बसोन दरवाज्याखालीं येऊन उभे राहिले. जवळ खिजमतगार, तानाजी मालुसरे, येसजी कंक, हिरोजी व नागोजी फरजंद असे पांचपन्नास लोक घेऊन, कृष्णाजीपंत व गोविंदपंत दिवाणजी त्यांजकडील, व आपलेकडील वकील दत्ताजीपंत बोकील, एक दोन शिपाई कारकून, ऐसे निघोन सदरेनजीक आले. पालखींतून उतरोन उभयतां सदरेस गेले. खानानें वकिलास विचारिलें कीं, 'राजे हेच कीं काय ?' त्यानें 'हेच' असें सांगितलें. एकमेकांस खैर करून भेटीस पुढें होतांच खान शरीरेंकरून मोठे उंच दराज होते, त्यांनीं महाराजांस द्वितीयेचे चंद्रासारिखें भेटण्यांतच हातीं धरून पुढें ओढून डावे हाताखालीं दाबून धरिलें. हातीं कटार होती ती चालविली. ते समयीं महाराजांचे अंगांत जिरें होतें. अंग चपळाईनें काढून घेतांच वार कायम न झाला. 'खानानेंच अगोदर दगा पुरूषार्थ केला. फार चांगलें झालें' ह्मणून हातांत वाघनखें होतीं त्या हातानें बहुत जलदी करून पाठीमागून हात पोटावर चालविला. झगा बारीक होता. पोटाला वार मोठा कारगर होऊन लागलींच आंतडीं बाहेर आलीं. तेव्हां बगलेंत दाबून धरले होते ते सोडून ढकलून दिले. 'शिवजी, दगा केला. शिपाईगिरीची शर्त केलीस' असें बोलून डावे हातें पोटाला सांवरून धरून 'अब् हमारी तरवार देख' ह्मणून महाराजांवर वार खानानीं चालविला. डोईंत जिरे होती ती किंचित् तुटून जखम गव्हाइतकी लागली. महाराजांनीं सफाई करून 'तुम् पठाण, अब् हमारी भवानी शिवजीकी देखो' असें बोलून तरवारीचा वार त्याचे खांद्यावर केला. तो पोटापर्यंत वार झाला. खान पुरे होऊन मुर्दा पडला. हें पाहून महाराज निघते झाले. तों सैयद बंडेखान पठाण यानें जलदी करून अंगावर आला. हें पाहून येसजी कंक यानें त्याजवर वार चालविला. तो तेथेंच पुरा झाला. त्याजवर गोविंदपंत दिवाँण सरकून आले. त्यांस 'तूं ब्राह्मण, पुढें येऊं नको' बोलले असतां चालून आला. ते समयीं जवळ तानाजी मालुसरे होते त्यांनीं व जिवबा महाडिक यांनीं त्याजवर पट्टा चालविला. जखम लागली. महाराज 'ब्राह्मण आहे. शिपाईगिरी व खावंदाची चाकरी केली. पुरा करूं नका' असें बोलले. याप्रमाणें इकडील व तिकडील यांची हातघाई होण्यांत भोई व खिजमतगार, जलदी करून खानाचा मुर्दा पालखींत घालून चालले. हें पाहून येसजी कंक व तानाजी मालुसरे यांनीं जलदी करून

महाराजांस बाहेर काढून देऊन भोयांच्या कुच्या केल्या, आणि खानाचें डोकें कापून रुमालांत घेऊन आले. शके १५८१ विकारी नाम संवत्सरीं मार्गशीर्ष शु॥ ५ भृगुवासरीं. या प्रकारेंकरून अफजुलखान मारून महाराज विजयी झाले. तेसमयीं जसा शिशुपाल सभेमध्यें सहज लीलेंकरून श्रीकृष्णजीनें मारिला त्या प्रकारें त्या सभेंत शोभा येती झाली!

दिवस दोन चार घटका राहिला, त्या अवसरीं महाराज किल्ल्याचे दरवाजास पावले. इशारतीप्रमाणें तोफा करविल्या. महाराजांची इशारत होतांच, मावळे लोक चालून गोटावर आले. तोफखाना वगैरे बुणगे दस्त केले. गोविंदपंत दिवाण वगैरे जलदीनें गोटांत जाऊन खानाचें वर्तमान कळतांच हतवीर्य होऊन अवसानें सोडून पळूं लागले. खानानें माहितगार मावळे लोक खंडोजी खोपडा तीनहजार मावळेनिशीं ठेविला, त्यानें खानाचा लेक व कबिला दोनतीनशें लोकांनिशीं आपले लोक माहितगार देऊन कोयनेचे कांटानें कऱ्हाडीं पावता करविला. वरकड हत्ती घोडे चीजवस्त एके दिवशीं सर्व दौलत महाराजांस प्राप्त झाली. ज्यांनीं हत्यार धरिलें त्यास मारिलें. हत्यार न धरिलें त्याचें हत्यार व घोडा घेऊन त्यांस सोडिलें. गोरगरीब यांचा बचाव करून त्यांस लावून दिले. तोफखाना व बुणगे दस्त केले. चौदाहजार घोडे व पाऊणशे हत्ती, दोनतानहजार उंट, शिवाय बैलतोफखाना सुद्धां पाडाव केले. खंडोजी खोपडाही पाडाव झाला. त्याचा शिरच्छेद केला. सरदार मातबर सांपडले ते वस्त्रें देऊन लावून दिले. गोविंदपंत, कृष्णाजीपंत सांपडले त्यांस वस्त्रें दिलीं, आणि निरोप दिला.

महाराज यश घेऊन मातुश्रीचे दर्शनास गेले. मातुश्रींनीं पोटाशीं त्यास धरिलें व 'संभाजीचा सूड घेतलास; माझे डोळ्यांचें पारणें फेडिलेंस, शिपाईगिरीची शर्त केलीस; दैवानें खैर झाली. आज भेट झाली हा दिवस सोन्याचा उगवला' असें बोलली. महाराजांवरून लिंबलोण करून सतका करविला. दानधर्म बहुत केला. समागमें होते त्यांस बक्षिसा वस्त्रें भूषणें देऊन वाढविलें. पालख्या आबदागिऱ्या सोन्याचीं कडीं देऊन 'तुह्मी सर्व होतां ह्मणून राजे खैर होऊन आले' अशी तारीफ करून मातोश्री मोठा आनंद करिती झाली.

झाडी तोडून तमाम वाटा बंद केल्या त्याजमुळें मावळे लोकांनीं जागजागां खानाची फौज धरिली. याप्रमाणें खानास बुडविण्याचें धाडस न

साहस मोठे पराक्रमें करून यश महाराजांनीं संपादन केलें. म्लेंच्छ पादाक्रांत करण्यास अवतारी पुरुष निर्माण होऊन श्रीचे वरप्रदानें महाराजांनीं अफजल बुडविला, आणि ज्यांनीं त्या समयीं श्रम पराक्रम केले त्यांच्या भेटी घेतल्या. ज्याचे जसे श्रम त्याप्रकारें आदर करून वस्त्रें भूषणें व कोणांस वाढविणें तें, पायचे होते त्यांस घोडीं दिलीं, व कोणांस सरदार करून पालख्या आबदागिऱ्या दिल्या. या प्रकारें सर्वांचा संतोष करून जखमी यांची उस्तवारी यथारीतीनें केली. युद्धीं पडले त्यांचे लेक आणून चाकरीस ठेविले. ज्यांस मूल नाहीं त्यांचे बायकांचे पोटास व लहान मुलें त्यांस बालपरवरषी करून रणीं पडले त्यांस माती देवविली. कोणी गरीब सांपडल्यास चीजवस्तसुद्धां देऊन सुटका करविली. अशी भूतदया. या योगानें सर्वांस असें वाटतें झालें कीं यांचें राज्य व्हावें आणि यांस यश यावें. अफजलखान जोरावर असून मारला, हा अद्भुत पराक्रम यांनीं केला. तो ज्या ठिकाणीं मारला त्या बुरजाखालीं त्याचें डोकें पुरलें, आणि नांव 'अफजलबुरूज' असें ठेविलें.

अफजल मारिला हें वर्तमान विजापुरीं पादशाहास कळल्यावर अली अदलशहा पादशाहाची आई बेगम बडी साहेबीण व पादशाहा हे बहुत विचारीं पडोन, 'मोठा सरदार नामांकित फौजेसुद्धां बुडविला, पुढें विचार कसा करावा?' याकरितां सर्व अमीर आणविले, व 'पादशाहीस वाईट दिसतें, शिवाजीराजांशीं द्वेष वृद्धिंगत केला; तो मर्दुमी अंगेजणी करून करणें अचाट करितो; लोकही तसेच मर्द; खजीना त्यानें जवळ बहुत केला; किल्ले कोट प्रांतही बळकट झाले; यास उपाय काय करावा?' असे विचारांत पडले. 'याउपरी ठीक दिसत नाहीं; सुभान अल्ला कसें करितो?' असें फारच गिरफतारींत पडले. शहरभर 'पादशाही शिवाजीराजा बुडवितो' हीच चर्चा लोक करूं लागले. खान बुडविल्यावर विजापुरीं किल्ले कोट राहिले ते दहशतीनेंच राजे यांचे हातीं येऊं लागले. महाराजही त्या प्रांतीं फौज पाठवूं लागले.

महाराजांची श्रीतुळजापुरीं देवीचे ठायीं अत्यंत भक्ति, दर्शन घडावें ही इच्छा झाली. यावरी श्रीनें दृष्टांत दिल्हा कीं, 'आपणास येथेंच मूर्ति करून स्थापना कर म्हणजे जे तुझे नवस मानसिक ते तेथेंच पुरवीन.' यावरून महाराजांनीं गंडकीची शिळा आणून कारिगर तुळजापुरीं पाठवून त्याप्रमाणेंच मूर्ति अत्यंत सुंदर करून तिची प्रतापगड येथें स्था-

पना केली. ती जागा फार चांगली. बालेकिल्ल्यावर खालीं कोटांत देवालय करून सुमुहूर्तीं अर्चा बहुत द्रव्य खर्चून केली. ब्राह्मणभोजनादि पूजा नैवेद्यास वगैरे हुद्देदार कारभारी नेमून ठेविले. त्यांस तनखा लावून दिला. उत्साहास वगैरे दागदागीने जवाहीर वगैरे दिले. तुळजापुरीं जाऊन नवस करावे ते येथेंच देवी कृपाकरून पावविती झाली.

अफजलखान मारिला त्याचा लेक फाजिलखान विजापुरीं गेला. त्यानें 'राजावरी आपणांस पाठवावें, बापाचें उसणें घ्यावें' ह्मणून बहुतच आग्रह करून हुकूम घेऊन फौज वगैरे नामी तयार करून मोहीम करावी असें केलें. ते समयीं पादशाहानें सरजाखान व सिद्दी जोहरी सरदार फौजेनिशीं बराबर दिले, आणि वस्त्रें देऊन रवाना केले. तेसमयीं महाराजांची स्वारी पन्हाळप्रांतीं आली होती. तेव्हां मोगल चालून पन्हाळ्यास आला. त्यास येतो तसा येऊं द्यावा, असें केल्यानें त्यानें येऊन किल्ल्यास वेढा घातला. महाराजांनीं आपली फौज मागें घालून, मोर्चे मारणें, रसद बंद करणें, कही मारणें, हें करविलें. चार सहा महिने वेढा बसला. पावनगडचे डोंगरास धमधमे रचून तोफेची मारगिरी करीत असतां हिसाब न धरितां लढले. तेव्हां विचार केला जे, 'आजपर्यंत द्रव्यानें व माणसांनीं खानास खराब केला. आतां आपण बाहेर जाऊन वेढा लावावा. ही मसलत करून किल्ल्याच्या लोकांची व सामानाची वगैरे भरती करून आपण खासा निघून रांगणा किल्ला येथें महाराज चालले. ही बातमी फाजिलखानास समजल्यावर तो मोर्चे उठवून महाराजांचे मागें लागावें ह्मणून चालला. दोन चार कोसांवर रांगण्यानजीक महाराज पावले, तों मागें मोगल जवळ आला ही बातमी समजली. यावरून त्यांचे तोंडावर मावळे लोक ठेविले. त्यांचे सरदार बाजी प्रभु देशपांडे, हिरडस मावळ, यांस पांचचारहजार हषमांनिशीं ठेविलें. त्यांनीं सांगितलें, 'साहेबीं निघोन जावें, गनीम थोपून राखितों. खिंडी चढूं देत नाहीं.' महाराजास बरें वाटून त्यांनीं 'आह्मी किल्ल्यावर जाऊन तुह्मांस तोफेची इशारत करूं, नंतर तुह्मी निघोन येणें,' असें सांगून ठेविलें. तों फौजही येऊन पावली. बाजी देशपांडे यांनीं मोगली फौज खिंडीनजीक पाहून जागां जागां मोर्चे बांधून झाडींत लोक उभे करून गोळ्या व जेजाल्याचे दुरटे चालविले. फौज दाबून राखली. चढूं दिली नाहीं. तों महाराज किल्ल्यावर पावले. तोफ झाल्यानंतर देश-

पांडे यांनीं 'महाराज पावले, याउपरी डोंगर धरून निघावें, पळावें हें काय? येथें लढाई करून मोगली फौज नामोहोरम होई तें करावें, चाकरी करून दाखवावी;' ह्मणून ते जमाव धरून उभे राहिले. त्या अवसरीं कर्नाटकी प्यादे पुढें करून तोफांची मार देत फाजिलखान यानें पुढें चालून घेतलें, आणि लगट केला असतां दोन प्रहरपर्यंत देशपांडे यांनीं लढाई मारली. दोनहजार लोक निवड करून बाजी प्रभु यांनीं फौजेवर चालून घेतलें. तिसरा प्रहर झाला. पठाणलोक बहुत मारिले. मर्दुमीची शर्त केली. पांचहजार लोक खानाचे रणीं पाडिले. तों बाजी देशपांडे यांस गोळा लागून ते ठार झाले. मावळे लोक, 'सरदार पडला, धीर न पुरे' जाणोन संभाळून डोंगर धरून निघोन किल्ल्यास पोंचले. मोगल खिंड चढून किल्ल्यानजीक पावला. 'मावळची हवा, डोंगरांत अडचणीची जागा. छावणी करावी, किल्ल्यास मोर्चे लावावे, तर शिवाजी हरहुनरें पूर्वीप्रमाणें फौज या अडचणींत गवसवून बुडवील,' हें जाणून धीर न होतां पावसाळा दिवस जवळ आला ह्मणून नामोहोरम होऊन तसेच कुच करून पन्हाळ्यास फाजल आले. तेथेंही बसण्याचा दम न पुरे. 'शिवाजी दगा करील. मैदानांत निघत नाहीं तेव्हां हुनरेबाजी दिसत्ये, भरंवसा न पुरे' ह्मणून विचार करून 'बाजतबरसात यावें' हा विचार करून विजापुरास निघोन गेले.

बाजी देशपांडे स्वामिकार्यावर खर्च झाले. शिपाईगिरीची शर्त करून रणीं पडले, त्यांचे लेक बाळाजी बाजी यांस आणून नांवाजून त्यांची सरदारी त्यांस दिली. त्यांचे भाऊ सात होते त्यांस आणून पालख्या व तैनात करून दिल्या. मावळे लोकांची सवनिशी सांगितली. बक्षीस दिलें.

महाराज या मसलतीस गुंतले जाणून खैरतखान व याकुबखान हबशी यांनीं जमावानिशीं जंजिऱ्याहून तळागडास वेढा घातला होता. 'विजापुरी फौज नामोहोरम होऊन गेली. महाराज खेळण्यास आले, तिकडून रायगडप्रांतीं स्वारी येणार' कळोन ते वेढा उठवून जंजिरेप्रांतीं निघून गेले. मोगली फौजेनें पन्हाळप्रांत खराब केला. त्यास राघो बल्लाळ अत्रे यांस सुभा देऊन तेथें ठेविलें. त्यांनीं मुलुखाची संचणी करून कौल देऊन प्रांत लाविला. महाराज रायगडास जाते झाले. नंतर कांहीं दिवस रांगण्यास रुस्तुमखान यानें जमाव करून विजापुराहून

पांचसातहजार फौज घेऊन येऊन वेढा घातला. किल्लेदार यांनीं लढणें तसें लढून फौजेंत गलबल करणें, छापे घालणें, मारणें तसें केलें. महाराजांनींही कुमक पोंचविली. तेव्हां वेढा घालून बसणें, दम न पुरे, जाणून शत्रु निघोन गेला. रुस्तुम नामोहोरम होऊन गेल्यावर अबदुल करीमखान व बहलोळखान दहाहजार फौजेनिशीं पन्हाळेप्रांतीं चालून आले. रांगण्यास वेढा देऊन बसल्यावर महाराजांनीं कुमकेस फौज पाठविली. किल्लेकरी यांनीं व बाहेरून फौज आली त्यांनीं रसद बंद केली, व ते गनीमी काव्यानें छापे घालूं लागले. याजमुळें दम न निघे. बरसात आली जाणून नामोहोरम होऊन गेले. जातेसमयीं दुमदारी मारून कांहीं हत्ती घोडे पाडाव आणिले. याप्रमाणें रांगणा येथें विजापुरकरांनीं हा किल्ला बेलाग, चांगला, आधीं घ्यावा ह्मणजे तो प्रांतच साधला, ह्मणून, उपद्रव केला असतां ते पराभवातें पावले. विजापुरी सरदार नामोहोरम होऊन गेले.

गड जंजीरेकर हवशी यानें तळें येथें मोर्चे दिले होते. 'जागां जागां चोरून उपद्रव करितात त्यांचें पारिपत्य करावें' ह्मणून बाजीराव पासलकर देशमुख मुसेखोरेकर यांस हषमलोक जमाव देऊन महाराजांनीं पाठविलें. त्यांनीं जाऊन राजपुरीं शह दिल्यावरून जंजीरेकराकडील काय सावंत चालून आला. लढाई झाली. दोहींकडील खासे सरदार बाजीराव देशमुख व काय सावंत हे रणीं पडले. त्याजवर महाराजांनीं आणखी जमाव देऊन रघुनाथ बल्लाळ सबनीस पाठविले. त्यांनीं जाऊन जंजीरेकराचा प्रांत लुटला. गर्दीस मिळविला. जंजीरेकर यांचे लोक चालून आले, ते लढाई देऊन मोडिले. त्याजवरून जंजीरेकर हवशी यानें तह केला कीं, 'याउपरी महाराजांनीं घेतला प्रांत किल्लेयांस उपद्रव लावणार नाहीं; तुह्मी आमचा प्रांत राहिला यास उपद्रव लाऊं नये.' असा तहनामा ठरवून रघुनाथपंत कांहीं द्रव्य घेऊन परतोन आले.

त्याजवर कांहीं दिवस तहाप्रमाणें चालले. आणखी उपद्रव करूं लागले. याजवरून त्र्यंबकाजीपंत यांस फौज लोक देऊन महाराजांनीं पाठविलें. त्यांनीं सिद्दीचे लोक आले त्यांसि लढाई मारून प्रांतास उपद्रव करून नतीजा दिला. हल्कुद ठेविले. त्या प्रांतीं जागां जागां डोंगर पाहून किल्ले बांधिले. दंडाराजपुरी हा डोंगर बांधिला. याप्रमाणें किल्ले करून सिद्दीचा उपद्रव छबाडी आपले तालुक्यांत न

चालावी असें केलें. पांचसातहजार लोक त्या प्रांतीं जागां जागां नेहमीं ठेवून जंजीरे याचें कांहीं न चाले असें केलें. 'जंजीरा पाण्यांत किल्ला, जेर न होय, असाध्य, तो आपणांस यावा, समुद्रांत सत्ता करावी' म्हणून बहुत चित्तांत हेतु धरून आरमार करावें असा बेत करून जहाजें नवीं तयार महाराजांनीं करविलीं. त्यांचीं नांवें—गुराब, तरांडीं, गलबतें, दुबारें, शिहाडें, पगार, मचवे, वभोर, तिरकटी, पाल, अशा जातीचीं चारपांचशें तयार करविलीं. यांस दहापांच लक्ष रुपया खर्च केला. त्यांजवर सरदार दर्यासागर व मायनाक भंडारी वगैरे यांसि सुभेदारी देऊन तोफा वगैरे सामान दर्यावर्दी केलें. लढाऊ कोळी व खलाशी ठेवून त्यांनीं दर्यांत स्वारी शिकारी करून जंजीरेकर याजवर दहशत पाडली. दर्यांत सर्व टोपीकर यांजवर इभ्रत पाडून सावकारी माल जहाजें लुटून हरजिनशीं दर्यांतील पैदास करून महाराजांस आणून देऊं लागले. खर्चही आरमारचा मोठा, तोही चालविते झाले. समुद्रांत सत्ता बसविली. दर्याकिनारा जागां जागां शहरें मारूं लागले, व बेटें चांगलीं पाहून त्यांनीं किल्ले बांधिले. समुद्रांत सत्ता बसविली. त्यांजवर द्रव्यही अपरिमित सांपडूं लागलें.

राजपूरप्रांत महाराजांकडे अमल, त्यास सावंताचीं गलबतें उपद्रव करीत. त्यास नतीजा देऊन संस्थान घेऊन टाकावें असें मनांत आणिल्यावरून, खेम सावंत व लखम सावंत देसाई, प्रांत कुडाळ, हे विजापुरी पादशाहींतील मनसब करून होते, त्यांनीं पादशाहास अर्ज केला जे, 'शिवाजीराजे यांचें पारिपत्य करण्याविषयीं हारोळी आह्मांस देऊन आणखी कुमकेस फौज द्यावी ह्मणजे पारिपत्य करून कोंकण सोडवितों.' याप्रमाणें करार केल्यावरून खवासखान दहाहजार फौजेनिशीं रवाना केला. त्याजबराबर बाजी घोरपडे मुधोळकर हेही दिले. बाजी घोरपडे यांनीं शाहाजीराजे यांस दगा करून धरून आणिलें हें महाराजांचे अंतःकरणांत सलत होतें. शाहाजी महाराज यांनीं 'घोरपडे यांनीं [आह्मांस] उपद्रव केले, हें तुह्मांस माहित असावें; तुह्मी आमचे पुत्र विजयी झालां आहां, तरी संधी पाहून उसणें घ्यावें' असें सांगून पाठविलें होतें, तें महाराजांचे अंतरीं पक्कें होतें. सावंत यांनीं बेदीली केली. बाजी घोरपडे बराबर नेमले. खवासखान घाट उतरोन येतो, हें कळोन फौज पागा तोफखाना वगैरे तयार करून पन्हाळ्यास येऊन फौजेसुद्धां चालून गेले. बाजी घोरपडे

पुढें आपली फौज कांहीं जमावासुद्धां घरास आले होते, ही वातमी ऐकून महाराज अर्धीं मुधोळनजीक तेथें गेले. घोरपडे याचें पारिपत्य आधीं करावें ह्मणून वेढा घालून भोंवता प्रांत लुटला. ते समयीं घोरपडे चालून आले. तेव्हां त्यासी लढाई दिली. ते मराठे जंवामर्दीनें लढले. बाजी घोरपडे रणीं पडले. सांपडले तितके मारिले. ठाणें घेऊन गांव लुटला. याप्रमाणें पुढें फौज व घोरपडे गेले यांचें पारिपत्य केलें. ही खवासखानास वातमी गेली. महाराज तसेच खवासखानावर चालून गेले. बाजी घोरपडे मारिले, गांव लुटला, बरोबर सामान भारी, हें कळतांच घाट उतरोन यावें तें अवसान न पुरे. तसेंच माघारे निघोन महाराजांची गांठ न पडूं देतां परत विजापुरास खवासखान गेला. महाराजही फिरोन सावंताचे मुलुखावर चालून गेले. कुडाळप्रांतीं जाऊन बहुतच खरावी आरंभिली. शह सावंतास सोसणें, अवसान न पुरे, जाणून कुडाळप्रांत सोडून फिरंगाणांत गेले. महाराजांनीं प्रांत हस्तगत करून ठाणीं तेथें घातलीं. फोंडें याचे कोट झुजला. ठाणें मजबूत आणि लोक हिंमतीनें लढूं लागले. महाराज मोर्चे देऊन बसले. किल्ला जेरीस नये, ते समयीं सुरुंग तयार केले. उडवावे तों बहलोलखान मदतीस फौज घेऊन आला. हें कळल्यावरून 'मोर्चे उठवावे, आधीं मोगल आला त्याचें पारिपत्य करून येऊन किल्ला घ्यावा' असा विचार केला, आणि लष्कर निघण्याची तयारी केली. किल्ल्यांतील लोक शह उठल्यामुळें बेफामपणें बुरजांवर तटांवर उभे राहिले. त्या संधींत सुरुंग तयार होते त्यांस वत्ती देवविली. त्यांनें किल्ल्यांतील लोक फार जाया झाले. किल्लेदार उडोन गेला. लोक घाबरे झाले. तेव्हां स्वारी जाण्याची तयारी झाली होती ती तहकुब करून किल्ला घेतला. कोट फत्ते केला.

हें वर्तमान घाटावर बहलोलखान येत होता त्यास कळलें. मदतीस जावें तों तें ठाणें गेलें हें जाणून तो परत गेला. महाराज फत्ते पावले. किल्ला फोंडें येथें महाराजांनीं इब्राहिमखान, हा हल्ल्याचे वेळीं खस्त करून निशाणाबरोबर गेला, त्याची नावाजीस करून त्यास सुभा देऊन ठेविलें. त्या प्रांतीं महाराजांनीं भीडगड, पारगड डोंगर चांगले पाहून तेथें किल्ले वसविले.

सावंत फिरंगाणांत गेले तेथें फिरंगी याचे हातून, महाराजाचे प्रतापतेजाचे भयास्तव, आश्रय देऊन ठेवणें अवसान न पुरे जाणून

सावंतानें महाराजांकडे वकिलीस पितांबर शेणवी शहाणे माणूस पाठविले. 'आह्मी सावंत, भोंसले कुळी आमची, तेव्हां आपले आहों. स्वामींशीं निष्ठेनें चालावें असा निश्चय झाला आहे, तरी कृपा करावी' ह्मणून कित्येक प्रकारें सांगून पाठविलें. याजवरून अभय देऊन भेटीस आणविले. वाडीप्रांत त्यांचें वतन देशमुखी खाऊन चाकरी करून खंडणी देऊन सुरळीत चालावें असें करून त्यांची स्थापना महाराजांनीं केली. त्यांचे सरदार नान सावंत व राम दळवी मातबर मर्द माणूस होते त्यांस नांवाजून चाकरीस ठेविलें. याप्रमाणें सावंताचें पारिपत्य करून फत्ते झाले.

फिरंगी यानेंही वकील पाठविला, आणि 'दरसाल नव्या तोफा फिरंग्यानें तयार करून द्याव्या, जवाहीर दर्यांतील फिरंग्यानें पाठवीत जावें, आणि कौल आपले जहाजास घ्यावा' असें बोलणें लाविलें. वकीलानें पोषाख, जवाहीर व नानाप्रकारच्या जिनसा फानसे आरसे वगैरे घेऊन येऊन नजर केले. त्याजवरून कौल देऊन तह ठरविला. याप्रमाणें जरब बसली.

ते समयीं 'जंजीरेसारखी जागा आपणास असावी' असें बहुत चिंतन करून श्रीस प्रार्थना केली असतां दृष्टांत झाला कीं, 'जंजीरा या कालीं साधणें नाहीं. सातशें वर्षांचा मुहूर्त त्यास दिला आहे. तूं समुद्रापाशीं स्थल मा ।.' त्यावरून तीन उपोषणें केलीं, असतां समुद्रानें दृष्टांत दिला कीं, 'कोळ्यांचें बेट गलबतें उभीं करण्याचें आहे तें तुह्मांस दिलें. तेथें जागा करावी.' यावरून दुसरे दिवशीं पाहिलें तों समुद्राचें पाणी लांब जाऊन बेटावर जागा विस्तीर्ण झाली. याप्रमाणें समुद्र प्रसन्न होऊन स्थल मिळालें. त्याजवरून बहुत संतोषी होऊन पांच सहा कोशांवर समुद्राचे पाण्यांत जागा बेलाग पाहून किल्ला बांधिला. त्याचें नांव 'सिंधुदुर्ग' असें ठेविलें.

बसनूरप्रांतीं व बिदनूरप्रांतीं शहरें मातबर आहेत, दर्याकिनारा आहे, तेथें बहुत द्रव्याधिपति आहेत, ह्मणून समजल्यावर बातमी आणून स्वारी करावी, शहरें मारावीं, प्रांत घेऊन ठाणीं घालावीं, असें महाराजांनीं चित्तांत आणून तेच समयीं सारें आरमार सिद्ध करून आपणही थोरलें पाल याजवर बसून दर्यांतून जावें असा सिद्धांत करून खुष्कीनें फौज रवाना करून मालवणावरून दर्यामार्गेंच जावें हा नेम ठरवून ते

गेले. बसनूर पेठ असावध होती तेथें जाऊन पेठ लुटली, प्रांतही लुटला. तीन चार दिवस तेथें राहून सर्व मत्ता जहाजांवर घालून महाराज निघाले. सुरतेच्या स्वारीसारिखें शहर लुटलें. तीन करोडीचा विषय सांपडला. तो घेऊन त्या प्रांतीं कडवाल, सिद्धेश्वर, मिरज, आकोलें, कोर्दे, हुमाऊद, हीं ठाणीं घेतलीं. अम्मल बसविला. गोकर्ण महाबळेश्वर ही जागा घेतली. श्रीदेवाचें दर्शन घेऊन तेथें दान धर्म बहुत केला. याप्रमाणें प्रांत घेतला. हें पाहून शिवाप्पा नाईक बिदनूरकर संस्थानी होते, त्यांस बहुत भय प्राप्त होऊन त्यांनीं वकील पाठवून महाराजांस पोषाख जवाहीर लाख रुपये नजर पाठविले, आणि तह ठरवून आपण दर्शनास आले. 'दरसाल खंडणी तीन लक्ष देत जाऊं' असा ठराव त्यांनीं केला. त्याजवरून महाराज त्यांजवर संतोषी झाले. वकिलीस रमाजीपंत आपणांकडून ठेविले. याप्रमाणें स्वारी करून रायगडीं महाराज आले.

ते समयीं रायगडीं सोयराबाईसाहेब गरोदर होती ती प्रसूत झाली. पुत्र झाला. शके १५८३ प्लव नाम संवत्सरे चैत्र शुद्ध ९. जन्मतां गर्भ पालथा झाला. हें वर्तमान महाराजांस कळल्यावर बहुत संतोषी होऊन 'राजा परम भाग्यवान्, पराक्रम बहुत करील, प्रजा वृद्धिगत करून पालन करील, दिल्लीचो पादशाहात पालथी घालील' असें बोलले. ज्योतिषी यांनींही 'जन्मभविष्य व ग्रह सबल उंच पडले [ह्मणून] सांगितलें. चैत्र शु॥ ९ स जन्म झाला त्यास त्याचें नांव 'राजा राम' असें ठेवण्यास सांगून ठेविलें. समारंभ करून रायगडीहून देशांत जावें ह्मणून सातारा-प्रांतीं महाराज आले. कांहीं ठाणीं राहिलीं होतीं तीं वाई, कऱ्हाड, कोल्हापूर आदिकरून घातलीं. निंबाळकर, घाडगे वगैरे पुंडपण करून होते, त्यांचे दबावासाठीं जागां जागां नवेच किल्ले बांधिले. वारूगड, भूषणगड, महिमानगड, वर्धनगड, सदाशिवगड व मचंद्रगड, व जुनेही किल्ले हस्तगत झाले. कोंकणांत, मावळांत, देशांत, डोंगर चांगला पाहून, व समुद्रकिनारीं किल्लेही बांधिले. त्या देशास आधार तेथें जमयती ठेवणें, त्या दहशतीनें दुसरा शत्रु आपले देशास उपद्रव करवीत नाहीं;देशाला पुंडपण कोणी बळकावीत नाहीं; शत्रु चालून आला असतां आपले लोक सावध होऊन दगड टाकितील तरी त्या दाबानें तो दबेल; एकमेकांस जवळचीं ठाणीं मदत करतोल; अपाय होणार नाहीं; अशी

कल्पना करून किल्ले केले. समुद्रकिनारीं, मालवण, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, रत्नागिरी, खांदेरी, कुलाबा, अशीं ठाणीं बांधलीं. त्यांचे आश्रयानें कित्येक गलबतें आरमार राहावें. उंदेरीचें बेट आरमार उभें करून बांधलें. त्याचें नांव 'पटकदुर्ग' ठेविलें. आरमार समुद्रांत, त्यानें बहुत द्रव्य आणावें. ती किल्ल्याचे बंदिस्तींत खर्च सुद्धां करावा. आरमारकरी यांनीं किल्ल्याचे आश्रयानें असावें. जंजीरेनजीक महाराज बेट बांधूं लागले, त्याजवरून हबशी यानें किल्ल्यानजीक किल्ला बांधिला. कल्याण तहत बिदनूरपर्यंत कोंकण किल्ले सुद्धां राज्य महाराजाचें झालें. विजापूरची पादशाहात फार करून त्यांनीं घेतली. राहिली तीही पादाक्रांत करूं अशी उमेद त्यांस झाली. अमीर आले तितके नामोहरम केले.

याउपरी महाराजांनीं दौलताबादेचे पादशाहातीस वेध लावावा हें मनांत आणिलें. कांहीं कांहीं स्थळें त्यांतीलही आलीं होतीं, परंतु दोन वेध करूं नयेत, एक पुरता करून मग दुसरा करावा, या अंदेशामुळें टाकिलें होतें.

यानंतर मोरोपंत पेशवे यांस कल्याण प्रांत भिवंडी वगैरे सत्तावीस रामनगर वगैरे किल्ले घ्यावे, खानदेश बागलाणप्रांत घेऊन अंमल बसवावा, म्हणून पाठवून देऊन तो तालुका त्यांचेच स्वाधीन केला. हवलदार कारकून, दरखदार, हुजूरचे देऊन देखरेख त्यानें स्वाधीन करून त्यांचे निजबतीस याप्रमाणें ठेविले. अण्णाजी दत्तो सुरनीस यांस चउलापासून तहद फोंडपर्यंत मुलुख ( कुडाळ, दाभोळ, राजापुर ) दरखदार हुजूरचे देऊन त्यांचे स्वाधीन केला. दत्ताजीपंत वाकनीस यांचे स्वाधीन वरघाट वाईपासून तहद कोल्हापूर तुंगभद्रापर्यंत तालुखा दिला, व देखरेख करावी म्हणून हवलदार कारकून देऊन 'खबरदारी व किल्ल्यावर इमारती सामान दारूगोळा वगैरे दास्तान करणें हें चौकशी करून नेमणुकीप्रमाणें करावें' म्हणून महाराजांनीं हुकूम दिला. 'सरकारची आज्ञा येईल तसें वर्तावें' याप्रमाणें महाराज सर्वांस सांगते झाले. नेताजी पालकरास सरनोवती होती ते स्वारीस प्रांतांत गेले होते. इकडे जरूरीचें कारण पडलें म्हणून निकडीनें लिहून येण्याविषयीं पाठविलें असतां हुकुमाप्रमाणें न आल्याबद्दल त्यांजवर इतराजी होऊन त्यांची सरनोबती दूर करून राजगडाकडे तानजी गुजर किल्ल्याचे सरनोबत शहाणे शूर असून ज्यांणीं बहुत कामें केलीं होतीं त्यांस आणून त्यांचें

नांव 'प्रतापराव' असें ठेवून सरनोबती त्यास महाराजांनीं दिली. ते दोही पादशाहतीचा हिशेब न धरितां मर्दुमी करून स्वारी शिकारी करणें, लढाई करणें, शहरें मारणें, इत्यादि कामें करूं लागले. शहाणे कर्ते विश्वासू असे झाले, ते बालाघाट, परांडे, हवेली, कलबुर्गे, आंवसें, उदगिरी तहद गोदातीरपर्यंत भागानगरचे पादशाहींत स्वारी करून लूट घेऊन आले. शाहाजीमहाराज यांजपाशीं व्यंकाजी दत्तो, मकाजी अनंत, पाळकलेक भोसले, सेवेंत होते ते निघोन महाराजांकडे कर्नाटकप्रांतांतून आले. सरदार चांगले मर्द वडिलांकडील आले ह्मणून बहुत गौरव करून नावाजीस करून महाराजांनीं वाढविले. कामें सांगितलीं.

त्यानंतर 'सुरत शहर मातबर, स्वारी करावी' या विचारें बातमीस पाठविले, ते बहिर्जी नाईक आले. त्यांनीं 'प्रांत मोठा, बहुत द्रव्य सांपडेल' ह्मणून सांगितलें. याजवरून विचार करून महाराजांनीं प्रतापराव गुजर सरनोबत, निळो सोनदेव, अण्णाजी दत्तो सुरनीस, मानसिंग मोरे, रूपाजी भोसले, मकाजी आनंदराव, व्यंकाजी दत्तो, आणखी सरदार नामी नामी फौज पंचवीसहजार हषम दहाहजार निवड करून लांब लांब मजली करीत कोळवणांतून सुरतेस रवाना केले. आपणही वरकड फौजेसुद्धां वरून चालले. तों सुरतेचा सुभा चालून आला, त्यास मोडिलें. कोटास मोर्चे दिले. पांच चार दिवस मुक्काम केला. सावकार मातबर होते. मोत्यें, माणीक, हरजिन्नस, जवाहीर, सोनें, रूपें, कोट्यावधीचा माल सांपडला.

सुरतेवर स्वारी महाराजांची गेली, हें औरंगाबादेस कळल्यावर तेथील अधिकारी यानें मोहोबतखान व दाऊदखान यांजला आठदहाहजार फौजेनिशीं सुरतेचे कुमकेस पाठविले. उदाराम माहुरकर यांची स्त्री रायबागीण व त्यांचे लेक जगजीवन हेही पांचचारहजार फौजेनिशीं दुसरे मार्गें आले. अशा दोन्ही फौजा दोहीं वाटांनीं चालून आल्या. सारे लोक पुढें गेले होते, आपण सडे फौजेच्या तोंडावर गेले. त्यांत रायबागीण जात होती, त्या मार्गीं बेरटीकर देशमुख, राजपाटील, यशवंतराव रामाजी, विश्वासराव हतनूरकर, दिनकरराव बागराव, यांस हुकूम महाराजांनीं केला जे, 'रायबागीण उमरखिंडींतून जाऊं न द्यावी, बुडवावी,' असें सांगून रवाना केले. त्यांनीं जाऊन वाट बंद केली. आपण मोहोबतखानावर गेले. खेडास ह्मणून शहर आहे त्यानजीक गांठ

पडली. युद्ध दोनप्रहरपर्यंत होऊन, मोगली फौज घोर्डी घालून महाराजांनीं मोडली. चार हजार घोडे, दहा हत्ती पाडाव केले. लूटही फार सांपडली. कांहीं लोक पळून गेले. त्यांचा पाठलाग न करितां 'सुरतेची लुट निभावून जाणें, रायबागीण आली तिचें पारिपत्य करणें' ह्मणून तसेंच चालून आले. बागराव वगैरे सरदार यांनीं माने यांचे तळावर जाऊन तेथून रायबागीण येतां खिंडींत आडविली होती. तों महाराज येऊन पावले. वेढा देऊन लढाई करून रायबागीण बुडविली. दोनहजार घोर्डी पांच हत्ती पाडाव झाले. रायबागीण तिचा लेक जगजीवन यास धरिलें. ती शरण झाली. याप्रमाणें महाराज सुरतेची स्वारी करून दोन फौजा लुटून यश घेऊन शत्रूवर दहशत घालून लुटसुद्धां सुरक्षित रायगडीं येऊन पावले. मार्गीं येतां रामनगरही मारलें. महाराजांनीं रायबागीण ईस बहुत मान देऊन सोडून दिली.

त्याजवर प्रबलगडावर किल्लेदार केशरसिंग हाडे रजपूत होते. भेदानें किल्ला न ये हें जाणून महाराजांनीं स्वारी केली. मोर्चे लाविले. किल्ला कांहीं दिवस भांडला. महाराजांचा प्रताप विचित्र, किल्ला बहुत थोर विस्तीर्ण असतां महाराजांची हल्ला झाली, कळून केशरसिंग यानें कबिले याचें जोहर केलें. एक लेक व आई चुकोन राहिली. केशरसिंगानें चालून घेतलें. खासा व आणखी रजपूत रणीं पडले. किल्ला फत्ते झाला. यावर महाराज किल्ला पहावयास पालखींत बसून चालले. ते समयीं शेला पालखींतून बाहेर पडला. त्यास बोरीची कांटी लागली. तेव्हांच पालखी उभी केली, आणि बोलले जे, 'या ठिकाणीं जे आह्मांस उभे केले तेव्हां खालीं द्रव्य आहे. खणावें.' ह्मणून सांगितलें. खणून पाहतां पांच चार लाख रुपये मोहरांचा चबुत्रा सांपडला. महाराज दैवी पुरुष. नंतर किल्ल्यावर गेले. केशरसिंग वगैरे रजपूत ठार झाले, त्यांस अग्नि देवविला. त्याची आई व लेक सांपडलीं. गौरव करून जवळ ठेविलीं. कांहीं दिवशीं त्यांस 'समाधानें देशीं जातों' बोलल्यावर वस्त्रें द्रव्य देऊन पाठविलीं. याप्रमाणें प्रबल किल्ला महाराजांनीं फते केला.

हें व आणखी मुलुख घेतला हें वर्तमान दिल्लीस औरंगजेब पादशाहास समजलें. तिकडील बंदोबस्तासच पांच चार वर्षे लागलीं. 'सुरतेवर स्वारी करून महाराजांनीं सुरत मारली, किल्ले कोट ठाणीं दौलताबाद तालुक्यांतील त्यांनीं घेतलीं, फौजा बुडविल्या, स्वारी करून प्रांत

लुटतात, धामधूम मांडली,' हें वृत्त समजल्यावर बहुत चिंताक्रांत होऊन औरंगाबादेस सुभेदारीस इखलासखान व महकूबसिंग ठेविले, त्यांस पादशाहानें नसहित करून लिहिलें कीं, 'काय करितां? अफजल मोठे आंगेजणीनें शिवाजीनें मारला. विजापुरचे पादशाहींतील किल्ले प्रांत बहुत घेतला. त्याजकडील अमीर मोठे मोठे चालून गेले, ते नामोहोरम झाले.' हें वर्तमान मोठे सर्द होऊन लिहिल्यावरून महकूबसिंग रजपूत सुभे यांनीं दहावीसहजार फौजेनिशीं रवाना केला तो चालून आला. त्याजवर प्रतापराव गुजर सरनोबत फौजेसुद्धां गेले. नगरानजीक उभयतांची गांठ पडली. युद्ध बहुत झालें. महकूबसिंग रजपूत ठार झाला. दहाहजार घोडीं, हत्ती व लूट बहुत सांपडली, ती घेऊन माघारे गुजर आले. त्याजवर दुसरे वर्षीं स्वारी त्या प्रांतीं महाराजांनीं करून औरंगाबादेचा पुरा मारला. जालनापूर पेठ झाडून सुभा चालून आला त्यास युद्ध देऊन मोडिला.

याप्रमाणें फते केली, आणि रायगडास आले. नंतर महाराजांनीं विचार केला जे, 'आपण किल्ले कोट प्रांत घेतला, फौज व पागा आपल्याजवळ झाली, जागांजागांचे माणूस उत्तम तितके आपण जमा केले, हषमी लोक जागांजागांचे नामी ठेविले, तसेच सरकारकूनही मोठे शहाणे कर्ते मेळविले, आपण धर्मस्थापनेची इच्छा धरिली, हिंदुधर्म स्थापना हेंच मानस होतें, तसेंच देवीनें कृपा करून आजपर्यंत आपणाकरवीं घडविलें. पुढेंही शेवटास देवच नेणार, ह्मणून आक्रम केला, राज्य साधिलें, याचा पाया रीत घालून धर्मेंकरून प्रजापालन करणें हें सिद्धीस न्यावें' ह्मणून चित्तास आणून 'पूर्वीं जे जे राजे धर्मेंकरून राज्य करून वृद्धीस पावले ते कोणते रीतीनें चालले, शास्त्रांचे ठायीं पुराणांतरीं महान् राजे आचरण करीत आले त्या अन्वयें आपणही करावें' असें केलें. याप्रमाणें अफजलवध, नानाप्रकार यवनांशीं युद्ध, तृतीय प्रकरण समाप्त.

---

## राज्यमर्यादास्थापन, पितृदर्शन श्रीशिवछत्रपति शककर्ते यांनीं केलें तें प्रकरण चतुर्थ.

श्रीशिवाजीमहाराजांनीं मनोरथ धरिला तसें श्रीनें राज्य, प्रांत, स्थलें, देश, दुर्ग असें करून दिलें. 'यवनांचें प्राबल्य होऊन धर्मोच्छेद झाला, तो स्थापावा' असा संकल्प केला, त्या अन्वयें श्रीकृपा होऊन यवनांचा

पराभव व्हावा असें घडूं लागलें. याउपरी धर्मकरून चालावें ह्मणून [शिवाजी महाराज] वंदोबस्त करिते झाले. पेशवाई मोरो त्रिमल पिंगळे यांस, सहा वर्षें शामराजपंतांनीं केल्यावर त्यांची काढून दिली होती तीच कायम करून, त्यांचे स्वाधीन तालुका प्रांत केला तोच कायम करून, दिली. निळो सोनदेव यांस, बाळकृष्णपंत हनुमंते यांची मुनिमी काढून दिली होती, तीच कायम केली; आणि दोनतीनशें कारकून दप्तरचे ठेवून एकवेरजी लिहिणें दप्तर वगैरे सालाचे सालास पाहून करीत असावें, असें केलें. अण्णाजी सुरनीस यांस सुरनिशी होती व तालुका प्रांत होता तो कायम केला. सोनोपंत यांजकडे दबीरी दिली. दत्ताजीपंत यांजकडे पागेची सबनिशी होती. त्यांस एके समयीं पागेचा झाडा चंदी विचारितां तोंडानें हजार पांचशें घोड्यांचीं नांवें चंदी नांवनिशी त्यांनीं सांगितली. याजवरून यादी आणून पाहतां कांहीं एक अंतर नाहीं. हें पाहून बहुत तारीफ करून त्यांजकडे वाकनिशी गंगो मगाजी याची दूर करून दिली, आणि गंगो मगाजी यांजकडे पागा दिली. प्रतापराव गुजर सरनोवत होतेच. पंडितराव उपाध्ये, धर्माध्यक्ष रघुनाथभट व बाळंभट केले. न्यायाधीश निराजी रावजी केले. याप्रमाणें अष्टप्रधान असावे ते ते दरख पाहून केले, आणि 'यांनीं तालुके वहिवाटावे व फौज घेऊन कामगिरीस जावें. सन्निध त्यांस एक एक मुतालीक करून देऊन यांनीं कामकाज चालवावें. खासा असतील त्यांनींही करावें.' याप्रमाणें करून दिलें. बाळाजी आवजी चिटणीस होतेच. दहा पांच कारकून लिहिण्यास ठेवून त्यांचा वंदोबस्त करून देऊन त्यांनीं चिटणिशी करावी. महाल मुलूख येथें सरदारांवरोबर त्यांचे कारकून चिटणिशीवर एक एक जावा, याप्रमाणें करून दिलें. फडणिशी मुजमीकडील दफ्तरदारी चिमणाजी आवजीकडे होतीच. पारसनिशी निळकंठराव प्रभु यांस दिली, आणि शेषावा नाईक पुंडे यांस पूर्वीं मालोजी राजे यांनीं पोतदारीविषयीं वचन दिलें होतें त्यांचा वंश शामजी नाईक पुंडे याजकडे पोतदारी होती ती कायम केली.

महाल बारा व कारखाने अठरा केले त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

**द्वादश कोश, पांस बारा महाल ह्मणावें.**

१ अंतःपुर—दरूनी महाल.

१ द्रव्यभांडार—महाल पोतें.

१ धान्यागार—महाल कोठी.
१ अश्वधन—महाल पागा.
१ गोधन—महाल थटी.
१ आरामक्षेत्रें—महाल शेरीबाग.
१ महाल टंकशाला.
१ महाल शिबिकादि यानें.
१ महाल इमारत.
१ महाल सौदागिरी.
१ महाल छबिना.
१ वसनागर—जामदारखाना.

**अष्टादश शाला, अठरा कारखाने.**

१ गजशाला—हत्तीमहाल, पीलखाना.
१ मल्लशाला—तालिमखाना.
१ आंबारखाना—धान्यसंग्रह.
१ भेरिदुंदुभि—नगारखाना.
१ यंत्र[illegible]
१ गाज्ञशाला—तोफखाना.
१ वैद्यशाला—शरबतखाना.
१ पानीयशाला—आबदारखाना.
१ उष्ट्रशाला—शुतरखाना.
१ शिबिरशाला—फरासखाना.
१ खटकशाला—शिकारखाना.
१ रत्नशाला—जवाहीरखाना.
१ पाकशाला—मुदपकखाना.
१ शस्त्रशाला—शिलेखाना.
१ तांबूलशाला—शराफखाना.
१ रथशाला—गाडीखाना.
१ जिनसखाना.
१ लेखनशाला—दफ्तरखाना.
१ नाटकशाला—नटखाना.

याप्रमाणें महाल व कारखाने केले. त्यांस दरोगे अधिकारी कारकून हवालदार वगैरे त्या त्या कामाचीं शहाणीं माणसें उपयोगी पाहून ठेवून

बंदोबस्त करून दिला. रघुनाथ बल्लाळ कोरडे सबनीस होते त्यांजकडे 'इमारत किल्ले कोट वगैरे पाहून करावे व सामान किल्ल्यावरील भरतीची चौकशी करावी' ह्मणून सांगितलें. रावजी सोमनाथ शहाणे पाहून कारभारांत ठेविले व राजापूर सुभा त्यांजकडे होताच. आबाजी सोनदेव कल्याणप्रांतीं सुभा होता, त्या प्रांतीं किल्ले कोट यांच्या इमारती त्यांजकडे सांगितल्या. राघो बल्लाळ अत्रे यांस स्वारांचा सुभा दिला. राघो मित्र मराठे यांस हुजूर लोकांचा हवाला दिला. खासबरदार, इटेकरी, पट्टेकरी, ढालाईत, जासूद, काशिद वगैरे जिलबीचे चाकरीचे लोक यांस सबनीस व एक एक हवलदार, नाईक, पाईक, करून नेमून दिले. गोमाजी नाईक पानसंबळ यांस कापडाचे जामदारखान्याचा हवाला दिला. मातबर सरदार शरीरसंबंधी निंबाळ्कर, घाटगे, शिर्के, मोहिते, महाडिक, जाधव, पालकर, मानशिंग मोरे, रूपाजी भोसले, मकाजी आनंदराव वगैरे यांस पागांचे सुभे व सरदाऱ्या दिल्या. कंक, मालुसरे, फर्जंद, पासलकर, नाईक व देशपांडे, मावळचे प्रभु, वगैरे यांनीं मोठमोठीं कामें केलीं त्यांस मावळे लोकांच्या सरदाऱ्या व पागा निसबतीस देऊन योग्यतेनुरूप वाढविलें. पायचे लोक यांची सरनोबती येसजी कंक यांस दिली.

रायगड जागा बहुत थोर बांकी बेलाग, किल्ला फार चांगला, राजधानीस योग्य, जाणून किल्ल्याचें काम इमारत आबाजी सोनदेव यांस सांगून कडे तासविले, बंदिस्त केली आणि बेलाग किल्ला केला. आंत राजमंदिर दौलत (बंक) सभा व मंत्रसभा व धर्मसभा व चित्रसभा व आदर्शमंदिर अशीं नांवें ठेवून त्याप्रमाणें जागा बहुत तरतुदीच्या व महाल राहण्याचे निराळे निराळे याप्रमाणें खाजगत राहण्याची जागा करविली. तशींच पागाघोडीं राहण्याचीं चिरेबंदी, लादणीचीं घरें, गजशाला, पाकशाला, कोठी वगैरे अठरा कारखाने बारा महाल यांचीं स्थलें करविलीं. बाजार दुरस्ता चिरेबंदी जोतीं घालून करविला. मातबर सरकारकून, सरदार, कारकून लोक यांस घरें सरकारांतून इमारती करवून दिल्या. ज्याची जशी योग्यता तशा त्यास जागा करवून दिली. मातुश्री जिजाबाईसाहेब यांचे खाजगीचे लोक-सेवेचे व शिबिकेचे-पुराणिक नित्यदान वगैरे धर्म करण्यास, खाजगी खर्च पाहिजे तसा नेमून देऊन त्यांस दिवाण कारभारी करून दिले. व चार महाल त्यास सेवेचे लोक,

बायका व खाजगी खर्च वगैरे याची नेमणूक करून देऊन त्याजप्रमाणें तनखा लावून देऊन दिवाण एक, दरकदार, चिटणीस, फडणीस, याजकडील कारकून नेमून देऊन पुराणीक ब्राह्मण निराळे निराळे बंदोबस्त करून राजधर्म त्याप्रमाणें खोजे व सेवेच्या बायका चौकीच्या वगैरे करून देऊन पुराणीक याजपासून नित्य त्यांणीं पुराण, स्त्रियांचे धर्म व पातिव्रत्यधर्म व इतिहासश्रवण करावें असें करविलें. कारभारांत बोलूं नये. कदाचित् उत्तम गोष्ट बोलणें तरी आग्रह न करितां महाराजांची मर्जी पाहून विनंति मात्र करणें. करणें न करणें पाहून महाराज करतील तसें मर्जीनें आज्ञेनें वागावें. याप्रमाणें धारा करून दिला.

कारभारी यांनीं ज्याकडे जो कारभार नेमला व ज्याचे जे हुद्दे ते ते त्यांचे त्यांनीं करावे. कोणाचें कोणीं करूं नये. आग्रह कोणाचा कोणीं धरूं नये. द्वेष करूं नये. तत्रापि एकादे ठायीं [द्वेष] पडल्यास महाराजांनीं निखालसता करून द्यावी. आज्ञा करतील तसें चालावें. द्वेष फारच पडल्यास त्यांत त्यांत शरीरसंबंध करून देऊन मोडावे. लहान कामाचे हुद्देदार यांनीं थोर लोक यांची अमर्यादा, महाराजांजवळ असणें व कृपा याजमुळें, करूं नये, व कारभाराविषयीं बोलूं नये. आपलाली सेवा करून मर्यादेनें असावें, यांत अंतर पडल्यास शिक्षा करावी. तसेंच सरकारकून यांनीं, जे समयीं ज्याची चाकरी व उपयोग तशी घालमेल करून करणें असल्यास, दुसरें काम अथवा जसें सांगितलें तसें निष्ठेनें चालावें. त्याप्रमाणें सर्वांनीं मान्य करून चालावें असें केलें. शरीरसंबंधी लोक, पागे, सरदार, शिलेदार, यांनीं आपलें बोलणें काम असेल तें आपले नाईक, जुमनेदार यांजपाशीं बोलावें. त्यांनीं सरदारांशीं बोलावें. त्यांनीं सरनोबतांस सांगावें, अथवा मुत्सद्दी यांजपासून बोलवावें. रूबरू गवगवा काडीमात्र पडूं नये. सरदार, सोयरे लोक, शिपाई यांनीं महाराजांशींच एकादा अर्ज करणें तरी कारकून यांजपासून करवावा. रूबरूच एकादी गोष्ट बोलणें ती मर्यादेनें बोलावी. त्याचें ऐकून 'उत्तर कारकुनांपाशीं अगर अमुक कारभाऱ्यापाशीं सांगतों ह्मणून गौरव करून विडे वगैरे देऊन निरोप द्यावा. कारभारविषयांत ज्यास जें सांगितलें असेल त्याखेरीज काडीमात्र बोलूं नये. जवळ असणार कृपेंतील त्यांनीं सर्वकाळ जवळ असून शिपाईगिरीच्या वगैरे गोष्टी बोलाव्या. त्यांजवर कृपाही करून वस्त्रें भूषणें द्यावीं. घोडीं द्यावीं. परंतु कारभार

करणें तो सरकारकून यांनींच करावा. आपलें बोलणें असेल तें कारभारी यांजपाशीं बोलून बोलवावें. याप्रमाणें बंद बांधून दिले.

किल्ले कोट ठाणीं घेतलीं त्यांचा बंदोबस्त सुभेदार एक व हवलदार एक व सरनोबत व तटसरनोबत, फडणीस, कारखानीस, यांच्या हस्तकीं देखरेखीं अधिकारी करून दिले. त्यांत हवलदार, इतबारी, घरंदाज, कुलीन, मर्द, शहाणे असे पाहून मराठे ठेविले. सुभेदार सवनीस ब्राह्मण देशस्थ, कराडे, कोंकणस्थ, मध्यंदिन असे विश्वासुक, शहाणे, मर्द, स्वामिसेवातत्पर पाहून योजिले. कारखानीस प्रभु लोक बाळाजी आवजी चिटणीस यांचे निसवतीस धंदा देऊन त्यांचे तर्फेचे नेमून दिले. सरनोबत व तटसरनोबत हे मराठे केले. हवलदार यांनीं सदरेस कारभार करावा. परवानगी रसानगी दरवाज्यांची व किल्ल्या त्यांजकडे. किल्ल्याचा तनखा दाणागल्ला दारूगोळा सामान आणवणें, बाह्यकारभार त्यांजकडेच. शिक्का त्यांचे नांवें. किल्ल्याचें मुख्यत्व त्यांजकडे. सुभेदार यांनीं कारभार करावा तो त्यांचे विचारें अनुमतें करावा. सवनिसाकडे हजरी लोकांची व चौकशी. कारखानिसाकडे कोठीचा जिन्नस, जमा व खर्च, दारूगोळा, इमारत, लोकांस रोजमुरा वांटणें, लिहिणें करणें इत्यादि त्यांजकडे. याप्रमाणें करून दिलें. चालण्याचे कानून जाबते करून दिले. याप्रमाणें एकाचें काम एकानें न करितां सर्वांनीं एक लक्ष करून चालावें याप्रमाणें केलें. किल्ल्याचें काम नाजुक जाणून फार सावध, इतबारी, चांगलीं माणसें रीतीचीं योजून किल्ल्यांस ठेविलीं. अश्वारूढ व सभासद व गडकरी, मेठकरी, परवारी, रामोशी असे करून दिले. परवारी, रामोशी यांनीं तटाखालील चौक्या कराव्या. कदाचित् एकांत एक विरुद्ध चालूं लागले तर हें वर्तमान कळतांच बदलून दुसरे ठेवावे आणि रोखापत्र करणें त्यांजवर शिक्का करणें व सरकारपत्र येणें तें सर्व हवलदार यांचे नांवें यावें. संध्याकाळीं दरवाजा लावून कुलूप घालावें. आपण येऊन मागुती ओढून पहावें. हवलदार यांनीं आपले अंगे किल्ल्या घेऊन जाव्या. आपलेजवळ उश्यास ठेवाव्या. प्रातःकालीं येऊन कुलूप काढून दरवाजा उघडावा. रोज घस्त सर्व दरखदार सुद्धां घालावी. जागां जागां पहारे यांची चौकशी हवलदार यांनीं करावी. त्याजवर सरनोबतांनीं घस्तीची व लोकांची रात्रींची चौकशी करावी. तटसरनोबतांनीं किल्ला लहानथोर याचे पहारे दोन चार नाजुक जागां जागां असतील त्यां-

ची चौकशी करावी. किल्ला कोट पाहून माणसांची भरती नेमणुकी त्यांस अडिस्ती व नगदी वगैरे बेगमी किल्ला पाहून जकीरा दहापांच वर्षांची बेगमी गल्ला लांकूडफांटा, जिन्नसमात्र, दारूगोळा, चुना वांटून तयार, असे सुद्धां आमके किल्ल्यावर आमकें सामान याप्रमाणें धारे बांधून दिले. किल्ल्याचे तट जेथें सोपे होते ते तासून व सुरुंग लावून इमारती करून वेलाग करविले. कोणतेही किल्ल्यास इमारत नाहीं असें नाहीं. हवलदार यांस दिवटी, भालदार, पालखी, योग्यतेनुरूप किल्ला पाहून नेमून दिले. वरकडांस दिवटी, चाकर, पोरगे.वगैरे नेमून दिले. हवलदार यांनीं रात्रंदिवस सदरेस सावध लोकसुद्धां हत्यारबंद असावें. किल्ल्याखालीं नाऱ्यांस वाटेच्या जागां, मेटे, तेथेंही लोकचौक्या ठेवाव्या.

दहा माणसांचा दाहिजा, त्यांत एक नाईक, नऊ शिपाई, त्यांत बंदुकी, आडहत्यारी, सांग, बरची, इटेकरी, पटेकरी, पाहून ठेविले. लोक ठेवणें ते खासा महाराजांनीं नाईक पाईक करणें जसें माणूस मर्द चांगलें इतबारी असेल त्याची परीक्षा हजरी करून ठेवावें. आणि कामें योजून दिलीं त्याप्रमाणें किल्लोकिल्ल्याचे बंदोबस्त निराळे निराळे करून देऊन ते किल्ले सुभेदार मामलेदार तालुकदार यांचे निसबतीस लावून त्यांनीं किल्ल्यावर सामान नवें जुनें करणें, खर्च लोकांस वगैरे झाला तो पाहून भरती करून देणें तें सरकारांतून तालुक्यास नेमून दिलें, त्यास विचारून करून द्यावें. लोक दरखदार यांची तगीरी, व बाहाली, गयाळ, मयत, नाकार, कामगार हें हुजूर सनदेनें व्हावें. त्याचा इतला कोणांकडे नाहीं. तालुकदार यांनीं करणें तें महाराजांच्या आज्ञेनें करावें. अशा रीतीनें काम विभागपरत्वें लावून देऊन आज्ञेखेरीज पाय पालटूं नये, आणि जेथील तेथें आयास न होतां घडत असावें असें केलें. किल्ले कोट हे आपल्या राज्याचा जीवप्राण; प्रांत घेतले त्यांचें संरक्षण; मोठीं मोठीं संकटें पडलीं असतां किल्लेकोट जंजीरे सावध तरी मोठेही शत्रूंची हिशेब धरावयास नको ह्मणून बंदोबस्त फार बारिकपणें करविला.

आतां मुलुख व प्रांत यांचा बंदोबस्त केला जे प्रांताचे प्रांतास सुभेदार नेमिला. त्यांस मजमदार, चिटणीस, फडणीस, दफ्तरदार, हुजूरचे दरखदार असावेसें केलें. गांवगणा कमाविसदार त्या सर्वांनीं तालुकदार यांचे अनुमतें हिशेब त्याजपाशीं दफ्तरांत दफ्तरदार याजपाशीं गुजरावे असें करविलें.

पागा व मोंगलमेवाशी लुटले त्यांचीं घोडीं व खरेदीचीं घोडीं व शिंगरें व मादवाना असे निरनिराळे जागा चांगली पाहून तयार करवून आरबी, कच्छी, ताजी, माणकी अशीं मोठमोठीं अवलादीचीं निगेनिगेनें जपून राखणार व करोली, निशाण लावणार, आडहत्यारी असे रुबरू परीक्षा घेऊन पाहून शिलेदार ठेवणें तेच ठेविले. निराळे ठेविले नाहींत. घोड्यांची किंमत करून पैसा देऊन पागेंत लाविलीं. कारण त्यांस आपला ओढा लागून घोडीं ताजीं राखणार नाहींत. चाकरी नकोशी वाटल्यास निघून जातील. ह्मणून पागाच करून ठेविली. पंचवीस घोड्यांस एक हवलदार नेमिला. त्यानें दाणा वैरण जिन्नस सामान जतन नगांसुद्धां चौकशी करावी. मर्द शहाणा पाहून बारगीर ठेविला. पंचवीस घोड्यांस पखाली एक, नालबंद एक, याजप्रमाणें सवाशें घोड्यांस 'जुमला' असें नांव ठेवून त्यांस जुमलेदार व कारकून नेमिले. असे पांच जुमल्यांस एक सुभेदार असावा तो नामांकित, मर्द त्यास पालखी व कारभारी मुजुमदार असावे. त्यांनीं सर्व पहावें. असे सुभेदार दहा ह्मणजे एकहजारी. ते सरदार मराठे मर्द इतबारी पाहून त्यांचे स्वाधीन केले. त्यांस मुजुमदार, दिवाण, जाबनीस याप्रमाणें देऊन पालखी हत्ती दिले. याचप्रमाणें पंचहजारी यांचे स्वाधीन पांच हजार, तो फार मातबर सरदार त्यास लवाजिमा नौबत निशाण हत्ती वगैरे करून देऊन पद्धति केल्या. त्या सर्वांनीं सरनोबत याचे आज्ञेंत वागून स्वारी शिकारी करावी असें केलें. कांहीं शिलेदार मानकरी ठेविले. त्यांनींही सरनोबताचे आज्ञेंत वागावें. घोड्याचे ओळखणीस मागें चौकावर शिक्का केला तो करावा. त्याजपाशीं दिवाण मुजुमदार, फडणीस, चिटणीस असे दरखदार करून हत्ती अंबारी, जरीपटका, नौबत दिली.

बातमीहलकारे ठेविले. त्यांची नायकी [बहिर्जी] नाईक यास दिली. त्याजवर महाराजांचा इतबार होता. अशी बातमी सर्व मुलुखांतील स्वराज्यपरराज्यांतील ठेविली. नाईक यानें पत्रें पाठवीत असावीं तीं **चिटणिसानें** नित्यचे नित्य दाखवित असावीं.

घोड्यास नालबंदी महिना पंधरा दिवसांनीं करीत जावी. जसें काम तसे नवे नाल लागतील ते पाडणें व जुनें लोखंड निघेल तें व नवें घेऊन आमकें केलें त्याचें लोखंड आमके असें लिहावें. याप्रमाणें धारे केले. सरनोबत यानें पागा घेऊन स्वारीस जावें. शहरें मारलीं त्यांची लूट

बाहेर जाऊं न देतां आणून द्यावी. आठ महिने स्वारी करावी. नदी नाले भरले नाहींत तों परत यावें. लूट सरकारीशिवाय ज्याची त्यास द्यावी. छावणीस जागां जागां नेमणूक असेल त्याप्रमाणें पागा पाठवाव्या. लष्करांत बटिक, बायको, कलावंतीण, कलाल, नेऊं नये; कारण माणूस बेखबर राहतें. असावध असल्यास दगा पावेल. 'व्यसनी माणूस असल्यास चाकरी होणार नाहीं, सरकारकामास अंतर पडेल,' ह्मणून ताकीद केली. जे नेतील त्यांस शिक्षा करावी. 'ब्राह्मणवस्ती व देवांस उपद्रव करूं नये. खंडणींत [ब्राह्मणांस] ओल घेऊं नये. यवन घेत जावा, अशी ताकीद केली. 'अंतर पडल्यास क्षमा न करितां शिक्षा करून चाकरीवरून दूर करूं' असे धाक लाविले. 'महाराज आपणांस पाहिजे तसें देणार, मग अंतर कां करावें ? ह्मणून लहानापासून थोर निष्ठेनें इमानानें आज्ञावचन केवळ ईश्वर आपला त्याची अवज्ञा न करितां चालते झाले.

स्वारी येतां झाडून तैनातींचा हिशेब करावा. याप्रमाणें करविलें. महाराजांनीं मावळे लोक वगैरे हुषुमी जमविले त्यांत पांचहजार माणूस निवड धावणार असे स्वारीबरोबर ठेविले. करोल, सांग, बरची, पट्टेकरी, यांच्या जमाती केल्या. तीस चाळीस साठ शंभर असे लोक, त्यांत सरदार, त्यास कारकून असे जथे केले. त्यांनीं स्वारीबरोबर चालावें. पुढें मागें बाजूनें चालण्याची नेमणुक [झाली असेल] त्याप्रमाणें चालावें. त्यांस पोषाख चांगले-मंदील बांधण्यास, सकलादा, व ताडपदरी व पैठणी पासोडे ओढण्यास--याप्रमाणें हजार दोनहजार माणूस, कोणांस सोन्याचीं कडीं, कोणांस रूप्याची मोहनमाला, कंठ्या, व हत्यारांस सोन्यारूप्याचे कट तैनाळ करून दिले. स्वारीस पागा जाणार त्याखेरीज हुजूरपागा जवळ नेहमीं पांचहजार घोडीं तीं बहुत चांगलीं जीनसामान सोन्यारूप्याचें, व त्यांजवर बारगीर मोठे मोठे लोक करोल हत्यारबंद पालखीनशीन असे ठेविले. खाशे घोड्यांवर सोनें रूपें जडाव जीन सरोसरा अशीं दोनशें घोडीं याप्रमाणें पांचहजार पागा बरावर जवळ नेहमीं रहावी असे ठेविले.

सर्वांस तैनात केली, ती समयाचे समयास पावावी; शिवाय लग्नमुहूर्त प्रयोजन त्याची नेमणूक ब्राह्मणांस अमके रीतीनें, वरकडांस ज्याचे त्याचे योग्यतेनें देणें तें देववावें. कोणी कर्ज करूं नये. फैजखोरी करूं नये. माणूस योग्य पाहून ज्याची जशी प्रतिष्ठा तशींच वस्त्रें भूषणें दे-

ऊन त्यांहून अधिक त्यानें करूं नये. ज्याची तैनात करणें त्याचें कुटुंब व खर्च योग्यता पाहून त्या अजमासें चौकशी करावी. देणें थोडें, खर्च फार, तर कर्ज करील. खर्च थोडा, देणें फार, तर वेनाहाक वर्तणूक करून दिवाळखोर होईल. अशानें अधिकच व्यसनी होईल जाणून योग्यायोग्य पाहून करून द्यावी. मर्यादेहून अधिक कोणी केलें आणि कर्ज केलें तर त्यास दूर तत्काळ करावें.

पागा राहण्यास छावणीच्या जागा तेथें पागा गेल्यावर सुभेदार यानें दाणा, चरीदा, माणसें राहणें, हजरी गैरहजरी पाहून चौकशीनें बेगमी करून चालवावें. हिशेब होऊन देणें फाजील हुजूरपरवानगीनें द्यावें. कामें काजें केलीं त्यांचीं चौकशीनें बक्षिसें द्यावीं. वाढवावें. निकामी [माणूस] अथवा योजले स्थलीं कामाचें नाहीं तर दुसरा [माणूस] अधिकारी यांस समजावून ठेवावा. याप्रमाणें छावणीचे दिवसांत करून मागुती स्वारी शिकारीस आज्ञेप्रमाणें मनसुब्यानुरूप तयार असावें. फौज घरीं राहिली, निष्कारण तैनात वाढली, निष्प्रयोजन खात बसले तर स्वामिकार्य राहतें. दहशत नाहीं [तिव्हां] राज्य साधणें घडत नाहीं. कृतकृत्य मानून शत्रूंशीं सख्य करून राहिल्यास तें राज्य वृद्धीस जात नाहीं, व शत्रु आहेत तेही हरण करितात. सुख पडत नाहीं. यास्तव प्रतिवर्षीं स्वारी करावी. असें करविते झाले.

लूट येईल ती जमा धरून कापड व दागिने नीट करावे, धुवावे. त्यास किमती घालून जे जिन्नस असतील ते ज्यास जसे पाहिजेत तसे त्याचे वेतनांत द्यावे. वेतन समयास न पावलें तर त्याचें कुटुंब उपवाशी मरेल, त्याचा द्रोह श्रेयस्कर नव्हे. तसेंच माणूसही दिलगीर असल्यास नाशास कारण फितवा फांदडा करून अपाय करील, ह्मणून महाराज सावधपणें असें करविते झाले.

हषम मावळे लोक त्यांत दहांना एक नाईक; पांच नायकांस हवलदार एक; पांच हवलदार त्यांस एक जुमला; पांच जुमल्यांस सरदार एक–त्यास तैनाती यथायोग्य, कुटुंब तशा द्याव्या. चांगलें गुणी माणूस दुसरीकडेस जाईल ह्मणून योग्य तसें केलें. लग्नमुहूर्त प्रयोजनसमयीं नेमणूक [असेल] तसें द्यावें. त्यांत खर्च त्यांनीं अधिक करूं नये.

तुफानखोरांचें पारिपत्य करावें. बदराह चालेल त्याची क्षमा किमपि न करावी. यथायोग्य पाहून क्षमा करावी. स्वल्प अन्यायीं उग्र दंड न क-

रावा. बहुत अन्याय त्यास स्वल्प दंड न होतां पाहून करावा असें केलें.

शेतकरी चाकरलोक यांचा धारा रयतेप्रमाणें करून त्याचे तैनातींत द्यावा. वरकड पावणें नगदी व गल्ला कापड जिन्नस देऊन बाकी वरात देऊन झाडा सालाचे सालास हजरी गैरहजरी पाहून करावा. बाकी ठेवूं नये. कोणांस मोकासा देऊं नये. वरात देऊन पाठवावें. मोकासा दिलिया त्यांचीच सत्ता गांवांत होऊन रयतेस उवद्रव देतील, यास्तव न दिला. बेकैदी करतील. जमेदार ते एक होऊन रयत नागवितील, यास्तव न दिला.

राजा शासन न करी तर प्रजा भीत नाहीं. प्रजा कशी ? तरी जसे मत्त हत्तीस भयाभीत होतात; तोच गज मदरहित झाल्यास त्याचीच हेलना करितात. अथवा सर्प विषरहित त्यास भीत नाहींत. हें जाणून यथान्याय शिक्षा प्रजेस करून चाल करून दिली.

सुभे तालुके दिले. जसें शत्रु जवळच वागतात [असें समजून] त्यांचे प्रतिकारार्थ हषम फौज त्यांचे जिमेस नेमून देणें ती देऊन ठेविली. प्रांताची लावणी गांवगन्ना मोजणी करून धुरुग, चावर, रुके, पैके, दोऱ्या, खड्या, व खडक्या, आदिकरून ज्या देशीं जशीं नांवें जशी चाल त्याप्रमाणें काठी घालून बिघे करून त्यास इस्ताव्यानें कौल देऊन मालाचा अजमास करून वसूल घ्यावा, असें करावें. जास्ती जुलूम रयतेस लागूं न द्यावे. याप्रमाणें ताकीद केली. वतनदार करीम पाहून अभय देऊन आणावे. त्यांच्या मनसब्या बरहक्क करून त्यांचे हातें काम घेऊन लावणी करावी. असें करून जमीदार वतनदार आदिकरून त्यांस हक्करूसुमाचे धारे नेमणूक करून दिले. रयतेस बेजाबता कोणाएकाचा उपद्रव न लागावा. हलकूप चालावें. सरकारचाकरी याप्रमाणें करावी असें केलें. पूर्वींही धारे दादाजी कोंडदेव व मोरोपंत व अण्णाजी दत्तो वगैरे यांनीं केले ते चालवावे.

प्रांत देश हस्तगत झाले तेथें थोर थोर देवस्थानें होतीं त्यांस प्राचीन धर्मादाय चालत आले ते यथास्थित चालावे, व नवीन देवस्थानें पाहून त्यांच्या पूजा अर्चा, नैवेद्य, उत्साह, अभिषेक, नंदादीप करून दिले. व त्यांस पारिपत्यगार नेमून देऊन त्यांची स्वस्थता केल्याप्रमाणें चालावेंसें केलें, व ग्रामदेव यांस नंदादीप चालते केले. तसेच थोर लहान क्षेत्रें येथें ब्राह्मणांचीं कुटुंबें पाहून त्यांस वर्षासनें नेमणुका त्याच गांवीं क-

रून दिल्या. थोर थोर सत्पुरुष यांसीं गांव भूमि उत्साह चालेल असें करून दिलें.

वेदशास्त्र अगदीं उच्छिन्न झालें, त्यास एक ग्रंथ अध्ययन केलें त्यास मणभर धान्य, दोन ग्रंथ अध्ययन केलें त्यास दोन मण, पंचग्रंथी, दशग्रंथी यांस पांच मण, दहा मण, परीक्षा करून द्यावें; तसेंच पंडित जसा जो विद्वान् त्यास योग्यता पाहून स्वदेशी असल्यास त्यांस भात, विदेशी असल्यास त्यास द्रव्यांचीं वर्षासनें श्रावणमासीं सर्वांस पंडितराव यांनीं परीक्षा करून अधिक विद्या होईल त्यांस अधिक मोइन्न वाढवावी असें केलें. मोठे मोठे पंडित वैदिक प्रतिष्ठित येतील त्यांच्या सभा करून सत्कार करून शंभर पन्नास रुपये अधिकही योग्यतेनुरूप द्यावे असें करून दिलें. याजमुळें दिवसेंदिवस अधिक विद्या वृद्धीप्रत पावती झाली. अग्निहोत्रें घेणार त्यांस तितकें द्रव्य देऊन घेववावें. त्यांची मोइन्न अधिक करावी. तसेंच यज्ञ करणार त्यांस द्रव्य लागेल तसें मोइन्न बांधून देऊन यज्ञ करवावे. याप्रमाणें देवब्राह्मणांची स्थापना करून नित्यदानें व नैमित्तिक प्राप्त झालें असतां करावयाचें त्याप्रमाणें करणें. जागजागां अन्नसत्रें व नित्य ब्राह्मणभोजन, इच्छाभोजन, यांचे निबंध बांधून दिले. ब्राह्मण आपले राज्यांतील दुसरे राज्यांत याच्ञा करावयास न जावेत असें केलें.

आपल्या राज्यामध्यें चोरभय अगदीं नसावें असें मनांत आणून जागां जागां बेरड चोर होते त्यांस धरून आणून कित्येकांचे शिरच्छेद केले; आणि ज्या ज्या देशांतील होते त्यांत किल्ले ठाणीं कोट येथें असावेसें नेमून देऊन त्यांस शेत वगैरे देऊन गडकरी यांस चौकींत नेमून देऊन त्यांची उपजीविका चालेसें करून त्यांतून चोरी कोणीं केली असतां शिरच्छेद करावा असें केलें. प्रतिगांवास रखवाली एक बेरड ज्या किल्याचा त्या प्रांतांत असावा, चोरी झाल्यास त्यानें भरून द्यावी, नाहीं तर पत्ता लावून द्यावा असें केलें. याजमुळें राष्ट्रांत कोठेंही चोरभय नाहीं असें झालें.

तोफखाना याचा बंदोबस्त लहानमोठया तोफा त्यांस गाडे करवून त्यांस दुसरे छकडे दारूगोळ्यांचे, व दारू बहुत चांगली तयार असावी; माळेस बैल ज्या तोफेस जसे असावे तसे पाहून दुहेरी सामान, सुतार, लोहार, चांभार, रस्सीदार, तलफदार, गोलंदाज, असे पाहिजेत तसे करून,

तोफखानेकडे हत्ती तोफांस एकादे वेळेस लागतात याकरितां नेमून गारद पायदळ एक तोफेस आमके असावे असा नेम करून, अधिकारी व कारकून व हवलदार मर्द शहाणे तरतूद करणार त्यांनीं दारूगोळा बाण कैऱ्या तयार करणें, तरतुदीनें व जवांमर्दीनें तोफा लावणें काढणें, कवायत करणें असें करावेंसें केलें. अशा दोनशें तोफा तयार चालवून बाकी गाड्यांवर रहाव्यासें केलें.

हत्ती पीलखान्यांत तीनशें साडेतीनशें होते. त्यांतून सरदार पागा यांचे निजवतीस नेमणुकीचे ते देऊन बाकी खाजगीकडील, जिलबीचे व स्वारीचे, निशाण नौबतीचे नामी मर्द पाहून नेमून, कोतवाल, अंबाऱ्या हौदेचे असे शंभर हत्ती तयार असावेसें केलें. त्यांचीं सामानें व चारणीच्या जागा वगैरे नेमणुका करून दिल्या.

तसेंच उंट हजार दीड हजार होते, त्यांत लढाऊ, शिवाय निजवतीस पागा वगैरेचे, व सांडणीस्वार व सुरनाळाचे वगैरे असे करविले.

थटी गायी म्हशी बहुत दोनचारहजार होत्या. त्यांचीं खिलारें केलीं. तीं मानदेश, भीमथडी वगैरे गवताचीं रानें पाहून जागां जागां ठेविलीं. त्यांची शुश्रूषा गौळी चाकर ठेवून बहुत रीतीनें व्हावी असें करविलें. तसेंच महिषी पांचहजार खिलारें करून त्यांस गौळी व धनगर यांचे स्वाधीन केल्या. त्यांनीं देशांत व कोंकणांत सड्यांवरून जागां जागां रहावें. त्याचे धारे मोजदादी करून लोणी वगैरे उत्पन्न यावें, व एकादे समयीं जिकडे जसें खर्चास दूध वगैरे ब्राह्मणभोजनास पाहिजे तसें हजारों शेर एकदांच यावें, तसेंच लोणी तूप यावें असें करविलें. तसेंच मेंढरें यांचे धनगर करून खिलारें पंचवीसहजार करविलीं. त्यांची मोजदाद वर्षांतून दोन वेळ व्हावी. उत्पन्न खर्च पाहून दसऱ्याच्या वगैरे खर्चास येण्याच्या मोइनी केल्या.

याप्रमाणें सर्व दौलतीचा बंदोबस्त बहुत तरतुदीनें करून आपण नित्य दिनचर्या करण्याचे नियम केले कीं, उषःकालीं उठावें. ते समयीं गायक यांनीं श्रीभगवंताचे स्तुतिपाठ वीणा, मृदंग, मंगलवाद्यें, नगारखाना यांचे श्रवणेंकरून उठावें. कांहीं प्रातःस्मरण करून सर्वकर्ता भगवान् हा संकल्प करावा. शौच विधियुक्त करावा. नंतर गोसेवन दर्शन मंगलालंभन करून स्नान गंगादि महानद्यांच्या उदकें करावें. जप देवतार्चन करावें. पुराणश्रवणादि करून चार घटिका दिवसास तिलक वस्त्रें अलंकार भूषणें घालून तिर-

दाजी निशाण एक घटिका करून सभेस यावें. तेथें सर्व कार्यकर्ते कारभारी वगैरे यांनीं आपलालीं कार्यें विचारून करावीं. जे जे दर्शनास येतील त्यांजकडे कृपायुक्त अवलोकन करून त्यांचे मुजरे घ्यावे. कोणांकडे अवलोकन करून किंचित् आपण हास्य करावें. कोणांशीं कांहीं भाषण करावें. कोणांस कार्यें सांगावीं. अशीं सर्वत्रांचीं अंतःकरणें वेधून घ्यावीं. सर्वांस भासावें जे, 'माझेठायीं कृपा विशेष आहे.' असा सर्वत्र आले त्यांचा गौरव करावा. दहा घटिका दिवस आल्यावर दोन चार घटिका विविक्तस्थानीं ज्याशीं करणें त्याशीं मंत्रविचार करावा. नंतर बारा घटिका दिवसास ब्राह्मणभोजनाचें उदक सोडून नैवेद्य करून सर्वांस, पंक्तिभोजन करणार यांसहवर्तमान, भोजन करावें. आणि तांबूल घेऊन चार घटिका पुन्हां मंत्रसभेचे ठायीं बसून पत्रें आलीं व पाठवणें तीं अवलोकन करणें व कार्ययोजना व मागील दिवशीं आयव्यय झाला, दुसरे दिवशीं करणें तो, पाहून चार घटिका अंतःपुरांत वामकुक्ष करावा. बारा घटिका दिवस राहतां पुन्हां सभेस येऊन सर्व कारखाने महाल यांची चौकशी पाहणें; आपण जाऊन पाहणें करावें. सभा करून न्याय मनसुबी झाली केली तें अवलोकन करून दादफिर्याद मनास आणावी. सहा चार घटिका दिवस राहतां बाहेर स्वारी बाग आराम देवालयें कारखाने यांत जावी. आणि घोडीं फेरणें, बोथाट्या वगैरे खेळणें खेळून सायंकाल झाला असतां येऊन सभेस बसावें. सर्वांचे मुजरे घेऊन दोन घटिका रात्रीं जपध्यान करून कांहीं पुराण, दासबोधसमास श्रवण करावें. नंतर भोजन करावें. तांबूल घेऊन सभेस दोन घटिका बसावें. आणि कारभार विचार करून एकांतीं चार घटिका बसावें. बातमी, नाजुक काम, पत्रें आलीं व चार बातमी हेर ठेवून आली ती, द्रव्याचे व धान्याचे निरख हे श्रवण करून अंतःपुरांत जावें. याप्रमाणें नित्यविधि नेमिला तसे त्या त्या घटिका विभागिल्या त्यांत तेंच करावें. न्यूनाधिक होऊं नये, असे नेम केले. यांखेरीज अवश्य कर्तव्य कार्य उत्पन्न होईल तें त्यांतच निरालस्यपणें करीत असावें.

याप्रमाणें सर्व कारभारी यांनींही नियमेंकरून चालावें, आपलाले कार्यांस तत्पर असावें. अशीं मनुष्यें, केवळ रत्नेंच, अशीं संग्रह केलीं. आपण सर्वगुणसंपन्न होत्साता सर्व गुणीजन यांचे गुण समजावे. त्याअन्वयें सत्कार करावे. विनोद हास्य व रहस्य गोष्टी एकादेसमयीं करणें

ते दोन चार असामी चांगले योग्य जे दुर्व्यसनी नव्हेत त्यांजशीं एकांतीं, कोणाएकास न समजे असें करावें. लघुमनुष्य अथवा दुर्गुणी यांशीं किंवा बाहेर सभेंत करूं नये. आणि कोणी केले असतां त्याचा तिरस्कार करावा, त्याप्रमाणें करिते झाले. सर्वकाल युद्धांची चर्चा व घोडीं शस्त्रें यांची चर्चा व परराज्यसाधनाचीच करीत असावी. कांहीं एक चित्तास विराम पाहिजे तर भुखानकवि यापासून मनोरंजन करवावें.

भुखानकवि हे दिल्लीस पादशाहापाशीं त्यांचे बंधु चिंतामणकवि मनोरंजन करून होते त्यांचे घरीं असतां, 'घरांतच राहतात' असें कोणी घरच्यानें ह्मटलें. तेव्हां 'आह्मांस यवनाचें अन्न भक्षावयाचें नाहीं' ह्मणून निघाले, ते कमाहूंचे पहाडांतील राजे यांजकडे जाऊन चतुरपणें त्यांचें मनोरंजन करीत होत्साते राहिले. त्यानें याचा बहुत सन्मान करून दक्षिणा लक्ष रुपये घरास जाण्यास निरोपसमयीं दिले. आणि गर्वेंकरून भाषण केलें कीं, 'ऐसा दाता पृथ्वीवर [दुसरा] कोण आहे ?' असें बोलला. तें कवीनें ऐकून त्याजवर तत्काळ उत्तर केलें कीं, 'ऐसे दाते शतंभीष्म बहुत आहेत; परंतु ऐसा याचक कोणी तुह्मी पाहिला नसेल कीं लक्ष रुपये तुमचे गर्वोक्तीनें दिलेले तुच्छ समजून या द्रव्यास स्पर्श करावयाचा नाहीं.' असें ह्मणून [कवि] निघाले ते दक्षणप्रांतीं शिवाजी महाराज यांची कीर्ति श्रवण केली होती तेथें येऊन महाराजांची भेट त्यांनीं घेतली, आणि महाराजांस विचारिलें कीं, 'यवनांचा शत्रु कोणी असेल त्याजपाशीं आह्मी राहणार.' तेव्हां महाराजांनीं उत्तर केलें कीं, 'मी यवनांचा काळ आहें.' त्याजवरून महाराजांपाशीं राहून मनोरंजन बहुतप्रकारें कविता करून करिते झाले. आणि महाराजांचे प्रताप पाहून नूतनग्रंथ 'शिवभूखन' ह्मणून कवितावद्ध करिते झाले. महाराजांची मर्जी बहुत प्रसन्न क्षणक्षणाचे ठायीं करिते झाले. ऐसी वहिवाट पांच चार वर्षें झाली. नंतर महाराजांची आज्ञा घेऊन दिल्लीस घरास जाण्यास निरोप घेतला. महाराजांनीं वस्त्रें भूषणें हत्ती घोडे जवाहीर लक्षावधि रुपये देऊन पुन्हां येण्याविषयीं आग्रह केला. त्यानेंही 'लवकर येतों,' असें मान्य करून गमन केलें. दिल्लीस गेल्यावर तें वर्तमान पादशाहास समजलें कीं, भुखानकवि शिवाजीराजे यांजकडून सन्मान पावून आले. ऐसें ऐकून त्यांचे बंधु चिंतामणकवि यांस आज्ञा केली कीं, 'तुमचे बंधु भुखानकवि येथें आले आहेत त्यांस भेटीस आणावें.' त्याजवरून चिं-

तामणकवि यांनीं सांगितलें कीं, 'आमचे यजमान आपणांस बोलावितात.' तेसमयीं भुखानकवि यांनीं उत्तर केलें कीं, 'आमचे यजमानांचे हे शत्रु होत, त्यांचें दर्शन आह्मांस कशाला पाहिजे? कारण आमचे मुखांतून शिवाजी महाराजांच्या प्रतापांवांचून दुसरें निघावयाचें नाहीं. त्यायोगेंकरून यांस क्रोध येईल.' तेव्हां चिंतामणकवि यांनीं बहुतप्रकारें सांगितलें आणि पादशाहास अर्ज केला जे, 'कवि दर्शनास येतील, परंतु शिवाजी महाराज यांचे प्रताप वर्णितील. आज्ञा झाली तर आणितों.' तेव्हां पादशाहानें घेऊन येण्याविषयीं आज्ञा केली. त्याजवरून चिंतामणकवि भुखानकवि यांस घेऊन गेले. आणि भेट झाली. तेवेळीं पादशाहाचा हुकूम झाला कीं, 'कांहीं वर्णन करावें.' तेव्हां यांनीं सांगितलें कीं, 'आपण हात धुऊन बसावें; आह्मीं वर्णन वीररसपर करूं, ते समयीं आपला हात मिशांवर जाईल.' तेव्हां 'हात धुण्याचें कारण काय?' ह्मणून विचारिलें असतां 'आपणांस शृंगार प्रिय, आणि आमचे बंधु शृंगाररस वर्णितात ते वेळीं आपला हात विजारेस लागतो; याजकरितां हात धुवावा' ह्मणून सांगितलें. ते समयीं पादशाहा बोलले जे, 'आमचा हांत मिशांवर न गेला असतां शिरच्छेद करूं.' मग हात धुतला. तेव्हां भुखानकवि यांनीं वीररसपर कविता ह्मणण्यास प्रारंभ केला; त्यांत आधीं महाराजांचा प्रताप वर्णिला. तेव्हां पादशाहानें 'आह्मीं सार्वभौम, सर्व राजे आह्मांस करभार देतात तेव्हां ते मांडलिक राजे, असें वर्णावें' ह्मणून आज्ञा केली. त्यावरून पृथ्वींतील सर्व राजे पुष्पवृक्ष होत, आणि पादशाहा भ्रमर, सर्वांचा मधु सेवन करणार, ऐसें वर्णन करून त्यांत शिवाजी महाराज हे चंपकवृक्ष ह्मणून वर्णिलें; कारण चंपकवृक्षास भ्रमर स्पर्श करीत नाहीं. ते समयीं पुन्हां पादशाहानें 'हात धुवविला याचें कारण वर्णावें' ह्मणून सांगितलें. तेव्हां सहा कवितांत उत्कृष्ट वर्णन केलें. सातवे कवितेंत पादशाहाचा हात आवेशेंकरून अकस्मात् मिशांवर जाता झाला. तें पाहून कवित्व आटोपिलें; आणि पादशाहाही बहुत खुष झाले. आणि सन्मान बक्षीस वस्त्रें जवाहीर हत्ती दिले. गौरव केला. हें वर्तमान महाराजांकडील वकील यानें सर्व लिहिलें. त्याजवरून महाराज बहुत प्रसन्न होऊन त्यांस येण्याविषयीं आज्ञा पाठवून आणविलें. याप्रमाणें महाराजांनीं एक एक मनुष्य रत्नाप्रमाणें परीक्षा करून वाढविलें व संग्रह केला. तसेंच नानाप्रकारचे गुणीजन यांचा संग्रह केला.

यांशिवाय गायक व विद्वान् येतील त्यांचे मनोरथ पूर्ण करून दिगंत कीर्ति जावी असें केलें. त्यांस सत्कार व द्रव्य देणें, गायन, नृत्य अवलोकन ऐकणें, समयाचे समयास त्यांचे ठायीं व्यसनासक्त न होतां करिते झाले. तद्वतच कोणतेंही दुर्व्यसन अणुमात्र नाहींच. कांहीं शिकार करणें राजधर्म पडला तेव्हां महिना दोन महिन्यां एकादे समयीं त्याचे कारखानदारांसह चित्ते, बाज, पायबाके, शाहीन, बहिरी, लगड, बाघरा, जाळीं, वगैरे जल स्थल व खेचर ह्मणजे आकाशपंथें गमनकर्ते, अशी तीन प्रकारची शिकार, त्यांत मनुष्यास पीडा करणार दुष्ट पशु व्याघ्र, वृक इत्यादि प्रयत्नें मारावे. मध्यम मृगादिक कार्याकारण श्राद्धादिकास वधावे, ऐसें करिते झाले.

याप्रमाणें राज्य आक्रमण करून, त्याचे निबंध बांधून सरकारकून, पागा, लोक, फौज सेना, कोश, खजीना असे सर्वगुणसंपन्न झाले. सर्व मंत्री यांसह कार्य करिते झाले. राज्याचे धोरे करून राज्य करणें तें षड्गुण संधि, विग्रह, यान, संस्थान, आसन, द्वैधीभाव यांस यथाकाल अनुसरून करिते झाले. शत्रु कसा आहे, त्याचें उणें कोठें आहे, हें पहाणें, व त्याशीं मैत्री अथवा विरोध करणें न करणें यांस 'संधि' ह्मणावें. 'विग्रह' ह्मणजे प्रयत्न करून शत्रु अथवा परराजा याशीं कलह निर्माण करणें. 'यान' ह्मणजे आपलें वल व दुसऱ्याचें वल कसें ही विवक्षा करून त्याजवर चालून जाणें तें कोणत्या प्रकारें जावें हें पाहणें. 'संस्थान' ह्मणजे उपेक्षा करून आपले स्थलीं उगेच असणें, अथवा त्याचे देशाचे ठायीं जाऊन कोठें राहून युद्धभूमीस कोठें उभे रहावें आणि राहून व्यूहरचना कशी करावी हें जाणणें. 'द्वैधीभाव' ह्मणजे कांहीं मैत्री व कांहीं आपला दर्प त्याजवर ठेवणें, दाव ठेवून चालणें. हे सहा गुण कोठें कसे करावे हें पाहून योजना करिते झाले.

द्वादश मंडल—अरि, मित्र, उदासीन; पैकीं आपलें राज्याचे भोंवतें चहूं बाजूंस राज्याचे लगत राजे, त्यांत प्रथम जवळ ज्यांचें राज्य असेल त्यांस 'अरि' ह्मणावें. त्यांशीं आपणांशीं नित्य संबंध, त्यांस सर्वकाल रक्षित असावें. त्याच्या पलीकडचें ज्यांचें राज्य त्यांस 'मित्र' ह्मणावें. कां कीं त्यांचा आपला अरि एक. याजमुळें सहज मैत्री असते. त्यांचे पलीकडे ज्याचें राज्य तो आपला 'उदासीन.' कां कीं त्याशीं आपणांशीं कारण नाहीं. प्रसंगेंकरून त्याचें राज्य घेणें अथवा मैत्री करणें तरी

प्रातःकालेंच करावें. असे चहूं दिशेस तीन तीन यांची विवक्षा पाहणें यास 'द्वादशमंडलविचार' ह्मणावें.

तसेंच शत्रु व मित्र यांत सहज शत्रु व सहज मित्र, दुसरें कृत्रिम शत्रु व कृत्रिम मित्र ही परीक्षा करावी. सहज मित्र आपले कन्येचे पुत्र, बापाच्या बहिणीचे पुत्र आणि आईच्या बहिणीचे पुत्र, मातुल, शालक, मध्यमंडळचा राजा हे होत. बंधु, व बापाच्या बंधूचे पुत्र व दायाद व आपल्या मंडळाजवळ ज्याचें राज्य तो राजा यांस सहज शत्रु ह्मणावें. सहज मित्र जे आहेत त्यांशीं कांहीं कारणेंकरून शत्रुत्व करणें आलें, व उदासीन मंडळचा राजा याशीं शत्रुत्व करणें, राज्य घेणें आलें, तर त्यांस कृत्रिम शत्रु ह्मणावें. तसेंच सहज शत्रु यांशीं मैत्री कार्य करून संपादून त्या अन्वयें कार्य करणें, अथवा जवळ ज्या राजाचें मंडळ त्या राजाशीं सख्यपणें राहणें पडल्यास त्यांस कृत्रिम मित्र असें ह्मणावें. तसेंच वृद्धि, क्षय, स्थान, ह्मणजे आपली वृद्धि, राज्य, सैन्य, कोश कसे आहेत, दुसऱ्याचे कसे आहेत, उणें असल्यास धीर धरणें, अधिक झाल्यास उद्योग करणें हें जाणण्यास ह्मणावें. यांची सर्व विवक्षा करावी.

सप्तदुर्व्यसनत्याग ह्मणजे,—द्यूत ह्मणजे पण करून खेळणें, व मद्यसेवन, गायनाचे ठायीं आसक्त होणें, शिकारीचाच बहुत छंद, तसेंच स्त्रियांचे ठायीं आसक्त, बहुत बोलणें हीं कामें चार; क्रोधन तीन,—उग्र दंड करणें, पारुष्य ह्मणजे दुसऱ्याचें उणें भाषण करणें, अर्थदूषण ह्मणजे दुसऱ्यानें उत्तम कर्म केलें त्यास दोष ठेवणें, हीं तीन; एकूण सात व्यसनें. यांचा त्याग करणें यास सप्तव्यसनत्याग ह्मणावें. यांचा त्याग करून आणि देशकालवर्तमान पाहून कोठें काय करावयाचें ते उपाय–साम दान दंड भेद–करिते झाले. साम ह्मणजे समानत्वें चालणें; दान ह्मणजे कांहीं देऊन चालणें; भेद ह्मणजे त्याचे राज्यांत फितुर करणें; दंड ह्मणजे त्याजवर निग्रहच करणें. हें पाहून करिते झाले. काल ह्मणजे कोणते कालीं काय कर्म करावें, देश ह्मणजे कोणते प्रकारें कोणते स्थलीं जावें; वर्तमान ह्मणजे तेथें व आपले इकडे विचार कसा इत्यादि पाहणें पहावें. दत्तापहार ह्मणजे आपण दिलें तें पुन्हां हरण करणें, तो कदापि करूं नये. शब्दार्थज्ञान ह्मणजे परराज्यांतील दूत येतील त्यांचें व आपले मंत्री यांचें बोलणें, व पत्रें आलीं व पाठविण्याचीं त्यांचा अर्थ जाणून जें करणें तें धर्मेंकरून उत्तर करणें, समजणें. अशा प्रकारें नीति

करून राज्य चालविते झाले. त्यायोगें राज्याचे ठायीं बहुत सुभिक्ष व सर्व यथास्थित असून प्रजा मनुष्यमात्र सुखरूप असोन पृथ्वीचे ठायीं रसधान्यादिकांची, ज्या ज्या कालीं जें जें होणें तें होतें अशी उत्पत्ति बहुत झाली. कालाचे कालास वृष्टि झाली. कोणतेंही अर्थभय राहिलें नाहीं. गायी दुग्ध बहुत देत्या झाल्या. फलपुष्पवृद्धि होती झाली. मनुष्यमात्रास स्वल्प प्राप्ति झाली तरी त्या योगेंकरून यथास्थित सुख होतें झालें. राज्यद्रव्य येईल त्यांतच सर्व प्रपंचकार्य नित्यनैमित्तिक कर्में हीं होऊन द्रव्यसंग्रह होत असावा अशी वृद्धि आपलाले धर्मेकरून चालण्याच्या योगें सर्वांस होऊन सर्वजन सुखी राज्यांत असते झाले. त्याच योगेंकरून सर्वांस अशी इच्छा होती झाली कीं धर्मेकरून चालण्याची इच्छा झाली. याप्रमाणें धर्म स्थापून धर्मेकरून राज्य संपादन करून नीतिमर्यादेंकरून सर्वांचें, सेवक पदरचे यांचें व प्रजांचें पालन पोषण करिते झाले. आणि नीतिमर्यादेप्रमाणें दौलतही संपादन केली. व त्याचा बंदोबस्त नीति, राजधर्म, राज्य करण्याचा आहे त्या प्रकारें केला.

हें वारंवार वृत्त शाहजी महाराज यांस श्रुत होण्याकरितां लिहीत गेले. त्यांतच 'आपलें निदर्शन घडावें, संपादिला जो अर्थ त्याचा उपभोग आपणांस घडावा' अशी उत्कंठा लिहीत गेले. त्यायोगें त्यांनींही लोभास्तव उत्तर पाठविलें. त्यांत 'तुह्मांस भेटावें, पहावें असा हेतु रात्रंदिवस मनीं वागतो व पुत्राचे प्रताप श्रवण करून बहुत संतोष होतो' असें लिहिलें. आणि श्रीजेजूरीचे देवास नवस केला होता जे, 'शिवाजी महाराज यांनीं हेतु धरिला कीं, राज्य साध्य करून देवगोब्राह्मण यांची पीडा परिहार करून धर्मस्थापना करावी तो सिद्धीस निर्विघ्न जावा, ह्मणजे लक्ष रुपयांचें सोनें घेऊन त्या सोन्याच्या मूर्ति करून पाठवूं.' त्याप्रमाणें तेथें कर्नाटकी कारागर यांजपासून चांगल्या मूर्ति तयार करून पाठविल्या. शिवाजी महाराज यांस भेटावें, जाऊन पहावें, आणि चिरंजीवानें अद्भुत पराक्रमें संपादन केलें तें राज्यही पहावें अशी उत्कंठा रात्रंदिवस मनीं, याजकरितां पादशाहाचे निरोपाचा उद्योग केला जे, 'बहुत दिवस झाले आहेत, श्रीकुलस्वामीचें दर्शन घेणें, त्यास गेलें पाहिजे.' तेव्हां पादशाहानें 'तुह्मी जातां आणि तुमचे पुत्र आफरी होऊन वर्त्ततात, त्यांस तुह्मी बहुतेक प्रकारें युक्तिप्रयुक्तींचा अनेक प्रकारें बोध करून आमचे भेटीस आणावें, आणि पुढें त्यांनीं तुमच्या रीतीनें पा-

दशाहींतील अमीरचालीनें चालावें' असें करण्यास आज्ञा केली. 'ते या-उपरी तुमचा बोध श्रवण करून येथें आले असतां वजीरी सांगून सर्व पादशाहात त्यांचेच स्वाधीन करून सेवा घेतां येईल. अशा प्रकारें शिवाजी महाराज आपले ज्या योगें होतील त्या योगें राजकारण करावें' अशी आज्ञा झाली असतां शाहजी महाराज यांनीं 'पुत्र आपले स्वाधीन आहेत नाहींत ही खातरजमा पूर्वीं केलीच आहे, तत्रापि प्रयत्न जो करण्याचा तो तितका करून पहातों; आह्मांस आपणांवांचून अन्य प्रकार किमपि करणें नाहीं. श्रीकुलस्वामीचें दर्शन घेऊन नंतर आपले कार्यार्थ पुत्राचीही भेटी घेऊन अनेक प्रकारें बोधाच्या चार गोष्टी युक्तिविचारांच्या सांगून आज्ञेंत चालावें असें करून पाहतों' ह्मणून सांगून पाठविलें. तेव्हां पादशाहानें राजे वश व्हावे ही उत्कंठा मनीं धरिली होतीच ह्मणून 'जाऊन करून पहावें, झाल्यास उत्तम; नाहीं तर तुह्मी तरी त्यांत मिलाफी होऊन राहूं नये. फिरोन आमचे आह्मांपाशीं मात्र यावें. पुत्रलोभ मनीं धरूं नये.' अशी खातरजमा करून घेऊन निरोप दिला. याजलाही भेटून पुन्हां इकडील दौलतीचे बंदोबस्तास येणें अवश्य होतें. कबूल करून घरीं येऊन बंदोबस्त करून तयारी करून त्या प्रांतींहून येते झाले. श्रीतुळजापुरीं येऊन श्रीदेवीचें दर्शन घेऊन देवब्राह्मणपूजा करून श्रीपंढरीस येऊन पुढें पत्रें पाठविलीं. तेथून 'श्रीशिखरशंभुमहादेवदर्शन ब्राह्मणभोजन महापूजा करून येतों' अशीं पत्रें आलीं. त्यांजवरून इकडून पुढें लोक पाठविले. ते गेल्यावर शिवाजी महाराज सामोरे जाण्यास निघाले. बहुतां दिवशीं दर्शन तें श्रीदेवालयींच देवासन्निध घ्यावें हा निश्चय करून मार्गीं जागां जागां प्रांतांत येतील तेथें सर्व तरतुदीनें सामान करविलें. आपण सर्व सरकारकून लोक फौज सरदार पागा हत्तीसह संपत्ति जमा करून पुढें सरनौबत यांस पाठविलें. तों महाराज श्रीजेजुरीस आले तेथें आपण जाऊन पोंचले, आणि श्रीचे सन्निध भेट घेतली. जिजाबाई साहेब ही श्रीसन्निध भेटली. राजस्त्रियाही भेटविल्या. तिकडून व्यंकोजीराजे व तुकाबाई साहेब व सर्व कारभारी सरदार लोक आले त्यांस सर्वांस भेटले. आणि हिकडील सर्व कार्यकर्ते यांच्या व सरदार लोक यांच्या भेटींचा समारंभ करून भेटविले. शाहजी महाराज पालखींत बसल्यावर आपण पायउतारा जोडा न घालितां पालखी धरून बहुत मर्यादेकरून लष्करांत डेऱ्यास आले. बसल्यावर पुढें मर्यादेनें

उभे राहिले. ते समयीं महाराजांस शाहजीराजे पुढें जवळ घेऊन बहुतच संतोषी होऊन दानधर्म करिते झाले. आणि 'श्रीचा वर पूर्वीं झाला तेच पुत्र तुह्मी, जगविख्यात पराक्रम केलात; धर्मरक्षक तुह्मी निर्माण झालांत; तुमचे योगें सर्व कुल धन्य झालें; शिसोदे यांचे कुलांत निर्माण झालांत त्यांचे धर्म ते पालन तुह्मी करून या प्रांतीं आलां असतां पुन्हा कुलाचा उदय केलात' ह्मणून बहुत गौरवून बोलले असतां उठून नमस्कार करून 'सर्व प्रताप स्वामींच्या पुण्याचा व चरणांचा; स्वामीचे आशीर्वादें व आज्ञेनेंच करणें तें केलें' ह्मणून बहुत विनयें व नम्रतेनें बोलले, आणि देवगोब्राह्मण यांस दानधर्म बहुत केला. ब्राह्मणभोजनें बहुत करून पुण्यास निघून येते झाले. तेथें दोन महिने राहून बराबर लोक सरदार आले त्यांचें आदरातिथ्य बहुतप्रकारें केलें. सन्मान केले. महाराजांची नित्य सेवा करणें, सर्व वर्त्तमान सांगणें, कारभार होणें तो आज्ञा घेऊन कागदपत्र लिहिणें महाराजांचे नांवें असें करिते झाले. सर्व संपत्ति हत्ती घोडे दाखविले. महाराज यांनीं तयार करविल्या व मिळविल्या त्या तलवारी बहुत किंमतीच्या, त्यांत आपले हातीं होती ती दिली. ती परम यशस्वी, तिचें नांव 'तुळजा' असें ठेवून तिची नित्य पूजा 'भवानी'बरोबर करावी. नंतर प्रतापगडीं जाऊन देवदर्शन करावें, राजगड, रायगड सर्व संस्थानें पहावीं, असा बेत करून राजगडास जाऊन प्रतापगडास आले. दर्शन करून तेथील सर्व संपत्ति दाखवून अफजलखान बुडविला, पराक्रम तरतुद ज्या स्थलीं जशी केली तशी निवेदन केली. तेथून रायगडास जाऊन तेथील राजमंदिर दौलत होती ती घोडे, पागा, फौज सर्व दाखविलें. तदनंतर सातान्यास येऊन श्रीरामदासस्वामींचें दर्शन करवून सर्व स्थलें दाखवीत पन्हाळ्यास गेले. तेथें महाराजांस तुकाबाईसाहेब व व्यंकोजी राजे यांस पाहिजे ते पदार्थ नजर केले. पोषाख जवाहीर हत्ती घोडे पाहिजे ते देऊन बराबर खर्चास खजीना मुबलक दिला. मेजवान्या केल्या. सर्व गुणीजन यांचे गुण दाखविले. बराबरचे सर्व सरकारकून व सरदार यांस मेजवानी करून वस्त्रें जवाहीर यथायोग्य व लोकांस वस्त्रें दिलीं व महाराज यांचे सेवेचे लोक यांस वस्त्रभूषणें बहुत द्रव्य देऊन महाराजांचें वृद्धाप्य, यांस बहुत प्रकारें जपावें' असें सर्वांस सांगून 'कांहीं दिवस मीही त्या प्रांतीं दर्शनास येण्याचा योग करितों' असें बोलोन 'येथें राहण्यांत तिकडील

दौलतीचा बंदोबस्त राहणार नाहीं' हें शाहजीमहाराज यांचें ह्मणणें, जाण्याचें मानस, याजवरून जाण्याचा बेत ठरवून, 'जातां पादशाहाशीं गोडच बोलून पुढें जाण्याचा योग करावा' असें सांगून बहुत संकटें व प्रयासें वारंवार पायांवर मस्तक ठेवून निरोप दिला. 'चार महिने या प्रांतीं महाराज यांनीं राहून नंतर विजापुरास जाऊन येथील बोलणें याउपरी सफाईनें चालावें असें बहुतकरून केलें आहे' ह्मणून सांगून शिवाजी महाराजांनीं पादशाहास पोषाख जवाहीर हत्ती घोडे दिले ते आपणांकरितां पाठविले ह्मणून देऊन तंजावरप्रांतीं निरोप घेऊन गेले.

याचप्रमाणें महाराजांनीं राज्य साधन केलें, त्याचे धोरे पाये अचल, पुढें बहुत काल त्या पायांनीं जो चालेल त्यास भय कदापि धर्म होऊं देणार नाहीं; असे नीतिमर्यादेचे पाये घालून वडील शाहजी महाराज यांस आणवून त्यांस सर्व पराक्रम व संपत्ति दाखवून व सर्व वृत्त निवेदन करून वडिलांचें दर्शन घेतलें. त्यांस संतुष्ट केलें. याप्रमाणें राज्यमर्यादाकथन चतुर्थप्रकरण समाप्त.

---

## शिवछत्रपति यांनीं दिल्लीपतिपराभव केला तें कथन प्रकरण पंचम.

श्रीशिवाजीराजे यांनीं राज्य सोडवून किल्ले, कोट, ठाणीं, प्रांत बहुत घेतला; त्या राज्यांत बहुत नीति, नेम, मर्यादांचा असा पाया घालून ते चालतात; त्यांनीं मनुष्यें पदरीं बहुत चांगलीं मेळविलीं; त्यांचे जवळ खजीना द्रव्य बहुत झालें, त्या योगें युक्तीनें बहुतच मोठीं घाडसें करून शिपाईगिरी ते करितात; बहुत लोकांचा जमाव करून त्यांनीं किल्ले कोट फार घेतले, व नवीं स्थलें, लोक, खजीना विपुल केला; सर्व लोक एकदिल सुखी केले; फौज फार व माणसें पराक्रमी, सरदार व कारकून, मोठमोठे मनसबदार मेळविले; बालाघाट, परांड, कलबुर्गे, आंबेढें, उदगिरी, गंगातीरपर्यंत स्वारीशिकारी ते करितात, औरंगाबादेचा त्यांनीं पुरा लुटला; जालनापूर मारिलें; महकुबसिंग व आपले सुभ्याची फौज गेली ती मारिली; रायबागीण व मोहबतखान सरदार गेले ते बुडविले; हीं वर्तमानें वरचेवर दिल्लीस पादशाहा औरंगजेब यास कळल्यावरून, पादशाहा दिलगीर होऊन विचारांत पडले कीं, 'आह्मीं या प्रांतीचे बंदोबस्तास गुंतलों; हें सोडून जावें तर मूळ हें, यास अपाय होईल; शिवाजीनें तर धुम मांडली आहे; तिकडील पादशाहाती

जेर करून आमच्या फौजा बुडवून लुटून त्यानें प्रांत घेतला; तो गुमान राखित नाहीं; विजापूरची तर पादशाहातच त्यांनीं घेतली; अफजलखान मोठे धाडसें आंगेजणीनें मोहरा मारिला; वरकडही उमराव नामोहोरम केले.' पादशाहाजादे व दिलेलखान मध्यप्रांतीं होते त्यांनींही राजे यांचा उत्कर्ष पादशहास लिहिला; तेव्हां 'आपण जाऊन मसलत करणें ठीक नाहीं. शिवाजी राजा मसलतीनें आटोपत नाहीं. अगोदर दोन्ही पादशाहाती भागानगर व विजापूर हस्तगत होतील तेव्हांच जें घडणें तें घडेल. नाहींतर एकटेच शिवाजी राजे आंगेजणी करतील, प्रसंगीं त्यांसही साह्य करतील, नामोष जाईल;' यास्तव विचार करून यखलाजखान याच्या सुभ्याची तगीरी करून पादशाहाचे मातुल शाइस्ताखान यास सुभा देऊन नवाजीस करून फौज तोफखाना वगैरे सामान बहुत पोक्त व खजीना बरावर मुबलक असें साहित्य देऊन पादशाहांनीं रवाना केले. 'शिवाजी राजे यांचा बंदोबस्त दोन्ही पादशाहातींत अहटासाह्य करून आधीं करावा' हें सांगून रवाना केले. बरावर रोहिले, पठाण उदबक व रजपूत वगैरे पोक्त सरदार दिले ते दरमजल येते झाले. त्यांनीं येतां अगोदर सुभ्यांचा बंदोबस्त केला आणि मग ते महाराजांवर चालून आले.

महाराज रायगडीं होते. तेथून त्यांनीं सर्व तयारी करवून फौज व सरदार पागा आणवून जमाव करून विचार केला जे, 'गनीम चालून आला यास कोणते उपायें व हुनरें जेर करावा ? तवी कशी पोंचवावी ? आपली फौज लोक जाया न करितां कसा उपाय करावा?' ते समयीं सर्वांचे विचारें संमतें 'मोगली फौज बाहेर कही कवाड सामान रसद समागमें आहे, त्यांस जबाब धरून बंदी करून आधींच पुढें तोंड देऊन लढाई कशास करावी? बंदी करून गनीम घाबरा करावा, आणि एकाद्रे गलीसंधीस मारून काढावा किंवा एकादे किल्ल्यास येऊन मोर्चे देऊन बसूं द्यावा, तेथें मोर्चे मारावे, असें कित्येक प्रकारें कावेबाजीनें शत्रु घावरा करावा.' असें ठरवून महाराजांनीं 'संकट आलें यास काय करावें 'ह्मणून श्रीदेवीची प्रार्थना केली. त्याजवरून देवीनें अंगीं आविर्भाव होऊन सांगितलें जे, 'सर्वांस सांगा, चिंता करूं नका. जसा अफजल मारिला तसाच याचाही अपजय करून मारून देईन. तुह्मांस यश देईन.' इतकीं वाक्यें निघालीं तीं चिटणीस वाकनीस यांनीं लिहिलीं. तीं वाक्यें संचार गेल्यावर उभयतांनीं श्रुत केलीं. महाराजांनीं ऐ

कून घेऊन 'सर्व पार पाडणार श्री समर्थ; त्यांनीं अंगीकार केला आहेच, तर चिंता नाहीं, शत्रूचें पारिपत्य करूंच,' ही उमेद धरिली.

खान येतांच आधीं चाकणचे किल्ल्यास त्यानें मोर्चे दिले. ते समयीं संभाजी कावजी ह्मणून कोणी पागे होते, ते असे बळकट होते कीं, त्यांनीं घोडे उचलावे; व असेच मर्दही होते. त्यांजवर महाराजांची इतराजी कांहीं कारणें झाली होती. ते पागासुद्धां जाऊन खानास भेटले व बाबाजी राम होनप देशपांडे, प्रांत पुणें, हे पुढें जाऊन बऱ्हाणपुरीच खानास मिळाले. माहितगार ह्मणून त्यानें जवळ सन्मानें ठेविले.

चाकण किल्ला फिरंगोजी नरसाळा हवलदार यानें भांडविला. खानानें ईशान्य कोनचा बुरूज सुरुंगानें उडविला. तेव्हां किल्ला जेर झाला. कौल घेऊन महाराजांची आज्ञा घेऊन किल्ला नरसाळे यानें तह करून खानास दिला. 'तुह्मी शिपाई खरे मर्द आहांत, तुह्मांस वाढवितों, आह्मांपाशीं रहावें,' ह्मणून खान यानें नरसाळे यास ह्मटलें असतां, 'ये समयीं रहात नाहीं' ह्मणून ते निघून महाराजांकडे आले. महाराजांनीं त्यास 'शर्त केलीस' ह्मणून नांवाजून किल्ले भूपालगड एथील हवाला देऊन पाठविलें. चाकण घेऊन खानानें पुण्यास मुक्काम केला.

इकडे महाराजांनीं प्रतापराव गुजर सरनोबत यांस तमाम पागा देऊन, कहीकवाड चालूं न द्यावें, रसद बंद करावी, अंतेंकरून रोखून गनीम धरावा, ह्मणून रवाना केलें, व आपण खासा तमाम मावळे लोक निवड करून राजगडाहून सिंहगडास आले. तेथून विचार केला जे, 'कांहीं एक साहस कर्म करून खान यास मारावें, खानाचे गोटावर चालून जावें, छापा घालावा, आपणच जाऊन खानाचें डोकें कापून आणावें,' असे कित्येक बेत चित्तीं दृढ करून कवाईत केली जे, 'कात्रजेच्या घाटांनीं जागां जागां झाडांस पोत बांधावे, आणि बैलांचे शिंगासही बांधावे; करणेकरी व शिंगाडे पांचपंचवीस यांनीं डोंगरांत बिकट जाग्यांस असावें, आणि आह्मीं फत्ते पावून इशारतीचा करणा सिंहगडचे वाटेस एक वाजवूं ते समयीं पोत उजळणार मावळे लोक त्यांजबरावर नेमून दिले होते त्यांनीं पोत उजळावें, व करणेकरी यांनीं करणे, शिंगें, बाजे करून सर्वांसह निघून जावें; ह्मणजे त्या मार्गें छापा आला असें पाहून फौज व खान तिकडे जातील. इकडे अवकाश सांपडल्यास गोट लुटावा, अगर पडेल तशी मसलत करून आपण सिंहगडास पोंचावें.'

असा ठराव करून लोक यांस सिंहगडचे वाटेनें जागां जागां हजार पांचशें असे करून देऊन घालणीचे जागां उभे केले. त्यांनीं 'करण्यांतील वारिक नळीची इशारत होतांच येऊन मिळत जावें,' असें सांगून आपण अंगांत जिरेटोप, त्याजवर अंगरखा घालून, पागोटें घालून चोळणा काचा घालून, तरवार विचवा एका हातीं व वाघनखें एके हातीं, पाटीशीं ढाल, याप्रमाणें करून पायउतारा, बरावर धारकरी, एसजी कंक, तानाजी मालुसरे, दादाजी बापूजी देशपांडे व चिमणाजी बापूजी देशपांडे व सुरवे असे घेऊन, मातवर निधड माणसें पंचवीस असामी केवळ जवळ असावे असें करून, पांचसहा हजार लोक निवडून घेतले, ते ठेवीत ठेवीत आंवे ओहोळ येथपर्यंत आले. पांचसातशें तेथें ठेवून, गोटानजीक दोनतीनशें ठेऊन गोटांत राजे शिरले. काळोख भाद्रपदमासचा, त्यांत कांहीं पाऊस त्या दिवसांत होता. गोटांत शिरून कोणीं 'कोण?' ह्मणून पुसलें असतां 'चौकीचे लोक' ह्मणून सांगत वाडाजवळ महाराज आले. वागेलगत वाड होतें त्यांत येऊन झाडांचे आश्रयानें चौकी चुकावून वरकड लोक वाहेर ठेऊन एकदोन असामी निकम(?), दादाजी बापूजी देशपांडे असे धारकरी बरावर घेऊन वाडांत महाराज शिरले. आंतील डेऱ्याजवळ गेले, तों खोजा जागा होता, त्याचे मानेवर तरवार ठेऊन एकजणास बसवून आपण खासा पुढें गेले. खानाचा लेक निजला होता त्यास तेथेंच जेर करून निजले जागां मारिला. आणि खानाचे बिचोंत्यांत गेले, आणि छातीवर चढून बसले. वार करावा तों बायकोनें जागे होऊन पाहिलें आणि पाय धरिले. तिजला दबाविलें. तेव्हां तिनें 'यासमयीं मारूं नये, जीवदान द्यावें व मजला चुडेदान द्यावें' अशी बहुत गलानी करून प्रार्थना केली. तेव्हां महाराजांचे अंतःकरणास द्रव आला; परंतु आपण येऊन हें कर्म केलें, व पुन्हां निभावून गोटांतून बचावून आपले लोकांत जाऊन मिळालें पाहिजे यास 'कसें करावें' ह्मणून मनांत विचार करून, 'खान वांचून मोहीम करील तर काय चिंता? पारिपत्य करीन; रणांत मारीन,' ह्मणून बहुत सावधपणें खबरदारीनें दाबून धरून गळ्यावर तरवार ठेविली व एकहातें पोटास नखें लाविलीं. आणि खानास बोलिले जे, 'आह्मीं हात धरून नेऊं तेथपर्यंत न बोलतां बरावर यावें. तेथून सोडल्यावर जावें आणि कांहीं तरी शास्त करितों याकरितां 'शास्ताखान' ह्मणवावें. बायकांनींही बरावर यावें.' या-

प्रमाणें उभयतांपासून इमान कुराण शपथ घेऊन 'मधीं गलबल केल्यास मारून टाकूं' असे करार करून हाताचीं दोन बोटें कापून घेतलीं. ते समयीं शास्ताखान भयाभीत झाला. त्यास हातीं धरून घेऊन बायकोसुद्धां वाडापाशीं येऊन आल्या वाटेनें आपल्या लोकांत बाहेर येऊन 'शिवाजी तो मी, तूं मोहीम करून आलास, तुझें पारिपत्य करीन. यास्तव युद्ध न करितां फिरून जाणें, नाहीं तर मारीन,' असें बोलून तेथून गोटाबाहेरील लोकांत मिळून आंबेओहोळांत लोक ठेविले होते त्यांत मिळाले, आणि इशारतीचा करणा केला. तों लोकांनीं कात्रज्याचे डोंगरांत पोत उजळले, व करणे वाजविले. खान बहुत सर्द खजील होऊन गुल न करितां वाडांत आले. तों लेक मारिला हें लोकांस सांगण्यास देखील शरमिंदे झाले. इतक्यांत खोजे वगैरे चौकीचे लोकांत गुल झाली, व लष्करांतही 'छापा आला' अशी एकच गुल होऊन लोक तयार होऊन कात्रजेचे वाटें चहूंकडे धांवूं लागले. गलबल पडली. यांत कोणी कोणास मिळेना. कांहीं पळूं लागले. कांहीं तयार होऊन छाप्याचे रोखें चालले. असें झालें तों महाराज जागां जागां लोक ठेविले त्यांचे इशारतीच्या संकेताप्रमाणें मेळवीत मोठे प्रतापें यश घेऊन, जसा कालिया पत्न्यांचे करूणेंकरून श्रीकृष्णजीनें सोडिला, तसा खानाचे मानेवर तरवार ठेविली असतां काढून शासन करून सोडून देऊन, सिंहगडास विजयी होऊन सुरक्षित येऊन पावले. तों प्रातःकालीं गनीमाच्या फौजा झाडींत जाऊन झाडांस व बैलांचे शिंगांस पोत बांधले. छापा नव्हेसें पाहून सिंहगडाखालीं नेऊन उभ्या राहिल्या. ते समयीं, किल्ल्यावरून तोफांची मारगिरी केली. त्यांत निशाणाचे हत्तीस गोळा लागून पडला. लोकही फार जाया झाले असतां विचार महाराजांनीं केला कीं, 'मोंगल वेढा घालून बसले [illegible] करून आपण [illegible] शास्ताखान [illegible] दिवस; शिवा[illegible] होतें'; अफजल मारिला असें ऐकिलें तसेंच आह्मांसही केलें असून सोडिलें; जीवदान दिलें व शास्त केली; मोर्चे देऊन बसण्याचे दिवस नाहींत; फौज पावसानें सडेल; फौजेंत फितवा असेल ह्मणूनच डेऱ्याजवळ लोकसुद्धां येऊन पोंचून वाडांत पोंचले आणि आपणांवरी अहसान केलें,

असे प्रकारें कित्येक अंदेशे मनांत आणून 'बाजतवरसात मसलत करणें पाहून करितां येईल' ह्मणून नाहिम्मत होऊन 'पुणें येथें शिवाजीचे नजीक राहणें ठीक नाहीं' जाणून दरमजल कोस दोन कोसांच्या मजली करीत पेंडगांवीं जाऊन छावणीस राहिले. याप्रमाणें शास्ताखान यास शास्त करून नामोहोरम करून घालविला. महाराज बहुत संतोषी झाले, बरोबर लोक नेले त्या सर्वांस नावाजून आपले बराबर धाडसें केलीं ह्मणून सरफराजी करून बक्षिसें दिलीं. देशपांडे दोन असामी,—दादाजी बापूजी व चिमणाजी बापूजी—यांस पालख्या दिल्या.

'शास्ताखानाचें पारपत्य केलें; ते नामोहोरम होऊन छावणीस आले,' हें वर्तमान दिल्लीस गेलें. ते समयीं पादशाहानें आश्चर्य केलें व त्यास क्रोधही आला. 'शिवाजी बडा सैतान पैदा हुवा' असें पादशाह बोलले. 'कोणींही कर्म आजपर्यंत न केलें तेंच करितो; आपले सुभे बुडविले; खान गेले याची गति अशी केली; किल्ले कोट मुलुख घेतला; त्याचा बंदोबस्त पारपत्य चांगलें झालें पाहिजे,' ह्मणून बहुत विचारांत पडून त्यांनीं खानाचे बराबर सरदार लोक दिले होते त्यांजवर इतराजी करून त्याचे मनसब सरमजाम जप्त केले आणि खानानें 'इतकें सामान बराबर दिलें असतां जाऊन आब गमाविला, नामोहोरम जाले, शास्तीही करून घेतली, ह्मणून 'तुह्मी हुजूर निघून येणें' असें फरमान त्यास पाठविलें आणि हुजूर बोलावून घेतलें. ते निघून गेले.

नंतर शाहाजी महाराज चंजावर प्रांतीं बंगरूळ तालुक्यांत होते तेथून, रणदुल्लाखान वगैरे फौज चित्रदुर्ग तालुक्यांत होती तेथें त्यांनीं मदतीस बोलाविले याजवरून, आले. त्या तालुक्यांतील गांव बंदेकीर ह्मणून तुंगभद्रातीरीं आहे तेथें शिकारीस गेले. तों सशाची शिकार उ- [illegible] घेरा लाविला. तेव्हां गचेचींत घोड्याचा पाय जा- [illegible] पडले. तेथेंच समाप्त झाले. [illegible] स कैलासवास शाहाजी महाराज [illegible] न महाराजांस आले तेव्हां त्यांनीं बहुत श्रमी होऊन 'आपण आजपर्यंत पराक्रम केले ते महाराजांस वारंवार लिहिले आणि त्यांनीं गौरव केला; याउपर आपणांस वडील नाहींतसे झाले' ह्मणून खेद केला. जिजाबाईसाहेब यांनीं सहगमन करण्याविषयीं आग्रह केला, हें पाहून आपण जाऊन मांडीवर बसून राहविली. बहुत री-

तीनें समाधान केलें आणि सांप्रदायिक उत्तरक्रिया आरंभून लक्षावधि रुपये दानधर्म महाराजानें केला. बेदेकीर येथें महाराजांची छत्री बांधविली आणि तो गांव महाराजांची पूजाअर्चा खर्चास तेथें पारपत्यगार नेमून चालावा ह्मणून त्यांचे ताब्यांत केला.

नंतर पादशाहानें विचार केला जे, 'मिरझा जयसिंग यास मोहिमेस पाठवावें. हे हिंदु आहेत. राजकारण, तह करून, अगर युद्ध करून हातीं लागल्यास घ्यावें, अगर मसलत करावी,' ह्मणून जयशिंगास सांगून सुभेदारी देऊन त्याचेबराबर दिलेलखान पठाण विश्वासू मातबर सरदार पादशाहांनीं दिले. फौज तोफा वगैरे सामान बहुत दिलें. ते दरमजल येऊन औरंगाबादेस पोंचून सुभ्याचा बंदोबस्त करून महाराजांवर चालून आले. तेव्हां महाराजांस विचार पडला जे, 'दोन सुभे दिल्लीचे आलेले बुडविले. श्रीनीं त्यांचें पारिपत्य केलें. हल्लीं मातबर सरदार मोठे अंगेजणीचा सामान भारी घेऊन आला तरी देव पार पाडणार, तेव्हां काय चिंता आहे?' ह्मणून श्रीची प्रार्थना महाराजांनीं केली जे, 'शत्रूचा पराभव कसा करावा?' ते समयीं श्री संचार करून बोलली जे, 'अरे मुला, या समयीं प्रसंग कठीण आहे; याचा पराभव घडत नाहीं. तुजला दिल्लीस जाणें घडेल. तेथेंही कठीण प्रसंग प्राप्त होईल; परंतु तेथून निभावून आणीन. तीर्थयात्रा बहुत घडतील. आजपर्यंत रक्षिलें तसेंच रक्षीन,' अशी आज्ञा झाली. ती चिटणीस व वाकनीस यांनीं लिहून ठेऊन त्याप्रमाणें वाचून दाखविलें. तें ऐकून घेऊन महाराज बहुत संतोषी झाले. 'सर्वप्रकारें श्री निभावणार आहे' असें बोलले, आणि विचार केला जे, 'जयसिंग आले. हे हिंदु आहेत. यांसि सख्याचे विचारें बोलावें,' ह्मणून रायगडाहून महाराज निघून राजगडास येऊन त्यांनीं फौजा जमा केल्या. जयसिंग व खान भीमा उतरून आले तों राजे राजगडीं आले हें कळून सिंहगड व पुरंधरचे मध्यें येऊन जयसिंग मुक्काम करून राहिले.

जयशिंग यांनीं महाराजांचें चरित्र व राज्यआक्रमणशक्ति पाहून 'हा राजा हिंदु परम धार्मिक, धर्मस्थापना करणारा, नीतीनें राज्य चालवितो, यास कसेंही बचवून पादशाहाची चाकरीही मनसब्याचे युक्तीनें बजवावी' असें मनीं आणिलें. 'याशीं युद्ध केलें असतां जय अथवा अपजय कसें पडेल कोण जाणें! याची फौज व सामान चांगलें; जातीनें मन-

सत्र करणार; ठिकाणें चांगलीं; बाकी सर्वगुणसंपन्न आहेत; वरकड सरदार नामोहरम होऊन गेले, तसेंच आपल्यासही घडल्या कठीण; तेव्हां आपण शत्रु म्हणून नव्हे; असा विचार करून महाराजांकडे सख्याचें अनुसंधान करावेंसें करून वकिलाबराबर सांगून पाठविलें जे, 'औरंगजेब बलवान् पृथ्वीपति, त्याशीं तुह्मी सख्य करावें. शत्रुत्वेंच राहून परिणाम या कालीं लागणार नाहीं. आह्मी हिंदु, जयपूरचे राजे, तुह्मी उदेपूरचे घराण्यांतील शिसोदे, थोरवंशज, धर्मस्थापना हिंदुधर्माची तुमचे कुलीं परंपरा चालत आली, त्याप्रमाणेंच करितां; यास्तव तुह्मांस अनुकूल आहों. तुमचा बचाव करून राज्य रक्षावें हें आमचे चित्तांत बहुत आहे. तुमचें मानस काय तें कळवावें.' असें सांगून पाठविलें असतां महाराजांनीं जी गोष्ट मनांत आणिली तिचा हाच भाव व 'श्रीची आज्ञा दिल्लीस एक वेळ जावें व आपला पूर्वप्रांत दृष्टीस पडून गंगादियात्रा व पुण्यक्षेत्रेंही घडतील, यास्तव सख्याचेंच बोलणें आलें हें उत्तम; त्याचा गौरव बहुमान करून आपले वकील त्याजबराबर पाठवावे,' हा विचार करून सर्वांचे विचारें ठरावांत आणून रघुनाथभट पंडितराव यास हत्ती घोडे लवाजमा देऊन वकिलीस पाठविलें. जयसिंगराजे यांस व खानास वस्त्रें पोषाख दिले. पंत जाऊन भेटल्यावर बोलणीं झालीं त्यांत त्यांनीं महाराजांचें बोलणें 'आपण पादशहाशीं सख्य असावें असें बोलतां तेंच आह्मांसही कर्तव्य आहे' असें सांगितलें. तसेंच 'आह्मांकडे हे प्रांत किल्ले मुलुख आहेत हे आह्मीं आपले बाहुबळें संपादिले. ते परतालुक्यांतील; त्यांस पादशाहाकडून उपद्रव न होतां पादशाहाची स्वस्थता घडावी; भेट होऊन अधिक सरफराजी व्हावी हें आपणांस आवश्यक; त्या अर्थीं आमचा आपणाशीं दुसरा अर्थ नाहीं'. बोलणें बहुत निखालसतेचें ऐकून घेऊन जयसिंगराजे यांनीं उत्तर केलें कीं, 'उच्छेद झालेला हिंदुधर्म स्थापून संरक्षितां, याचा आह्मांस संतोष आहे. तुह्मी आमचे रामसिंग जसे पुत्र, तसे आह्मांस आहांत. शपथपूर्वक दुसरा अर्थ नाहीं. तुमचे मतलब पादशाहाकडून काय करून घ्यावयाचे असतील ते समजावे. त्यासारिखा विचार होईल' ह्मणून वकिलापाशीं सांगून दिलेलखान याची त्याची भेट करविली. त्यास वस्त्रें जवाहीर आणिलें तें देऊन बोलणींही समजाविली. त्याची सल्ला घेऊन पंडितराव यांस वस्त्रें देऊन त्यांजबराबर महाराज यांस बहुमान वस्त्रें जवाहीर देऊन रवाना केलें.

त्यांनीं येऊन जयशिंगराजे यांचीं बोलणीं समजाविलीं. महाराजांनीं सर्व आपले मतलब लिहून काढिले ते, 'आह्मीं राज्य घेतलें हें दरोबस्त आमचें आह्मांकडे राहावें. वरकड दक्षिणप्रांतांतील चौथ सरदेशमुखी आह्मांकडे चालावी. किल्लेकोट घेतले ते व नवे केले ते आमचे आह्मांकडे असोत. आणि सख्य घडावें.' असें सांगून पुन्हां वकिलास रवाना केलें. त्यानें जाऊन यादी दाखविल्या, तेव्हां महाराज तह करितात असा सिद्धांत जयशिंग याचा झाला. भेटी व्हावी. नंतर परस्परें निघाले असतां 'टरोन बोलणीं करार करितां येतील' असा ठराव झाला असतां दिलेलखान याचा विचार 'लागलीच भेट घेऊन बोलणीं पक्केपणांत आणून या जातीचा तह ठरवूं नये; सर्व पादशाहास लिहून पाठवून आज्ञा येईल त्याप्रमाणें पुढें विचार करावा. मतलब करून आलों. हा दावा वाढवून कांहीं प्रांत किल्ले घेऊन नंतर करणें तें करावें. पादशाहाकडून उत्तर येईपर्यंत आह्मीं पुरंधर घेतों, तुह्मी सिंहगड घ्यावा' असा आग्रह त्याचा पडला. ते समयीं 'शिवाजीराजे तहांनीं येतात हें वाईट नाहीं. पादशाहाचे आज्ञेप्रमाणें त्यांचेंही बरें करून पादशांही मतलब मनांत आणून आपलेसे करावे. दौलताबाद तालुक्यांतील प्रांत किल्ले घेतले ते तहांनीं सोडवावे हें उत्तम,' असें जयसिंगानें सांगितलें असतां खानाचा आग्रह न सुटला. 'पादशाहास लिहून करणें तसें करूं' ह्मणून वकिलास निरोप दिला.

खान आपण कुच करून आले, ते पुरंधरानजीक येऊन त्यांनीं मोर्चेबंदी करून वेढा घातला. रुद्रमाळचे डोंगरावर दमदमे रचून तोफा चढवून मारगिरी केली. 'हल्ल्यांनीं किल्ला घ्यावा; हिसाब काय आहे? हल्ला करावा,' असा विचार केला. ते समयीं महाराजांनीं राजगडाहून केदारदरवाजाकडून रसद पोंचविली. लोकांची भरती केली. वरचेवर मदत केली. मोर्चे मारून उधळून दिले. त्याजवरून फारच अभिमानें आग्रहास खान प्रवर्तला. आपली कुलजमीयत एक करून आपण खासा नारायणाचे देवाल्यापाशीं उभा राहून लोक पायउतारा करून, किल्ल्यावर हल्ला चढविला. तोफांची मारगिरी करून पेंढार वगैरे पुढें घातलें. त्यांचे मागें गारदे; त्यांचे मागें पठाण लोक; तोफा त्यांमागें; असें करून आपणही चालून घेतलें. याजवर किल्ल्यावरून मुरार बाजी देशपांडे पहाडकर प्रभु, मावळे लोकांचे सरदार, होते त्यांनीं लोकनिवड

करून धारकरी घेऊन हल्ल्यावर चालून घेतलें. पेंढार कापून काढून पिटलें. मागें पठाण व गारद होती ते उभे राहिले. त्यांजवर सरसून आले. पठाण हजार दोन हजार गोळी व तरवार चालवून रणीं पाडिले. मावळे लोकही वहुत पडले. सारा हल्ला डोंगराखालीं पिटीत आणिला. तेव्हां खासा दिलेलखान चालून गेला. त्याजवर मुरार बाजी लोकसुद्धां येऊन मारित सुटले. तेव्हां खान आपले जागां दंग झाला. पुढें हल्ला चालेनासें बाजी यानें केलें. खान तोंडांत वोट घालून चकित झाले. 'शिपाईगिरीची शर्त केली. मावळे लोक हे शिवाजीचा सैतानखाना आहे' ह्मणून बोलले. 'कौल घ्यावा' असें सांगून पाठविलें असतां 'तुह्मी तुरुकडे. तुमचा हिसाव काय? तुमचा कौल कशास पाहिजे? मी शिवाजीचा चाकर आहें. मरून खस्त होऊन तुह्मांस नामोहोरम करीन,' असें बोलून बाजी प्रभु यांनीं पुढें चालून घेतलें; तेव्हां दिलेलखान याचे हाताचा तीर लागून आणखी जखमा वहुत चढून रणीं ठार पडले. लोकही त्याजवरावर वहुत पडले. वरकड सांवरून निघून किल्ल्यावर गेले तों महाराजांकडील आणखी नामी लोक भरतीस आले. नगारे, करणे वाजवूं लागले कीं, 'किल्ला हुशार आहे.' तेव्हां तोफा चालूं लागल्या खान खजिल होऊन 'शेवटास हल्ला जाणार नाहीं; हा हट्ट करणें, लोक मारणें, चांगलें नाहीं' ह्मणून गोटास आले.

अस्तमान झाला तेव्हां जयशिंग यानें सांगून पाठविलें जे, 'हें करितां हें चांगलें नाहीं. शिवाजीराजाचीं माणसें एकाहून एक अधिक आहेत किल्ला येणार नाहीं. एक किल्ल्यास इतकीं माणसें खराब झालीं तेव्हां किल्ले मोठे झाडींतील कोंकणवांधारी वगैरे कसे येतात? सह्याद्रीचे किल्ले विकट, झाडी रान, त्यांस तेथें कसें कराल? शिवाजीराजा राजकारणेंकरून येऊन भेटत होता तें सोडून विश्वासही गमाविला. राजकारण तोडिलें. पुढें विचार काय?' इतक्यांत सिंहगडावर सुलतान ढव ह्मणून कोणी सरदार फौज देऊन मोर्चे लावावयास पाठविला होता त्यास 'महाराजांनीं छापा पहांटेस पांच चार वेळा करून गर्दी करून उडविला. फौज लुटली गेली,' हेंही वर्तमान आलें. याजवरून खान सं होऊन जयशिंग यास बोलले जे, 'राजे यांस पुन्हां भेटीचें राजकारण विश्वास जेणेंकरून होय त्या रीतीनें करवावें; परंतु त्यांत पुरंधरास आह्मीं मोर्चे लावून हल्ला केला, किल्ला घेऊं अशी प्रतिज्ञा केली असतां ती

गोष्ट घडली नाहीं, याकरितां किल्ल्यावर [आमचें] निशाण त्यांनीं घेऊन चढवावें. पुन्हां किल्ला त्यांसच तहांत द्यावा असें करावें. एवढें मात्र करून घेऊन मागील बोलणें आहे त्याप्रमाणें चालवावें.' याजवरून जयशिंगराजे यांनीं 'प्रयत्न करून घडेल तितकें पाहूं' ह्मटलें. महाराज यांचें व जयशिंग यांचें चित्त मिळालेंच होतें. खानाचा दुराग्रह याजमुळें वकिलास पूर्वी निरोप दिला. आंतून एक विचार होता. पुन्हां वकील पाठवून 'झाली गोष्ट ती बरीच झाली; याउपरि पूर्वी बोलणें होतें तेंच कायम ठेवावें. किल्ल्यावर मात्र एकवेळ आमचें निशाण नेऊन किल्ला मग तुह्मींच ठेवावा. एवढें मात्र करावें' असें सांगितलें असतां उत्तर पाठविलें जे, 'निशाण घेऊन किल्ला दिला असें घडणार नाहीं. खानानें हजार लोकांनिशीं पाहिजे तसें किल्ल्यावर येऊन किल्ला पाहून जावें.' त्यावरून 'खान किल्ल्यावर जावे' असें ठरून किल्ल्यावर दोन हजार माणसें बहुत नामी लोक सामान वगैरे बहुतच तरतुदीनें उभे करून सदरेस बैठक करवून खानास वर घेतलें. सामान चांगलें पाहून 'दगाबाजी केली असतां चालावयाची नाहीं, दगा पावूं,' असें पाहून खालीं येऊन खान शर्मिंदे झाले. 'नेम शेवटास न गेला, किल्ला घेणें अवघड गोष्ट होय, कां कीं राजे यांनीं माणूस बहुत चांगले मर्द ठेविले असून लढाई करण्याची शर्त करितात,' असें ह्मणून गोटांत आले. भेटी व्हावी हा सिद्धांत झाला. परंतु 'रुद्रमाळ खानानें दमदमे रचून घेतली ती परत द्यावी, आणि पुरंधरापासून फौजा उठवून जावें; नंतर भेटी होतील,' असें सांगून पाठविलें. तेव्हां रुद्रमाळ परत दिली. फौज उठविली. नंतर पंडितराव यांस पुन्हा रवाना केलें. ते 'तुमचा विश्वास कसा पडतो? एकवेळ ठरावांत आलें असतां तुह्मींच तह बिघडला, आतां भेटी कशी घ्यावी ! ही खातरजमा व्हावी,' ह्मणून बोलले. तेव्हां शपथ खानासह निखालसता जयशिंग यांनीं करून देऊन करार ठरवून देऊन लिहिलें कीं, 'मतलबाप्रमाणें पादशाहास लिहून ठरवून आणूं' अशी खातरजमा केली. जयशिंगाचें ह्मणणें 'तुह्मीं आह्मीं रजपूत; तुह्मी राणे शिसोदे, आह्मी कछवे; शरीरसंबंधीच आहों. जसे रामशिंग तसे तुह्मी आह्मांस. दुसरा विचार नाहीं. तुमचें बरें तेंच सर्वप्रकारें करीन,' असें सांगून वकील पाठविले. त्यांनीं जाऊन सर्व कळविल्यावरून भेटीस आले. आपली फौज हषम लोक निवडक बराबर घेऊन उभयतां पेशवे व सु-

रनीस संभाजी महाराजापाशीं फौज पंचवीस तीस हजार असे कि-ल्ल्याचा बंदोबस्त करून ठेविले; बराबर सरदार, सरकारखानदार, फौज, पागा मिळून पंचवीस तीस हजार लोक घेतले. हषम दहाहजार घेतली व फौजेंतील मावळे लोक घेतले, त्यांचे पोषाख बादली व पैठणी होते. घोडयांस सामानें सोन्यारुप्याचीं घातलीं. मुत्सद्दी सरदार वगैरे यांनीं अंगांवर जवाहीर घातलें होतें. तसेंच हत्तीचीं सामानें भरजरी असून पायीं सोन्यारुप्याच्या सांखळ्या घातल्या होत्या. अंबाऱ्या, हौदे, शेप-न्नास सजविले होते. तसेच खिजमतगार हुजरे वस्त्रें अलंकारयुक्त, पा-यचे सरदार कडीं तोडे कंठ्या ईहींकरून युक्त, याप्रमाणें स्वारी सिद्ध करून आपण साधा पोशाख करून अंबारींत बसले. हातीं तरवार ती-रकमान घेतली. पाठीमागें मुत्सद्दी सरदार यांच्या अंबाऱ्या चालल्या. पुढें हत्ती कोतवाल चालत होते. संगें लोक मर्द होते. शिंगाडे यांचीं शिंगें रुप्याचीं होतीं. असे भेटीस आले. जयशिंग याचा इतबार पुरा होतांच वेखिलाफ उभयपक्षीं होताच. तेव्हां महाराज आले ही बातमी येतांच जयशिंग खानास बराबर घेऊन फौज स्वारी तयार करून सामोरे गेले. उभयतांकडील लोक सरदार यांच्या भेटी करविल्या. नंतर खासाही भेटले. परस्पर बहुत आदर झाले. महाराजांचे लोक व सामान पाहून ब-हुत चकित झाले. 'जो अर्धीच देणारा व त्याची संपत्ति अशी, तेव्हां लोक जीवांची परवा कशास ठेवतील ? किल्ले कोट घेणें, धाडसांचीं कर्मे करणें, हें असें सामान असतां अगाध काय ?' अशी चर्चा करून सर्वांचे पोषाख व आभरणें पाहूनही सरदार कोण व राजा कोणता हा संदेह त्यांस झाला. महाराजांनीं जवाहीर देखील विशेष अंगावर घा-तलें नव्हतें. भेटी झाल्यावर जयशिंग व महाराज एका अंबारींत बसून डेऱ्यास आले. तेथेंही एक आसनीं बसले. विडे, पान, अत्तर, गुलाब हो-ऊन गोटास जाण्यास निरोप झाला. दुसरे दिवशीं 'दिलेलखान याचे डेऱ्यास जावें, पादशाही इतबारी मोठे अमीर,' म्हणून जयशिंगानें सां-गितल्यावरून ठरलें. बराबर सुभानशिंग मामा दिले. त्यासह महाराज त्याचे डेऱ्यास जातां खान गोटाबाहेर सामोरे आले व घेऊन गेले. वस्त्रें बहुमान जवाहीर हत्ती घोडे राजांस दिले. मानकरी व मुत्सद्दी यांसीं वस्त्रें जवाहीर देऊन तहाचें बोलणें परस्परें चालतें झालें. सुभानशिंग यानें राजाचें बोलणें सांगितल्यावरून 'जयशिंगराजे सुभेदार वयें वडील, पा-

दशाहीचे ठायीं इतबारी आहेत. आह्मी त्यांचे ताबीनांत. ते करतील त्यांत आह्मीं आहोंत', असें खान सफाई करून महाराजांकडे बोलले. जयसिंग व दिलेलखान यांस मेजवान्या बहुत तरतुदीनें केल्या. हत्ती घोडे जवाहीर वस्त्रें दिलीं. मातबर अमीर यांसही वस्त्रें दिलीं, योग्यते-नुरूप दिलीं. नंतर खान व जयसिंग यांनींही महाराजांस मेजवान्या केल्या. सरकारकून, सरदार यांस वस्त्रें जवाहीर दिलीं. महाराजांस वस्त्रें जवाहीर हत्तीघोडे देऊन समारंभ केला.

जयसिंगाची ममता, मनःपूर्वक बोलणें, उत्तमप्रकारें महाराजांशीं झालें. 'राजा परमधार्मिक कुलीन होय; यास यश येऊन दिवसेंदिवस हा वृद्धिंगत पावो. दैववान्, पराक्रम याचा विचित्र, यास्तव जसें साहित्य होईल तसें करावें', असा विचार करून तसें करिते झाले.

तेसमयीं जंजीरेकर शिद्दी संबूल हबशी जयसिंग याजकडे आला होता. महाराजांनीं 'जंजिरा आह्मांकडे देववावा' असें ह्मटलें असतां पादशाही चाकर ते, 'औरंगजेबाची आज्ञा पाहिजे; तुमचे मतलब लिहून पाठवूं' असें उत्तर केलें.

नंतर राजे निरोप घेऊन राजगडास गेले. तहनामे लिहिले. त्यांत पूर्वकलम जंजिरे याचें लिहून येथें झालें वर्तमान लिहून 'राजे भेटले, दिल्लीस यावयाचें ठरलें. यादीवर रुकार होऊन सनदा याव्या. आह्मी उभयतां बहादरीस निभावणीस व्हावें ह्मणजे दिल्लीस येतों असें राजे यांशीं ठरलें. आपणही सफाई करून सर्फराज करावें' असे कित्येक प्र-कार जयसिंग यानें लिहिले, आणि कूच करून भीमातीरीं मुक्काम केला. नंतर पादशाहाचीं उत्तरें आलीं. 'उभयतांनीं बहादरी सांगून जंजिरे कलम बोलूं नये; वरकड किल्लेकोट पादशाही दौलतींतील सोडावे; त्यांतही दौलताबादेखालील प्रांत किल्ले सोडावे; चौथाई व सरदेशमुखी करार करावी; हुजूर भेटीस आल्यावर तेथून प्रांत किल्ले, सफाईची चाल पाहून, देणें ते देतां येतील;' अशीं यादीवर उत्तरें आल्यावर महाराजांस पत्रें पाठवून पुनः आणवून घेतलें. जयसिंगानें ठराव केला जे, 'विजापूर प्रांतांतील पादशाहींतील जे घेतले त्यांविषयीं बोलूं नये, व त्यांलगत कांहीं प्रांत दौलताबादेखालील हेही जुन्नर वगैरे तालुके राखावे; बाकी सत्तावीस किल्ले, त्र्यंबक नाशिक प्रांत, बागलाण, खानदेश सोडावे; असें ठरवून करार तहनामे करून उभयपक्षींचे वकील जाऊन तेथून तहनामे

करार होऊन यावे. नंतर जाण्याचा बेत करावा.' असें ठरवून आपले-कडील माणूस मातबर देऊन महाराजांकडील वकील सोनोपंत डबीर यांचे मेहुणे रघुनाथ बल्लाळ कोरडे वेरे शहाणे पारसनीस होते जाणून दिले.

ते दिल्लीस गेल्यावर जयशिंगराजे व दिलेलखान औरंगाबादेस जावयाचा विचार ठरवून जातां विजापूरप्रांतीं खंडणी घ्यावयाची तेव्हां महाराजांनीं बरोबर फौजेसुद्धां यावें' म्हणून बोलून कुच करून निघाले. जयशिंग व महाराज यांनीं एका अंबारींत बसावें. उभयतांची निखालसता पाहून आपली अंबारी मागें चालविणें दिलेलखानास असह्य वाटूं लागलें, तेव्हां पेडगांवीं आपले राहण्यास ठाणें बांधावयाचें म्हणून काम लावून तेथें राहिला. महाराज व जयशिंग पुढें गेले. खंडणी झाली.

महाराज 'दिल्लीचा जाब येतांच जाणें पडेल, किल्लेकोटांचा बंदोबस्त झाला पाहिजे,' म्हणून निरोप घेऊन निघाले. जयशिंग औरंगाबादेस गेला. राजे पन्हाळ्यावर येते झाले. तेव्हां महाराजांनीं विचार केला जे, 'आपण किल्ल्यांची खबरदारी केली होती तसें किल्लेकरी चालून खबरदार सावध आहेत नाहींत पहावें म्हणून, रात्रींच किल्ल्यावर गेले आणि हवलदारास हाक मारून 'महाराज आले, गनिमाची झड मागें आहे; दरवाजा उघडून किल्ल्यावर घेणें' असें सांगविल्यावरून तटावर सारे अधिकारी खबरदार लोक घेऊन येऊन उभे राहून 'रात्रीस दरवाजा उघडूं नये ही कैद महाराजांनीं करून दिली यास्तव उघडीत नाहीं; शत्रु आला असला तरी घेरियाचे लोक खालीं हुशार करून रोखून राखतों; दरवाजानजीक तटालगत असावें; शत्रु पुढें न येण्याचा बंदोबस्त वरून करून रोखून पुढें येऊं देत नाहीं' असा अर्ज केला. तेव्हां 'सर्फराजी होईल. आज्ञाही आमची व परवानगीही आमची; आह्मीच सांगतों दरवाजा उघडावा.' असें बोलल्यावर 'दरवाजा उघडीत नाहीं. रात्र थोडी आहे मागील गलबल पडूं देत नाहीं' असें उत्तर केलें. याजवर 'पारिपत्य केलें जाईल. तुह्मी चाकर इतबारी, हुकुमाप्रमाणें चालावें हें घडत नाहीं हें चांगलें नाहीं,' असें भय घालून पाहिलें. तथापि दरवाजा उघडीतना. प्रातःकाल झाला तेव्हां सर्व कारभारी हवालदार हात बांधून दरवाजाजवळ येऊन कुलुपें काढविलीं आणि महाराजांस आंत घेऊन 'आह्मी अन्यायी, पारिपत्य करणें असेल तें करावें' असें बोलल्यावर महाराज

बहुत संतोषी झाले. त्यांस नांवाजून त्यांनीं वाढविलें. 'आज्ञेप्रमाणें चालतां, इतबारी आहां,' असें बोलून निघून साताऱ्यावरून राजगडास महाराज चालले. श्रीरामदासस्वामीचें दर्शन घेऊन सर्व निवेदन करून 'दिल्लीस जाणें प्राप्त, कसें करावें?' विचारिलें. 'जावें, फत्ते पावाल. संकट दूर होईल; तूर्त जाणें प्राप्त आहे,' अशी आज्ञा झाली. आज्ञा घेऊन राजगडीं पावले. तेथें आल्यावर मुरार बाजी यानें पुरंधरीं लढाई बहुत शर्तीची मारली, शिपईगिरीची सीमा केली, शेवट जखमा लागून मुर्द्याचें मांस ढालेंत भरून नेलें. यावरून बहुत संतोषी होऊन त्याचे पुत्र बाजी मुरार यांस आणून नवाजिशी करून पालखी वस्त्रें बक्षीस देऊन त्याची सरदारी त्यांस सांगून दोन गांव उरवडें वगैरे ह्मणोन मुसेखोरें यांतील इनाम वंशपरंपरेनें करून दिलें. याप्रमाणें सर्फराज केलें.

यानंतर स्वारी रायगडास गेल्यावर दिल्लीहून पादशाहानें विचार केला जे, 'शिवाजी राजे यांस तह ठरावून आपणांपाशीं आणून असेंही करून निरोप न देतां गोंवून ठेवावें. सफाईनें चालल्यास इकडीलच मातबर कामें सांगावीं; किंवा शिवाजी दगाबाज हुन्नरी आहे; कोठेंही अंतर पाहून करितां येईल तसा विचार करावा. उगेंच मसलत लांबवून सरदार फौज पाठविणें, खासा स्वारी करणें, हें करण्यांनीं घडत नाहीं' ह्मणून सर्व तहनामा जयशिंग यानें लिहिल्याप्रमाणें चौथ सरदेशमुखी विजापूर प्रांतांतील तालुके व त्यालगतचे किल्ले कोट करार करून जंजिरे याचें कलम गाळून, 'हें बोलूं नये' असें करून 'सत्तावीस किल्ले व तो प्रांत सोडावा, पादशाही उमराव ह्मणवून एथें भेटून हुजुर रुजू होऊन सर्फराज होऊन जावें' असें ठरवून यादींवर स्वाद करून सनदी करून जयशिंग याजकडे रवाना केल्या. 'तुह्मी बहादर होऊन खातरजमा करून रवाना करावें' असें लिहिलें. वकील गेले. याचीं पत्रें रवाना करविलीं तीं जयशिंग याजपाशीं येऊन पावलीं. यावर त्यानें पंडितराव यांस बोलावून महाराजांकडे सर्व रवाना केले. ते घेऊन आले आणि दिल्लीस जाण्याचा विचार पक्केपणें ठरावांत आला. याजवरून कारभारी मातबर या सर्वांस विचार पडला जे, 'कर्म दुर्घट दिसतें. दिल्ली ह्मणजे दोन महिन्यांची वाट, स्वदेश नव्हे, तेथें जाणें; औरंगजेब केवळ दैत्य होय: हें संकट कसें निभावेल!' ऐसा विचारही कोणी कोणी महाराजांस सांगूं लागले. महाराजांनीं उत्तर केलें कीं, 'एक वेळ दिल्लीस जाणेंच प्राप्त. श्रीनेंही

'जाणें घडेल. परतोन निभावून आणीन,' अशी आज्ञा केली आहे. तो प्रांत, दिल्लीचें स्थान, व पूर्वी आपले वडिलांनीं उत्तरप्रांतीं राज्यें केलीं ती जागा अवलोकन तरी करावी आणि त्या प्रांतीं भागीरथी, यमुना हीं तीर्थें करावीं. बहादरही वळकट आहेत. पादशाही तहनामे करार होऊन आले यांत आपणांस चवथाई सरदेशमुखी हे राज्यविभाग ऐसे कायम झाले. पुढें श्रीहरि करणार तसें घडेल; कसाही प्रसंग पडलिया कळेल तसे निभावून येऊं' असा सिद्धांत करून सर्वांस सांगितलें आणि जावें हा विचार सबल पक्ष ठरविला.

देशीं जिजाबाईसाहेब व राजारामसाहेब यांस ठेविलें. मोरो पंडित पेशवे, अण्णाजी दत्तो सुरनीस, निळो सोनदेव मजमदार हे तीन सर्वाध्यक्ष नेमून यांचे स्वाधीन राज्य करून रायगड प्रांतांत ठेविले. आपण बरोबर संभाजीराजे घेतले. कारभारी निराजी रावजी न्यायाधीश, बाळाजी आवजी चिटणीस, त्र्यंबक सोनदेव डबीर, जिवनराव माणको, नरहर बल्लाळ सबनीस, दत्ताजी गंगाजी, राघो मित्र, प्रतापराव गुजर सरनोबत, दावजी गाढवे, हिरोजी फर्जंद, वगैरे कित्येक मातबर सरदार विश्वासुक घेतले. पांच चार हजार पागा निवड करून घेतली व फौज पांच हजार व हषम पांच हजार त्यांत हषम सरदार लोक मालुसरे देशपांडे घेतले. सर्व राज्याचा बंदोबस्त 'पूर्वीं धारे करून दिले त्याप्रमाणें चालावें,' असें करून देऊन सर्व फौज पागा हषम लोक राज्यरक्षणास ठेविले. 'तिकडे कसाही प्रसंग पडला असतां तुह्मीं जहामर्दीनें राजाराम साहेबांस घेऊन राज्य रक्षावें' असें पेशवे, मुजमदार, सुरनीस यांस सांगून आपण औरंगाबादेस आले. जयशिंग याची भेट झाली. बोलणीं होऊन त्यांनीं बहादर होऊन 'उभयतांनीं या प्रांतींच राहावें' असें ठरून रामशिंग जयशिंगाचे पुत्र चार हजार फौजेनिशीं बरोबर दिले. ते व महाराज निघून दरमजल नर्मदा चंबळ उतरोन मथुरेस पावले.

रामशिंग यानें राजास घेऊन आल्याचें वृत्त पादशाहास लिहून पाठविलें. त्यानें मुक्कामाचे मुक्कामास सर्व बंदोबस्त आदरें निखालसतेनें करविला. शिवाजीराजे कसेही येऊन भेटावे हेंच मानस होतें.

राजे मथुरेस गेले ते कांहीं दिवस गोकुळवृंदावन करून निघतेसमयीं मथुरेचा चोबा ब्राह्मण एकटा पुढें आला. हत्तीवर बसावें तों अवलोकन केला. त्यास महाराज बोलले, 'बेवकूब ब्राह्मण समय न पाहतां आला.'

उत्संगळ शब्द ब्राह्मणास महाराजांचे मुखांतून निघाला तो ब्राह्मणानें ऐकून प्रतिशब्द तसाच देऊन 'मीं नव्हे; राजा, तूंच तसा' ह्मटलें. तेव्हां त्यास पुढें बोलावून हातीं धरून 'आह्मीं तुह्मांस बोललों त्याची क्षमा करावी' असें गौरवून विचारलें जे 'तुह्मीं आह्मांस असें कां बोलला?' त्यानें उत्तर केलें, 'आह्मी प्रमाण बोललों आणि तुह्मीं बोललांत तें योग्यच. असे समयीं आह्मीं पुढें येऊं नये; परंतु अकस्मात् आलों. आह्मीं बोललों कसे? तरी दिल्लीश्वर केवळ रावणच असा क्रूर होय. त्याचे भेटीस तुह्मीं मोठा प्रताप करून त्याचें राज्य घेऊन थोडके फौजेनिशीं जातां आणि पुत्रही समागमें नेतां हा कोण विचार केला? चांगलें नाहीं.' असें ऐकून त्याचे बोलण्यास बहुतच चांगलें मानून त्याचा सन्मान वस्त्रें द्रव्य देऊन केला, आणि तेथील उपाध्येपण त्यास दिलें. दरसाल पांचशें रुपये वार्षिक करून दिलें. त्याचा गांव त्या प्रांतींच दिला. रामशिंग यास सांगून चालावा असें केलें. तो अद्यापि चालत आहे. नंतर त्यासही समागमें घेऊन दरमजल दिल्लीस गेले. जाऊन पावल्यावर रामशिंग यानें 'पादशाहास राजे भेटूं आले' ह्मणून अर्ज केला. त्याजवरून 'दिवस मुहूर्त चांगला पाहून भेटीस आणावे' हें सांगितलें. त्याप्रमाणें उत्तम दिवस पाहून भेटीस नेले.

ते दिवशीं पादशाहानें बहुतच तरतुदीनें अदालत मजालस करून सर्व वजीर मातबर जमा करून नेले. भेटीस जाण्यापूर्वीं नजर करणें खुरनिषात आदाब बजावणें वगैरे पादशाही कायदे सर्व रामशिंग यानें महाराजास सांगून ठेविले. ज्या प्रसंगीं 'तुह्मी एथें आलां तेव्हां येथील रंग राखून आपले मतलब सिद्ध करून देशीं जावें हें उत्तम' असें बहुत रीतीनें सांगून ठेविलें होतें. 'बरें' ह्मणून राजे बोलले. भेटीस गेल्यावर यवनास भुईस हात लावून सलाम करणें ही ईर्षा मनांत आणून त्यानें सांगितला मार्ग टाकून खुरनीस केली नाहीं. हें रामशिंगानें पाहून नजर घेऊन आपण पुढें होऊन केली. उजवे बाजूस अमीर होते त्यांत उभे राहण्यास हातानें पादशाहानें दाखविल्यावरून खान व वजीर राजे मारवाडकर जसवंतशिंग उभे होते यांचे वरते जाऊन उभे न राहतां बसले. हें पाहून रामशिंग आपण पुढें होऊन उभे राहिले; तेव्हां पादशाहानें खुणेनें विचारिलें असतां 'दक्षणी राजे, अदालत कधीं पाहली नाहीं,' असें रामशिंग बोलले. पादशाहानें मनांत आणिलें जे,

'पुरुष हा खंबीर होय.' तोंडास रुमाल लावून किंचित् हास्य करून आश्चर्य केलें. सन्मानरीतीनें 'कधीं आलां ? काय खबर ?' हे प्रश्न केले. त्यांनींही उत्तरें समर्पक केलीं. व सनदा दाखवितां सन्मानेंकरून बोलून डेऱ्यास जाण्यास निरोपाचे विडे देऊन निरोप दिला. खर्चास व मेजवानी पाठविली; व फौजेसुद्धां अजमास करून दरमहा वांधून दिला. रामशिंग वराबर डेऱ्यास घेऊन आले. 'एथें आलां तेव्हां विचारें चालावें. केली गोष्ट ती पूर्वीं आपण सांगितलें असतां कशी केलीत ?' असें बहुत प्रकारें ममतेच्या अर्थें सांगून निघून गेले. त्याजवर महाराज कांहीं दिवस पादशाहानें हवेलींत राहावें, फौजही आसपास जवळ उतरावी, असें योजून दिलेले हवेलींत सलतनतेनिशीं जाऊन राहिले.

याउपरी रामशिंग मध्यस्थ याजपाशीं 'करार यादीबुदी झाल्या, देशींहून आलों, इकडील हवा मानत नाहीं, यास्तव कराराप्रमाणें देऊन तिकडील काय सांगणें तें सांगून निरोप देववावा' हें बोलणें लाविलें. 'बरें आहे' असें पादशाहा बोलले आणि 'राजे यांनीं आह्मांपाशीं असावें; मोठीं मोठीं कार्यें करावीं; सर्फराजी अधिक करून घ्यावी; जाण्याची तांतड कां करितात ? त्यांचे मतलब करार तर होऊन गेलेच आहेत' असें उत्तर झालें. नंतर राजे यांनीं वरकड वजीर मातबर यांच्या भेटी घेण्याविषयीं विचारिलें तेव्हां परवानगी झाली. ज्याचे घरीं जाणें योग्य त्याचे भेटीस जाणें येणें केल्यावर रामशिंग याजपासून बोलविलें जे, 'राजे यांचें ह्मणणें प्रथम आलों, कराराप्रमाणें मतलब कागदपत्रें होऊन निरोप घ्यावा. पुन्हां जे समयीं प्रसंग उपयोग पडेल ते समयीं पत्रें येतील तेव्हां पाहिजे तसें सामान घेऊन येऊन काम भारीही असल्यास बजावूं' असें बोलणें लाविलें. पादशाहांनीं ऐकोन घेतलें आणि मनांत आणिलें 'प्रथम भेटींत यांनीं खुरनीस आदाब न केली व पुढेंही येथें राहून स्वस्थतेनें नौकर ह्मणवून चाकरी करावी, हुकमांत चालावें, असें होईल हें दिसत नाहीं. वरकड बहुत योग्य मर्द व शिपाई मनसबदार धाडसाचे सर्वगुणसंपन्न दैववान् पुरुष आहेत. आपले हातीं लागून हुकमांत चालून निखालसता झाल्यास वजीरी देऊन सर्व राज्यभार यांजवर ठेवावा अशी योग्यता यांची आहे. निरोप दिला असतां जाऊन फंद करण्यास चुकावयाचे नाहींत, कसेंही एथें ममतेंत गोंवून ज्या रीतीनें येतील तसे आणावे. करार व तह ठरला. बहादरही मोठे दिले, त्या

अर्थीं वावगी गोष्ट करणें युक्त नाहीं. ममतेनें व बोलण्यानें हातास लागले तर घ्यावेत, नाहींतर दाव ठेवून हातीं घ्यावेत. निरोप देणें ठीक नाहीं.' असें दृढ निश्चयांत आणून रामशिंग याजपासून सांगविलें जे, 'राजे आले, मोठे कर्ते शिपाई मनसबदार चतुर सतेज सर्वगुणें संपन्न आहेत. त्यांनीं चाकर ह्मणवून तिकडील जहागीर आहे ती राखून इकडेही करोडों रुपयांचा तालुका स्वाधीन करितां येईल; लाख पन्नास हजार फौज बाळगून आह्मांजवळ या प्रांतीं राहून कामें करावीं, तिकडेही पुत्र ठेवून चालवावें; तिकडे पादशाहती वंडें वाढलीं तीं मोडावीं; तो तालुका वांईकडील घेऊन त्याचा फौजेचा बेहडा करून घ्यावा; चाकर ह्मणवून सर्फराजी करून घ्यावी; यांत सफाई दिसल्यावर वजीरीही यांस सांगावी; सर्व इतबार ठेवावा असें आमचे चित्तीं आहे व या कामास राजे लायकही आहेत; यास्तव तुह्मीं कशाही उपायें राजे यांस मतलबावर आणावें.'

याजवरून रामशिंग यानें सर्व वृत्त सांगितलें असतां, 'या प्रांतीं राहाणें घडायाचें नाहीं. करारांत आलें तें करून देऊन त्या प्रांतीं सुभे आहेत त्यांसहवर्त्तमान तिकडीलच काम सांगावें. तें बजावून देऊं.' असें बोलणें पडलें. याजवरून शिवाजीचा खंबीरपणा ढळत नाहीं; हातीं लागत नाहीं; कसें करावें हा विचार करिते झाले. ऐकत नाहीं त्या अर्थीं दावूनही पाहिलें पाहिजे,' ह्मणून एके दिवशीं जाफरखान अमीर पादशाहाचें केवळ इतबारी खिलोणें जवळ होते त्याजपाशीं खुलासा निघाला जे, 'राजे खुरनीस करीत नाहींत व हुजूर चाकरी करूनही राहात नाहींत; बहुत खंदेपणा जात नाहीं, त्या अर्थी जरब देणें प्राप्त' असें रोषयुक्त बोलणें पडलें. तेसमयीं जाफरखान, शास्ताखानाचे आप्त, यांजमुळें पादशाहाची मर्जी पाहून अधिकच चढी देऊन बोलले. ही बातमी राजे यांस कळली तेव्हां जाफरखानाचे हवेलीस जाऊन त्यास कित्येक ममतेचे अर्थ-'तुह्मी पादशाहापाशीं बहुत लगत असून मेहरबानींत आहां तेव्हां आमचें साहित्य करीत असावें' असें सांगितलें. त्यानें मनावरतें 'बरें' ह्मणून (महाराजांचा संशय काय करतील यास्तव) स्नेहेंकरून विडे देऊन वस्त्रेंही दिलीं. निरोप घेऊन गेल्यावर पुन्हां रामशिंग यास पादशाहाशीं बोलण्याविषयीं महाराजांनीं सांगून बोलविलें जे, 'दक्षिणची मसलत सर्व आपणांस सांगावी. येथून मर्जी असल्यास फौज सामान घेऊन जाऊं. किंवा तिकडे जयशिंग यास हुकुम करावा.

ते व आपण मिळोन सर्व दक्षिण काबीज करून देतों,' असें बोलविलें असतां पादशाहाचे मनांत प्रशस्त न पडे. अधिकच संशय वाढूं लागला. करार शपथ दिली व बहादर दिले ही अडचण; तेव्हां केवळ बेइमानी दाखवणें चांगलें नाहीं; परंतु जरब देऊन आपले मनांत तसे पह्यावर आणावें ह्मणून पोलादखान यास हुकूम केला जे, 'राजे यांचे मुकावल्यानीं आपली फौज तुह्मी घेऊन पंचवीस हजार लोकांसुद्धां उतरोन चौकी द्यावी. हुकुमाशिवाय बाहेर जाणें येणें न घडे असें करावें,' ह्मणून चौक्या पाठविल्या. ते भोंवते दुरून येऊन उतरले. हें राजे यांस समजल्यावर रामशिंग यास सांगून पाठविलें, 'तुह्मी बहादर असून ही गोष्ट काय आहे ? अर्ज करावा. पादशाहाची मर्जी आह्मीं एथेंच असावें अशी दिसते. आह्मांस मान्य आहे,' असें बोलविलें. तेव्हां त्यानें अर्ज केला तसमयीं राजे यांचें अंतःकरण शुद्ध होऊन 'हुजुराची चाकरी मोठे इतबारीची करावी, तें ऐकत नाहींत यास्तव हें करणें प्राप्त पडलें. वरकड तुह्मी आपल्या बोलण्यावर आणावें. या पह्यास येत तों हेंच करावयाचें. वरकड जयशिंगराजे व दिलेलखान बहादर असून सरकारी करारनामे गुंतले आहेत. राजे यांस वांकडें करणें पारिपत्य करण्यास काय गुंता होता ? परंतु ती गोष्ट करावयाची नाहीं. तुह्मीही सुभेदार यांस लिहून राजे निखालसपणें होऊन सरकारी आज्ञेंत चालत असें करावें' असें सांगितलें. तें रामशिंगानें राजे यांस येऊन कळविलें.

ते समयीं राजे यांनीं [राम]शिंग यास सांगितलें जे, 'पादशाहाची मर्जी अशी आहे त्या अर्थीं आह्मीं येथेंच राहातों. जेव्हां निखालसता पडत जाईल तेव्हां तसेंच कामकाजही करितां येईल. परंतु चिरंजीव व फौजेस इकडील हवा मानवत नाहीं; यास्तव निरोप देववावा. कार्याकारण माणसें ठेवून घेणें तीं घेतों,' असें विचारण्यास सांगितलें. यावरून त्यानें विचारिलें. पादशाहानें 'लोक फौज जाऊं देणें हें सहजांत काम होतें, हाल खूप होतात, त्या अर्थीं निरोप द्यावा' सांगितलें. 'पुत्रास लावून देणें, तिकडे जाऊन फंद न करीतसे जिमेदार देऊन रवाना केले पाहिजे,' असें सांगितलें. तें [राम]शिंग यानें कळविलें. 'जिमेदार कशास पाहिजेत? व आह्मांस या प्रांतीं कोण जिमेदार होणार ? पादशाहाची मर्जी असल्यास उभयतांही राहूं,' ह्मणून शागीर्दपेशा कांहीं पागा हषमपैकीं कांहीं सरदार ठेवून कारभारी मंडळी ठेविली. 'वरकड कारकून पागा फौज

सव प्रतापराव गुजर सरनोवत, दत्तो मगाजी, त्र्यंबकराव वांकनीस यांजवरावर जावें, चांगलीं घोडीं हत्ती वगैरे जावें' ह्मणून सांगितलें. त्यांनीं उत्तर केलें कीं, 'साहेबासाठीं प्राण गेले तरी जावोत, परंतु टाकून जाणार नाहीं.' असा सरनोवत सरदार लोकांचा निश्चय जाणून सर्वांचें समाधान करून प्रतापराव यास सांगितलें, 'हा प्रसंग असेच रीतीनें मोठे हुन्नरीनें यांतून वचावून जाण्याचा असें समजून तुह्मांस निरोप दिला. याकरितां जावें'. असें सांगून देशीं सर्वांस लावून दिलें. 'प्रधान वगैरे यांस सांगावें-ते व तुह्मीं वहुत खवरदारीनें राहावें. आह्मी येथें आहों याची चिंता करूं नये, व जिजावाई साहेव यांसही समाधान करून सांगावें' असें सांगून पाठविलें. त्याजवर चित्तांत विचार केला जे, 'या संकटांतून पार कसें पडावें? पादशाहाचें ह्मणणें तसें इमान देऊन आपण अवलंविला मार्ग, यवनाचें अन्न न घेणें, धर्मस्थापना करणें तें सारें सोडून त्याचे ह्मणवून वजीरी व दौलत मेळवून राहावें किंवा मोठे धाडसें हुन्नरें यांतून वचावून जाण्याचा समय आहे तसें करून आपले संकल्प सिद्धीस न्यावे' हा विचार पडला. 'प्राणही गेले असतां हा संकल्प सोडावयाचा नाहीं. यास्तव श्रीवर भार ठेवून पार पडावें', हा निश्चय करून 'आठा दिवशीं आपले गुरुवारचा उत्साह करितों' असें करून 'सर्वांस मिठाईच्या डाल्या भरून पाठवाव्या' असा वहाणा निर्माण करून पाठवूं लागले. 'मिठाईच्या डाल्या कशाच्या जातात?' असा चौकीस संदेह झाला, त्याजवरून चौकशी केली. एक दोन वेळ पाहिलें असतां मिठाई जाते; डाल्या वंग्या भरून जातात हें कळोन चौकशी पाहारेकऱ्यांनीं सोडली. आणि महाराजांची दिनचर्या व वारीक वातमी, काय उमेद, पळयावर येतात न येतात ह्याची पादशाहानें ठेविली होती. तेव्हां पादशाहास राजे राहण्याचा निश्चय करून निखालसता होऊन इकडील चाकरी चाकर ह्मणवून करावी, मनसव दौलत मेळवावी, वहुतच निष्ठेनें चालावें असे खंविरांत आले असें दिसोन वातमी जाणेजोगें वोलणें करणें, निःसीम डौल महाराज दाखवूं लागले.

जयशिंग व रामशिंग यांनीं शपथ करून वहादर होऊन राजे यांस आणिलें असतां पादशाहानें वेइमानी केली याजवरून त्यांनीं महाराजांशीं अंतरंगापासून दुसरा विचार ठेविला नाहीं. सर्व वातमी राखणें, वाहेरून राखण राखणें, खर्चास पावतें करणें, पादशाहाशीं वोलणें वगैरे सर्व ते

करिते झाले. त्यानंतर महाराज यांनीं चौकीचे लोक यांशींही बहुत सफाई ठेवून आदर करून बोलणें, मेजवानी करणें, वस्त्रें द्रव्य देणें, जवळ बोलावणें, इत्यादिकेंकरून विडे पान ताजीमतवाजा करून आपलेसे करून त्यांत बोलणें तें पादशाहास उत्कंठतेनेंच सफाई दिसेल असें कृपा कधीं करतील असें दाखवावें. बातम्या वरचेवर शाहासही कळत गेल्या. ऐसी तयारी दृढ झाल्यावर आपले कारभारी लोक इतबारीसुद्धां निघण्याचा बेत सिद्ध केला. ज्यामार्गें जाणें व तीर्थयात्रा होऊन मोठीं शहरें क्षेत्रें करणें तेथें तेथें हुंडया करून सावकारींत द्रव्य श्रीकाशीसुद्धां जागां जागां रवाना केलें. फौज पागा लोक अधीं रवाना केले होतेच. दिल्लींत राहिले लोक यांत कोणांस दुखणें, कोणी चाकरी टाकिली, कोणी उठोन गेले, असें करून संकेत करून त्यांतही देशीं जाणार व पाठवण्याचे ते पाठविले. केवळच निभावयाजोगे घ्यावयाचे त्यांस संकेत सांगून 'अमके स्थलीं राहावें' असें सांगून ठेविलें. कांहीं रामशिंग याचे आश्रयें घालविले. 'देशीचे लोक राहात नाहींत, उठोन जातात' असें दाखवून युक्तीनें हलकें केलें. नंतर शहरचे लोक शागिर्दपेशास ठेविले. त्यांनीं दुरून असून चाकरी करावीसें केलें. आपले शरीरास आराम नाहीं हा बहाना करून निजले. प्रहर सहा घटिका दिवस येई तों निजावें. बहुतकरून आंत गैरावत्यांत राहावेंसें केलें. रावता गैरावता असें आठ पंधरा दिवस दाखवून कामाकाजासाठीं कारकून कारभारी हुजरे लोक जाणें येणें तसे बेतानें सारे बाहेर काढिले. श्रीमारुतीनें लंकेंत जाऊन जशी ख्याति केली, सीताशुद्धि घेऊन गेले, तसें आपण युक्तिकरून जहांबाजीनें हुन्नर करून पादशाहास दगा देऊन जावें ह्मणून श्रीदेवीस प्रार्थना केली. देवीनेंही आश्वासन दिलें. 'निघणें, निभावून नेईन', असा स्वप्नगत दृष्टांत होऊन श्रीनें सांगितलें. यावरून सर्वांस आधीं काढून दिलें. त्यांनीं आमके पुऱ्यांत जाऊन गुप्त असावें ती जागा वगैरे आधींच निश्चयांत आणिलें. तेथें सर्व पोंचले अशी बातमी आणून आपण खासा व संभाजीराजे पेटाऱ्यांत बसून गुजरीचे वेळेस मिठाईच्या बंग्या जातात ह्मणून निघाले. पलंगावर खासा पोषाख तसाच ठेवून हिरोजी फर्जंद यास बेत सांगितला कीं, 'तूं पलंगावर रजईची वळकटी करून निजले आहेतसे दाखवून बुक्या मारीत बसावें. मध्यरात्रीनंतर निघोन आमके स्थलीं येऊन पोंचावें' त्याप्रमाणें करून तो 'महाराजांनीं

जावें, मागें आपणास जसें पडेल तसें पडो, आपलेच कृपें निघोन जाईन' असें ह्मणून राहिला. प्रातःकाल झाला, चार घटिका दिवस आला. 'महाराजांस निद्रा लागली आहे, गुल करूं नका' अशी ताकीद करून आपणही निघोन 'कामास जातों' ह्मणून ठिकाणास गेला. महाराज व सर्व निघाले ते शहरचे पश्चिमेस पुरा बाहेर होता तेथें बेताप्रमाणें सर्व एक होऊन आठ चार दिवस वेश पालटून जागां जागां फुटून कोणी बैरागी, कोणी गोसावी, असे होऊन ब्राह्मण वाणी शूद्र वैश्य असे वेश धरून राहिले.

इकडे प्रहर दिवस आला. हालचाल नाहीं असें पाहून शहरचा शागिर्दपेशा नांव ठेविला तो व चौकीचे लोक पाहतात तों कारभारी आदिकरून कोणी नाहींसें पाहून त्यांनीं गुल केली. चौकशी करितां 'निघोन गेले; नाहींत' असें समजून पोलादखान यांस समजाविलें. त्यानें पादशाहास जाऊन अर्ज केला कीं, 'राजे निघोन दग्यानें गेले.' हें पादशाहास कळल्यावर त्यांची पोलादखान याजवर इतराजी होऊन त्याची मनसब जप्त करून त्यांनीं चौकी बसविली व राजे निघाले ते रामशिंग याचे सल्लेनीं निघाले असतील हा संशय धरिला. तों रामशिंग यानेंही अर्ज केला जे, 'शिवाजी राजे निघोन गेले. आपण शपथ देऊन आणिले असतां हजरतीनें चौकी पाठविली. दस्त केलें. मर्जी सरकारची', असें रामशिंग बोलले. तेव्हां 'काय चिंता आहे? राजे जातील तेथें त्यांचें पारिपत्य करीन. तुह्मी मध्यें ह्मणून इतकी सबुरी केली' असें ह्मणून शहरांत पादशाहानेंही चौकशी करविली. तमाम तालुकदारांस पत्रें पाठविलीं. 'जेथें राजे सांपडतील तेथें दस्त करावे' व मार्गांनींही लोक रवाना केले. परंतु शोध न लागे. एथें हरिपाई करून निघून गेले हें मनांत शहा अपूर्व मानिते झाले.

महाराज आठ चार दिवस नानाप्रकारचे वेशें राहून तेथून पुढें मथुरेस रवाना झाले. आपण, दहावीस असामी कारभारी, हुजरे, सरदार, इतके एकजिवाचे बैरागी होऊन मथुरेस जाऊन पावले. तेथून देशीं जाणें ठीक नाहीं. चौकशी बहुत चालली आहे. निभाव पडणार नाहीं. तेव्हां आपण यात्रा काशी वगैरे करण्याचा विचार केला. संभाजी राजे लहान त्यांचा पायीं निभाव पडणार नाहीं ह्मणून मथुरेंत काशीपंत व कृष्णाजीपंत पेशवे यांचे आप्त विश्वासू रोजगारी तेथें होते त्यांचे जवळ

उपाध्ये याचे विचारें ठेवून 'आह्मी अमके मार्गे जाणार' तें न समजूं देतां 'आह्मी अमूक स्थळीं आल्यावर सांगून पाठवून त्यांस घेऊन जाऊं' असें सांगून ब्राह्मणाचा वेश संभाजीराजे यांस देऊन गुप्तरूपें ठेविलें. समागमें विसाजीपंत व चोवे उपाध्ये यांस घेतलें. आपण सर्व मंडळीसह वैरागीवेश धारण केले होते, तसेच वैराग्यांचे मेळ्यांत मिळून तेथून कुरुक्षेत्रास गेले. तेथून उत्तरमानस हरिद्वार करून गंडकी, अयोध्या दर्शन करून श्रीकाशी व प्रयाग यात्रा करून गयेस आले. तेथें गयावर्जन केलें. निघतां श्रीविष्णुपदावर मोहरा घालून पद भरून गुप्तरूपें निघाले. त्रिस्थलीयात्रा, कार्तिकस्नान, माघस्नानें सांग करून बराबरचे सर्व यांजपासून यात्रा वगैरे करवून देवगड चांदें येथें येऊन श्रीगंगातीरींचीं क्षेत्रें करीत करीत मानस करून दक्षिणमानसीं सुरक्षित वीस बावीस महिन्यांनीं पावले. महाराज पुण्यश्लोक त्याप्रमाणें पुण्यक्षेत्रें यात्रा देवदर्शनें घेऊन निभावून आले. गंगातीरीं मथनकालेश्वरादि करून कुशतर्पणास आले. तीर्थविधि केला. तेथून पुढें एके गांवीं येऊन राहिले. त्या गांवीं एक गरीब कुळवाडी होता त्याचे गोठ्यांत राहिले. त्याची आई वृद्ध होती ती स्वाभाविकपणें 'तुह्मी वैरागी आलां, तुह्मांस अन्न द्यावें; परंतु गांवीं देशींची फौज येऊन गांव लुटून नेला. काय करावें?' असें बोलल्यावर त्यांनीं विचारिलें, 'देशींची फौज कोणकोणाची आली?' ह्मणून विचारिल्यावर 'शिवाजीराजा याचा तेलंगराव सरदार फौजा घेऊन आला; गांव लुटला; शिवाजीराजा दिल्लीस गेला, त्याचें पादशाहानें पारपत्य अद्याप कां न केलें? आह्मां गरीबांस बहुत उपद्रव होतो', असें बोलल्यावर महाराज मनीं फार समाधान पावले. 'आपण विदेशीं गेलों असतां प्रसंगेंकरून मोठ्या संकटांत पडलों. देवानें निभावून हे दिवस दाखविले. प्रमाण. परंतु आह्मी नसतां आह्मांप्रमाणें राज्य रक्षून सर्वांवर दाब आहे. अमल उगवितात तेव्हां बहुत बरें' मानून तिजला आश्वासन दिलें कीं, 'तुझें बरें होईल. तुझें नांव काय? वतन?' वगैरे विचारून घेतलें. तेथून भागानगरचे तालुक्यांतून महाराज जवळ देशीं येऊन पनाळा प्रांतीं आल्यावर सांगून पाठविल्यावर आपण तसेच वेषेंकरून राजगडास येऊन पावले. मातुश्रीचें दर्शन घेतलें. शके १५८८ पराभव नाम संवत्सरे मार्गशीर्ष वद्य १० स आले. ते समयीं बहुत आनंद होऊन कुरवंड्या व दानधर्म साखर वांटणें वगैरे मातुश्रीनें करवून सर्वांसह मंगळस्नानें

करविलीं. तोफांची सरवत्ती केली. वस्त्रें भूषणें सर्वांसह परिधान केलीं.

हें वर्तमान सर्व राज्यांत 'महाराज येऊन पावले' असें कळतांच तमाम सरकारकून व सरदार व कारखानदार व दैशिक, ग्रामिक, लोक, सावकार सर्व दर्शनास येते झाले. सर्वांनीं नजरा व पोशाक व आपलाले तालुक्यांतील उत्तम पदार्थ जिन्नस उपायनें नजरा घेऊन येऊन भेटले. मोठा उत्साह समारंभ होता झाला. किल्ल्यास तोफा करविल्या. लोक आले त्यांचें गौरव करून योग्यतेनुरूप भाषण सत्कार महाराजांनीं केला. मोठ्या संकटांतून महाराज देशीं आले. उत्साह करून दान धर्म बहुत केला. बराबर गेले होते त्यांस श्रम साहस ज्यांणीं जसे केले त्यांस त्याप्रमाणें गौरवून नावाजीस करून तैनाता जास्ती करून पोषाख जवाहीर देणें पालख्या हत्ती घोडे वगैरे देणें तसें दिलें. महाल, गांवही दिले. निराजी रावजी न्यायाधीश व त्र्यंबक सोनदेव डबीर व बाळाजी आवजी चिटणीस यांस तिघांची तारीफ करून, 'तुह्मीं सेवा बहुत केली, मोठें कारस्तान उपयोगी पडलें' ह्मणून, बहुत कृपा करून अंतरंगांत ठेविलें. शिवाय आणखी कारकून सरदार हुजरे वीस पंचवीस असामी यांनीं दिल्लीस यात्रेबरोबर सेवा केली त्यांस बहुत सर्फराज केलें व वाढविलें. हिरोजी फर्जंद यांस पालखी व बक्षीस देऊन वाढविलें. पागा सरदारी दिली आणि त्रिंबक वगैरे किल्ले तहामध्यें सोडिवले होते, पेशवे यांस, ते किल्ले व प्रांत घ्यावा ह्मणून रवाना केलें. त्यांणीं फौजपागासुद्धां जाऊन चहूं महिन्यांत सोडवून फत्ते करून प्रांतासुद्धां अंमल बसविला. चाकण वगैरे ठाणीं घेतलीं. संभाजी व कावजी तिकडे मिळाले होते त्यांस, चाकण प्रांतीं लोक गेले त्यांणीं पागासुद्धां लुटून मारिलें.

तिकडे दिल्लीस शोध बहुत रीतीनें करितां न लागला. शिवाजी राजे गेले हा अपराध रामशिंग याजवर येऊन जयसिंग याचा सुभा तगीर केला, आणि दिल्लीस हुजूर बोलाऊन घेतलें. दिलेलखान यास सुभेदारीचें काम सांगितलें.

गंगातीरीं येतां महाराज ज्याचे घरीं राहिले होते त्याचे आईस आश्वासन दिलें होतें, त्यास, देशीं आल्यावर महाराजांनीं कुटुंबासह बोलावून, आणून द्रव्य वस्त्रें दिलीं. 'लूट काय गेली?' ती विचारोन द्रव्य आणखी दिलें आणि सेवेशीं ठेविलें. मथुरेस पत्र पाठविलें जे, 'देशीं

सुखरूप पावलों. याउपरि सावधपणें संभाजीराजे यांस घेऊन येणें,' असें काशीपंतास लिहिलें. त्यांणीं संभाजीराजे यांस घेऊन येतां वाटेनें त्यांचें स्वरूप सुंदर सतेज तेव्हां हा कोणी मातवर आहे अशी चौकशी पडली. तेसमयीं 'आह्मी ब्राह्मण, हा आमचा मुलगा,' असें सांगून एकजागां बसून काशीपंतांनीं फराळ केला. असे प्रकारें संकटेंकरून निभावून आल्यावर महाराज फार संतोषी होऊन 'विश्वासू, खरे' ह्मणून 'विश्वासराव' असा काशीपंतास किताव देऊन वाढविलें. तिघे भाऊ यांस पालख्या व मातवर तैनाता करून लाख रुपये होनांचा सुवर्णाभिषेक करून बक्षीस दिलें. किल्ले प्रांत येथील महाराज यांणीं दिल्लीस जाण्यापूर्वीं बंदोबस्त करून देऊन इमारती करविल्या त्याप्रमाणें चालल्या होत्याच. सर्व किल्ले कोट पाहून तयार, चांगलें वाईट, अधिक उणें, कोठें करणें, तें नवीन करविलें. लोक सरदार जेथें जसे पाहिजेत तसे ते जुने ठेविले. त्यांजपासून कामकाज कसें चालेल हें जाणून नवे जुने करून ठेविले. आपण राज्यांत हिंडून श्रीरामदासस्वामीचें दर्शन व श्रीजेजूर व शिंगणापुरशंभु, प्रतापगडदेवी दर्शन करून मागती रायगडीं आले.

बाळाजी आवजी चिटणीस याजला राज्यकारणीं पत्र ल्याहावयास सांगितलें होतें. तें पत्र निकडीनें जावयाचें ह्मणून त्यास आणविलें. 'पत्र सत्वर गेलें पाहिजे, आणा' ह्मणून आज्ञा केली. तेसमयीं पत्र लिहिलेलें नव्हतें. महाराजांनीं 'आणा' ह्मणोन सांगितलें तेव्हां 'लिहिलें आहे' असें बोलले. तों 'वाचून दाखवा' अशी आज्ञा झाल्यावर खिशांत हात घालून दोन बंद कोरे कागद गुंडाळी होती ती काढली आणि अस्तमानसमयीं दिवटीजवळ होऊन पत्र साद्यंत वाचून दाखविलें. 'ल्याहावयास सांगितलें तसें, मतलब बहुतच कारस्तानीचे; त्या अन्वयें लिहिलें' ह्मणून तारीफ केली. तों दिवट्या हांसला. महाराजांनीं 'कां हांसलास? ह्मणून विचारलें. त्याणें न सांगावे तर हुकूम झाला. बोललें पाहिजे, ह्मणून त्याजकडे पाहिलें. तेव्हां विचारांत पडून झाल्याप्रमाणें सांगितलें जे, 'कागद तयार नव्हता ह्मणून कोराच वाचला. आतां तयार करणार. अपराध केला. क्षमा करणार स्वामी समर्थ.' असे बोलून मुजरे केले. तों दिवट्यानेंही 'कागद कोरा वाचला यास्तव हांसलों' ह्मणून खुरनीस केली. त्यावर बारपत्र लिहून वाचून दाखवावें. ते समयीं तेथेंच बसोन पत्र लिहिलें.

पुन्हां वाचून दाखविलें तों पूर्वीप्रमाणें अक्षरें व मतलब संगतशुद्ध. पूर्वीं वाचलें व फिरोन वाचलें त्यांत तिळप्राय न्यूनाधिक्य नाहीं. हें पाहून बहुत संतोषी झाले. तारीफ केली. 'चिटणीस योग्य आहांत व तर्ककरून योग्य आहांत,' असा गौरव करून त्यांस पोषाख अंगावरील उताराचा व मोत्यांची कंठी शिरपेंच बक्षीस दिले. ते समयीं यांणीं अर्ज केला जे, 'सर्व राज्यांतील सरकारकून सरदार किल्लेकोट येथील चिटणिसी व कारखानिसी जमेनिसी तीन धंदे स्वामींनीं करून दिले ते बक्षीस असावे, कोठें चालत नाहींत ते चालावे, व दाभोळ सुभे येथील सरदेशमुखीचें वतन करून द्यावें.' त्याजवरून महाराज कृपावंत होऊन वचन दिलें. धंदे त्यांजकडे राज्यांतील सांगितले. दाभोळचे सरदेशमुखीचीं वतनपत्रें करून दिलीं. दिल्लीचे स्वारींत बहुत उपयोगी पडले याजवरून राजकारणी कारभारी समीपचा विश्वास ठेवून बहुतच कृपा याजवर महाराज करूं लागले.

संभाजीमहाराज यांचा विवाह करावा असा सिद्धांत करून पिलाजी सिरके यांचे कन्येचा शरीरसंबंध सिद्धांत करून बहुतच तरतूद साहित्य करवून मोठे समारंभेंकरून पांचचार लक्ष रुपये खर्च होऊन लग्न झालें. वधूचें नांव 'येसूबाई साहेब' असें ठेविलें.

नंतर वऱ्हाडप्रांतीं स्वारीस गेले. दिलेलखान सुभा औरंगाबादचा करून,होता. त्याचे ताब्यांत आणखी लोक वगैरे सामान देऊन एखलासखान यास पादशाहांनीं दिल्लीहून पाठविलें. तेही आले. महाराजांनीं देशीं येऊन सत्तावीस किल्ले व ठाणीं व बागलाण घेतलें. मुलूक मारीत स्वारी शिकारी करितात. वऱ्हाडांतील कर्जेशहर मारिलें. बहुत मत्ता सांपडली. तेथून बऱ्हाणपुरास गेले. तेथील पुरे मारिले. हें वर्तमान दिलेलखानास कळोन आपण व बहलोलखान व बहादरखान एखलासखान जमियतसुद्धां चालून आले. इंद्रायणीनजीक गांठिलें, तेव्हां युद्ध करून दवून राखून महाराज रायगडीं जाऊन लुटसुद्धां पावले.

हें वर्तमान 'राजे पुनः देशीं गेल्यावर स्वारी करितात, फंद करितात,' ह्मणून औरंगजेब यास कळलें, ते समयीं बहुत दिक्क होऊन 'मोठा शत्रु शिवाजी निर्माण झाला. हस्तगत झाले असतां हरीफाईनें निघून गेला. जो सुभा पाठवावा त्याचे हातें कांहीं एक घडत नाहीं. खासा आपण जावें तर इकडील बंदोबस्त राहिला पाहिजे;' ह्मणून आपले पुत्र शहा-

जहां यासच सुभेदारी देऊन रवाना केलें. बराबर मातबर सरदार भावसिंग वगैरे दिले. ते निघोन औरंगाबादेस येऊन पावले. हें वर्तमान महाराजांस कळलें. दिल्लीस गेले तेव्हां शहाजहां याची रीति सर्व माहित झालीच होती. "द्रव्याचे लालची पेंढीचें ढोर" असें आहे. काय चिंता आहे ?' असें महाराज बोलले. पादशाहांनीं पुत्र येतां त्यास 'तुह्मीं शिवाजीचे गळां पडूं नये. तुमचे वस्तू त्याशीं मसलत निभावणार नाहीं. त्याशीं द्वेष न करावा. सुभे बुडविले तसें पादशाहाजादा बुडविला असें लौकिकांत आलें असतां ठीक नाहीं. पादशाहीस अपाय होईल. यास्तव तहांनीं व गोडींनीं आपलेसे करून प्रांत जतन करावा' असें सांगितलें होतें. त्यावरून त्याचें मानस तह करावा असेंच होतें. पूर्वी महाराज दिल्लीस गेले, ते समयीं 'यांचे ठायीं पादशाहांनीं नजरबंदी केली हें ठीक न केलें. शिवाजी राजासारखे अमीर हातीं राखावे,' असेंच शाहजादे याचें संमत होतें. आंतून सफाईच होती. 'तेच हल्लीं आले; परंतु मनसुबा काय ?' हा संशय महाराजांस होता. तों शाहजादे यांणीं राजकारण तहाचें पाठविलें जे, 'तुह्मीं आह्मीं सफाईनें चालावें.' हें तिकडून आल्यावर महाराजांनीं 'बरें आहे. तूर्तच बिघाड कशास पाहिजे ? त्याचा आदर कायम ठेवून मतलब [काय] आहे हेंच पाहावें' ह्मणून आपणही रुकार देऊन राजकारण चालविलें. मुसलमान सरदार यांशीं राजकारण करणें, बोलणें, विश्वास पुरत नाहीं. तेव्हां भावसिंग आहेत कळलें, याजवरून 'आपण आह्मी भावसिंग याचे विद्यमानें बोलावें' असें ठरविलें. बाळाजी आवजी चिटणीस याचा व भावसिंग याचा दिल्लींतील स्नेह. त्याजकडे पाठविणें जाणें येणें ते करीत होते. याजवरून चिटणीस यास लवाजिमा देऊन राजकारणास पाठविलें. त्यांणीं जाऊन पादशाहाजादे याची व भावसिंग याची भेट घेतली. महाराज यांणीं वस्त्रें, जवाहीर, हत्ती पाठविलेले पावते केले आणि बोलणें चालतें केलें. 'राजे आपण होऊन पादशाहास भेटावें, कामें काजें करावीं, येथें बोलणें तह ठरले तसे मुद्दे हासल व्हावे, ह्मणून दिल्लीस गेले. दरम्यान मातबर दिले असोन चौकी बसविली. नजरबंदी केली, बहादर यांचें कांहीं न चाललें.' ते समयीं शाहांनीं उत्तर केलें कीं, 'पादशाहाचे अंतःकरणांत राजाविषयीं विपरीतभाव कांहीं नव्हता व हल्लींही नाहीं. निखालस होऊन आपणापाशीं राजे यांणीं राहावें व त्यांस वजीरीचें काम आपण सांगावें हा त्यांचा

हेतु राजे कबूल न करीत. याजवरून हरयत्नें दाबून करवावें हें करणेस गेले. राजास मानलें नाहीं, आणि ते निघोन आले. पुढेंही आह्मांस येते-समयीं आज्ञा केली जे, 'राजे यांस वांकडे न होतां, झाली ती गोष्ट बरीच समजून शिवाजीराजेसारखे मनुष्य मागें झाले नाहींत व पुढें होणार नाहींत ह्मणून आमचे हातीं लागावे असा यत्न केला असतां वांकडें जाणून गेले. बरें असो. त्यांची मर्जी तिकडे राहावें, कामें करावीं तींच कायम करून पूर्वीं तह झाले ते कायम करून त्यांचे विचारें चालावें: आह्मांस वांकडें करणें असतें तर तेच समयीं करितों. परंतु शिवाजीराजे अशा रीतीनें गेले हें त्यांणीं युक्त न केलें असें बोलून सफाई करावी या प्रकारें हुकूम आहे.' असें बोलणें झाल्यावर चिटणीस यांणीं 'हल्लीं आ-पण या रीतीनें बोलतां व भावसिंगही खातरजमेनें सांगतात त्या अर्थीं हें सर्व वृत्त महाराजांस लिहून उत्तर आणवितों, नंतर पुढील बोलणें बोलूं,' असें सांगून दोहींकडील सर्व बोलण्याचे अर्थ लिहून पाठविले. त्याज-वरून महाराजांची आज्ञा आली, 'बोलणें सिद्ध करून मतलब राखणें.' त्याजवरून 'आपण सफाईनें चालणार ते असे:—वांकडें चालणें नाहीं, पूर्वींचा तह कायम ठेवणें, सारी फौज कुमकेस येणें, अगर समक्ष भेटीस येणें हें पुरतेपणें परस्परें निखालसता झालेशिवाय घडणार नाहीं. कांहीं मुलुक करार करून थोडी बहुत फौज नेहमीं कुमकेस राहील,' असें बो-लणें चिटणीस यांणीं लावलें. त्याजवरून बोलणें तह ठरला कीं, 'सं-भाजी राजे यांचे नांवें पांच हजार फौजेचा सरमजाम देऊन त्यांत पांच हजार फौज नेहमीं राहावी, त्यांत मातबर सरदार लोकांसुद्धां कामकाज करीत जावें' अशीं उभयपक्षींचीं बोलणीं सिद्धांतांत ठरून 'जे सत्ता-वीस किल्ले बंधारी खानदेश, बागलाण प्रांत सुद्धां घेतला तो महाराजांनीं सोडावा. पांच हजार फौजेस सरमजाम आवढे, बालापूर, वऱ्हाड प्रांतीं तालुका लाऊन द्यावा, व पूर्वींचे करार आहेत त्याप्रमाणें चौथाई सरदेश-मुखी चालावी, विजापूर तालुक्यांतील प्रांत किल्ले व त्यालगत दौलता-बादेखालील किल्ले मुलुक पेशजीचे तहाप्रमाणें महाराजाकडे चालावे.' असा तह ठरावून महाराजाकडे लिहून पाठविलें आणि उत्तरें आणून करार ठरविला. शाहजादे यांचीं दस्तकें व सरमजाम तालुक्याच्या सनदा वगैरे घेऊन बाळाजी आवजी चिटणीस महाराजांपाशीं आले. महारा-जास जवाहिर, वस्त्रें, हत्ती, घोडे शाहाजाद्यांनीं दिले ते आणून प्रविष्ट

केले. तिकडील वकील बरोबर घेऊन आले त्यास महाराजांनीं सत्तावीस किल्ल्यांच्या चिठ्या देऊन वस्त्रें दिलीं. निरोप देऊन महाराजांनीं वऱ्हाड, आवढा, पटा दोन्ही किल्ले व वऱ्हाडप्रांत घेऊन अमल बसविण्यास रावजी सोमनाथ सुभेदार फौज देऊन पाठविले. तो अमल बसल्यावर औरंगाबादेस पांच हजार फौज पाठवावीसें करून प्रतापराव गुजर सरनोबत सरदार, त्याजबरोबर कारभारी अण्णाजी रंगनाथ मलेकर व येसाजी मल्हार असे देऊन पाठविले. ते शहरास जाऊन राहिले. शाहाजहां व महाराज यांचा तह होऊन बहुतच सफाई परस्परें निखालसता झाली.

शाहजादे यांणीं तहाचें वर्तमान पादशाहास लिहिलें. तेव्हां तह झाला हा त्यांस प्रशस्त वाटला नाहीं. 'शिवाजी राजे निःसीम आपलेसे होऊन त्यांनीं तिकडील दोन्ही पादशाहाती विजापुर व भागानगर या घेऊन आपणास द्याव्या व त्यांतूनच आणखीही प्रांत फौजेचे बेजमीस त्यांणीं लाऊन घ्यावे' असें पादशाह लिहीत गेले. महाराज तहनाम्याकरितां स्वारी करणें ती विजापुर तालुक्यांत वगैरे करून खंडण्या घेत गेले. किल्याच्या इमारती व दौलतींचा बंदोबस्त उपभोग करीत दोन वर्षे तह चालला असतां दिल्लीहून औरंगजेबाचे चित्तांत आलें जे, 'याप्रमाणें राजे यांसी तह करून चालणें ठीक नाहीं. अधिकच वळावत चालले. दोन्ही पादशाया त्यांणीं घेतल्यावर इकडील ही मसलत ते करतील. या पादशाईतील प्रांत किल्ले खंडणी घेत जावी ती आपणास द्यावी हें घडत नाहीं त्या अर्थीं तह मोडावा. आणि स्वारी करणें, प्रांत किल्ले घेणें, ते तेच घेतात हें पुढें जड पडेल.' यांजवरून शाहजादे यांस लिहिलें जे, 'राजे याजकडील प्रांत किल्ले दिले ते माघारे घ्यावे. फौज माघारी पाठविणें. हात पोहोंचल्यास लुटून घ्यावे' असें लिहून येत होतें, त्याची शाहाजादे यांची व महाराजांची अंतर्यामीं निखालसता याजमुळें त्यांणीं सरनोबत यांस सूचना केली व महाराजांसही लिहिलें. तेव्हां महाराजांनीं सरनोबत व फौज पत्र पाठवून मागें आणविली. आवढे वगैरे तालुके जप्त केले. महाराजांनीं मोरोपंत पेशवे यांस फौज देऊन रवाना केलें. सालेरीपासून सर्व तालुका सत्तावीस किल्ले घेवविले. बागलाण खानदेश अमल बसविला आणि सरनोबत वगैरे सर्व फौज घेऊन खासा स्वारीस निघाले. ते बऱ्हाणपूरपर्यंत गेले. खानदेशांत खंडणी घेऊन लुटीत गेले.

ब्रऱ्हाणपुरचे पुरे मारले ते लुटून वऱ्हाड प्रांतीं येऊन करजें वगैरे शहर मारीत मुकाम करीत बेमुगलवा लूट करीत खंडणी घेत येत असतां, दिलेलखान, बहादरखान व एखलासखान, बहलोलखान, इंद्रमणी असे उमराव चालून आले. त्यांशीं युद्ध करून तंबी पोहोंचवून दबाऊन सा-गरिले. आणि महाराज त्याचा हिसाब न धरितां पराभव करून राजगडीं येऊन पावले. पेंडगांवपर्यंत दिलेलखान मागें आला आणि फौज माघारी घेऊन दहा हजार फौजेनिशीं सालेरीवर पेशवे यांजवर चालून गेला. हें वर्तमान महाराजांस कळतांच त्यांनीं प्रतापराव गुजर यांस पागा फौजे-निशीं तिकडे रवाना केलें. त्यांणीं दरमजल जाऊन दिलेलखान, एख-लासखान युक्तीनें निघून जाऊन, कोणारगड एथें रुमाजी नलगे दोन हजार लोकांनीं होते ही बातमी लाऊन त्यास लुटावें ह्मणून चालून जाऊन तेथें मावळे लोक यांणीं गट बांधून युद्धाची शर्त केली. दोन हजार पठाण रणीं पाडिले. रुमाजी नलगे यास ठार मारिलें. सालेरीस खान जाऊन मोर्चे देऊन बसले तों प्रतापराव जाऊन पावले. घाटाक-डून मोरोपंत पेशवे चालून आले. मोगल मध्येंच घेरून घाबरा केला. रसद बंद केली. तेव्हां मोर्चे सोडून निघोन चालला. तों लगट करून एखलासखान यास मराठ्यांनीं गांठलें. युद्ध बहुत झालें. पांच हजार माणूस पठाण घोडे घालून मारले. एखलासखान सडा पळून गेला. दि-लेलखान दुसरे वाटे घाटावर गेला. त्याजवरही मराठे जाऊन पडले. त्याजला सावर घेऊं दिला नाहीं. ते निघून मातबर मजला करीत औ-रंगाबादेस पोंचले. पेशवे यांस लूट बहुत सांपडली. हत्ती घोडे पाडाव करून आणिले. बराबर सरदार आनंदराव, व्यंकाजी दत्तो, रुपाजी भो-सले व सुरेराव कांकडे, खंडोजी जगताप, संताजी जगताप, मानसिंग मोरे, विसाजी बल्लाळ, मोरो रंगनाथ, मुकुंद बल्लाळ, हे होते. त्यांणीं लढाईत बहुत शर्त करून कामें केलीं. सुरेराव कांकडे रणीं पडले. बेहे-लोलखान सरदार लढाईत पाडाव आले. हें वर्तमान महाराजांस लिहिलें त्याजवरून बहुत संतोषी होऊन त्यांनीं तोफा करविल्या. जासूद पत्रें घेऊन आले त्यांस सोन्याचीं कडीं वस्त्रें बक्षीस दिल्हीं. बेहेलोलखान व आणखी सरदार पाडाव झाले होते, त्यांस वस्त्रें देऊन शहरास खर्चास देऊन रवाना केले.

याजवर विजापुराकडील रणमस्तखान व बेहेलोलखान पनाळाप्रांतीं

यावें ह्मणून [संगमांत]पर्यंत धामधूम करीत आले. हें वर्तमान कळतांच सरनोबत यांस सरमजाम तोफा पागा लोक वगैरे मोठी तयारी करून देऊन सरदारांसुद्धां रवाना केलें. ते तावडतोब जाऊन त्यांची यांची गांठ उमरटी तालुक्यांत पडून मोठें युद्ध दोनप्रहरपर्यंत चाललें. त्या संधीस तेथें पाणी प्यावयास नाहीं; त्या योगानें मोगल अगदीं नाइलाज होऊन आयास आणिला. ते समयीं तह करून 'महाराजाकडील प्रांतांत या ऊपर आह्मी येणार नाहीं' असा करार करून घेऊन नंतर मोगलास जाऊं दिलें. हें वर्त्तमान महाराजांस कळल्यावर महाराजांनीं सरनोबत यांस 'तह करून मोगल सोडिला हें ठीक न केलें. आयास आणिला तसाच बुडवावा हें कां न केलें?' असें महाराजांनींही पुष्कळ प्रकारें त्यास लिहिलें. परंतु सरनोबत तह करून भागानगरप्रांतीं देवगड, रामगडपर्यंत स्वारी करून खंडणी चौथाई घेत घेत मजल दरमजल पांच चार कोशांचा मुकाम करीत करीत आपले देशीं सुखरूप येऊन पोहोंचले. तों रणमस्तखान व बेहेलोलखान हे दोघे पुन्हा तयारी मोठा सरमजाम तोफा लोक खजाना जमा करून पनाळ प्रांतावर येऊन पावले. हें वर्त्तमान महाराजांस कळलें. महाराजांनीं सरनोबतास सांगितलें कीं, 'तुह्मीं ज्याला तह करून सोडिलें तोच फौजेसुद्धां सरदार रवाना करितो, आणि ते सरदार चालूनही आले. याचा इतबार कोणते आधारें कशावरून धरिला? करणें योग्य हें होतें कीं त्यास तेच समयीं बुडवावें. तें न करितां तह करून आलां ह्मणून तुह्मास शब्द लाविला. तर तुह्मींच पुन्हां याजकरितां जावें,' असें सांगून सरनोबत यांस रवाना केलें. ते गेले ते बावसे नवरीवर जाऊन तावडतोब (रोष मनीं महाराजांनीं शब्द ठेविला हा होता याकरितां) त्यास गांठोन मोठ्या आवेशानें युद्ध बहुत करिते झाले. 'प्रतापराव यांणीं बेइमानी केली' हा महाराजांचा शब्द आपल्यावर आला ह्मणून मोठे आवेशानें, लोक व घोडे निवड करून, घोडे चालविले. त्या योगानें त्यांची खराबी बहुत केली. तों प्रतापराव यांस गोळा लागून एकाएकीं रणीं ठार पडले. तें पाहून त्या समयीं हंसाजी मोहिते सरदार जुमलेदार होते त्यांणीं ते समयीं सरदार पडले असतां त्यांची चिंता वगैरे न करितां मोठे धाडसेंकरून 'आपण आंगेजणीनें लढाई करून यश संपादावें' असें मनीं आणून पुन्हां स्वतः फौजेसहवर्तमान चालून घेतलें आणि त्या रोषानें मोगल याची फौज कापून काढिली. हें

त्यांचें अद्भुत कर्म पाहून धीर न पुरे, तेव्हां मोगल पळूं लागले. त्या योगानें त्यांचा मोड झाला. पळूं लागले. त्यांस विजापुरपर्यंत पाठलाग करून पिटीत पिटीत मजल दरमजल अवकाश घेऊं न देतां घालविलें. अशा रीतीनें हंसाजी फते पावले, व आपलीही फौज त्या प्रसंगीं युक्तीनें व धीरानें संभाळून महाराजाचे प्रतापें रायगडीं आले. महाराजांनीं त्यांची फारच नवाजीस करून अशा समयीं हंबीरी केली ह्मणून त्यांस 'हंबीरराव' हा किताब दिला आणि सरनोबती त्यांजलाच करार करून देऊन वस्त्रालंकार देऊन बहुमान करून मोठे इतमामानें त्यांसच बागलाण प्रांतीं पाठविलें. ते जाऊन गुजराथ प्रांतांतील शहर आमदाबादपर्यंत जाऊन मुलुक लुटून शहरें मारीत मारीत खंडणी घेत घेत नर्मदानदीतीरास येऊन पोंहचले. पुढें मजल दरमजल करीत करीत बऱ्हाणपुरीं आले. पुढें खानदेशींचीही खंडणी बेतानें करून पुढें फौजसुद्धां दररोज पांच चार कोश असे मुकाम करीत करीत माहूर तालुका येथें येऊन फौजेसहवर्त्तमान जाऊन तेथीलही खंडणी त्यांणीं केली. त्याच बेतानें पुढें जालनापुर व शिंदखेड येथील खंडणी घेऊन पुढें कूच करून फौजेसुद्धां गंगातीरीं सुरक्षित देशीं येऊन पोहोंचले. तों दिलेलखान व आणखी उमराव फौजसुद्धां सरमजामानिशीं चालून आले. ते समयीं मोठे वेगानें लांब लांब मजली करीत करीत फौजेसुद्धां अशा प्रकारें करून चालले. त्यामागें गनीमही तशाच प्रकारें फौज तोफा खजीना स्वार पायदळ सुद्धां बेतानें येत असतां त्यांस मजलचे मजल दाबून दाबून फत्ते पावून काम बजावून यश घेऊन आपले महाराजाचे दर्शनास फौज, लोक, तोफा वगैरे सरमजाम व खंडणीचे रुपये व लुटीचे वगैरे सामानांसुद्धां युक्तीनें शत्रूस दाबीत दाबीत सुरक्षित एकंदर लुटीसुद्धां खज़ाना घेऊन सुखरूप मोहिते पावले. सर्व आलें तें नजर महाराजांस केलें व एकंदर वृत्त महाराजांनीं विचारिलें, तेव्हां त्यांणीं जसें जसें ज्या ज्या ठिकाणीं होत गेलें तसतसें सर्व इत्यंभूत महाराजांस निवेदन केलें. महाराज त्यांजवर बहुत संतोषी होते झाले. नंतर त्यांस निरोप दिला. ते निरोप झाल्यावर आपले ठिकाणीं जाऊन उतरले. फौजेसही उतरण्यास सांगोन आराम होते झाले.

नंतर कान्हा मोरदेव गपचुप याजकडे सरनोबतीची मुजमी होती ती कांहीं कारणानें त्याजकडे न ठेवावी असें महाराजांचे मनांत येऊन

त्यास दूर करून अण्णाजी रंगनाथ पुरंधरे सवनिसीवर होते ते शाहाणे कर्ते पाहून त्याजवर संतोषी होऊन त्यास सरनोबतीची मुजमी दिली. वस्त्रें भूषणें देऊन विडे दिले. निरोप दिला. बकाजी फर्जंद यास कारभार दिला. त्यास वस्त्रें अलंकार दिल्हे. संताजी घोरपडे यांणीं मोठीं मोठीं युक्तीनें व मर्दुमीनें वहुतेक कामें केलीं व हे शिपाई मर्द जाणून त्यांजवर संतुष्ट होऊन त्यांस किताब 'हंबीरराव' दिला. त्यांणीं येऊन महाराजांस विनंति केली त्यावरून त्यांस तैनात ज्यास्त करून जुमलेदारीची सरदारी दिली. त्याचप्रमाणें धनाजी जाधवराव हे थ्यंकोजी खांडेकर यांचे जुमल्यांत होते त्यांस शिपाई मर्द जाणून जुमलेदारीची सरदारी दिली. याप्रमाणें दोन सरदार हंबीरराव यांणीं विनंति केल्यावरून उभयतांस वाढविलें. याप्रमाणें हंसाजी मोहिते, बीड परगण्याचे देशमुख, यांणीं चाकरी मर्दुमीनें बहुत केली. महाराज यांणीं दिल्लीहून सरदार आले व मसलत झाली असतां नामोहोरम त्यांस केले, दिल्लीस जाऊनही मोठी ख्याति करून युक्तीनें व आपले जोरानें आले. असे दिल्लीपति यास नामोहरम केले. महाराज राजगडास येऊन तेथून पुढें रायगडीं गेले. याप्रमाणें दिल्लीपतिपराभव पंचम प्रकरण समाप्त.

---

## शिवछत्रपति यांणीं दक्षिणदिग्विजय केला तें कथन प्रकरण षष्ठ.

श्रीशिवछत्रपति यांची औरंगजेब याणें बहुत प्रकारें स्पर्धा करून, पूर्वी शाहजादेपणांत, औरंगाबादेस असतां राजाचा पराभव करावा ह्मणून प्रयत्न केला; पुढें दिल्लीस जाऊन आपण पादशाह झाल्यावर याचा पराभव करावा ह्मणून सुभे पाठविले, त्यांचा कांहीं यत्न न चाले; नंतर भेटीस नेऊन आपलेसे करावे ह्मणून दिल्लीस नेऊन दगाबाजी केली असतांही न चालली; आणखी मोहिम केली तेही पराभवातें पावली; तेव्हां आपले ठायीं 'ईश्वरानेंच त्याजला वैभव दिलें, आपण यत्न करणें ठीक नाहीं,' ह्मणोन पराभवातें पावून राहिले. महाराजांचा प्रताप दिवसेंदिवस वाढत चालला. संभाजीराजे प्रबुद्ध झाले, यांस व राजारामसाहेब यांस विद्याभ्यास करवावा, सुशिक्षित करावे, ह्मणून घोड्यावर बसणें, शस्त्रविद्या, तालीम, तिरंदाजी सर्व करविते झाले. आपण राजे व हे राजपुत्र; पुढें राज्यास अधिकारी हेच; आपण महाराष्ट्र राज्य आक्रमून धर्मस्थापना केली ती पुढें वृद्धीस यांचे हातें पाववावी; अष्टप्रधान यांतच

राजपुत्रांची गणना आहे; सर्व अमात्य राजाचा वामभुज, युवराजा राजपुत्र हा सव्यभुज असें आहे; त्याअर्थीं हे सुशिक्षित असावेत ह्मणून लेखनादि अभ्यास करवून पंडितांचा सहवास करविला आणि उत्तम वृद्ध सेवक त्यांचे समीप ठेविले. दंडनीति, राजधर्म हे सांगितले. 'राजपुत्रीं पितृसेवा कायावाचामनें करावी. जीं कर्म करणें तीं पित्यास संतोष उत्पन्न होय अशीं त्यांणीं करावीं. कोणतेंही कर्म पित्यास तिलप्राय विषाद उत्पन्न होय असें करूं नये. पित्याची कृपा ज्यावर असेल त्याजवर आपण कृपाच करावी. ज्याचे ठायीं पित्याचा द्वेष त्याशीं आपणही करावा. त्याशीं प्रीति करूं नये. पित्यांनीं संतुष्ट होऊन युवराजपदकारभार सांगितला असतां गर्वारूढ होऊं नये. संपत्तीचे व तारुण्याचे मदेंकरून उन्मत्त होऊं नये. पिता, माता, भगिनी, बंधु व वल्लभ थोर थोर प्रतिष्ठित असतील त्यांचा व प्रजादिकांचा अपमान करूं नये. मोठीही वृद्धि पावला असतां पित्याची आज्ञा उल्लंघन करूं नये हाच पुत्राचा धर्म श्रेयकर आणि भूषणापेक्षां भूषण होय. बंधुवर्ग असतील त्यांत आपण युवराज झालों, कारभार करितों, ह्मणून गर्व धरून आपण सर्वांहून अधिक असें कदापि मानूं नये. राजाची आज्ञा पालन न केली, बंधूंची अवगणना केली असतां द्रोहेंकरून तो युवराज पदच्युत होतो. पूर्वीं यदु आदिकरून राज्यास सिंहासनादिकरून युक्त असतांही ते अनधिकारी जाहले. पितृद्रोहेंकरून असें घडलें, व बंधुहेलना करून दुर्योधनादि नाश पावले. यास्तव बंधुवर्गांचे अर्थ त्यांस देऊन त्यांचा मनोधार विशेष वाढूं न देतां रक्षावे. बहुत नम्रत्व करून सकलगुणसंपन्न असोन सर्व मित्र व मंत्री सेवकजन उत्तम यांचा सहवास व युक्तिश्रवण करून राज्यांतील माहितगारी व राज्य करण्याच्या युक्ति अवगत करून घ्याव्या. त्यांची मान्यता रक्षावी. उत्तम जनाची संगति करावी. नीच व दुर्व्यसनी यांशीं कदापि मैत्री करूं नये. त्यांचा सहवास न करावा,' असे बोध करविले. राजांनीं पुत्रास बहुत प्रकारें रक्षावें. मत्त हस्तीस अंकुश नसल्यानें तो अनर्गल होतो. सर्वांचे घात करितो. तसेंच पुत्र रक्षिले नाहींत आणि लघु मनुष्यांची संगति त्यांस झाली व मद झाला असतां ते आपणच राज्य करावें ह्मणून इच्छा धरून अनर्गल होतील. तेणेंकरून राज्यक्षय होईल. जसें मांस आमिष अमुक स्थळीं आहे असें व्याघ्रास कळल्यावर त्याचें निवारण होत नाहीं, तसें पुत्रांचें निवारण मग करूं ला-

गलें तरी घडत नाहीं. यास्तव उत्तम सुशिक्षित प्रौढ सेवक सावध असे जवळ ठेवावे. सिंहाचे पिलास असावध रक्षक असले तर त्यांसच भक्षून आणखी जनांचा नाश करितात. यास्तव सावध असावें. राजाचे कुळीं अनीतिमान् पुत्र निर्माण झाला ह्मणजे तें राज्य व कुळ शीघ्र क्षयास जातें. ह्मणून बहुतच नीतीनें रक्षणें तसें रक्षिलें. आणि मातबर सरकारकून प्रौढ यांजपाशीं बसावे. दरबारांत कारभारांत माहित होत जावें.' असें सांगून तसें त्यांकरवीं करविते झाले. श्रीरामदासस्वामी यांचें दर्शन व सहवास करण्यास त्यांस पाठविलें होतें.

तसेंच निळो सोनदेव मजमदार वारले त्यांचे पुत्र दोघे; वडील नारोपंत, धाकटे रामचंद्रपंत. परंतु हे नारोपंत नाकाबिल आर्ष होते, ह्मणून रामचंद्रपंत यांसच पद देऊन मजमूचें काम त्यांजपासून महाराजांनीं चालविलें. निराजी रावजी न्यायाधीश हे परम चतुर शाहणे तर्कज्ञ यांस न्याय करण्याविषयीं 'राज्यांतील अनेक प्रकारचे न्याय येतील ते नीतीनें करावे; दंड करणें त्यास न केला, व न करावा त्यास केला, असतां राजास अकल्याण, व न्याय करणें त्यांत लोभ धरून वृत्ति उच्छेद झाली असतां परम पाप, त्यायोगें राज्य क्षयास पावतें, यास्तव नीतिशास्त्रप्रमाणें विद्वान् पंडित ब्राह्मण सभासद चतुर व सभ्य धान (ह्मणजे ज्यास आलें त्यास बोलावणें व आणणें करणार, यास ह्मणावें) त्यांस व तसेच आणखी न्यायकर्ते दहा पांच घेऊन सर्वांचे संमतें न्याय निवडून राजास निवेदन करून किमपि अन्याय होऊं नये असें करीत असावें ह्मणून सांगितलें व कोणाची दाद फिर्याद आली असतां लागलीच मनास आणली नाहीं असें न घडतां करावें. न्याय करणें ते बहुत दिवस लाऊन त्यांची जीविका बुडाली असें न होतां तात्काळ गोरगरीब सर्वांचे न्याय होत असावे. कोणासही विपरीत शासन, द्रव्यहरण होऊं नये,' असें बहुत रीतीनें सांगून 'मुख्य गोष्ट राजाचा धर्म प्रजापालन करणें व न्याय अन्याय पाहणें; धर्म कोणीं आचरिला, अधर्म कोणीं केला, हें पाहून शिक्षा करणें; यास्तव सावधपणें जें करणें तें करावें. नाहीं तर राजास वाईट; ह्मणून लघु जन यांचे न्याय करणें त्या त्या ज्ञातींतील सभ्य असतील व त्यांचे त्यांचे धर्म असतील त्या अन्वयें व देशधर्म ज्ञातीधर्म विवक्षा करून करीत जावें,' असें सांगून करविते झाले.

महाराजांस, मद्यप्राशन करणार व कैफी यांचा बहुत त्रास होता. से-

त्येचे लोक व समीप राहणारे यांणीं कैफ सेवन केला तरी तत्काळ त्यांस शिक्षा करीत. बहुतच केला, व्यसनी झाला, तर सेवेंतून दूर करीत. कलाल यांचीं दुकानें सरकारआज्ञेखेरीज असूं नयेत. व ठेवावीं त्यांस सरकारपागा व कारखान्यांस मद्य परवानगीनें देत जावें अशी ताकीद होती. व सैन्यांत तर तें अगदीं जाऊं देऊं नये. कैफी माणूस झालें ह्मणजे बेखबरदार होऊन कार्यनाश होतो, द्रव्यनाश होतो, आणि मनस्वी पापाचार घडतो ह्मणून बहुत मर्यादा शिक्षा करणें असें करून ठेविलें.

शहाजी महाराज यांणीं चंजाऊर प्रांतीं राहून तो प्रांत जतन केला आणि ते समाप्त होण्याचे समयीं त्यांणीं नारो त्रिमल हणमंते कारभारी आणि व्यंकोजी राजे तेथें होते त्यांणीं त्याचे विचारें चालून रक्षावें असें केलें.

नारोपंत अग्निहोत्र घेऊन सोमादिक यज्ञ करून दीक्षित झाले. त्यांचे पुत्र रघुनाथ नारायण बहुत कर्ते व शहाणे धूर्त विद्वान् असे झाले. शहाजी महाराज वारल्यावर त्यांणीं दौलत कायम राखून द्रव्यादि संग्रह बहुत केला. व्यंकोजी राजे यावत् बालत्वदशा होती तावत् त्यांचेच करण्यांत चालत आले. नंतर त्यांनीं स्वतः व्याप व पराक्रम थोडा असोन, कारभार करावा ही इच्छा धरिली, परंतु बुद्धीकरून कमी पडले, आणि सांगितल्याप्रमाणे चालावें तेंही त्यांचे हातून न घडे, असें होऊन त्यांस कारभारी व थोर माणसें यांचें केलें चांगलें न वाटून सामान्य जन हलकीं माणसें यांची प्रतिष्ठा, बोलगुज त्यांचे ते ऐकूं लागले. याजवरून रघुनाथपंतीं विचार केला, 'यांजपाशीं राहून वडिलीं मेळविली ती प्रतिष्ठा जतन होणें संकट दिसतें. धणी हे खरे; परंतु शिवाजी महाराजांचे गुण आणि कर्तृत्व दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊं लागलें. दौलतीचे खावंद हे. त्यांचे दोष आपणावर येतील यास्तव स्नान संध्या करून स्वस्थ रहावें; क्षेत्रवास करावा; असें मनांत येतें. परंतु दौलतीस कमी आपण असोन पडेल, हाही स्वामिकार्याचा दोषच होय ह्मणून ते कांहीं ऐकतील तितकें सांगावें.' असें उदासवृत्तीनें जें कांहीं करितील तें पहावें असें करूं लागले. बहुतच विलक्षण; कांहीं वांकडें केल्यास 'राजेसाहेब, आह्मी तुमचे परंपरा वडिलोपार्जित सेवक; तुमचें हितच करावें हें आह्मांस श्रेयस्कर जाणून करितों; तें आपणास चांगलें वाटत नाहीं. सामान्य माणसाचा सहवास आपण धरितां हें चांगलें नाहीं. वडिलीं कीर्ति कसी अर्जविली

तसेंच वडील बंधु शिवाजी राजे यांणीं कसें राज्य वृद्धीतें पाववून दिगंत विख्यात लौकिक संपादिला. त्यांचे भाऊ आपण ह्मणून तसें चालावें. आह्मी समीप असतां कांहीं न झालें असें शिवाजी राजे ह्मणतील. आमचे हातें सेवा घ्यावी, आह्मींही करावी, हेंच आह्मांस उचित. द्रव्य व लोक पदरीं असतां नाचीजपणें लोकांहातीं द्रव्याचा व्यय व्यर्थ करवितां. वडिलीं कीर्ति मेळविली त्याहून अधिक करून दाखवावी तरीच कुळांत जन्म घेतल्याची योग्यता आहे.' असे बुद्धिवाद वहुत रीतींनीं केले असतां व्यंकोजीराजे यांचे विचारास न येऊन त्यांचे ठायीं दिवसेंदिवस ते अनादर करूं लागले. हितावह बोलणें तेंच अहित वाटूं लागलें. त्याजवरून त्यांणीं सर्व वृत्त यांची चाल महाराजांस लिहिली. महाराजांनींही पत्रें लिहिलीं कीं, 'तुह्मी उदासीन राहतां; रिकामे लोकांहातीं कांहीं एक उद्योग न करितां द्रव्य खाववितां; वडिलीं थोर माणसें विश्वासू जोडलीं त्यांचा अनादर करितां, विहित नव्हे.' परंतु लघु मनुष्यांनीं बुद्धीस भ्रंश बहुत केला. ते समयीं पंतांनीं विचार केला जे, 'यांचें अन्न वडिलोपार्जित भक्षिलें, तेव्हां यांचे ठायीं वाईट इच्छिणें योग्य नाहीं. यास्तव यांचे वडील बंधु शिवाजी राजे महाराजांचे ज्येष्ठ पुत्र राज्याचे अधिकारी त्यांजपाशीं जावें, हेंच उत्तम.' असें मनांत आणून एके दिवशीं व्यंकोजी राजे यांस बोलण्यांत बहुतेक प्रकारें बुद्धिवाद केला असतां त्यांणीं विचाराचे मार्ग एकीकडे ठेऊन उत्तर केलें कीं, 'तुह्मीं चाकर, सांगूं तितकें करून असावें.' असें बोलले असतां रघुनाथपंतीं तत्काल उत्तर केलें कीं, 'राजेहो, आह्मी तुमचे सेवक खरेच; परंतु तुह्मांपासून गेल्यावर तुमचे अर्धासनींच बसण्यास योग्य आहों.' हें उत्तर त्यांस फारच वाईट वाटलें. ते समयास पंतीं कुटुंबास निरोप घेतला जे, 'शिवाजी महाराज यांचें दर्शन करून येतों.' 'आपण येथें प्रसंगीं बोललों तसेंच करून दाखवावें,' हेंच चित्तांत आणून हरएक पाळेगार यासीं सख्य करून शेवटास नेलें तर यांचे राज्यास विपरीत, हें करणें अश्लाघ्याचें होय. शिवाजी राजे यांस राज्य साधण्याचा बहुत हव्यास, दिवसेंदिवस अधिकच संपादन करितात, त्यांजकडेसच जावें हाच सिद्धांत केला. त्यांतही आह्मी त्यांच्या वडिलांच्या पदरचे ह्मणून उगेंच जाणें ठीक नाहीं. राजे यांस राज्यकारणाचा आदर बहुत. तेव्हां इकडील संस्थानें यांचीं राजकारणें घेऊन जावीं ह्मणून चंदी वगैरे राजकारणें सिद्ध

केली. हें राज्य नवीन राजाचे पदरीं घालावें, हें सिद्ध करून आणखीही कित्येक राजकारणें करून करनाटकांतून महाराजांकडे जावें ह्मणून यावयास निघाले.

ते समयीं पंतीं मनांत विचार आणिला जे, 'विजापूरची बादशाहत बहुतकरून सुटली व दबावांत घातली आहेच, तेव्हां महाराजांस करनाटक प्रांतीं येण्यास भागानगरची पादशाहत मध्यें आहे. हें महाराजांस मनसब्याचे अर्थे येण्यास अवघड दिसेल, यास्तव भागानगरचेंही राजकारण जाणून सख्य सिद्ध करून जावें' ह्मणून भागानगरानजीक आले. तेथें आकण्णा मादण्णापंत हे कुल्लकारभारी वजीरी करीत होते. त्यांस कसें भेटावें, राजकारण परिस्फुट आधीं न होतां सिद्धीस जावें, ह्मणून त्यांस, थोर ब्राह्मण पंडित आले ह्मणजे त्यांचे ठाईं विशेष प्रेमा होता जाणून, आपण पंडित होऊन, प्रातःकाळीं स्नानसंध्यासमयीं जावेंसें करून, सर्व लवाजिमा दूर दहा वीस कोशीं ठेवून त्या समयीं गेले.

मादण्णापंत बहुत थोर, ब्राह्मणांचे ठायीं निष्ठा, दानधर्मशील असे होते. नित्य लक्ष भोजन घालीत. भोंवतीं अन्नसत्रें करून त्यांतून सर्वांची बातमी आल्यावर आपण भोजन करावें असें व्रत चालवीत होते, हें नगरविख्यात आहे. त्यांची भेट घेतली. तेथें पंडितजनसमाज सभा होऊन शिव सर्वोत्तम, विष्णु सर्वोत्तम, हा विषय बोलणें चाललें होतें. तेव्हां रघुनाथपंत हे वैष्णव स्वतः असतां त्यांणीं शिव सर्वोत्तम हाच पक्ष अंगीकार करून शिव सर्वोत्तम हें स्थापून सर्वांचें समाधान केलें. विष्णुपक्ष निर्बल झाला असतां पंतीं पुनः वैष्णवपक्षीं बोलणें करून विष्णु सर्वोत्तम पक्षस्थापना केली आणि पुनः द्वैतवाद्यांस दूषणें देऊन अद्वैतप्रतिपादन केलें. तेव्हां मादण्णापंतांनीं बहुत संतुष्ट होऊन पंतांचा बहुत थोर विद्वान् जाणून गौरव करून स्तुति केली, 'आपण स्वामी सत्पात्र थोर आहां, ह्मणून कोठून आलां, काय अपेक्षित, ती आज्ञा करावी' असें अण्णांनीं विचारलें. ते समयीं यांणीं उत्तर केलें कीं, 'आह्मांस द्रव्याची किंवा भूमिग्रामजीविकेची अपेक्षा किमपि नाहीं. आपण बहुत सुज्ञ धर्मिष्ठ शास्त्रज्ञ आहां, आपणांशीं एकांतस्थळीं कांहींएक चर्चा चार घटका करावी इतकी मात्र इच्छा आहे.', असें बोलल्यावर अण्णा पंतांस एकांतीं घेऊन गेले. तेव्हां सांगितलें, 'आह्मी पंडित याचक नव्हे. शिवाजी महाराजाचे सेवक आहोंत. रघुनाथपंत

नामाभिधान. राजेसाहेबांकडे करनाटकचीं राजकारणें गेलीं आहेत, व या प्रांतींचीं आपलीं स्थळें पहावीं यास्तव चंजाऊर प्रांतीं त्यांस जावयाचें आहे योजून आपणाशीं व पादशाहींत स्नेह करावा, आपणापासून समयपरत्वें उपयोग पडावे, तिकडूनही इकडील उपयोग तेच पडावे असें चित्तीं धरून आपली भेटी घ्यावी अशी आज्ञा, यास्तव आलों आपण धर्मशील व राजे धर्मस्थापना करावी हा अभिमान धरितात त्यांस आपण सहाय असावें. आपणं प्रभु याचाही उपमर्द न करितां आपले प्रभूसहवर्तमान सख्य घडावें.' हें ऐकून मादण्णापंत पंतांवर बहुत संतुष्ट झाले. पंतांचें बोलणें व युक्ति थोर असोन असे प्रकारें येऊन ते भेटले; व महाराजांची कीर्ति पूर्वपरिचितच होती व यांचीही ऐकिली होतीच; तेव्हां मादण्णापंतांनीं बहुत आदरेंकरून बोलणीं होतीं तीं तदपेक्षापूर्वक ऐकून, त्याविषयीं सिद्धांत शपथपूर्वक स्नेह अक्षय चालावा, दोहोंकडील मनोदय सिद्धीस जावे असें करून पंतांस ठेऊन घेऊन सर्व लवाजिमा आणविला. पादशाहाची भेट करवून जातांना या मार्गे जावें, भेटी घडाव्या, असें करून मेजवानी वस्त्रें देऊन पादशाहासह पत्रें राजास दिलीं. याप्रमाणें राजकारण सिद्ध करून पंत निघाले आणि महाराजांचे दर्शनास आले.

महाराजास हें कळल्यावर ते पुढें सामोरे जाऊन सन्मानें करून पंतांस घेऊन आले. महाराजाकरितां त्या प्रांतींचे उत्तम पदार्थ आणिले ते पंतांनीं नजर केले. तो प्रांत बहुत सुवर्णाच्या होनाचा ह्मणून सुवर्णाचे विचोवे, चांदण्यास खांब सोन्याचे मढीव, व दिवट्या सोन्यारुप्याच्या शतावधि, तशा अंबाऱ्या हौदे व चवघड्याचीं सामानें नजर आणिलीं. खजीनाही आणिला, तें सर्व नजर केलें. महाराज बहुत प्रसन्न झाले. पंतीं करनाटक प्रांतांचीं व चंदी वगैरे स्थळांचीं राजकारणें आणिलीं होतीं तींही यथावकाश श्रवणारूढ केलीं. महाराज यांस राज्यसाधनाविषयीं प्रेमा व हव्यास. त्यांत राजकारणें पक्कीं करून घेऊन पंत भेटीस आले होते. व्यंकोजी राजाचा अव्यवस्थितपणा, पूर्वार्जित दौलत सर्व तेथें राहिली. शहाजी महाराजापाशीं पदार्थ राहिले ते यावे. राज्य पाहून नवीन संपादावें, तेथील बंदोबस्त पक्केपणें राहावा, ही उत्कंठा महाराजास झाली. आणि ते पंतांवर बहुत संतुष्ट झाले. 'मुजमूचा धंदा आपला परंपरागत तो आपणाकडे चालावा' असें पंतांचें बोलणें पडलें.

त्याजवरून वस्त्रें देऊन सांगितला, आणि चंजाऊर प्रांतीं जाण्याचा सिद्धांत करून तयारी करविली. बरावर पागा ४०,००० घेतली. तसेंच हाषमही घेतले. चतुरंगसेना बहुत तरतुदीनें घेतली. शत्रुपराभव करणें तेव्हां दैवावर भार घालून व्यवसाय करणें युक्त नव्हे. दूर जाण्याचें तेव्हां द्रव्य बहुत पाहिजे व सेना व राजकारण हीं तीनही दृढ असलीं पाहिजेत. राजकारणें पंत पक्कीं करून आलेच होते व सेना व द्रव्य हीं अनुकूल होतींच ह्मणून तींही बहुत घेतलीं. आणि 'मनसुबा कसा करावा, कसें जावें,' हें पंतांसह विचार करितां, पूर्वीं थोरथोर राजे शास्त्राधारें नीति करून चालत आले, तीं शास्त्रमतें पंतांनीं निवेदन केलीं. 'शत्रुपराभवास दोन कारणें मुख्य आहेत; एक दैव, व एक पुरुषप्रयत्न. त्यांत दैव हा पूर्वपक्ष, दैव पंगु होय. प्रयत्न हा सिद्धांत होय. कसें? तर जे उत्तम मुहूर्तें निघाल्या कार्यसिद्धि होती तर सेना आदिकरून कशास पाहिजे? सुमुहूर्तें एकटेंच जाऊन जय पावावें, ह्मणजे दैवप्रधान[वाद] प्रमाण; अथवा अन्य सामान्य जे जे जन यांणींही उत्तम मुहूर्तें करून राजाचा पराभव करावा तें तर घडत नाहीं; अथवा विजयप्रद मंत्र अनुष्ठानेंच करून जय होत असावा तें घडत नाहीं, यास्तव सैन्य, द्रव्य, अमात्य, मंत्रज्ञ हें मुख्य साधन. तेव्हां प्रयत्नच सबल पक्ष होय, आणि द्रव्य व प्रयत्न यांचें ऐक्यच आहे. एकास एक दोनही अनुकूल पाहिजेत, एक नसल्यास एकेंच करून सिद्धि होत नाहीं. रथास एकच चाक असल्यास रथ चालत नाहीं. यास्तव या अर्थीं पाहतां प्रयत्नावांचून दैवेंकरूनच कार्यसिद्धि होणार नाहीं तेव्हां मुख्य प्रयत्न; दैव त्यास साह्यभूत पंगु आहे; प्रयत्न करून सिद्धीस जातें ह्मणून दोन्हीची अपेक्षा धरून चालावें. दैव प्रयत्न पाहतां दोन्ही एकच होत.' असें पंत बोलले असतां महाराजही सर्वज्ञाण फारच मानवले. आणि सुमुहूर्त पाहून अनुष्ठानप्रयोगादि ब्राह्मणांस सांगून सर्व सैन्य उत्तम शूर सरदार कारभारी सामान पोख्त ऐसें घेऊन निघते झाले.

राज्याचा मागील बंदोबस्त केला. उभयतां पुत्र यांस ठेविलें, व मोरोपंत पेशवे, अण्णाजीपंत सुरनीस यांस मागें ठेविलें. दिल्लीस जातांना मागें यांणीं राज्यकारभार चालविला, हें जाणून राज्य त्यांचे स्वाधीन करून जवळ शत्रु होते त्यांशीं ज्या रीतीनें सख्य होईल तसें करून अथवा आपण गेले असतां मागें त्यांचा उपसर्ग न पडे. राज्य रक्षण

होय असें सर्व पाहून राजकारणें राखून फौजही पाहिजे तशी ठेविली. बहादरखान याशीं कांहीं शत्रुत्व होतें त्यासीं ममतेंत घेतला. विजापूरचा तह होताच. आपण निघून विजापूर देशांतून भागानगर प्रांतीं गेले. भागानगरास रघुनाथपंत यांस पुढें पाठविलें, समागमें निराजी रावजी दिले. उभयतां जाऊन भागानगर प्रांतांतून जातां प्रांतास तिलप्राय उपसर्ग लागूं न दिला. बहुतच कैदेंकरून दाणा वैरण लांकूड आदिकरून सर्वांनीं विकत घ्यावें. काडीमात्रास कोणी धक्का लावूं नये, बेकैदी केली असतां त्याचीं बोटें हात तोडावे, असा बंदोबस्त करविला. महाराजांची कैद आज्ञा उल्लंघन कोणी न करावी अशी होती. भागानगरासमीप गेल्यावर मादण्णापंत सामोरे येऊन आदरें करून यांच्या त्यांच्या भेटी झाल्या. पादशाहही दादमहालावर आले. महाराजही गेले. पादशाहाची व महाराजांची भेट दादमहालावर झाली. उभयतां गालीच्या टाकून एकासनीं बसले. बराबर महाराजांकडील बाबाराव सरनोबत व रघुनाथपंत व नीराजीपंत व दत्तोपंत वाकनीस व बाळाजी आवजी चिटणीस असे होते. त्यांसही बसण्याची परवानगी होऊन ते बसले. मादण्णापंत यांणीं पादशाहाकडून फारच निर्मळपणें स्वच्छता करविली.' महाराजांनींही सफाईनें भेट घेऊन परस्परें आदरेंकरून बोलणीं झालीं. बराबर लोक सरदार होते त्यांचा सन्मान करून त्यांस पादशाहानें दर्शन दिलें. उत्तम सेना पाहून आपले ठायीं पादशाहा बहुतच दंग झाले. तारीफ केली. लोक असे व त्यांस देणेंही तसेंच; तेव्हां मोठे मोठे धाडसाचीं कामें आंगेजणोनें होणें अशक्य काय आहे, ह्मणोन लोकांची तारीफ केली. 'हत्ती नामी किती आहेत ?' असें पादशाहानें विचारल्यावर मावळे लोक कंक, मालूसरे, मोठे मोठे सरदार पांच पन्नास हाजर लोक पोशाक सामान सुद्धां होते ते आणवून मुजरे करवून भेटविले आणि 'हेच हत्ती बाळगिले आहेत,' ह्मणोन महाराजांनीं उत्तर केलें. तेव्हां बादशाहांनीं बहुत आश्चर्य मानिलें. महाराजांची स्तुति फार केली. परस्परें स्नेहाचे रीतीनें बोलणीं होऊन शिवाजी महाराजांचा आपण सन्मान बहुत करून विडे पान वस्त्रें जवाहीर हत्ती घोडे पादशाहानें दिले. महाराजांचे अंगास आपले हातें अत्तर लाविलें. निखालसपणा फारच झाला. बराबर मातबर मातबर कारभारी होते, त्यांस वस्त्रें कंठ्या सिरपेंच दिले. सरदार यांसही वस्त्रें दिलीं. नंतर महाराज

निरोप घेऊन डेऱ्यास आले. एक महिना भागानगरास मुकाम होता. मादण्णापंत यांचे मार्फतीनें राजकारण त्यांचें नित्य महाराजांकडे येणें जाणें असें होतें.

महाराजांस व सर्व मुत्सद्दी सरदार यांस मादण्णापंत यांणीं मेजवानी करून भोजनास नेलें. सर्वांस वस्त्रें दिलीं. व महाराजांसही वस्त्रें जवाहीर हत्ती घोडे नजर केले. महाराजांनीं मादण्णापंतास मेजवानी करून वस्त्रें जवाहीर हत्ती घोडे व त्याजकडील मंडळीस वस्त्रें दिलीं; आणि शपथ होऊन निखालसता झाली. पादशाहासही महाराजांनीं डेऱ्यास आणून बहुत तरतूदीनें मेजवानी वस्त्रें जवाहीर व सर्व अमीर यांस यथायोग्य वस्त्रें जवाहीर दिलें. शपथ प्रमाण झालें. पादशाहांनींही 'पादशाहत तुमची होय; दुसरा विचार नाहीं;' असा करार उभयपक्षीं झाला. वरकडही भागानगरीं अमीन मनसबदार होते, यांची जसी योग्यता, जसा आदर करावा, तशा रीतीनें त्यांचे घरीं जाणें व त्यांस आणणें असें केलें आणि सर्व आपले लक्ष्यांत घेतले. सुदीन पाहून पादशाहाचा निरोप घेतला. निरोपास हत्ती पांच व घोडे पांच, वस्त्रें जवाहीर पोशाक पांच असा बहुमान महाराजांस शाहांनीं दिला. परस्पर एकविसी सहाय करावें याविषयीं शपथ प्रमाण होऊन निरोप घेतला.

भागानगरीं केशवबाबा महापुरुष होते. त्यांचे भेटीचा लाभ झाला. सत्पुरुषांचे ठायीं महाराजांचा बहुत आदर. त्यांचें कीर्तन हा उपदेशच होय असें जाणोन श्रवण करिते झाले. महाराजांनीं त्यांचा सत्कार द्रव्य वस्त्रें भूषणें देऊन केला. भागानगरीं वकीलीस प्रल्हादपंत ठेविले.

करनाटकप्रांतीं जाण्यास निघाले ते तुंगभद्रातीरास करनाळें कडपें येथें गेले. तेथें खंडणी पांच लक्ष होन घेऊन तेथून निवृत्तिसंगमीं स्नान करून श्रीशैलास गेले. अंतरपुरीवर सर्व फौज ठेवून सडे गंगास्नानास गेले. तेथें गेल्यावर बहुत रम्यस्थान पाहून तेथेंच वास करावा असें, योगभ्रष्ट महाराज, त्यायोगें त्यांस बुद्धि उत्पन्न झाली. कारभारी होते त्यांस बोलूं लागले जे, 'आमचे मनोरथ सर्व संपूर्ण श्रीजींनीं केले; उभयतां पुत्र आहेत; तुह्मी सर्व कारभारी प्रतिसृष्टिकर्त्ते असेंच आहां; तसेंच द्रव्यादि संग्रह सेना प्रांत किल्ले कोट हे संपादिले आहेत. याउपरी आमचे बुद्धीस परावृत्ति झाली कीं असे स्थानींच राहून वास करावा,'

असें बोलूं लागले. त्यावरून सर्वांस संकट निर्माण झालें. बहुतांनीं सांगणें विनंती करणें तसी केली असतां वृत्ति फिरेना. राजे सर्वज्ञ त्यांस सर्व अवगत. तेव्हां रघुनाथपंतीं श्रीची प्रार्थना केली. त्यासमयीं श्रीदेवी महाराजांचे अंगीं आविर्भवली आणि बोलली जे, 'तुजला या कर्मेंकरून मोक्षप्राप्ति व्हावयाची नाहीं. तुजपासून अमानुषकर्में दुर्घट करविलीं, आणखीं करावयाचीं आहेत. महत्कृत्य पुढें घडावयाचें आहे. धर्मस्थापना व प्रजापालन करावयास अधिकारी तुजला केलें आहे. मनीं कर्म धरिलें तें न धरावें,' असें झालें तें लिहून ठेविलें. तें श्रवण केलें आणि 'श्रीची आज्ञा असी झाली' ह्मणोन रघुनाथपंतीं व सर्वांनीं बहुत प्रकारें प्रार्थना केली. ते समयीं 'श्रीची इच्छा आज्ञा; ती करणें प्राप्त,' ह्मणून ते स्थळीं लक्ष ब्राह्मणभोजन करण्याचा संकल्प करून करविलें. धर्मही बहुत केला. घाट बांधविला. तपस्वी यांस स्नानसंध्यांस गुहा बांधविली. दहा बारा दिवस महाराज तेथें होते. याप्रमाणें करून तेथून दरमजल चंदीप्रांतीं गेले. येलूरचे ठाण्यास वेढा घातला. जवळ डोंगर चांगले होते ते पाहून किल्ले वसविले. त्याचें नांव 'साजरागोजरा' असें ठेविलें. येलूरास मोर्चे लावून जेर केले, तों शीरखान चालून आला. नरहरी बल्लाळ सबनीस यांस दहा हजार मावळे लोक देऊन किल्ल्यास मोर्चे लाविले ते तसेच कायम ठेवून आपण त्रिमली महालांत शीरखानावर गेले. शीरखान याजपाशीं पांच हजार पठाण तोलदार होते व हातीं द्रव्य बहुत होतें त्यांशीं झगडा झाला. महाराजांनीं आंगेंकरून तरवार घोडे चालून धारकरी यांजबराबर तरवार केली आणि शीरखान मोडून उधळला. गर्दीस मेळविला. त्याचे हातीं मुलुक होता तेवढा काबिज केला. पांच हजार घोडे, बारा हत्ती व द्रव्य मुबलग प्राप्त झालें. यश घेऊन माघारे आले तोंच येलूर नरहरिपंतीं फत्ते केलें.

नंतर महाराज निघून चंदीस गेले. वेढा घातला. मोर्चेबंदी केली. पूर्वीं रघुनाथपंतीं राजकारण पक्कें केलें होतें. आयास न करितां किल्ला वाकें लागला. विजापुराकडील त्या किल्ल्यांत खानखाना त्याचे लेक रूपखान व नासर महंमद होते ते कौल देऊन बाहेर काढिले. त्यांचे मतलबानीं करार केले त्या प्रमाणें, द्रव्य व देश कांहीं त्यांस देऊन समाधान करून स्थापिले. चंदी प्रांतांतील किल्ले कोट ठाणीं होतीं तीं

महाराजांनीं घेऊन विठ्ठल पिलदेव गोराडकर यांस सुभा चंदीचा सांगितला. रामाजी नलगे यांस किल्ल्याचा हवाला दिला. तिमाजी केशव यांस सबनिशी सांगितली. रुद्राजी साळवी यास इमारतीचें काम सांगितलें. याप्रमाणें चंदी प्रांत घेऊन बंदोबस्त करून महाराजांनीं आरंदीनजीक त्रिवापी कावेरीतीरीं येऊन मुक्काम केला.

संताजी राजे शहाजीराजे यांच्या नाटकशाळेचे पुत्र बहुत शूर शहाणे होते ते चंजाउरीं व्यंकोजीराजे यांजपासून निघोन महाराजांचे भेटीस आले. महाराजांनीं आपले बंधुच ह्मणून बहुत आदर करून भेट घेतली. सन्मान करावयाचे रीतीनें केला. जवळ ठेविले. त्यांचें अंतर्याम पाहून शुद्ध समजल्यावरून चंदीचें ठाणेंत मुख्य नेमून पाठविले आणि तेथूनच व्यंकोजीराजे यांस पत्र पाठविलें जे, 'आपलेकडील गोविंद भट गोसावी व काकाजीपंत व निळोबा नाईक व रंगोबा नाईक व तिमाजी इख्तियारराव असे भले लोक पाठवून द्यावे.' त्यावरून व्यंकाजीराजे यांणीं पाठवून दिले. त्यांजपाशीं महाराजांनीं सांगितलें जे, 'कैलासवासी महाराज यांणीं कैलासवास केला, त्यास तेरा वर्षें झालीं, महाराज यांचें द्रव्य जड जवाहीर हत्ती घोडे मुलुक हे रघुनाथपंतीं तुह्मांस राज्यीं बसवून पूर्ण तुमचे स्वाधीन केलें. ऐसीयासी तें पितृधन होय. आमचा अर्धा वांटा तुह्मीच आजपर्यंत उपभोग केला तो आह्मी तुह्मापाशीं मागावा तरी बहुत दूर होतों. बरें बोलून तुह्मी देणार नाहीं ह्मणून आजपर्यंत बारा तेरा वर्षें आह्मीं सबूरी केली. मनामध्यें विचार केला जे, तुह्मी महाराजांचेच पुत्र आहां. खातील तों पावेतों खावेत. मालाचे धणीच आहांत. आह्मांस जे समयीं पाहिजे व फावेल तेसमयीं मागून घेऊं असें मनीं धरलें होतें. ऐसीयासी राजकारणप्रसंगें करून आह्मी कुतुबशहाचे भेटीस भागानगरीं आलों. तेथून करनाटकांत आलों. या प्रांतीं येऊन चंदी घेतली. वरूणतर्फेचा मुलुक हस्तगत केला. शेरखान झगड्यास आला. त्यास गर्दीस मेळविला. त्याचे हातीं प्रांत होता तेवढा घेतला. कावेरीतीरीं येऊन भले लोक पाठवावे असें तुह्मांस लिहिलें त्यावरून तुह्मीं पाठविले. त्यांस 'याप्रमाणें जाऊन आमचा निरोप सांगावा,' ह्मणून सांगून पत्रेंही त्याअन्वयें दिलीं आणि त्यांजबरोबर आपलेकडील बाळंभट गोसावी व कृष्ण जोसी व कृष्णाजी सखोजी असे देऊन रवाना केले. त्यांणीं जाऊन

महाराजांचें बोलणें व सर्व वृत्तांत सांगितला असतां ती गोष्ट मनांत न आणितां कपटबुद्धी करून व्यंकोजीराजे आपणच खासा भेटीस निघोन आले, आणि नम्रत्वें बोलून वांटणीचें बोलणें न करितां सारेंच आपण खावें असा चित्तीं निश्चय धरिते झाले. महाराजांनीं बहुता रीतीनें बोलविलें परंतु वांटा द्यावा हें अंतःकरणीं न येई. तेव्हां महाराजांनीं विचार केला जे, 'हे धाकटे भाऊ; आधीं बोलणीं निश्चयांत आणून यावें ते आधींच आपण बोलून भेटीस आले. यांस धरावें, वांटा घ्यावा तर ही गोष्ट थोरपणाचे इज्जतीस लायक नाहीं.' यानिमित्त वस्त्रें बहुमान देऊन निरोप दिला. बरोबर पात्रविण्यास रूपाजी भोंसले व मानसिंग मोरे व अण्णाजी रंगनाथ केळकर दिले. व्यंकोजी राजांस चंजाउरास पोंहचवून ते आले.

व्यंकोजीराजे गेल्यावर पुनः महाराजांनीं शामजी नाईक पुंडे व कोनेरीपंत व शिवाजी शंकर या हातें बहुता रीतीनें सांगून पाठविलें कीं, 'तुह्मी व आह्मी वांटे करून घेऊं. परस्परें समाधानानें राहावें. गृहकलह वाढविलिया उभयपक्षींही वाईट. कष्ट होत. पूर्वीं पांडव कौरव बहुत कष्टी झाले, हें मनांत आणून कलह वाढवूं नये. आह्मी आपला पितृधनाचा अर्धा वांटा मागतों तो द्यावा. हें न करितां धर्म सोडून आमचा अर्धवांटा आजपर्यंत खादला, पुढें खाऊं इच्छितां, हें विहित नाहीं.' असें सांगून पाठविलें असतां उत्तर यथास्थित न करितां त्यांस लाऊन दिलें. महाराजांनीं विवेक केला जे, 'आपणच आलों ते भेटीस येऊन गेले. कनिष्ठ बंधु त्यांजवर जातीनें जाऊन पुरुषार्थ करणें विशेष नव्हे' असें समजून उपेक्षा केली.

यानंतर आरंदीनजीक त्रिवापी कावेरीतीरीं याच मुक्कामीं रघुनाथपंतास पुढें या राज्याचें भविष्य कसें आहे हें महाराजांस प्रार्थना करून देवी आणून विचारावें असी इच्छा होऊन त्यांनीं विचारिलें. शालिवाहन शके १५९५ प्रमाथीनाम संवत्सरे चैत्र बहुल त्रयोदशी भौमवार तेदिवशीं महाराजांचे अंगीं श्रीभवानी आविर्भाव होऊन भविष्य सांगितलें. तें वाक्य बाळाजी आवजी चिटणीस व वाकनीस यांणीं लेहून ठेविलें:—

१ देशीचें राज्य नाम्र घेईल. रायगड जाईल. संभाजी राजा सांपडेल. हैराण होतील.

१ पुढें मागती राजा शिव नामें होईल. दिल्लीपावेतों राज्य घेईल. एकराज्य करील.

१ चंदीस राजाराम राज्य करील. चंदीचे राजाकडून मागती देशीचें राज्य प्राप्त होईल.

१ पुढें भोंसले यांचें राज्य सत्तावीस पिढ्या होतील. एक हजार वर्षपर्यंत शक चालेल.

१ पूर्वजन्मीं शिवाजीनीं सत्तावीस कावडी स्वांगें भागीरथीच्या आणून रामेश्वरीं घातल्या व सत्तावीस जन्में श्रीभवानीस शिरकमळें वाहिलीं.

१ या पुण्येंकरून सत्तावीस पुरुष भोंसले यांचें राज्य चालेल. सत्ताविसावा पुरुष गर्भांध होईल. तो राज्य सर्वस्वी बुडवील.

एकूण कलमें सहा.

याप्रमाणें श्रींनीं अंगीं येऊन, रघुनाथपंत हणमंते यांणीं श्रींस प्रार्थना केली त्यावरून सांगीतलीं तीं लिहिलीं आणि गुप्तरूपें महाराजांस दाखवून ठेविलीं.

महाराजांनीं चंदी आदिकरून मोठीं मोठीं संस्थानें व किल्ले साध्य केले. येलूरचा किल्ला बहुतच मजबूत, ज्याचे खंदकांत पाणी, त्यांत सुसरी, असा बळकट होता तोही घेतला. महाराजगड व देवगड करनाटकगड हेही घेतले. दोन चार कोटींचें राज्य साधिलें.

इतक्यांत दिल्लीस वकील व वातमीदार होते त्यांचीं पत्रें आलीं जे, 'पादशाहास दक्षिण प्रांतीं जाण्याची इच्छा अंतर्यामीं निर्माण होऊन फौज मोठी तयारी करून ते आपले प्रांतांत किल्लेकोट याचे बंदोबस्तास ह्मणून निघणार.' निघाले हें वर्तमान समजलें तेव्हां, 'देशीं जावें, आपला बंदोबस्त राखावा,' ह्मणून महाराजांनीं निघावयाचा विचार करून चंदीचें वगैरे राज्य सोडविलें. तेथें संताजीराजे व रघुनाथ नारायण हे मुख्य करून ठेविले व हंबीरराव सरनोबत व कांहीं फौज तेथें ठेवून पक्का बंदोबस्त होऊन वहिवाट होईपर्यंत सारी फौज नेणें ठीक नाहीं जाणून दहा हजार फौजेनिशीं सरनोबत यांस ठेविलें आणि महाराज घांट चढून कोल्हार बालापूर तालुक्यांत आले. तेथें ठाणीं घातलीं, प्रांत काबिज केला व किल्ले कोट घेतले. नवे किल्ले डोंगर चांगले पाहून वसविले. त्या प्रांतींचे पाळेगार कित्येक गर्दीस मिळविले व ज्यांणीं खं-

डणी सालाबाद करार केली त्यांस स्थापिलें. प्रांत घेऊन त्या प्रांतीं कांहीं फौज सुद्धां मानसिंग मोरवे व रंगो नारायण यांस ठेविलें. अरणीचा कोट वेदो भास्कर यांजकडे शहाजी महाराज यांणीं दिला होता त्याप्रमाणें महाराजांनीं त्यांचे पुत्र आठजण होते ते येऊन भेटले. त्यांस बहुत मर्द शूर कर्त्ते पाहून तो तालुका प्रांत सुद्धां तीनलक्ष होनाचा इनाम करून देऊन, सेवा सांगून चालविला. त्यांणीं त्याप्रांतीं फौज ठेऊन प्रांत रक्षावा, सेवा करावी, असें केलें. श्रीरंगपट्टण वगैरे खंडण्या घेऊन गदग लक्ष्मेश्वर येथें आले. दोन कोट घेतले. खानगौडा देसाई पळून गेला. गदग प्रांतीं आले. बलवेड कर्यातीचे मार्गे येतां मलवाई देसाईण इनें महाराजाचे कहीकबाडास उपसर्ग दिला हें वर्तमान कळतांच बलवेड यास मोर्चे दिले. सत्तावीस दिवस कोट भांडला. नंतर घेतला. ठाणें घातलें. मलवाई देसाईण धरली. 'स्त्रीस शिक्षा काय करावी?' ह्मणून एक दोन गांव खाऊन असावें ऐसी हलकूद करून राखिली.

कोल्हार प्रांतींचा बंदोबस्त करून महाराज पुढें येतां विजापूरकरांकडील हुसेनखान माईणा व लोदीखान दहाहजार स्वारांनिशीं आपला प्रांत चंदी वगैरे घेतला ह्मणून चालून आले. त्यांस तंबी पोहोंचवून मोडून गर्दीस मेळविले. घोडे हत्ती पाडाव करून तेथून कोपलतुंगभद्रातीरीं महाराज आले. कितीक पुंड पाळेगार यांजपासून खंडणी घेऊन पादाक्रांत करून आपलेसे केले. वर्षासन खंडणी देण्याचे धारे बांधिले. बावलीखान पठाण आपले प्रांतावर चालून जातो हें वर्त्तमान महाराजांस कळतांच निळोजी काटकर यांस फौजसुद्धां त्याजवर पाठविले. त्यांणीं दुर्गाबाज येथें गांठिलें. युद्ध झालें. बावलीखान यास बुडविलें.

त्यासमयीं व्यंकोजीराजे कावेरीतीरीहून निरोप घेऊन गेले होते. महाराजांस मनसब्याचे रीतीनें देशीं येणें प्राप्त व आपणच त्यांजवर मसलत करणें ठीक नाहीं जाणोन निघून आले. पत्रें व शामजी नाईक पाठविले असतांही त्यांचें अंतःकरण शुद्ध झालें नाहीं. महाराज तोरगळप्रांतीं येऊन पोंहचले असतां तिकडे संताजी भोंसले व रघुनाथपंत व हंबीरराव सरनोबत त्या प्रांतीं ठेविले होते, त्यांजवर व्यंकोजीराजे यांणीं कांहीं मोंगली फौज व मोंगलांकडील सरदार यांशीं राजकारणें करून, दुर्बुद्धी करून तुरुख लोक मेळविले, आणि त्यांचे बुद्धीस

लागून जवळ मुत्सद्दी हलकीं नाकाबिल माणसें यांचे सल्लेनें खासा आपणच चालून आले. युद्ध करावें ही बुद्धि धरून आपली सारी जमायत एकवठ करून येऊन वालगोंडापुर येथें व्यंकोजीराजे पोहोंचले. तेव्हां महाराजांकडील फौज चालून रघुनाथपंत व सरनोवत सर्व मिळोन पुढें गेले. कित्येक प्रकारें सांगून पाठविलें परंतु विचार न करितां महाराजांनीं प्रांत सोडविला हा सारा आपणाकडे असावा हेंच चित्तीं भरून चालून घेतलें. पंत यांणीं मर्यादा रक्षून लढाई द्यावी ह्मणतां, तुरुख लोक यांणीं निकड केली, तेव्हां महाराजांचा बचाव राखून घोडे चालवून फौज मोडून गर्दीस मेळविली. व्यंकोजीराजे यांजकडील प्रतापजी राजे व भिवजी राजे व शिवाजीपंत डबीर ऐसे तिघे पाडाव केले. कित्येक मारिले. पराभव पाऊन, व्यंकोजीराजे शेंदोनशेंनिशीं त्यांस कसें धरावें ह्मणून मर्यादा केली ह्मणून पळोन गेले. हें वर्तमान सरदार व पंत यांणीं मुकाममजकूरीं महाराजांस सविस्तर लिहून पाठविलें. तेव्हां राजे यांस पत्रेंही लिहिलीं जे, 'या उपरी वांटयाचा वगैरे निर्गम करावा. नाहींतर चंजाऊर सुद्धां अमल बसवणें प्राप्त आहे.' महाराजांस वातमी येऊन पावल्यावर व्यंकोजी राजे यांस त्यांणीं पत्र निषेधयुक्त पाठविलें जे, 'तुह्मी महाराजांचे पुत्र बहुत थोर लोक. असें असून, कांहींच विचार करीत नाहीं. धर्माधर्म विचारीत नाहीं. ऐसें करितां कष्टी व्हाल. तुह्मी ह्मणाल कीं काय विचार करावा, तर ऐसा विचार करावा कीं अधर्मेकरून आपण आजपर्यंत खादलें, आतां अर्धा वांटा मागतात तो द्यावा. त्याचा भाग त्यास देऊन आपण सुखरूप राहावें. श्रीमहादेव व श्रीतुळजा भवानी यांची त्याजवर पूर्ण कृपा झाली आहे. दुष्ट मूर्ख लोक त्यापुढें कसे जगूं पहातील हा विचार करायाचा होता आणि युद्धप्रसंग पाडायाचा नव्हता. दुर्योधनाची बुद्धी करून लोक मारविले. सेवकाहातीं अपजय पावून लौकिक करून घेतले. पुढें तरी या जातीचा हट्ट न करणें. कित्येक प्रांत आमचे आह्मीं घेतले. आरणी, बेंगरूळ, कोल्हार, वोसकोटा, सिरकटे, किरकोळ जागा व चंजाऊर असे आमचे हातीं राहिले ते आमचे विभागाचे. आमचे लोक त्याचे स्वाधीन करावे. नगद व जडजवाहीर हत्ती घोडे याचा अर्धा वांटा, महाराजांचे हातची वस्तुमात्र, विचार करून आह्मांस देऊन तुह्मीं निर्मळपणें असल्यावर आह्मीं आपणापासून तुंगभद्रापलीकडे पनाळप्रांतीं

तीनलक्ष होनांची दौलत तुह्मास देतों. अथवा हा न माने तरी कुतुब-शहासी बोलावून त्याजपासून तुह्मास तीनलक्ष होनांची दौलत देववितों. दोहींतून एक मनीं धरून मान्य करणें. हटाचे हातीं न देणें. आपणांत आपण गृहकलह करावा आणि कष्टी व्हावें याचें प्रयोजन नाहीं. या उपरी तरी आपला आमचा संधिव्यवहार करावा. अशी बुद्धि मनीं धरून वांट्याचा व्यवहार निर्गमांत आणून टाकणें आणि सुखरूप असणें. गृहकलह बरा नव्हे. आह्मीं तरी वडीलपणें आजपर्यंत सांगितलें. आतांही सांगतों. ऐकाल तर बरें आहे. तुह्मीच सुख पावाल. न ऐकाल तर तुह्मीच कष्टी व्हाल.' याप्रमाणें लिहून कित्येक पर्याय पाठविले. व रघुनाथपंतासही, 'याउपरी तह करून घ्यावा. ते खातात ते महाराजांचे पुत्रच आहेत. तटी न लावतां त्यांचा स्वरूपनाश न करितां आब राखून सख्य करणें.' असें लिहून पाठविल्यावर व्यंकोजी-राजे यांचेमागें महाराजाची फौज गेली होती, बोलणें लागलें होतें, तों महाराजांचें पत्र निषेधाचें गेलें तें पाहून, 'वडील बंधू वडिलाप्रमाणें व त्यांचें दैवही विचित्र. त्यांशीं कलह करणें हें चांगलें न झालें. आपण केलें कर्म सर्वांचे बुद्धीस लागलें हें फार वाईट केलें.' याप्रकारें बहुतच पश्चात्ताप होऊन व्यंकोजी राजे यांनीं संधीचें राजकारण लाऊन तह ठरविला. रघुनाथपंताची भेट व्हावीसें केलें.

भेट झाल्यावर पंतीं आड घातली कीं, 'आह्मी शिवाजी महाराजांचे सेवक, तुह्मी त्यांचे धाकटे बंधु; आमची भेट होणें ते महाराजाचे इरा-द्याप्रमाणें बरावरीहून अधिक व्हावी.' तेसमयीं व्यंकोजीराजे यांणीं मान्य केलें. मध्यें डेरे देऊन तिकडून राजे हत्तीवर बसोन आले तसेच आप-णही (रघुनाथपंत) अंबारींत बसोन मागें सरनोबत व संताजी भोंसले यांच्या अंबाऱ्या ठेऊन पोशाक वगैरे जिलिबी निशाणें, एकसारखे करून ते जितके चालले तितकेच आपण चालून डेऱ्यासमीप बरावरीनें आले. हत्तीवरून उतरणें ते राजे उतरल्यावर आपण उतरले. डेऱ्यांत बराब-रीनें हात धरून आले. मसनदी दोन करविल्या होत्या. भेटी झालि-यावर बसावयास मसनदीपाशीं उभयतां बराबरीनें हात धरून गेले तेव्हां पंतांनीं हात सोडून घेऊन, 'या मसनदीचे आह्मी चाकर. यांजवर बसण्यास योग्य तुह्मीच,' ह्मणोन राजे यांस बसवून आपण मुजरे करून पूर्वमर्यादेप्रमाणें बसले. 'जसे शिवाजी महाराज तसेच तुह्मी आह्मास

साहेबापासून गेलियावरी अर्धासनीं बसण्यास योग्य ऐसे चाकर आहों, असें बोललों तेव्हां स्वामीनीं, तुह्मी चाकर; सांगूं तितकें काम करावें, असें सांगितलें, ह्मणून इतकें करावें लागलें. वरकड चाकर तसे आह्मी चाकर नव्हे, असे समजोनच वडिलीं पालिग्रहण केलें आहे तसेंच आपणही करावें. आह्मी तुमचे हितावांचून प्राणही गेला तरी चालावयाचे नव्हे. व स्वामी वांकडे चालले असतां विनंति करण्यास चुकावयाचे नाहीं. आह्मीही संस्थान व राज्य साधण्याविषयीं विनंति करीत गेलों. आपण न ऐकिलें. लहान माणसांचेंच पथ्य पडत गेलें. महाराज पराक्रमी सांगतांच दूर देशीं असतांही राज्य साधावें, पराक्रम करावा, म्लेंछ दुष्ट संहार करावे, धर्म स्थापावा, हीच त्यांची वासना; तसीच हिंमत करून त्यांनीं आमची विनंति मान्य करून येऊन तीन चार कोटींचें राज्य संपादिलें. तुमचे ठायीं महाराजांचा मोह बहुत. इतर भावना किमपि नाहीं. बहुत लोभ ममता आहे. वारंवार आह्मांस लिहिणीं येतात. या उपरि स्वच्छपणें पूर्वीं जसें श्रीरामचंद्रजीचे आज्ञेंत श्रीलक्ष्मणभरत चालले तसें चालत जावें हाच आपला धर्म. येणेंकरूनच वृद्धीस पावाल. हरएक कारण पडल्यास आह्मांस आज्ञा करीत जावी. ते समयीं आह्मीं सेनासह येऊन कार्य करूं. आह्मांस जसे महाराज, तसेच तुह्मी. दुसरा विचार नाहीं. कार्यप्रयोजनाव्यतिरिक्त उगेच लोकाहातीं निष्कारण खाटाऊं नये. महाराजांप्रमाणेंच उद्योग धरून राज्य साध्य करावें.' असें कित्येक प्रकारें बोलोन निरोप घेऊन निमे प्रांताचा ऐवज त्यांजकडील येत जावा, असें करून घेऊन 'पूर्वींचे पदार्थ हत्ती घोडे जवाहीर मर्जीस येईल ते महाराजांस रवाना करावे,' असें सांगून पंत निघून आले. चंदी प्रांतीं पावले.

इकडे महाराज यांणीं तोरगल प्रांतांतून पनाळ्यावरून सातारा प्रांतीं येऊन श्रीस्वामीचें दर्शन करून प्रतापगडीं श्रीदेवीचें दर्शन केलें आणि रायगडास आले. मातुश्रीचें दर्शन घेऊन तिजला तिकडील सर्व वृत्त निवेदन केलें. उत्तम पदार्थ आणिले ते दाखविले व द्रव्यही बहुत आणिलें तें सर्व निवेदन केलें. आणि भागानगरीं पादशाहास व मादण्णापंतास लिहून पाठविलें जे, 'करनाटक प्रांतींची स्वारी करून यश व प्रांत घेऊन स्वदेशीं येऊन सुरक्षित पोहोंचलों. त्याजवरून त्यांणीं वस्त्रें बहुमान हत्ती घोडे जवाहीर देऊन निराजीपंत तेथें ठेविले होते ते व

आपलेकडील वकील असे पाठविले. महाराजांनीं वकीलास बहुमान करून निरोप दिला.

महाराज देशीं आल्यावर कांहीं दिवशीं करनाटक प्रांतीं फौज व सरनोबत यांस बाकी फौज घेऊन हुजूर येण्याविषयीं त्यांस त्यांणीं लेहून आणविलें. ते निघून देशीं महाराजांचे दर्शनास येतां मार्गीं हुसेनखान माईणा व लोदीखान चालून त्यांस आडवे झाले, त्यांस सरनोबत त्यांणीं युद्ध करून मोडिले. हुसेनखान व लोदीखान उभयतां पाडाव केले. फौज लुटली. फत्ते पावून त्यांस घेऊन आले. महाराज बहुत संतोषी होऊन सामोरे जाऊन त्यांची त्यांणीं भेट घेतली. सर्वांचा आदर करून ज्यांणीं ज्यांणीं जसी सेवा केली होती तें जाणून त्याप्रमाणें त्यांस बक्षिसें बहुमान तैनाती वाढविणें ते महाराज करिते झाले. हुसेनखान व लोदीखान यांस वस्त्रें बहुमान देऊन खर्चास व लवाजमा देऊन विजापुरीं जाण्यास निरोप दिला.

याप्रमाणें महाराजांनीं दक्षिण प्रांत सर्व एक राज्य पश्चिमसमुद्रापासून श्रीरामेश्वरापर्यंत दक्षिणेसीं एक आज्ञा असें केलें. याप्रमाणें दक्षिणदिग्विजय षष्ठ प्रकरण समाप्त.

---

## श्रीशिवछत्रपतिराज्याभिषेकप्रकरण सप्तम.

श्रीशिवाजीमहाराज यांणीं दक्षिणप्रांतीं जाऊन चंदी वगैरे स्थळें हस्तगत केलीं. बरकड मांडलिक राजे पाळेगार सर्व पादाक्रांत झाले. करभार खंडणी प्रतिवर्षीं द्यावयाची त्याचीं वार्षिकें बांधलीं. विजापूरची पादशाहात सर्व हस्तगत झाली. महाराजांस भागानगरचे पादशाहाशीं सख्य बहुतच अकृत्रिम जाहलें. दौलताबादची पादशाहात दिल्लीचे पादशाहांनीं पूर्वीं घेऊन सुभे ठेविले तेही पराक्रमेंकरून बुडवून, त्याचे प्रांतांतील किल्ले व स्थळें महाराजांनीं बहुत घेतलीं. सुभे बुडविले. दिल्लीस जाऊन पादशाहाची हिम्मत व कर्तृत्व पाहिलें साडेसहा सुभे दक्षिणप्रांत यांत बहुतकरून राज्य आपणास हस्तगत झालें. राहिलें त्यांत चौथाई मोकासा बाबती घासदाणा साहोत्रा ऐसे तह आपले जबरीनें करून निमे अंमल आपलें स्वराज्य त्यांतही सामील झालें. एक दिल्लीपति राहिले, त्यांचाही उपमर्द आपण केला. त्यांणीं जे जे सरदार पाठविले ते मारून गर्दीस नेले. रामेश्वरपर्यंत एक साम्राज्य आपण केलें. याउपरि

आपण असे रीतीनें राज्य केलें तर पाळेगारांतच संख्या आपली होती. यास्तव याउपरि राज्याभिषेक करून छत्रसिंहासन करून पूर्वी धर्मकरून राजे राज्य अष्टप्रधानयुक्त करीत आले तसें करावें हें महाराजांनीं अंतः-करणांत आणून उद्योग करण्यास प्रारंभ केला.

या समयांत दिल्लीहून औरंगजेब बहुत प्रकारची फौज घेऊन तरतुदीनें निघाले, तेव्हां त्यांनीं मनीं विचार केला कीं, 'दक्षिणप्रांतीं जाण्यास विजापूरची पादशाहात बुडाल्यांतच जमा आहे. शिवाजीराजे यांणीं त्याचा सर्व प्रांत व स्थळें घेतलीं असतां, त्याशींच ते सख्य करून स्थळ रक्षून राहिले आहेत. भागानगरचे पादशाह, त्यांची त्यांची भेटी होऊन उभयतांत अतिसख्यत्व मादण्णापंत तेथील वजीर त्याचे योगें जाहलें, तेव्हां दोन्ही उद्योग केले असतां शिवाजी राजे त्याचें साह्य करणार, त्याअर्थी जावें तरी त्याजवरीच मोहीम करावी. त्यांणीं आपल्या फौजा व सरदार गेले ते नामोहरम केले. आपण जाऊन त्याशीं बळें लढावें तरी शिवाजी दैववान्, फौज खजिना त्याजपाशीं बहुत, त्यांतही उमराव सरदार मुत्सदी जवानमर्द मनसबबाज बहुत आहेत; त्यांचा पराभव या काळीं आपले हातें घडावयाचा दिसत नाहीं. जातीनें खबरदार असा कीं, विजापूरकर याचें सर्वस्व घेऊन ईहसान त्याजवर केलें. भागानगरकर तरी तेच असे झाले. तेव्हां याचें साह्य ते सर्व प्रकारें करितील. यास्तव आपलेच प्रांतीं राहून बंदोबस्त करावा. आपण त्या प्रांतीं चाल केली असतां, ते आमच्या प्रांतावर चालून येण्यास चुकणार नाहींत. ह्मणून किल्ले रणथंबोर मातबर जागा, किल्ला बहुत मजबूत, तेथील सुभेदार पादशाहाशीं बदलून हुकूम न मानितां राहिला होता, त्याचें पारिपत्य करावें हा विचार सर्व वजीर आदिकरून उमराव यांचे विचारें करून त्या प्रांतीं औरंगजेब गेले.

एके दिवशीं वजीर सर्व मिळून 'कशी मसलत करावी?' ह्मणून विचारास बसले. तों मोर्चेलबारदार इलाचीबेग ह्मणून मोर्चेल घेऊन मागें उभा होता तो पुढें येऊन त्याणें अर्ज केला जे, 'हजरतीस इतका विचार कां पडला! मजला पाठवावें. दोन फर्मान, एक किल्लेदार यास व एक लोकांस, ऐसे दोन द्यावे. एकटाच जाऊन किल्ला फत्ते करून येतों.' त्याजवरून त्यास नावाजून दोन फर्मान दिल्हे आणि वस्त्रें देऊन रवाना केला. तो एकटाच किल्ल्यावरी गेला. वरतीं जाऊन त्याणें किल्लेदार यास एकीकडे 'हुकूम सांगावयाचा आहे'

ह्मणोन उठवून नेला, आणि तेच स्थळीं कटार चालवून त्याचा गळा कापिला. मग त्याचें शिर रुमालांत घेऊन तो बाहेर आला आणि 'हरामखोर, सरकारहुकूम यानें अमान्य केला यास्तव यास मारिला. तुह्मांस पादशाही फर्मान आहेत.' असें ह्मणून त्यानें ते काढून देऊन सर्वांच दिलासा केला. किल्लेदार याचा लेक यास खातरजमा करून तो पादशाहापाशीं येऊन पोहोंचला. वर्तमान समजाविलें. पादशाहांनीं किल्लेदार याचे लेकास किल्लेदारी सुभा दिल्हा, आणि 'याउपर हुकुमाखेरीज न चालावें,' असें सांगितलें. इलाचीबेग यांणीं शर्त केली, परंतु त्यास समीप सेवेमध्यें ठेवणें ठीक नाहीं असें वाटून त्यास वाढवून दूर ठेवावा ह्मणोन सरदारी देऊन वाढविला. आणि तेथें छावणी करून पादशाहा राहिले. शिवाजी राजे यांचा प्रताप मोठा व फौज पराक्रमी याकरितां दक्षिणप्रांतीं जाणें ठीक नाहीं, ह्मणोन त्या प्रांतींच पादशाहा राहिले.

नंतर हें सर्व वर्तमान वकील यांणीं हरघडी बातमी अंतरंगची व बाह्यांगची अशी घेऊन लिहिली, त्याजवरून महाराजांनीं विचार केला कीं, 'दिल्लीपति याजवर आपलें तेज पडलें, आतां आपण सिंहासनाधीश्वर व्हावें. आपलेपाशीं सर्व सरकारकून, मंत्रविशारद, शूर, निपुण राजकार्याचे ठायीं दक्ष, जनाचे ठायीं दया, परोपकारकर्ते ऐशांचा संग्रह झाला, तो किती? अमात्य व सेनाधिकारी तो किती? एक एक योग्य असें चतुरंग सेना, व कोश द्रव्य असावें तसा संग्रह जाहला तो किती! सरकारकून व सरदार व प्रांत कोण कोण किती प्राप्त झाले? ते समजण्यास महाराजांनीं निवडून काढून पाहिले. ते बितपशील.—

१ मोरो त्रिमल पिंगळे पेशवे.
२ रामचंद्र नीलकंठ.
३ रघुनाथ नारायण पंडितराव.
४ अण्णाजी दत्तो.
५ बाळाजी रघुनाथ.
६ नरहर बल्लाळ सबनीस.
७ रावजी सोमनाथ सुभे.
८ त्र्यंबकाजी दत्तो.
९ जनार्दनपंत हणमंते मजमदार.
१० दत्ताजीपंत वाकनीस.
११ बाळाजी सोनदेव.
१२ शामजी नाईक पुंडे पोतदार.
१३ शंकराजी नीलकंठ.
१४ रघुनाथ बल्लाळ कोरडे.
१५ कृष्ण जोशी.
१६ नरहर आनंदराव.
१७ निराजी रावजी.
१८ प्रल्हाद निराजी.

१९ बाळाजी आवजी चिटणीस.
२० चिमणाजी आवजी दप्तरदार.
२१ गंगो मंगाजी पागे.
२२ प्रभाकर भट उपाध्ये.
२३ दत्ताजी गोपीनाथ वोकील.
२४ अण्णाजी रंगनाथ केळकर.
२५ विठ्ठल पिलदेव गारुडकर.
२६ तिमाजी केशव सबनीस.
२७ कोन्हेरपंत.
२८ त्रिंबक भास्कर.
२९ शिवाजी शंकर.
३० कृष्णाजीपंत मथुरे.
३१ काशीपंत मथुरे विश्वासराव.
३२ विसाजीपंत मथुरे.
३३ शिवभट उपाध्ये.
३४ बाळंभट गोसावी उपाध्ये.
३५ कृष्णाजी सखाजी.
३६ शामजी आवजी कारखानीस.
३७ येसाजी गोविंद.
३८ शामराज पद्मनाभ.
३९ गोविंदभट उपाध्ये.
४० कृष्णंभट गोसावी उपाध्ये.
४१ रघुनाथपंत.
४२ नारो सदाशिव.
४३ अण्णाजी मल्हार.
४४ दाजी आनंदराव.
४५ शामजी सदाशिव.

या प्रकारें पराक्रम केलेले थोरथोर लिहिले. आणखीही बहुत सुभे, मामले, किल्लेकोटांत महालदार, कारखानदार; असंख्यात कर्ते माणूस झाले आहेत.

## सरदार नामांकित—वितपशील.

१ हंसाजी हंबीरराव मोहिते सरनोबत.
२ सावाजी भोंसले शिंगणापुरकर.
३ रूपाजी भोंसले सरकारी सरदार.
४ मानसिंग मोरे.
५ जयसिंग पालकर.
६ आनंदराव निंबाळकर.
७ बाजी मोहिते.
८ पदाजी काटकर.
९ नेतोजी काटकर.
१० रामोजी शिरके.
११ वाघोजी शिरके.
१२ हरजी राजे महाडिक.
१३ महादाजी नाईक निंबाळकर.
१४ खंडेराव दाभाडे.
१५ खंडोजी आटोळे.
१६ गणोजी दरेकर.
१७ कान्होजी आंग्रे.
१८ संताजी घोरपडे जुमलेदार.
१९ गोंदजी जखताफ.
२० संताजी जखताफ.
२१ बाजी नलगे.
२२ मालोजी नलगे.
२३ संभाजी कावजी.

२४ परसोजी भोंसले.
२५ भुजबळराव.
२६ अेरेराव.
२७ बहिरजी घोरपडे.
२८ संभाजी काटकर.
२९ सूर्याजी काटकर.
३० रायजी गडधे.
३१ देवजी उघडे.
३२ केरोजी पवार.
३३ गोमाजी नाईक पानसंबळ.
३४ संताजीराव भोंसले, शाहाजी महाराजांचे नाटकशाळेचे लेक.
३५ महादाजी नायक पानसंबळ.
३६ मकाजी आनंदराव पालक लेक.
३७ पिलाजी शिर्के.
३८ तानाजी शिर्के.
३९ पिलाजी शिर्केचे लेक गणोजी.
४० संभाजी शिर्के.
४१ जेसिंग पालकर.
४२ आनंदराव हफ्तहजारी.
४३ आचलोजी राजे महाडिक.
४४ तुकोजी पालकर.
४५ येसाजी थोरात.
४६ नेमाजी शिंदे.
४७ मुधोजी खाजणकर.
४८ धनाजी जाधवराव.
४९ तैलंगराव पागे सरदार.
५० त्र्यंबकाजी खांडेकर जुमलेदार
५१ सोमवंशी.
५२ कान्होजी भाडलकर.
५३ बहिरजी नाईक इंगळे.
५४ खंडोजी जखताप.
५५ बुबाजी पवार.
५६ कृष्णाजी घाटगे.
५७ कृष्णाजी पवार.
५८ मालोजी निंबाळकर.
५९ हिरोजी सेलके.
६० खापणे.
६१ बहिरजी बांडगे.
६२ बळवंतराव देवकांते.
६३ परसोजी शितोळे.
६४ रायाजी नलगे.
६५ येसाजी खांडेकर.
६६ अमदोजी पांढरे.
६७ अमृतराव निंबाळकर.
६८ बाळाजी नाईक निंबाळकर.
६९ भवानराव देवकांते.
७० माहाणेवर.
७१ कांकडे.
७२ कडु.
७३ कोकाटे.
७४ ढमढेरे.
७५ बांडे.
७६ उचाले.

आणखी सरदार जुमलेदार पागे शिपाई लोक बहुत नामी होते.

**मावळे लोक पायदळचे सरदार.**—वितपसील. नांवनिशी मातबर.

१ येसजी कंक सरनोबत.
२ तानाजीराव मालुसरे.
३ जीवा माहाला.
४ सोन माहाला.
५ राजपाटील येशवंतराव.
६ रामाजी विश्वासराव.
७ कृष्णाजी नाईक.
८ कुडाळकर.
९ मलधंडे.
१० हिरोजी रोटे.
११ रामोजी मोरे.
१२ तुकाजी लाड.
१३ डेळे.
१४ तानाजी दुंदुसकर.
१५ पिलाजी सग्रणस.
१६ जावजी पारळे.
१७ मुधोजी हुणकणे.
१८ विठोजी कडु.
१९ इंद्राजी गोरड.
२० महादाजी फर्जंद.
२१ जावजी मोहने.
२२ हिराजी भानगिरे.
२३ मुधोजी खानवेलकर.
२४ सुभानजी नाईक.
२५ तान सावंत.
२६ कोंडाजी वळखले.
२७ बाजीराव पासलकर.
२८ बाजी प्रभु देशपांडे, हिरडस मावळ.
२९ बाजी मुरार देशपांडे, माहाडकर.
३० ढवळे.
३१ हिरोजी फर्जंद.
३२ नागोजी फर्जंद नाईक.
३३ हरबाजी फर्जंद.
३४ पारटे.
३५ ठाकूर.
३६ ढमाले.
३७ दादाजी बापूजी देशपांडे.
३८ चिमणाजी बापूजी देशपांडे.
३९ राम दळवी.
४० बागराव.
४१ दिनकरराव.
४२ माल सावंत.
४३ तुळाजी फर्जंद.
४४ कृष्णाजी भोंसले.
४५ येसाजी दरेकर.
४६ बाजीराव दरेकर.
४७ सोन दळवी.
४८ चांगोजी कडु.
४९ मुधोजी सासवडेकर.
५० राणोजी दरेकर.
५१ हरजी नाईक जासूद.
५२ खंडोजी नाईक जासूद.
५३ गणोजी कावळे.
५४ सोमाजी नाईक बंकी.
५५ सूर्याजी काळे.
५६ बापूजी मांडरे.
५७ सूर्याजी मालुसरे.

## आरमाराचे सरदार.

१ दर्यासागर.
२ इभ्रामखान.
३ मायनाक भंडारी.

सदर्हु सरकारकून, सरदार, अष्टप्रधान.

किल्लेकोट व प्रांत बहुत हस्तगत झाला त्यांतील तालुके—

### प्रांत सातारा वांई—बितपसील.

१ सातारा.
२ वैराटगड.
३ वर्धनगड.
४ परळी सज्जनगड.
५ पांडवगड.
६ महिमानगड.
७ कमलगड.
८ वंदनगड.
९ तायवडा.
१० चंदनगड.
११ नांदगिरी.

### प्रांत कराड.

१ वसंतगड.
२ मचिंद्रगड.
३ भूषणगड.
४ कसबा कराड.

### प्रांत मावळ सह्याद्रि.

१ रोहिडा.
२ सिंहगड.
३ नारायणगड.
४ कुंवारी.
५ केळना.
६ पुरंधर दौलतमंगळ.
७ मोरगिरी.
८ लोहगड.
९ रुद्रमाळ.
१० राजगड.
११ तुंग.
१२ तीकोना.
१३ राजमाची.
१४ तोरणा.
१५ दातेगड.
१६ विसापूर.
१७ वांसोटा.
१८ सिवनेरी.

### प्रांत पनाळा.

१ पनाळा.
२ खेळणा.
३ विशाळगड.
४ पावनगड.
५ रांगणा.
६ गजेंद्रगड.
७ भुदरगड.
८ पारगड.

९ मदनगड.
१० भीवगड.
११ भूपाळगड.
१२ गगनगड.
१३ बावडा.

## प्रांत कोंकण, बंधारी व नलदुर्ग.

१ मालवण सिंधुदुर्ग.
२ विजयदुर्ग.
३ जयदुर्ग.
४ रत्नागिरी.
५ सुवर्णदुर्ग.
६ खांदेरी.
७ उंदेरी.
८ कुलाबा.
९ राजकोट.
१० अंजनवेल.
११ रेवदंडा.
१२ रायगड.
१३ पाली.
१४ कलानिधिगड.
१५ आरनाळा.
१६ सुरंगगड.
१७ मानगड.
१८ महिपतगड.
१९ महिमंडण.
२० सुमारगड.
२१ रसाळगड.
२२ कर्नाळा.
२३ भोरप.
२४ बल्लाळगड.
२५ सारंगगड.
२६ माणिकगड.
२७ सिंदगड.
२८ मंडणगड.
२९ बाळगड.
३० महिमंतगड.
३१ लिंगाणा.
३२ प्रचीतगड.
३३ समानगड.
३४ कांगोरी.
३५ प्रतापगड.
३६ तळागड.
३७ घोसाळगड.
३८ बिरवाडी.
३९ भैरवगड.
४० प्रबळगड.
४१ अवचितगड.
४२ कुंभगड.
४३ सागरगड.
४४ मनोहरगड.
४५ सुभानगड.
४६ मित्रगड.
४७ प्रल्हादगड.
४८ मंडणगड.
४९ सहनगड.
५० शिकेरागड.
५१ वीरगड.
५२ महीधरगड.
५३ रणगड.
५४ सेटगागड.

५५ मकरंदगड.
५६ भास्करगड.
५७ माहुली.
५८ कावन्ही.

## ठाणीं.

१ कल्याण.
२ भिंवडी.
३ वांई.
४ कराड.
५ सुपें.
६ खटाव.
७ बारामती.
८ चांकण.
९ शिरवल.
१० मिरज.
११ तासगांव.
१२ करवीर.

## प्रांत बागलाण.

१ सालेरी.
२ नाहावा.
३ हरसळ.
४ मुलेरी.
५ कणेरा.
६ अहिवंतगड.
७ धोडप.

## प्रांत त्रिंबक वगैरे.

१ त्रिंबक.
२ बाहुला.
३ मनोहरगड.
४ खळागड.
५ चावडंस.
६ मृगगड.
७ करोला.
८ राजपेहर.
९ रामसेन.
१० माचणागड.
११ हर्षण.
१२ जवळागड.
१३ चांदवड.
१४ सबलगड.
१५ आवढा.
१६ कणकई.
१७ गडगडा.
१८ मनरंजन.
१९ जीवधन.
२० हडसर.
२१ हरींद्रगड.
२२ मार्कंडेयगड.
२३ पटागड.
२४ टणकई.
२५ सिद्धगड.

## प्रांत फोंडें बिदनूर.

१ कोट फोंडें.
२ कोट काहूर.

३ कोट बकर.
४ कोट ब्राह्मणाळ.
५ कोट कडवळ.
६ कोट आकोलें.
७ कोट कठर.
८ कोट कलबर्गें.
९ कोट शिवेश्वर.
१० कोट मंगरूळ.
११ कोट कडणार.
१२ कोट कृष्णगिरी.

**प्रांत कर्नाटक वगैरे. प्रांत जगदेवगड.**

१ जगदेवगड.
२ सुदर्शनगड.
३ रमणगड.
४ नंदीगड.
५ प्रवळगड.
६ बहिरवगड.
७ वारूणगड.
८ महाराजगड.
९ सिद्धगड.
१० जवादिगड.
११ मार्तंडगड.
१२ मंगळगड.
१३ गगनगड.
१४ कृष्णगिरी.
१५ मल्लिकार्जुनगड.
१६ कस्तूरीगड.
१७ दीर्घपलिगड.
१८ रामगड.

**प्रांत श्रीरंगपट्टण.**

१ कोट धर्मपुरी.
२ हरिहरगड.
३ कोट गरूड.
४ प्रमोदगड.
५ मनोहरगड.
६ भवानीदुर्ग.
७ कोट अमरापूर.
८ कोट कुसूर.
९ कोट तळेगिरी.
१० सुंदरगड.
११ कोट तळगोंडा.
१२ कोट आटनूर.
१३ कोट त्रिपादुर.
१४ कोट दुटानेटी.
१५ कोट लखनूर.
१६ कळपगड.
१७ महिनदीगड.
१८ रंजनगड.
१९ कोट आलूर.
२० कोट शामल.
२१ कोट विराडें.
२२ कोट चंदमाल.

**प्रांत येलूर, तालुके व गड.**

१ कोट आरकाट.
२ कोट लखनूर.
३ कोट पळणापट्टण.
४ कोट त्रिमल.

५ कोट त्रिवादी.
६ पाळेकोट.
७ कोट त्रिकोनदुर्ग.
८ कैलासगड.
९ चंजिबरा कोट.
१० कोट वृंदावन.
११ चेतपाव्हली.
१२ कोलबाळगड.
१३ रसाळगड.
१४ कर्मटगड.
१५ यशवंतगड.
१६ मुख्यगड.
१७ गर्जनगड.
१८ मडविंडगड.
१९ महिमंडणगड.
२० प्राणगड.
२१ सामारगड.
२२ साजरागड.
२३ दुर्भेगड.
२४ गोजरागड.
२५ अनुरगड.

## प्रांत वनगड वगैरे तालुका.

१ वनगड.
२ गहनगड.
३ सिमदुर्ग.
४ नलदुर्ग, मिरागड.
५ श्रीमंतदुर्ग.
६ श्रीगदनगड.
७ नरगुंद महंतगड.
८ कोपलगड.
९ बाहदूर बिंडा.
१० त्र्यंकटगड.
११ गंधर्वगड.
१२ ढाकेगड.
१३ सुपेगड.
१४ पराक्रमगड.
१५ कनकाद्रिगड.
१६ ब्रह्मगड.
१७ चित्रदुर्ग.
१८ मसन्नगड.
१९ हडपसरगड.
२० कांचनगड.
२१ अचलागिरिगड.
२२ मंदनगड.

## प्रांत कोल्हार बाळापूर.

१ कोल्हार.
२ ब्रह्मगड.
३ वडन्नगड.
४ भास्करगड.
५ महिपाळगड.
६ मृगमदगड.
७ आंबेनिराईगड.
८ बुधलाकोट.
९ माणिकगड.
१० नंदीगड.
११ गणेशगड.
१२ रवळगड.

१३ ह्रातमंगळगड.
१४ मंचकप्रकाशगड.
१५ भीमगड.
१६ प्रेईवारगड.
१७ सोमसेखरगड.
१८ भदगिरी.
१९ चेनगड.
२० श्रीवर्धनगड.
२१ बिदनूरकोट.
२२ मलकोल्हारकोट.
२३ ठाकूरगड.
२४ सरसगड.
२५ मल्हारगड.
२६ भूमंडलगड.
२७ बिरुटकोट.

## प्रांत चंदी.

१ राजगड.
२ चेनगड.
३ कृष्णागिरी.
४ मदोन्मत्तगड.
५ आरवलुगड.
६ काळाकोट.

## प्रांत चंजाउर व अरणी.

याप्रमाणें आणखी कित्येक प्रांत किल्ले हस्तगत जाहले. कोठील पाळेगार वश जाहले. शिवाय तुंगभद्रातीर रामेश्वरपासून देखील गोंडवण चांदे व वराड ह्या प्रांतांत नर्मदेपर्यंत चौथ मोकासा अंमल बसून महाराजांचा चालला.

तेव्हां सार्वभौमपद करण्यास, सिंहासन करण्यास अधिकार जाहला. दहा कोटी खजिना संग्रह झाला, व मंत्री अष्टप्रधान करणें याचीं लक्षणें जशीं शास्त्रीं तसे प्रधान प्राप्त जाहले. सैन्य-अश्व गज रथ पदाति--चतुरंग पाहिजे तसें सिद्ध झालें. आपले पूर्वज पूर्वीपासून छत्रसिंहासनयुक्त राज्य करित आले, त्या कुळीं आपण येऊन त्या सिसोदे कुळींचा धर्म, दुष्ट यवनाचें पारपत्य, त्याचे न ह्मणवितां करणें, तो श्रीनीं कृपा करून श्रीसांबानीं व श्रीभवानीनीं आपले हातें चालविला; कुळधर्म जतन केला; आरसीसिंह याचे वंश छत्रसिंहासन करून राज्य उदापुरीं करीत आहेत, व आपले कुळींचे पुरुष कच्छभुज व नेपाळ येथें राज्य छत्रसिंहासन करून करितात. आपण हें राज्य दक्षिण प्रांतचें प्रतापें सोडविलें. श्रीमहाराणा सजणसिंह याचे वंश आपण, तस्मात् छत्रसिंहासन पृथक् करून राज्याभिषेकयुक्त होत्साते पूर्वयुगीं राजे धर्में नीति करून राज्य करीत आले तसें आपण करावें, ह्मणून म-

हाराजांनीं दृढ संकल्प केला. राज्य करण्यास अंगें सात पाहिजेत.— राजा, प्रधान, राष्ट्र, दुर्ग, कोशबल, सुहृद्बल व सेना—हीं सात अंगें असावींत तशीं सिद्ध जाहलीं. याउपरि सिंहासनाधीश्वर ह्मणवावें ऐसें चित्तांत आणून महाराजांनीं श्रीस प्रार्थना केली. श्रीनींही स्वप्नगत दृश्य होऊन 'तुजला वर दिल्हा, तसेंच त्या कुळांत अंशभूत होऊन धर्म वृद्धिंगत केला. सिंहासनाधीश होणें, हाही हेतु पूर्ण करितों,' ऐसी आज्ञा झाली. आश्वासन झालें. त्यानंतर मातुश्रीस विनंति केली. त्यांची आज्ञा घेतली. श्रीरामदास स्वामींकडे कारकून पाठविले, विनंति केली. त्यांणीं अनुमोदन दिल्हें, आणि 'कार्यसिद्धि होईल' अशी आज्ञा झाली. चिंचवडचे देव व इतर साधूंकडे कारकून पाठवून त्यांची आज्ञा आणली. आणि सर्व राज्यांतील मोठे मोठे पंडित, विद्वान्, वैदिक व प्रतिष्ठित ब्राह्मण शिबिकादि यानें पाठवून बोलावून आणिले. सर्व सरकारकून व सरदार जमा केले. आप्त, सुहृद्, संबंधी, इष्टमित्र, यांस आणून सभा करून आपलें मनोगत, 'याउपरि या अन्वयें छत्रसिंहासन करावें असें आहे, याचा विचार कसा करावा?' ह्मणून स्वतः प्रश्न केला, आणि सर्वांचें अनुमोदन घेतलें. राज्याभिषेक करावा असें सिद्ध झालें. शिष्टसंमतें विचार करितां 'राज्याभिषेक करण्यास आदौ व्रतबंध होऊन सर्व विधि झाले पाहिजेत. यास श्रीकाशी व पैठण व सर्व क्षेत्रींची शिष्ट मंडळी यांचे विचारावांचून येथें सिद्धता कैसी करावी?' असा विचार पडला. सर्वही सरकारकुनांस विचार कसा करावा ऐसें प्राप्त झालें. ते समयीं बाळाजी आवजी चिटणीस यांणीं उठोन विनंति केली जे, 'सर्व जे जे मनोरथ स्वामींनीं केले ते दुर्घट असतांही घडले यांतच काय अशक्य आहे? चार वेद सहा शास्त्रें असें ज्यांचें अध्ययन असें श्रीकाशींत मुख्य भटांचें घर आहे. त्यांतील धर्मप्रवृत्ति ग्रंथ त्यांजपासून उत्पन्न होतात, तेच धुरीण पंडित गागाभट्ट अनायासें पैठण येथें महाराजांची कीर्ति श्रवण करून आले आहेत. त्यांस व पैठणचे पंडितांस आणून त्यांचे विचारें सिद्धता करावी.' याजवरून त्यांस उद्योग करून आणवण्याची आज्ञा झाली. तेव्हां सर्वांचेंही संमत आणावें असें झालें. याजवरून केशव पंडित व भालचंद्रभट पुरोहित हे बाळाजी आवजींचें गुरुस्थान, व सोमनाथ कात्रे यांचेच आश्रित, यांस दहा हजार रुपये व पालख्या देऊन बाबांस व पैठणकरांस

आणावयास रवाना केलें. त्यांणीं जाऊन महाराजांचा उद्योग व मनोरथ त्यांस समजावून त्यांशीं व पैठणकर पंडितांशीं एकवाक्यता केली. आणि उदापूर, जयपूर येथें राज्याभिषेकविधि होतो त्याप्रमाणें करावें असें सिद्ध करून घेऊन आले. त्यांचा रायगडीं महाराजांनीं सामोरें जाऊन बहुत सत्कार केला. आदरेंकरून ठेविले आणि इकडील सर्व थोर थोर ब्राह्मण व मुत्सदी सहवर्तमान सभा केली. आणि विचार केला कीं, 'हे उदाजीचे राणाजीचे घराणेंतील वंश, सिसोदे कुळपरंपरा पुरुष पिढ्या लावून या प्रांतीं हिंदुस्थानांतून आले; रजपूतराजवंश महाराष्ट्रदेशीं मराठे ह्मणवितात; उदापूर, जयपूर येथें राज्याभिषेक सिंहासन व्रतबंध होत येतात; जयसिंग यांणीं काशिक्षेत्रादि ब्राह्मण नेऊन अश्वमेध केला; हा सर्व निर्णय ते समयीं जाहला आहे, त्या अन्वयें राज्याभिषेकांग व्रतबंध करून अभिषेक करावा; हे त्यांचे कुळींचे, यांस छत्रसिंहासन अधिकार चाललाच आहे,' असें ठरलें. महाराजांचें वय शेचाळीस वर्षांचें, पुत्र दोन जाहले असतां अभिषेकाचे पूर्वांगीं व्रतबंध करावा ऐसें सिद्ध करून, सर्व पंडितजन, ब्राह्मण यांचें संमत झालें, आणि मंत्री लक्षणयुक्त, व अभिषेकसंभार साहित्य, समुद्रोदकें व महानद्यांचीं पुण्योदकें व गज अश्व सुलक्षणिक व स्थळें कशीं करावीं, ब्राह्मणभोजन लक्षावधि करावें, व्याघ्रांचीं चर्में व सुवासिनी कन्या सुवर्णकलश, पीठ व सिंहासन करण्याचा विधि सांगितला असतां, महाराज बहुत संतुष्ट होऊन 'राज्याभिषेक सुमुहूर्तकाल योजावा' असें सांगितलें. मुहूर्ताचा निश्चय शास्त्रीं आहे तो काढिला. पाहणार ज्योतिषी, गणक सिद्धांत वक्ते विचक्षण निपुण असे तीन असावे, यांहून उणे नसावे; अधिक असतील तितके असावे. यथासंभव त्यांणीं विचार करून दक्षिणायन, त्यांतही अवश्य कर्तव्यच आलियास कार्तिक मार्गशीर्ष पौष हे घ्यावे. उत्तरायणीं चैत्र व अधिकमास नसावा; पर्जन्यकाल खेरीज सर्व युक्त आहेत; नक्षत्रांत ध्रुवनक्षत्रें व विष्णुनक्षत्रें असावीं. याप्रमाणें योग करणादि योग्य असा निश्चय करावा.

याप्रमाणें पाहून सर्वमतें आनंद नाम संवत्सर ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी सिद्ध केली, आणि संपूर्ण क्षेत्रें, व प्रतिष्ठित ब्राह्मण, व मांडलिक राजे, इष्टमित्र, सर्व राज्यांतील सेवकजन यांस येण्याविषयीं पत्रें आमंत्रणाचीं लेहविलीं. समारंभास स्थापनाची योजना मुख्य सिंहासन राजधानी

करणें, त्यासीं पुण्यदेश पुण्यभूमि पाहून आसमंताद्भागीं पुण्यक्षेत्रें व महानदी, व त्या स्थानीं विपुल उदक कृत्रिम सरिता ह्मणजे पाट नहर यांचीं उदकें, सर्व धान्यें त्या देशीं व्हावीं ऐसें स्थान, व शत्रूंस दुःसाध्य असावें. याजवरून रायगड ही जागा, सर्व राज्यांत दुःसाध्य व श्रीकृष्णा समीप, सर्व उत्तम लक्षणें आहेत, पाहून योजिला. तेथें सिंहासनास सभा करविली. ज्या सभेंत सहस्रावधि मनुष्यें बसावीं, त्यांस शीतोष्णबाधा न व्हावी, चित्रविचित्र स्तंभ, अष्टप्रधानांचीं स्थानें, भिंती वगैरे परम रमणीय ऐसें करवून, त्यांस उल्लोच व वितानें ह्मणजे चांदवे चांदण्या सुवर्णमय वस्त्रें किनखाप बादली ऐशा करविल्या. पटल ह्मणजे पडदे असे किनखापी करविले. सिंहासनाचें स्थान, तेथें सुवर्णाचे स्तंभ चार, त्यांत चांदवा अमोल्य जरीचा, त्यास मुक्ताफळांचे गेंदांचे घोंस, ऐसें बहुत चांगलें सभास्थान करवून सर्व राजमंदिरें यांस चित्रें रंग देऊन जागाजागा उत्तम स्थळें केलीं. थोर थोर ब्राह्मण, मांडलिक राजे येतील त्यांस स्थळें निराळीं निराळीं योग्य अशीं करविलीं; आणि मोठे विस्तीर्ण मंडप, सभेस व भोजनशाळा वगैरेंस केले. सर्व राज्यांतील गुणिजन, वारांगना, कलावंतें, गायक, व वाद्य वाजवणार बहुत कुशळ तितके आणिले. कुंड, मंडप, वेदिकरून होमशाळा अभिषेकस्थान परम निपुण श्रोत्री ब्राह्मण यांजपासून परम रमणीय असावें तसें करविलें.

बहुतजण येणार त्यांस दुर्गाखालीं स्थळें, ब्राह्मणभोजनास एक एक स्थळीं पांचपांच हजार ब्राह्मणांची पंक्ति व्हावी अशीं दहापांच स्थळें निराळीं निराळीं, त्यांस मंडप व पारपत्यगार, पाककर्ते व वाढणार ठेवून तरतूद करून दोनप्रहरीं ब्राह्मणभोजनें होत असावीं, दिव्य षड्रस अन्नें नित्य नूतन उत्पन्न होत असावीं, ऐसें करविलें. तसेंच किल्ल्यावर पांच सहस्र ब्राह्मणभोजनास स्थळें व दहासहस्र सुहृद् आप्त यांचे भोजनाचीं स्थानें करविलीं. तसेंच लक्षावधि ब्राह्मणभोजन, आप्त व राजे, मांडलिक, सेवकजन व शिष्टसमुदाय यांस अमुक पदार्थ नाहीं, किंवा न्यून पडला, सरला, असें न व्हावें अशी आज्ञा करून, धान्यांचे व साहित्याचे पर्वतप्राय डेरे करविले. इच्छिला पदार्थ ज्यांणीं जो मागितला तो सिद्ध तत्काल व्हावा, कोणाएकास आबालवृद्ध यांचा सत्कार नाहीं झाला असें चुकोन राहिलें, साहित्य न्यून पडलें, असें न होतां

करणार अध्यक्ष अधिकारी एक एक पदार्थास एक एक अधिकारी, एक एक कारखानाच पदार्थांचा, व करण्यास एक एक अधिकारी व मनुष्य, व त्याजवरी एक सर्वाध्यक्ष असें योजून करून देविलें.

सर्व सरकारकून व सरदार व सुभेदार व मामलेदार, कारकून लोक व सेवक लोक असे दहा पांच लक्ष मनुष्य जमा झाले. पन्नास हजार ब्राह्मणसमुदाय जमा झाला. सर्वांसही मोठा हर्ष व उत्कर्ष, ज्यास जे अधिकार नेमून सांगितले ते बहुत सावधपणें तिळमात्र न्यून पडूं न देतां प्रथमपासून सिंहासनआरोहणापर्यंत कोणते दिवशीं प्रातःकाळपासून सायंकाळपर्यंत काय व्यवहार होणें, त्याचें साहित्य काय, कोणास काय देणें, याचे नियम करून जाबते लिहून पुन्हा गलबल द्या घ्या म्हणावयाची एकही पडूं नये, ऐसें करून, ज्याचें त्याजपाशीं देऊन, तिळमात्र गर्गशा अथवा बोभाट न पडतां तो दिवस सिद्धीस जावा, ऐसें करून दिल्हें.

व्याघ्रचर्में, मृगचर्में आणविलीं. समुद्र व पुण्यनद्योदकें आणविलीं. सर्वसंभार सिद्ध जाहला. आणि मुहूर्ताचे समारंभाचे पूर्वीं सात दिवस पूर्वांग शांति यज्ञ होणें ते ज्येष्ठ शुद्ध षष्ठीपासून त्रयोदशीपर्यंत नेमले. प्रथम ज्येष्ठ शुद्ध चतुर्थीस व्रतबंधाचे समारंभास प्रारंभ होऊन पंचमीपर्यंत यथाविधि व्रतबंधन झालें. ब्राह्मणभोजन दोन दिवसांत लक्ष झालें. तदंग दक्षिणा सर्वांस एक रूपयाप्रमाणें दिल्ही. पंडित वैदिक शिष्ट यांची संभावना यथायोग्य झाली. त्यानंतर षष्ठीस प्रथम पटबंधनविधि करून ऋत्विजवर्णन पुण्याहवाचनपूर्वक यज्ञास प्रारंभ करून विनायकशांति आदौ केली. सात दिवस अग्नीच्चीं चिन्हें पाहणें वगैरे करविलीं. सर्वही कार्य निर्विघ्न होतें झालें. महाराज व ऋत्विज निरशनव्रतस्थ, घृत, पय, फळें आहार करून नक्षत्रशांति, व ग्रहशांति ऐंद्री शांति व पौरंदरी शांति यथाक्रमें करून राज्याभिषेकांग विधि सांगितले तसे करविते झाले. सात दिवस ब्राह्मणभोजन नित्य पन्नास हजार झालें. सर्व जन समारंभास आले त्यांस मिष्टान्नेंकरून आदर आतिथ्यसत्कार व शिष्टांचे सत्कार झाले. नित्य सभा गीत मंगळवाद्य, भेरी, समारंभ अत्यद्भुत किमपि व्यंग व प्रायश्चित्त न पडतां सांग झाला.

याप्रकारें करून त्रयोदशीचा दिवस प्राप्त झाला असतां, अष्टप्रधान करण्याची योजना करून, आठ सिद्ध केले. लेखकद्वय—एक पत्रलेखक

व एक गणकलेखक,-ऐसे योजिले. ऋत्विज, छंदोगामात्य, प्रधान, व द्वादश कोश, बारा महाल व अष्टादश शाळा कारखाने यांचे अधिकारी, देशाधिकारी, नगराधिकारी ऐसे सर्व पृथगाकारें योजिले. सर्वांसही मंगलस्नानें करवून महाराजांनींही मंगलस्नान केलें. विधियुक्त मृत्तिकास्नान, पंचगव्यस्नान, गंगादि पुण्यतीर्थोदकें पंचामृतस्नान केलें. सर्वांनीं शुभ्र वस्त्रें, गंध, पुष्प, अलंकार घातले. महाराजांनीं शुभ्र वस्त्रें, अलंकार पुष्प परिधान केलें. आणि क्षीरवृक्षाचें आसन सवा हात उंच व रुंद असें करून सुवर्णेकरून मढवून त्यावर आरोहण केलें.

पट्टराणी पटबंधन करून सईबाई साहिब बसली. संभाजी महाराज सन्निध बसले. पूर्वेस मुख्य प्रधान ब्राह्मण मोरो पंडित प्रधान पिंगळे हातीं सुवर्णकलश घृतपूरित घेऊन उभे राहिले. दक्षिणेस क्षत्रिय प्रधान असावे तसे सेनापति हंसाजी हंबीरराव मोहिते सेनापति, रौप्यकलश दुग्धपूर्ण घेऊन उभे राहिले. पश्चिमेस निळोपंत यांचे पुत्र रामचंद्र पंडित अमात्य ताम्रकलश दधिपूर्ण घेऊन उभे राहिले. उत्तरेस छंदोगामात्य प्रधान रघुनाथ पंडितराव सुवर्णकलश मधुपूर्ण घेऊन उभे राहिले. त्याजपाशींच मृत्तिकाकुंभांत समुद्रजल व महानद्या जल-कृष्णा गोदा यमुना गंगेच्या उदकें पूर्ण असा ठेविला. उपदिशांचे ठायीं क्रमेंकरून अग्नि कोनास अण्णाजी पंडित सचिव प्रधान छत्र घेऊन उभे राहिले; नैर्ऋत्यभागीं जनार्दन पंडित हणमंते प्रधान व्यजन (पंखा) घेऊन उभे राहिले. वायव्य कोनास दत्ताजी पंडित मंत्री प्रधान चामर घेऊन उभे राहिले. ईशान्यभागीं न्यायाधीश सोनोपंत यांचे पुत्र बाळाजी पंडित न्यायाधीश दुसरें चामर घेऊन उभे राहिले. सन्मुख सव्यभागीं पत्रलेखक बाळाजी आवजी लेखनपात्र घेऊन उभे राहिले. वामभागीं सन्मुख गणकलेखक चिमणाजी आवजी लेखनपात्र घेऊन उभे राहिले. आसमंताद्भागीं सर्व कोश व शाळा यांचे अधिकारी उभे राहिले. मध्यें शिष्ट, ब्राह्मण, पंडित, वैदिक, श्रोत्री, प्रतिष्ठित, उभे राहिले. सुहृद्, मांडलिक राजे भोंवते उभे राहिले, आणि अभिषेकास प्रारंभ जाहला.

यथाविधि मंत्रोक्तप्रकारें प्रधान ब्राह्मण व पुरोहित ऋत्विजसह सुवर्णपात्र शतच्छिद्र करून त्यांत स्थापित उदकें करून, व प्रधान द्रव्य कलश घेऊन उभे राहिले, त्यांसहवर्तमान अभिषेक केला. ते समयीं मंगळवाद्यें भेरी गायनादिसमारंभें सर्वही आकाश पृथ्वी शब्देंकरून पूर्ण

झालीं. नंतर मंगलस्नान, सुवासिनींनीं आरती केली; आणि कांस्यपात्र घृतपूरित त्यांत मुख पाहिलें व आदर्शांत मुख पाहून ब्राह्मणांस दक्षिणासह दोन दानें दिल्हीं. आणि शुभ्र वस्त्रें अलंकार परिधान करून तदनंतर सिंहासनावर आरोहण करण्याचा मुहूर्त होता. घटिकादिस्थापना केली होती. सिंहासनसभा केली. तेथें क्षीरवृक्षाची वेदी वट औदुंबराची करावी तशी करून त्यास सुवर्णेंकरून तगटें मढवून रत्नखचित केलें. प्रमाण आहे तसें केलें. त्याजवरी चित्रें–प्रथम ओळ वृषभांची, त्याजवर मार्जारांची, त्याजवर तरसांची, त्याजवर सिंहांची, त्याजवर व्याघ्रांची, अशीं एका बाजूस आठ याप्रमाणें बत्तीस चित्रें चहूंकडे मिळून काढून त्यास सिंहासन असें ह्मणावें, तसें सिद्ध केलेंच होतें. त्याजवरी मृगचर्म घालून त्याजवरी कांहीं सुवर्णादि द्रव्य घालावें. त्याजवरी व्याघ्रचर्म घालून, त्याजवरी कार्पास आसनें मखमलीचीं मृदु ऐशीं घालून, बादली जरी वस्त्रें घालून उदबैन ह्मणजे लोडें व तक्के, मागें प्रभावळ करून, त्यास छत्र, त्याजवर मंडप, चांदवा सुवर्णमय वस्त्राचा, त्यास मुक्ताफळांचे घोंस ऐसें सुशोभित केलें होतें. उत्तमलक्षणी हस्ती व अश्वरथ सजवून सुवर्णाचे अलंकार घालून राजांगणीं सिद्ध असावे तसे आणिले. आरोहणमुहूर्त घटिका लग्न नेमिलें, त्या लग्नावरी श्रीविष्णूची सुवर्णमय प्रतिमा करून षोडशोपचारें पूजन प्राणप्रतिष्ठा करून सव्य हस्ताचे ठायीं स्थापन केली, तशीच घेऊन त्या सहवर्तमान मुहूर्तघटिका पूर्ण होतांच सिंहासनाचे ठायीं आधीं सव्य जाऊन, सव्यजानु गुढघा देऊन नमस्कार करून पाय न लावितां पूर्वाभिमुख आरोहण करावें, तसें महाराजांनीं केलें. ते समयीं एकदांच भेरी व मंगळवाद्यें, तोफा सरबत्ती व नृत्य, गीत, वाद्य जयशब्द होण्यास प्रारंभ जाहला. तो नाद मोठा गगनचुंबित शब्द होता झाला. स्वराज्यांत किल्ले दुर्ग यांस सूचना केली होती, जे एके किल्ल्याच्या तोफा एकानें ऐकतांच त्यांणीं कराव्या. त्याप्रमाणें सर्व राज्यांतील किल्ले, दुर्ग यांवर एकदांच सरबत्ती झाली.

त्यानंतर सिंहासनीं बसल्यावरी रक्तांबरें रक्तभूषणें सुवर्णमय बादली परिधान केलीं. दिव्यमाणकादि रत्नें, चौकडे, कंठ्या, माळा, शिरपेंच तुरा, झगा, पोंच्या, ऐसे अलंकार घातले; आणि विधिमंत्रें करून धनुष्यबाण पूजन, खड्गचर्म पूजन करून ते हस्ताचे ठायीं धारण

केले. त्या समयीं सुवर्णाचीं पुष्पें, व रौप्यमय करून वृष्टि केली. षोडश सुवासिनी यांनीं, मंगल आरत्या ब्राह्मणकन्या घेऊन उभे राहून कराव्या तसें केलें. त्यांस वस्त्रें भूषणें अलंकार दिल्हे. नंतर सिंहासनाचे ठाई बसल्यावरी, मंत्रविधि करणें ते करून ब्राह्मणांचे आशीर्वाद घेणें ते घेतले. ऋत्विज, आचार्य व ब्राह्मणपूजन करून गागाभटजी यांशीं लक्ष रुपये दक्षणा संभावना केली. वस्त्रेंभूषणें दिल्हीं. सर्व ऋत्विज यांस पांच पांच सहस्र दक्षणा अलंकार दिल्हे. पुरोहित यांस चोवीस सहस्र रुपये दक्षणा वस्त्रें अलंकार भूषणें उपाधिक दिल्हें. शिष्टमंडळी पंडित यांस कोणास सहस्र, पांचशत, दोनशत असे योग्यतेनुरूप दिल्हे. सर्व ब्राह्मणसमुच्चय यास देकार पंचवीस रुपयेप्रमाणें मेढा करून तेथें खालीं करविला. गोसावी, तडीतापडी, गोरगरीब, भिक्षुक, तितक्यांस देकार दोन चार पांच रुपयेप्रमाणें देवविले. किल्ल्याखालीं व वर देकार वांटणेस प्रारंभ एकदांच करविला. याप्रमाणें महाराज शालिवाहन शके १५९६ आनंद नाम संवत्सर ज्येष्ठ शुद्ध १३ गुरुवासर सुमुहूर्तें छत्रसिंहासनाधीश्वर झाले. आणि राज्याभिषेक त्या दिवसापासून आपला शक त्यांणीं चालविला.

सिंहासनारूढ होऊन त्यानंतर अष्ट प्रधान यांस व दरखदार, महालदार, कारखानदार, सर्व सभांचे जे अधिकारी, त्यांस अधिकाराचीं वस्त्रें दिल्हीं. अष्टप्रधान यांचे दरख केले. मुख्य प्रधान यांस व सेनापति यांस बादली वस्त्रें पांच, सणगें व शिरपेंच, मोत्यांचे तुरे, कंठ्या, चौकडे, झगे, व शिकेकटारा, व ढालतरवारा, व चौघडे नोबती, व जरीपटके, हत्ती, घोडे, व सोन्याचे दांडीच्या चवऱ्या, याप्रमाणें देऊन पदें करारपत्रें करून दिल्हीं. अमात्यांस बादली वस्त्रें, पोषाख, व ढाल तरवार, चौकडा, कंठी, तुरा, शिरपेंच, शिकेकटार, रुप्याचें कलमदान, ताडीचे व चवरी, हत्ती, घोडा याप्रमाणें दिल्हे. सचिव पंडित यांस बादली वस्त्रें, पोषाख, कंठी चौकडा, तुरा, शिरपेंच, शिकेकटार, ढाल तरवार, हत्ती, घोडा ऐसे दिल्हे. सुमंत व मंत्री यांसही पोशाख, दागिने सदरहुप्रमाणें ढाल तरवार, हत्ती, घोडे, चवऱ्या दिल्हे. पंडितराव यांस बादली पोषाख, शिरपेंच, कंठी, चौकडा, तुरा, चवरी, हत्ती, घोडे याप्रमाणें दिल्हे, व न्यायाधीश यांस त्या अन्वयें दिल्हें. त्यांणीं पदें बहुमानें घेऊन महाराजांस नजरा करून मुजरे केले. बाळाजी आवजी यांस चिटणिशीचें

वस्त्रें, मंदील, दुमजला, दुपेटा, झगा, व विजार, कंठी, व शिरपेंच, चौकडा रुप्याचें कलमदान पेटीचें, चवरी व घोडा याप्रमाणें दिल्हे. तसेंच चिमणाजी आवजी यांस फडणिशीचीं वस्त्रें, कलमदान ताडीचें असें दिल्हें. त्यांणीं मुजरे केले. अष्टप्रधान यांस स्वारीस जाणें, तालुके राखणें, तेथें राहणें, यास्तव सर्वांस मुतालिक करून दिल्हे. त्यांस वस्त्रें बहुमान दिल्हे. राजाज्ञापद शंकराजी नीळकंठ महागांवकर यांशीं दिल्हें. वरकड महालदार, कारखानदार यांस ज्याचे त्यास अधिकाराचीं वस्त्रें दिल्हीं. शामजी नाईक पुंडे यांस पोतदारीचीं वस्त्रें दिल्हीं. बाळाजी रघुनाथ सबनीस फौजेचे यांस बक्षीगिरीचीं वस्त्रें, ढाल, तरवार, कलमदान ताडीचें ऐसें दिल्हें. वरकड सरदार मातबर, फौज वागवणार, मानकरी, यांस जशी ज्याची योग्यता तशीं कोणास साडेतीन सणगें, कोणास दोन कंठ्या शिरपेंच, ऐसे योग्येतनुरूप, याप्रमाणें सर्वांचे बहुमान नेमून देवविले.

मुजरे नजरा घेऊन, घोडा सुलक्षणीक सोन्याचें जडावाचें सामान बादली मोत्यांची झालर ऐसें साज करून आणिला, त्याजवर आरूढ होऊन राजांगणांत येऊन सोन्याची अंबारी, त्यास मोत्यांचे अलंकार, जरीबाब गाशे, झालरा ऐसा गज सज्ज करून आणिला त्या अंबारींत बसले. हत्तीचे मस्तकीं सेनापति एक मोर्चेल व अंकुश घेऊन बसला. पाठीमागें मुख्य प्रधान खवासींत मोर्चेल घेऊन बसले. वरकड अष्ट प्रधान दरखदार यांस निराळ्या निराळ्या अंबाऱ्यांत बसविलें. कोणी हौद्यांत, कोणी घोड्यावर, याप्रमाणें खासे अंबारीचे पाठीमागें चालणार तितके सरदार वगैरे बसवून चालविले. सर्व रस्ते व घरें रंगविलीं. ध्वज पताका तोरणें लाविलीं. मार्गांनीं झाडून सडे घालवून रांगोळ्या घातल्या; अलंकृत करविले. सर्व नगरदेवता यांच्या पूजा यथासांग नैवेद्य धूप दीप ऐसे करविले. त्या मार्गे करून पुढें जरीपटका व भगवें निशाण यांचे हत्ती दोन; त्यामागें प्रधान व सेनापतीचे पटक्याचे हत्ती व सर्व फौजेंतील निशाणें; त्याबराबर हुजूर पागा; करवाल लोक; घोडे, सोनेरुपेचें सामान, बंदुका, अमोल्य उत्तम वस्त्रें आभरणें करून युक्त, ऐसे शूर व सेनाधुरंधर पदाचे अधिकारी बिनीसंरक्षणास त्याजबराबर चालले. तोफा गाड्यांवर चालणार. स्वारींतील व रथ अश्वांच्या गाड्या. त्यामागें नानाप्रकारचे शूर अश्वांवर व गजांवर बसणारे चालले. त्याचे मागें

नानाप्रकारचे पदाति पटेकरी, विटेकरी, सांगबर्ची, बाणेकरी चालले. खासबारदार बंदुकीचे लोक रणवाद्यें तासे मर्फे हलग्या वाजंत्री वाजवीत चालले. त्यांचे मागें कोतवालहत्ती पन्नास, व सांडणीस्वार शंभर, व बाणाच्या कैच्या उंटावर चालले. त्यामागें कोतवालघोडे शेंपन्नास चालले. त्यामागें नानाप्रकारचीं मंगळवाद्यें शाहाबाजे वाजवणार काळू सनया घोड्यावर बसोन नगार्जी चालले. कर्णेकरी बाके शिंगेंही सर्व रूप्याचीं, हे चालले. त्याचेमागें धाडीगाणार घोड्यावर भाट वंदीजन प्रताप वर्णन करीत चालले. त्यांचे मागें लग्या निशाणें व बाणदार जरी व तोमर भाले बोंथाट्याचे लोक चोपदार वेत्रधारी चालले. हत्तीवर बसलेले ऐसे शूर मल्ल जेठी लोक चालले. त्यांचे मागें महाराजांच्य हत्तीभोंवतें पायचे लोक सरदार मावळे मोठेमोठे पोशाख वस्त्रें अलंकार ऐसे सभोंवते दुरून चालले. कांहीं अंतरें करून सर्व अष्ट प्रधान मुत्सदी यांच्या अंबाऱ्या शेंपन्नास चालल्या. त्यांचे मागें फौजेचे लोक नेमिले तितकेच. याप्रमाणें रस्त्यांतून मिरवत देवतादर्शन करून त्यांस वस्त्रें अलंकार फळें दक्षणा देऊन पुन्हा रस्त्यानें माडीवरून कन्या सुवासिनी मंगळ आरत्या, दहीं, लाह्या, पुष्पें, दूर्वा यांची वृष्टि करितात असे होत्साते राजद्वारीं येऊन रथांत बसोन राजांगणांत गेले. तेथून शिबिकेंत बसून सभाद्वारीं पूर्ण कलश व निंबलोण उतरोन टाकिलें. त्यास वस्त्रें अलंकार दिल्हे, आणि गृहप्रवेश करिते झाले.

आदौ गृहीं कुळदेवता नमस्कार पूजा करून फलतांबूल दक्षणा अर्पण करून मातुश्रीस नमस्कार केला. राजपत्न्या यांणीं ओंवाळिलें, त्यांस वस्त्रें अलंकार अमोल्य देऊन सिंहासनाचे ठायीं येऊन बसले. सर्वांच्या नजरा घेऊन सर्वांस विडे देऊन निरोप दिले. ब्राह्मणभोजनें झालीं. इष्टजन आप्त यांसहवर्तमान मिष्टान्न भोजन करून तांबूल भक्षिलें. आप्तजनांस निरोप देऊन मातुश्रीपाशीं बसोन, आपले आशीर्वादें मनोरथ सिद्धीस गेले, इत्यादि गोष्टी करून मातुश्रीची पूजा वस्त्रादि करून अंतःपुरांत गेले. द्वितीय दिवसाचे ठाईं सर्व गुणीजन कलावंत जन यांस विपुल द्रव्य व वस्त्रें देऊन संतुष्ट केले. मांडलिक राजे व संपूर्ण जन यांसह पंडितशिष्टसमुदाय आले, त्यांचे सत्कार भोजनादि करवून वस्त्रें भूषणें देऊन निरोप दिल्हे.

याप्रकारें महाराजांनीं राज्याभिषेक समारंभ व तरतूद अत्यद्भुत केली.

धर्मस्थापना करून, राज्य करण्याचे धर्म, यवनाक्रांत पृथ्वी होऊन लोपले होते ते पुन्हा जीर्णोद्धार करून स्थापिले. शिसोद्यांचे कुळांत उत्पन्न होऊन कुळभूषण कुळधर्म स्थापना केली. पत्रें लिहिणें तीं, स्वस्तिश्री राज्याभिषेक शक घालून, क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति स्वामी यांणीं समस्त राजकार्यधुरंधर व समस्त सेनाधुरंधर, अथवा राजमान्य राजश्री, अथवा राजश्री, ज्याची जशी योग्यता व कोणास कसें ल्याहावें याची पद्धति करून ल्याहावें तसें केलें. तसेंच जमाखर्चीं लिहिणें झडती, हिशेब लिहिण्यास यवनी नांवें मोडून गजशाळा, अश्वशाळा, भंडारगृह, वसनागार, पाकशाळा ऐसीं नामें ठेवून लिहिणें करावें तसें केलें. अष्टप्रधान यांचे व्यापार पूर्वीची शास्त्रपद्धति काढून चाली पाहून केले.

मुख्य प्रधान यांणीं सर्व राजकार्य मंत्र राजकारणें करावीं; सर्वांशीं समान बुद्धीनें सर्वांचे अनुमतें कोणाशीं द्वेषबुद्धि न करितां सर्वांस घेऊन चालावें. राजहित तें प्राणाहीपेक्षां अधिक, आपला स्वार्थ तिलप्राय न पहातां दक्ष व विचक्षणपणें निरालस्य सर्वकाळ करीत असावें. सेना घेऊन युद्धादि प्रसंग शूरत्वें राज्य नित्यनूतन साध्य करावें. शत्रूची बातमी राखून पराभव करावे. राजपत्रें होतील त्यांवर मुद्रा मुख्य प्रधान यांणीं आपली दुसरी करावी.

सेनापति यांणीं सर्व सेना रक्षण करून त्याचे मान सन्मान रक्षून वेतनें समयाचे समयास पाववून राज्यास ज्यांणीं जशी सेवा केली तें निवेदन करून त्यास वतनें व बक्षिसें देववावीं. सर्व सैन्य घेऊन युद्धादि प्रसंग करावे.

अमात्य यांणीं सर्व राज्यांतील आय व्यय जमाखर्च होईल तो, लेखनाधिकारी यांजपासून चौकशीनें लिहिणें करवून, आपण पाहून राजास निवेदन करावें. राजपत्रांवर व जमाखर्चाचे हिशेब राज्यांतील व सर्व महालांतील यांजवर चिन्हें करावीं. राजास नित्य निवेदन करावें. व येविशीं दक्ष निपुण असावें. व मोठीं मोठीं राजकार्यें युद्धादि प्रसंग सैन्य घेऊन करावे.

सचिव यांणीं राजपत्रें होतील त्यांत न्यूनाधिक अक्षर मजकूर याचा शोध करून नीट करावें. व तसेंच महाल परगणे यांचे हिशेबाचेही शोध करावे. राजपत्रावरी संमत करून बार चिन्ह रुजू करावें. युद्धादि प्रसंग राजहित तें करीत असावें.

मंत्री यांणीं मंत्रकार्यांत निपुण असोन राजकारणें राखीत असावीं. राजानें जें जें कर्म कृत्य केलें त्याची दिनचर्या वाका लिहून ठेवावा. आमंत्रण निमंत्रण राजाचें भोजनादि साहित्य पदार्थ काय पाहिजे हें पाहत असावें. राजकार्याविषयीं दक्ष असोन युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रावरी संमत करावें.

सुमंत यांणीं सर्व परराज्यांतील राजकारणें, शत्रूंचे संधि विग्रह पाहून ख़ातमी राखणें, व वकील येतील जातील त्यांचे सन्मान वगैरे करावे. सर्व राजास निवेदन करून आज्ञेनें राजकार्य युद्धादि प्रसंग करीत असावे. राजपत्रावरी संमत असें चिन्ह करावें.

पंडितराव यांणीं धर्माधिकार, सर्व पंडितजन यांचे व विद्वान् ब्राह्मण यांचे सन्मान करावे; व धर्माधर्मविविक्षा यज्ञ करणें व शांतिक, पौष्टिक, नित्य, नैमित्तिक काळाचें काळीं सुचवून करवावें. दंड कोणास कसा करावा हा धर्म पाहाणें, प्रायश्चित्ताचे निर्णय व त्याचीं पत्रें होतील, त्यांजवरी संमत असें चिन्ह करावें.

न्यायाधीश यांणीं सर्व राज्यांतील न्याय अन्याय—वृत्तीचे व भूमीचे—याचे सर्वकाल राजास कांहींएक दोष न लागे असे न्याय करणार अधिकारी व शास्त्रज्ञ ब्राह्मण नेमिलेल्यांचे विचारें धर्मतान्याय करून सर्वकाल राजास निवेदन करावे, पाहत असावें. न्यायाचीं निवाडपत्रें होतील त्यांजवर संमत असें चिन्ह करावें.

चिटणीस पत्रलेखक यांणीं सर्व राजपत्रें ल्याहावीं. व राजकारणपत्रें ल्याहावीं. राजाचें हृद्गत जाणून तत्काल नानाप्रकारचे कल्प करून चतुरपणें लेखन करावें. जें युद्ध करून आयासें करून कार्य होणें तें पत्राचे भाव पाहूनच कार्य होत असावें, ऐसें लेखन करावें. पत्रें येतील त्यांचीं उत्तरें ल्याहावीं. चिटणिशी व फडणिशींतील पत्रें कोणतीं, तीं कशीं ल्याहावीं, फडणिशींतील पत्रें लेखक वर्तमान भावी व देशमुख देशपांडे व तालुकदार अशी चिटणिशी, निवाडपत्र प्रायश्चित्त वगैरे चिटणिशी, यांचे कानू जाबते ठराव करून दिल्हे तसे ल्याहावे.

फडणीस यांणीं अमात्यांचे संमतें सर्व जमाखर्च लिहिणें, तत्काल लिहून बहुत सावधपणें रक्षावें. राजास निवेदन करावे. दक्ष विचक्षण गणनक्रियेंत असावें. बारा महाल अठरा कारखाने यांचे अधिकारी यांणीं व तालुकदार सुभे किल्ले यांणीं आपलाले अधिकार करून आपलाले

हिशेब कितेब लिहून मजमुद दप्तरीं गुजरावे. त्यांणीं एकबेरजी झडती करून सालाचे सालांत दुसरे सालीं समजावीत असावें. असे निर्बंध बांधून दिल्हे.

पूर्वीही राज्याचा पाया घालून धोरे करून दिल्हे होते; व नवीन अधिकारी झाले त्यांस पद्धति करून दिल्ह्या. सभा दरबार करणें, व आपण प्रातःकाळापासून उद्योग करण्याचा नेम पूर्वी केला त्याप्रमाणें सभेस बसणें, सिंहासनीं अथवा सदरेस दरबार कारभार करण्यास बसणें, यास समीप सेवक पाठीमागें आठ दहा असामी विश्वासू तर्कज्ञ नाईक नाईक असे हुजरे वगैरे यांणीं मोर्चेल, चामरें, विडे, पंखे ऐशीं राजभोग असतील ते घेऊन तितकेच उभे असावे. ते नेमून असावे. त्यानंतर सिंहासनाचे दोहीं भागीं आप्तविषयी, शरीरसंबंधी, विश्वासू असे दहा बारा नेमून दिल्हे तितके यांणींच समीप मर्यादा ठेवून असावें. प्रथम स्तंभापाशीं मुख्य प्रधान यांणीं बसावें. त्याजपाशीं अमात्य, त्याजपाशीं सचिव, त्याजपुढें मंत्री ऐसे चार प्रधान असावे. उजवेबाजूस वामभागीं पंडितराव, त्यांजपाशीं सेनापति, त्यांचे पुढें सुमंत, त्याचे पुढें न्यायाधीश यांणीं बसावें. उजवे बाजूस चतुःप्रधानापुढें चिटणीस, डावेकडे फडणीस प्रधानाजवळ बसावे. त्यापुढें मोठमोठे सेनाधिकारी व शूरलोक सरदार शिपाई योग्यतेनुरूप डावेबाजूस बसावें. सव्यभागीं कारभारी, उजवेबाजूस सर्व मुत्सद्दी व कार्यकर्ते मोठे मोठे सुभे व तालुकदार व महालदार व किल्लेकरी राज्यांतील यांणीं योग्यतेनुरूप बसावें. ज्याचे त्याचे मुतालीक व कारकून ज्यांचे जे त्यांचे मागें बसावें. ज्यांचें कार्य लागेल त्यांणीं पुढें होऊन विनंति करावी. सांगितली आज्ञा ती ऐकून उत्तर करून पुन्हा स्थळीं बसावें. गडबड तिळप्राय होऊं नये. चिटणीस व फडणीस वगैरे पत्रें लिहिणें वाचणेचीं, तेव्हां सिंहासनापाशीं आपलाले बाजूस मर्यादेनें बसून लिहून वाचून दाखवावीं. आज्ञा होईल तें कार्य करावें. आणि बसणें तें आपलाले स्थळीं बसावें. योग्यतेनें कोणीं कोणाचे पुढें अथवा आपली मर्यादा सोडून थोरांचे स्थळीं बसूं नये. ज्यांचें जें स्थान त्यांणीं मर्यादेनेंच असावें. चोपदार यांचे नाईक दोन, यांणीं सभेंत सन्मुख असोन येतील त्यांचे नांव मुजरा द्यावा. ज्याचें स्थान योग्यता तशी कोणाची भीड न धरितां आधींच जपून जेथील तेथें बसवावे. गलबल केली तरी उठवून बसवावे. दरबारचे देवडीची चौकी

चोपदार यांजकडे; मुत्सदी यांस बोलावणें, आणणें, त्यांणीं जावें. शूर शिपाई यांस भालदार यांणीं बोलावणें करावें. जे राजकार्यास येणार तेच पाहून घेत असावें. नवीन आल्यास अर्ज करून घ्यावें. सभेंत दोहीं भागीं मागें सर्व कारखाने यांचे नाईक, हवालदार, हुजरे, वगैरे यांणीं दाटी व अमर्यादा न करितां उभें असावें. वरकड लोक यांणीं पुढें सर्व कारखाने यांचे कामाचे उपयोगीं त्यांणीं देवडीपाशीं असावें. नाईक असतील त्यांस कार्य सांगितल्यावरी त्यांणीं आपलाले लोकांस सांगून करावें. जरीपटका निशाण याजपाशीं हुजूर पागेचे लोक व शिपाईलोक यांणीं नेहमीं बसलें असावें. चौकी असावी. देवडीबाहेर लोक शिपाई वगैरे यांणीं तयार चौकीवर असावें. बदलीनें यावें जावें, दरवाजाबाहेर छबिना तयार हत्ती घोडे वगैरे वारीप्रमाणें असावे. अशा मर्यादा करून दिल्ह्या.

सहस्र गोप्रदानें व सत्पुरुष यांस वस्त्रें ग्रामभूमि संकल्प केले. कोणास ग्रामभूमि देणें ते व सरंजाम देणें तो यवनाचे तहापैकीं चौथाई मोकासा बाबती ठरले त्यांत घ्यावीं. असें देणें द्यावें कीं, पुन्हा आपण अथवा दुसऱ्यांनीं हरण केलें असें न होतां दिल्हें तेंच अक्षय चालावें. ऐसें करून दिल्हें. अष्टप्रधान यांस तैनाता केल्या. मुख्य प्रधान यांस पंधरा हजार होन, अमात्यांस बारा हजार होन, वरकडांस दहा हजार होन, याप्रमाणें करून दिल्हे. त्यांत कांहीं मोकासे सरदेशमुखी ऐसे ऐवज लावून बाकी इतलाखी ऐसे करून दिल्हे. शिवाय तालुके किल्ले यांचे कारभारी तीस बत्तीस नेमून दिल्हे. बाळाजी आवजी यांस, 'तुमची सेवा बहुत निष्ठेनें जाहली व राज्याचे वृद्धीस उपयोग बहुत जाले, यास्तव अष्टप्रधानांतील पद योजना करणार; ह्मणून अभिषेकापूर्वी सांगितलें;' ते समयीं 'मी कारकून लिहिणार दरखदार, मजला प्रधानांतील पद नलगे सर्वकाळ चरणांचें सान्निध्य व अक्षयी कृपा सेवा घडणें; यास थोरलें पद घेऊन थोरले सेवेशीं जाणें चरणाचा वियोग घडेल. माझी सर्व जोड चरणाची सेवा; यापरता लाभ मानीत नाहीं. स्वामी कृपा करणार त्या अर्थीं चिटणिशी स्वामींनीं सर्व राज्यांतील दिल्ही, हीच अक्षय वंशपरंपरेनें वतनी करून देऊन चालावी, असें अभयपत्र करून दोनी हे धंदे कारखानिशी व जमेनिशी माझे निसबतीस आहेत ते व चिटणिसी अक्षयी करून द्यावी.' त्याजवरून कृपाळू होऊन महाराजांनीं चिटणिसी

चौंच वस्त्रें बहुमान होऊन पत्र शपथयुक्त करून दिलें. सहा हजार होन तैनात केली: त्यास कांहीं मोकासे लावून दिल्हे. फडणीस चिमाजी आवजी यांस तीन हजार होन तैनात केली. वरकडही महालदार कारखानदार यांस वगैरे कोणास पांच चार तीन दोनशें व शंभर ऐशा होनाच्या तैनाती करून दिल्या. तसेच लोक सरदार पायचे लोक व सेवेचे लोक यांस योग्यतेनुरूप सर्वांस पांच चार हजार होनांपासून दोनशें शंभर पन्नास पंचवीस पंधरापर्यंत तैनाती करून चालवें ऐसें केलें. हे राज्याभिषेक होऊन तक्त केले.

भागानगरीं व विजापुरीं वर्तमानें गेलीं. यावरी कळून जे भागानगरकर मैत्रीचे होते त्यांणीं संतोष मानिला. विजापूरकर भयाभीत बाह्यात्कारें संतोष दाखवून त्यांणीं वस्त्रें जवाहीर हत्ती घोडे महाराजांस पाठविले. व सर्व पाळेगार मांडलिक हे चंजाऊरपर्यंत सर्वांची वस्त्रें भूषणें जवाहीर सर्व पाठविते झाले. दिल्लीचे पादशाह रणथंबें येथें होते त्यांस सर्व वर्तमान समजलें. ते पादशाह बहुत खप्पा होऊन दिलगीर झाले, आणि 'खुदांनीं वर देऊन आह्मांस बाराशें वर्षें पादशाहात दिल्ही, ती मर्यादा अवकाश असतां हिंदूची पादशाहात आह्मांस दिल्ही, ती आजच पुन: हिंदूचे हिंदूस देऊन तक्त दुसरें पृथ्वीवर हिंदूंचें झालें. याउपरी चांगली गोष्ट पुढें व्हावयाची, व हें तक्त मोडावयाचें कठीण गोष्ट आहे. आपण सुलतान रुकद्दीन याचे कुळांत उत्पन्न होऊन आपले कारकीर्दींत ही गोष्ट घडली! व्यर्थ उत्पन्न झालों! शिवाजीनें राणोजीचे कुळीं उत्पन्न होऊन पुन: छत्रसिंहासन तक्त केलें. ते धन्य झाले,' ह्मणून तीन दिवसपर्यंत बाहेर दरबारास आले नाहींत. मक्केस निघोन जावें किंवा येच समयीं मसलत करावी. तरी बळेंकरून ते अधिक जाहले, ह्मणून जनान्यांत राहिले. तेव्हां सर्व वजीर व अमीर यांणीं अर्ज करून 'ही गोष्ट ईश्वरी इच्छेची आहे, आपलाही प्रताप थोर आहे, प्रयत्न करून सर्व गोष्टी करितां येतील,' ह्मणून समाधान करून दरबार करविला. बाहेर आले आणि सुभ्यास दिलेलखान यास पत्र लिहिलें जे, 'कसेंही करून विजापूरचे पादशाही कमजोर झाली, त्याजवर मोहिम करून ती हस्तगत करावी. आणि भागानगरासही वेढा घालावा. यांत शिवाजी राजे त्यांची मदत करितात न करितात हें पहावें. त्याशीं सख्य होईल तितकें करून त्याचे मुलखाचे वाटे न जातां आधीं हें कृत्य करावें' ऐसें लिहिलें गेलें.

यानंतर त्याच शकांत (१६००) ज्येष्ठ वद्य ९ स जिजाबाई समाप्त झाली. त्यांची उत्तरक्रिया महाराजांनीं लक्ष रुपये लावून महादानें देकार ऐशी केली. बहुत खेद केला, कीं 'तीर्थरूप दूरदेशीं जन्मप्रभृति राहिले. मातृवियोग नसतां प्राप्त आज जाला.' ह्मणून चार महिने पर्जन्यकाळ रायगडींच राहिले. आश्विन शुद्ध ५ चे मुहूर्ते पुनः सिंहासनारोहण सभा केली.

पर्जन्य गेल्यानंतर संभाजी राजे व कारभारीसह महाराज सर्व संपत्ति व सरदार अष्टप्रधान फौजसह निघोन राजगडीं येऊन प्रतापगडचे देवीचें दर्शन घेतलें. तेथून श्रीरामदासस्वामींचे दर्शनास आले. ते समयीं महाराजांस लोक जोहार ह्मणून करावयास आले. त्यास स्वामींनीं विचारिलें, 'हे शब्द अर्थरहित काय आहेत ? यांत अर्थ कांहीं नाहीं' ह्मणतां महाराजांनीं, 'वंदन करण्यास जोहार ह्मणतात,' असें सांगितलें. आणि 'काय ह्मणून बोलावें ?' असें स्वामींस विचारिलें. तेव्हां 'रामराम कां ह्मणत नाहीं, ह्मणत जावें' असें सांगितलें. तें सर्व जनांस एकसमयीं उपदेशस्थानीं झालें. महाराजांनीं, 'स्वामींनीं पर्वतवास करणें, त्याअर्थीं परळी किल्ला आपला, तेथें असावें, सेवा घ्यावी'-अशी विनंति केली. तेव्हां, 'चाफळचे रामजीचे उत्साहाचा बंदोबस्त करावा,' अशी आज्ञा जाहली. त्यास अकरा गांवचे मोकासे व सरदेशमुखी श्रीस नेमून अकराशें होन नेमणूक शिवाय करून उत्साह करविला. परळीस कड्यांत कोनाडा जागा करून तेथें येणें राहणें करूं लागले. तेथें राजमतें स्थान योजून 'मर्जीस येईल तेव्हां राहत जावें, किल्ल्याचे दरवाजावरचा हवालदार आपले आज्ञेत राहत जाईल,' असें सांगितलें. यांणीं, 'किल्लेदार याणींच आमचे आज्ञेत चालावें, वरकड प्रयोजन नाहीं,' असें सांगितलें; 'जेथपर्यंत तुमचें स्वराज्य होईल, अंमल बसेल, तेथपर्यंत ग्रामदेवता श्रीमारुति असे स्थापावे,' अशी आज्ञा जाहली. ती मान्य करून तसें करविलें. पूजा करून पुनः रायगडास आले.

कांहीं दिवस पुणें वगैरे ठिकाणीं राहिले. श्रीजेजुरी व शिखरचें दर्शन केलें. संभाजी महाराज यांस 'कारभारी यांचा विचार समजोन घेत जावा, राज्याचे अधिकारी ज्येष्ठ पुत्र तुह्मी,' ह्मणोन आज्ञा केली. परंतु उग्रप्रकृति, महाराजांचे मर्जीनुरूप वागणें पडेना, असें होऊं लागलें. कांहीं दिवस राजगडीं राहून रायगडीं गेले. महाराजांचे मनांत बहुत हेतु, हे राजपुत्र सर्वगुणसंपन्न असोन यांणीं राज्यभार चालवावा, आ-

पणास विसावा व्हावा ह्मणून बहुत रीतींनीं 'मार्गें करून चालावें' हा बोध करून, त्याचा व्रतबंध करून युवराज्याभिषेक करावा, असें मनांत आणून व्रतबंध केला. परंतु संभाजी महाराजांची मर्जी एक प्रकारची. कोणे एके दिवशीं हळदकुंकुसमारंभ शीतळागौरी यास सर्व सुवासिनी स्त्रिया राजवाड्यांत येणार, त्यांत कोणी रूपवान् स्त्री आली. तिजला महालांत नेऊन बलात्कार अविचार जाहला. हें वर्तमान महाराजांसही समजलें. तेसमयीं बहुत तिरस्कार येऊन बोलले जे, 'राज्याचे अधिकारी हे, अगम्यागमन श्रेष्ठ वर्णाचे ठायीं जालें. सर्व प्रजा हें राजाचें कुटुंब, अपत्यासमान होत. पुत्र झाले तरी काय करावयाचे, त्यांचा त्याग करीन, शिक्षा करीन' असें आग्रह करून बोलले. ही बातमी संभाजीमहाराजांस समजली. त्याजवरून दोन घोडीं यांजवरी आपण व स्त्री असे बसून पांच पंचवीस माणसें केवळ आपले खासगीचीं घेऊन रात्रीसच निघोन गेले. ते दिलेलखान औरंगाबादेस होते त्यांजपाशीं गेले. कांहीं दिवस त्यांणींही संतोष मानून, हें कार्यच जाहलें, ह्मणून दरमहा बांधून देऊन बहुत सत्कार करून ठेविले. कांहींएक फौज लोक जमा करून ठेविले. आणि दिलेलखान यांणीं आपली फौज कांहीं बराबर देऊन, 'भूपाळगड जाऊन घ्यावा' असा विचार करून राजे यांस रवाना केले. ते समयीं चालून येऊन वेढा घालून मोर्चे लाविले; गोळी गोळा टाकावा तरी संभाजी महाराजच पुढें येऊन उभे राहून हवालदार यांस 'दरवाजा उघडावा, नाहींतर शिरच्छेद करीन, सर्व लोक मारीन' असें सांगून पाठविलें. तेव्हां कोणास धीर न पुरे. गोळा वाजवितां नये. भयाभीत होऊन पळूं लागले. फिरंगोजी नरसाळा हवालदार शास्ताखान याशीं चाकण भांडविला तोच होता. विठ्ठल भालेराव सबनीस होते; नामजाद लोक पळून गेले, ते समयीं यासही अवसान न पुरे. 'लोकांचा पळ सुटला, काय करावें! लोकांची गती हे, आपण दम धरून उभें राहून लढावें तरी महाराज पुढें येणार. गोळा टाकणेस नये.' ह्मणून किल्ला सोडून रात्रीस पळून महाराजांकडे गेले. किल्लेकरी कांहीं राहिले त्यांस किल्ला घेऊन धरिले. बहुतेकांचे डावे उजवे हातपाय तोडिले. उग्र दंड केले. सर्व किल्लेकरी यांस समजावें ह्मणून दहशत घातली. फत्ते जाहली. कांहीं मनांत विचार केला कीं, 'हें करणें ठीक नाहीं.' ह्मणून माघारे निघोन दिलेलखान यांजकडे गेले.

महाराजांस हें वर्तमान समजलें. यावरी पुत्राचें आचरण हें जाणून

खिन्न झाले. आणखी किल्ल्यांत येऊन असेंच करितील, जाणून ताकीद केली कीं, 'लढावें, किल्ले सोडूं नयेत' आणि संभाजीराजे यांजकडे कारकून पाठवून बोध करविला, 'हें कृत्य तुह्मीं करितां हें काय? आह्मी श्रम करून राज्य सोडविलें हें तुह्मांसाठीं किंवा कोणासाठीं? तेथें राहून यवनाचा समागम करून पुन: स्थळें व राज्य त्यांचे घरीं घालावें ही बुद्धि धरिली, हा अपाय तुमचा किंवा आमचा होतो? आह्मांस याउपरी कांहीं कर्तव्य नाहीं. एकादे क्षेत्रीं वास, किंवा श्रीरामदासस्वामींपाशीं जाऊन बसावें. परंतु तुमचीच हानि होईल. तुह्मी मागील जाहल्या गोष्टी त्या झाल्या, याउपरी तुह्मी निघोन यावें. पाहिजे तेथें खासगी खर्चास तालुका लावून घेऊन रहावें. कारभार आटोपेल तितका करावा. माहीत व्हावें.' ऐशा कित्येक ममतेच्या गोष्टी व विवेकाच्या गोष्टी सांगून पाठविल्या. बोध होईल ते रीतीनें करविला. याजवरून त्यांणीं विचार केला कीं, 'येथें राहून अथवा विजापुरीं भागानगरचे पादशाहींत आपले मनोगतानुरूप चालावयाचें नाहीं, असें महाराजांचे लिहिल्यावरून व सांगून पाठविल्यावर अनुताप होऊन स्त्रीसह युक्तीनें निघोन येऊन महाराजांचें दर्शन पनाळप्रांतीं होते तेथें येऊन घेतलें. तेसमयीं एकांतीं बसवून, 'तुह्मी सद्वंश. तुह्मांसाठीं राज्य किती संपादन केलें! याचे अधिकारी तुह्मी. सर्व प्रजा हें तुमचें कुटुंब व लेंकराचे ठायीं मानावें. राजेलोक तुह्मी, शतावधि स्त्रिया लग्नें केलीं असतां अथवा शतावधि उपस्त्रिया नाटकशाळा ठेविल्या असतां युक्त आहे. परंतु अविचार अगम्यागमन करणें व परस्त्रीबलात्कार हे दोन्ही यशक्षयास कारण. पूर्वीं मोठमोठे राजे रावणादि राज्यकर्ते या दोषेंकरून राज्य व कुलक्षयास गेले. हें राज्यक्षयाचें कारण होय.' असें घरोब्याचे रीतीनें समाधान करून, पनाळा या प्रांतांत तीन लक्षांचा तालुका त्यांचे खर्चास नेमून त्यांस कारभारी विठल त्रिंबक बाजी मुरार याचे नातू, देशपांडे, महाडकर यांस खासनिशी पद देऊन ठेविलें. सोमाजी नाईक बांकी व बावाजी समशेरबहादर हे सरहार लोक वगैरे देऊन ठेविले. त्यांची चौकशी सांगितली. 'संभाजी महाराजांस बुद्धिवाद करून युक्तीनें वागत तसें करावें,' असें सांगून ठेविलें. किल्याची परवानगीरसानगी सर्व हवालदार याचे जिमेस सर्व कारभार ऐसें करून हवालदार याचेच निसबतीस काम ठेविलें. यांणीं वरतें असावें. खालीं उतरणें तें परवानगीनें

लेहून नेऊन करावें, ऐसें करून ठेविलें. कोल्हापूरचे ठाण्यांत महाराजांनीं जनार्दन नारायण सुमंत हे ठेविले. याप्रमाणें बंदोबस्त करून देऊन नजरबंद ऐसेच ठेविले, आणि महाराज निघोन रायगडीं आले.

नंतर दिलेलखान यास औरंगजेब यांणीं, 'विजापूरचे पातशाहीवर मसलत करावी,' असें लिहिलें. 'शिवाजी राजे यांस विरुद्ध न करितां ते पातशाहात हातीं घ्यावी. कमजोर न होऊन जाहली आहे, यांत मसलत करावी.' त्याजवरून पोक्त सामान, फौज, तोफखाना वगैरे करून विजापुरावरी चाल केली. भीमानदी उतरोन, तमाम मुलूख शहर मारीत ठाणीं घालीत, शहरानजीक भिडला. खान आलीशान मशाहुदशाह याणींही आपली फौज व उमराव जमा करून लढाईचा प्रसंग करविला. परंतु खानाचें सामान भारी, उपाय न चाले. खजिना व सामानाची कोताई पडली, याजमुळें कांहींएक यत्न न चाले. याउपरी पादशाही जाती असें समजोन बहुतच विचारांत पडोन विचार केला जे, 'शिवाजी राजे हे आपले पादशाहींतील शाहाजी राजे यांचे बेटे उमराव. त्यांणीं आपले पादशाहींतील व दुसरें आणखी दैवें करून राज्य साध्य केलें. तख्तनिशीन जाहले. आह्मांकडील उमराव चालून गेले, खटाई झाली. तत्रापि तह करून संस्थान रक्षिलें. त्यांचें व आपलें अंतःकरण शुद्ध नाहीं ऐसेंही आहे. त्यांस लिहिणें, मदत करा ह्मणणें, हें खुदांनीं दैवास आणिलें. विरुद्ध समजोन साह्य करितील न करितील. तत्रापि नेक जात, थोर उमराव पूर्वींपासून. त्यांचे वडील या राज्यांत वाढले, त्या अर्थीं त्यांसच, साह्य करावें, असें ल्याहावें. यांत त्यांची नेकी व कुलीनताही समजेल. मग जसे ताले असतील तसें घडेल.' ह्मणून दृढ विचार करून ये समयींचें विघ्ननिवारण होण्यास पराक्रमें करून दैवेंकरून खजिना, फौज, सर्वगुणसंपन्न असे तेच आहेत, ह्मणून महाराजांस कित्येक प्रकारें 'गनीम बहुत जोरावरी धरून येऊन पोंहोचला; हे पादशाहात तुमची. येऊन मदत झाली पाहिजे.' त्याजवरून महाराजांनीं तेच क्षणीं सर्व फौज उमराव पागे वगैरे तोफखाना दिलेलखानाचें सामान आलें त्याजहून अधिक असें सिद्ध करून मजल दरमजल पनाळ प्रांतीं येऊन पोंहचले. विजापुरानजीक खासा लष्करनिशीं जाऊन मुकाम केला; आणि विचार केला जे, 'गनीम सामान बहुत कटा; त्याहीमध्यें पठाण जात हट्टी; यांशीं लढाईंत माणसें जायां न करितां हुन्नरच करून खजील होऊन नामोहरम होय तें करावें.' ह्मणून तजवीज केली

कीं, त्याचा प्रांत दौलताबाद तालुका, यांत आपली फौज पैसावी, वेढा लावावा. त्याजवरून दिलेलखान यास तीन गांवांचें अंतर सोडून भीमानदी उतरोन जालनापूर पावेतों त्याचे मुलूखतलख्यांत राज्य करीत चालले. प्रांत गांव शहरें मारीत मारीत जालनापुरास जाऊन चार दिवस मुक्काम करून पेठ मारली. तेव्हां बहुत मालमत्ता हातीं लागली. जालनापूर हें औरंगाबादेपासून चार गांवें आहे. त्या जाग्यास शाहा शाहाजादा असतां त्याचा हिसाव न धरितां पेठ लुटून, सोनें रुपें हत्ती घोडे, यांखेरीज मत्ता बहुत सांपडली. ती घेऊन पटागडतर्फेस स्वार होऊन कुच करून येत असतां मध्यें रणमस्तखान, आसतखान, जावितखान, ऐसेच आणखी सात पांच उमराव आठ दहा हजार स्वारांनिशीं चालून आले. त्यांस ज्याहावाजीचे हुन्नरें जैशी तंबी करूं नये तैसें करून लढाई मारून घोडे हत्ती पाडाव करून पटीयास गेले. मागुती तेथून फौज सरदार त्यांचे मुलखांत धुंदी करावयास पाठविले. व मोरो पंडित प्रधान यांस बागलाणांत व खानदेशांत सत्तावीस किल्ले मोगलांचे घ्यावे, मुलूख काबीज करावा, ह्मणून वीस हजार फौजेनिशीं तिकडे रवाना केले; आणि महाराज पटागड किल्ला येथेंच मुक्काम करून राहिले.

इतकेंही जाहलें, परंतु विजापूर घ्यावें ह्मणून दिलेलखान बहुतच विरईस पडून, इकडे कसेंही होवो, पादशाही हस्तगत करून नंतर तिकडील विचार करावा, ह्मणून बहुतच निकड बसवून तोफांची मारगिरी विजापूरचे कोटास केली, कोणतेविशीं वाकी ठेविली नाहीं. बहुतच जेरदस्तीस [illegible] आणिले. तेव्हां खान आलीशान यांणीं पुनः महाराजास पत्रें लिहिलीं, वकील पाठविले कीं, 'तुह्मीं आपली नेकी करावयाची तितकी करून शाहाजी राजे यांचे पुत्र तुह्मी, या पादशाहींतील त्यांणीं निमक खाल्लेलें याची चीज करून, वांकडेही तुह्मांशीं चाललों असतां येऊन, सर्व प्रकारें साह्य केलें. शर्थ आपणाकडून करणें ती केली. मसलत ही केली कीं, त्याच मुलखांत वेढा लावून गनीम येथून उखळून काढून नंतर घेरून मारावा. सर्व मुलूख त्याचा खराब पराजय केला, वेढा लाविला. कोटांत आह्मांसही द्रव्यांनीं व सामानांनीं साह्य केलें. परंतु दिलेलखान बहुतच हट्टास पडून, तिकडे त्या पादशाहाची सर्व दौलत गेली तरी जावो, परंतु विजापूर घ्यावें, असे आग्रह करून उठत नाहीं. कोटानजीक येऊन भिडला आहे. येसमयीं कांहींएक वि-

चार न करितां तुह्मी येऊन पोंचून पादशाही राखिली ... जवरून महाराज स्वार पत्रें पावतांच फौज मुलखांतील जमा ... करीत पुनः पन्हाळ्यानजीक येऊन मुक्काम केला. पूर्वींही सामान खर्च... दारूगोळा पाहिजे तसे वांचविले आणि पुनः आलियावर आणखी मागुती द्रव्य व सामान मुबलग पावतें केलें. हरहुन्नरें सामान दारूगोळा पाठवून हुशार केले. त्यांचे मुलखांत सैन्य पैसलें होतें तें सर्व बोलावून आणिलें, आणि दिलेलखान याजवरी सेनापति वगैरे सरदार फौज पुढें पाठविली. त्यांणीं जाऊन कांहींएक अंतरानें सडेस्वारीनिशीं उभे राहून कबिला बाड मारावे, रसद गल्ला सामान कांहींएक पोहोंचूं देऊं नये, असें करून भोंवतीं जवा धरून रस्तेबंदी करून रोखून धरिला. हें वर्तमान शाहाजाहांस कळोन त्याचे मदतीस औरंगाबादेहून रणमस्तखान व दोन उमराव आठ दहाहजार स्वारांनिशीं रवाना केले: ते येत असतां त्याजवरी महाराजांची फौज धांवून जाऊन त्यांस मारीत पिटीत औरंगाबादेपावेतों नेले. कित्येक शहरें लुटीत देश खराब करीत परतोन येऊन गनीमास घेरून बसले.

हें वर्तमान; व पंडित प्रधान बागलाण खानदेश प्रांतीं गेले, त्यांणीं अहिवंत किल्ला घेतला. अहिवंत ह्मणोन जसा पन्हाळा त्याचे समतुल्य किल्ला मातबर. तसाच नाहावागड बागलाणचे दरम्यान मुलखांत बहुत कठीण तोही घेतला. ऐसे दोन किल्ले नामोशाचे पुरातन जागे काबोज केले, तेथेंही बहुत मालमत्ता सांपडली, आणि बराबरील जमीयत फौज होती ती मुलखांत पाठवून ठाणीं बसवून बहुत धामधुम केली. कितेक मुलूख काबीज केले. हें वर्तमान; व पहिली स्वारी खासा महाराजांनीं केली, जालनापूर मारिलें, रणमस्तखान नामोहरम करून दिलेलखानास वेढला, विरईस पडून राहिल्यामुळें तमाम फौज याउपरी त्यास गर्दीस मिळवून औरंगाबाद दौलताबाद घेऊन इकडे मसलत करितात असें पादशाहास समजलियावरून पादशाहा यांणीं रणथंबें येथें डाकेवरी बाके जाहिर झाल्यावरून, बहुत खजील होऊन आहदीवरी आहदी दिलेलखानास पत्रें आलीं जे, 'याउपरी तुह्मी अग्राहास न पडतां युक्तीनें निघोन शाही न बुडवितां बचावून निघावें. शिवाजी राजे यांस युद्धाचा प्रसंग पाडूं नये,' लिहिणीं आलीं. दिलेलखान यांचे फौजेंत रुपयास शेर अर्धशेर अनाज जाहलें. हत्ती घोडे

कीं, त्याचप्रमाणें मरूं लागलीं. या जातीनें सर्व दौलतावादेचा मुलूख
[illegible] करून वेढा लावून दिलेलखान जेरदस्तींत आणिला. बाहेर
माणूस हत्ती घोडे कांहींएक फिरकूं न पावे. निघाले तितके उचलूं
लागले. कबीला बाड रसद न चाले. पादशाहाचीं लिहिणीं आलीं.
तेव्हां दिलेलखान यास असें कळोन आलें कीं, 'आपण येथें दम धरून
राहिल्यानें आपली शाही कुल बुडवितील, गर्दीस मेळवितील. विजापूर
घेणेची सर्व मसलत राहिली. याउपर आपले प्राण व पादशाही सल-
तनत जाऊं पाहते. बुडविली याचें अपेश नशिवास न येतां निघोन
कोणते प्रकारें जावें, निभाव कसा पडतो; बसोन राहिल्यासही बसों देत
नाहींत, त्या अर्थी निघोन जावें.' म्हणून विजापूर सोडून दिवसास
कोश दोन कोश मजली करीत चालला. याप्रमाणें गनीम जेर जेर
[illegible]करून खट्टा करून उपलिक खान आलीशान यांणीं जशी कोट राख-
[illegible]ण्याची शर्त करावी तशी करून बहुत शर्त केली. कोट लढवून राखिला.
[illegible] याप्रकारें सैन्येंकरून व द्रव्येंकरून विजापूरचें साहाय्य महाराजांनीं
केलें. ज्या उपायें गनीम उखळूं येईल त्या उपायें उखळून विजापूरचें
अरिष्ट दूर केलें. पादशाहात रक्षिली. ते समयीं खान आलीशान बहु-
तच कृतोपकारी होऊन महाराजांची तारीफ करणें ती करून वस्त्रें जवा-
हीर उत्तम पदार्थ पाठविले. ढाल तरवार महाराजांकडे पाठविली. 'पुनः
पाहिजे तरी तुम्हीं बांधावी, किंवा आपणास मक्केस रवाना करून हे
पादशाहात तुमची होय, तुम्हीं संभाळावी.' म्हणून खिलत व वकील
पाठविले. 'बेकीकदपणें बहुतच सरळ होऊन तुम्ही शाहाजी राजे यांचे
पुत्रत्वास उत्तीर्ण झाला. पूर्वीं आम्हीं तुम्हांकरितां शाहाजी राजे यांस
पीडा केल्या, वगैरे सर्व एकीकडे ठेवून हे गोष्ट तुम्ही करून दिगंत
कीर्ति मेळविलीत, वंशजपणाची धन्य केलीत.' ते समयीं महाराजांनींही
पादशाहास वस्त्रें, हत्ती, घोडे, जवाहीर पाठवून वकिलाबराबर आपले मात-
बर देऊन 'आम्हीं राज्य सोडविलें त्यांत या पादशाहींतील व आणखीही
सोडविलें. तेव्हां आपण आम्हीं वश व्हावें म्हणून कैलासवासी महारा-
जांस पीडा केली. परंतु आम्ही त्यांचे स्वाधीन नाहीं समजोन मनसबा
व मुलूख त्याजकडेसच राखून शेवटवरी चालविले. ते कृतोपकार तुम्हीं
केले आहेत. ते थोर शाहा तक्तनिशीन आपणालायक तेंच करीत

तुमचे उपयोगीं व...
त्यांणींच आपण फत्ते ५...
जवामर्दी राखणें आपण शर्त केली. या...
सुखरूप जतन करून आपण करावी. आह्मांस संकट १८७...
साहाय्य करण्याविशीं लिहित असावें.' ह्मणून ढाल तरवार फिरून पाठविली. आणि तह करारदाद पादशाहांनीं ठरविला कीं, 'हुसकोटा व व बेंगरूळ, आरणी व चंजाऊर आदिकरून पेशर्जी माहाल लागले आहेत, त्यांस दसकशी व तोफा वगैरे देणें येतें तें माफ असे. दरोबस्त आपणाकडे करार केले असें चालावें. शिवाय नवीन चंदी वगैरे तालुके किल्ले घेतले तेही दरोबस्त आपणाकडे चालावे. यास कांहींएक अडथळा आह्मांकडून तुह्मी जितका प्रांत वहिवाटतां त्यास व्हावयाचा नाहीं,' याप्रमाणें ठरावून दिल्हें. महाराज यांणीं 'बाकी तुमचे तालुके राहिले ते तुह्मी राखावे, त्यांत आमचा उपद्रव होणार नाहीं;' ऐसें करून दिल्हें. याप्रमाणें तहनामा ठरविला.

दिलेलखान संभाळीत संभाळीत आदवानी कोपळप्रांताकडे निघोन गेला. त्याचे पाठीवरी महाराजांनीं फौजा रवाना केल्या होत्या त्या व प्रथम विजापुरानजीक जाऊन देवगडाकडे गेले. ते समयीं जनार्दनपंत सुमंत हणमंते कोपळप्रांतांत कांहीं फौजेनिशीं ठेविले. त्यांणीं तिकडे कितेक पुंड पाळेगारांनीं फिसाइती केल्या त्यांस मारून टाकिलें. व हुसेनखानाचा भाऊ काशीमखान दोन तीन हजार स्वारांनिशीं आला होता त्यास, व त्याचा कबिला व हुसेनखानाचे दोघे लेक असे कैद केले. हत्ती पांच व घोडे पांचशें पाडाव केले. याखेरीज पुंड पाळेगार यांचा मुलूख व गड कोट काबीज करून ठाणीं बसविलीं. फत्ते केली. असें असतां दिलेलखान व सरजेखान व हुसेनखान येतां बहुतकरून जमियत फुटली गेली, हें कळोन, हेही पांच सहा हजार स्वारांनिशीं गनीमावर गेले. मध्यें गनीम घालून जिकडे जिकडे गनीम जाई तिकडे तिकडे जागा जागा गनीमास गोषमाल देऊन तिकडूनही मारून काढिला. तो भीमानदी उतरोन पेडगांवांत आपले मुलखांत खट्टा होऊन गेला. दिलेलखान यास असें कळोन आलें जे; मागुती विजापुरची वाट न धरावी, असा खजील केला. याप्रमाणें महाराजांनीं प्रतापें करून यश कीर्ति व अर्थ संपादन केले.

लिहिलें कीं, 'सं-



...णात्रयाचे उपाय बहुत प्रकारें
...कळोन आलें कीं, या पादशाहींत अथवा
...जीपूर अगर भागानगर पादशाहींत आपला मनोगत चालणार नाहीं. असें जाणून आमचे लिहिलेप्रमाणें येऊन भेटी जाहली. यावरी घरोब्याचे रीतीनें जसें समाधान करावें तसें केलें. व दिलेलखान मातबर जमाव करून विजापूरची पादशाहात कमजोर पाहून चालून जाऊन शहर कोटास भिडला. याजवरून खान आलीशान यांणीं आह्मांस सख्य करावें ऐशीं पत्रें पाठविलीं. त्याजवरून दरमजल जाऊन मुलूख मारून शर्तीनशीं गनीम उखळून मारून काढिला. विजापूरचें अरिष्ट दूर करून पादशाहात रक्षिली. यावरून त्यांणीं तह करून, तुह्मांस चंजाऊर वगैरे तालुके यांच्या तोफा व पेशकसी देणें लागत होती ती आह्मांकडे करून दिल्ही. व चंदी वगैरे प्रांत तहामध्यें आह्मीं आपणाकडे लावून घेतले. तरी याउपरी हे सर्व आह्मांकडील कारभारी लोक आहेत त्यांचे स्वाधीन करीत असावें. हें वर्तमान तुह्मांस समजावें' ह्मणोन पत्रें रवाना केलीं. आणि भूपाळगड गेला होता तो व बाहदूरबिंडा घेऊन महाराज यशस्वी होऊन पुनः रायगडास आले. शरीरीं कांहीं व्यथा निर्माण झाली होती. हल्लीं बरी जाहली.

यानंतर राजाराम यांचा व्रतबंध करून विवाह करावयाची योजना करून बहुत समारंभ करणेची तरदूत करविली. शरीरसंबंध प्रतापराव गुजर याची कन्या करून केला. एकमासपर्यंत मोठा समारंभ सोहळा लक्षावधि रुपये खर्च होऊन जाहला. शके १६०१ यांत लग्नसमारंभ केला.

यानंतर महाराजांनीं या प्रकारें करून धर्म, अर्थ, काम तीन पुरुषार्थ अमानुषी कर्में करून केलें ते सर्व यथासांग संपादिले. पराक्रम व चमत्कार केले ते वर्णन करावयास कोणासही शक्ति नाहीं. तत्रापि कांहीं कांहीं संक्षेपेंकरून पूर्वींपासून करीत आले त्या आधारें जाहले. ज्यांची कीर्ति तुकारामबावा व रामदासस्वामी परम विरक्त वैराग्याचे शिरोमणि यांणीं अभंग श्लोक करून प्रताप वर्णिला त्यास मान्य असे राजे झाहले, त्यांचें अद्भुत चरित्र दिवसा दिवसाचे ठायीं नानाप्रकारें केलें तें वर्णन करण्यास इतरांस काय शक्ति आहे! राज्याभिषेक होऊनो प्रताप केले ते वर्णिले. याउपरि उत्तरखंड चरित्र केलें. जे तीन पुरुषार्थ साध्य झाले याउपरि चवथा पुरुषार्थ मोक्ष तो श्रीरामदासस्वामीबा

...झीं
...करीत
...जाहला, ... निदानीं

वरदहस्त ठेवून कृ[illegible] व्यथा, याउपरि मर्यादा विशद[illegible] श्वरण आरंभिलें. मोठे मोठे पंडित ज्ञानी यें[illegible] सहवास करावा. आत्मानात्मविचार करावा. अशी वृत्ति [illegible] आणि करिते झाले. पूर्वयुगीं राजे आपण वृद्धापकाल प्राप्त झा[illegible] राज्य पुत्राचे स्वाधीन करून आपण ईश्वरप्राप्तीचा उपाय अरण्यांत जाऊन करीत आले तसें करावें, हा हेतु. परंतु पुत्राचे ठायीं गुण असा[illegible] ते नाहींत; तसेंच टाकून गेलें असतां अपकीर्तीस कारण होईल. य[illegible] अर्थी यावद्देह घरींच सत्समागम करून सद्गुरुबोधित महावाक्याचा उपदेश जाहला तें साध्य करून सार्थक करावें हेंच उत्तम. षड्वर्गत्याग करून विषयापासून विरक्त होत्साता सर्वकाल भगवद्भजन, श्रवण, मनन निजध्यास, कीर्तनादि नवविध भक्ति करून मुक्त असे होऊन सर्वकाल कालक्षेप करिते झाले. योगादिमार्ग पहावे असें केलें. पूर्वी युगायुगाचे ठायीं अवतार निर्माण होऊन बहुत दुष्ट दुर्जनांचा नाश करून धर्म स्थापिले, तैसेंच महाराजांनीं अवतार चरित्र केलें. यज्ञयागादि धर्म ब्राह्मणांपासून चालविले. धर्मवृद्धि करून सर्वांस आनंदरूप प्रजापालन यथाविधि केलें. शके १५९६ पासून राज्याभिषेक झालियावरि शके १६०२ पर्यंत. याप्रमाणें चरित्र करून असतां कांहीं दिवशीं ज्वराची व्यथा जाहली. याउपरी आपली अवधि पांच सात दिवस इतकीच राहिली, म्हणून सर्व मातबर सरकारकून सरदार आदिकरून जमा करविले, आणि सर्वांस जवळ बोलावून [illegible] दर्शन आपण [illegible] तसें केलें. प्रधानादि कारभारी व विश्वासुक[illegible] राज्य आपण मोठे पराक्रम [illegible] केली. किल्ले, कोट, जंजिरे, प्रांत व द्रव्यही अनेक [illegible] संग्रह केलें. दान धर्म यश कीर्ति इहपर दोन्ही साध्य केलीं. पुढे या[illegible] रक्षण करून आह्मांहून अधिक पराक्रम करून, एक दिल्लीची पादशाहात व उत्तरचें राज्य साध्य करणेंत आयुष्य पुरलें नाहीं, व मेळविलें राज्य व माणसें तुह्मी सर्व मोठे मोठे पराक्रमी यांचीं भूषणें योग्यता, वाढवून अधिक राज्य वाढवणें असे. वडील पुत्र वयें करून योग्य परंतु क्रूर आणि [illegible]सनी, तेव्हां पुढील विचार यथास्थित दिसत नाहीं. धाकटे पुत्र गुणें[illegible]रून युक्त परंतु वयेंकरून लहान, व धाकटेच; तेव्हां विभाग करूनहा

लिहिलें कीं, 'सं-
...आणात्रयाचे उपाय वहुत प्रकारें

१७६ श्रीशिव... कळोन आलें कीं, या पादशाहींत अथवा
...पूर अगर भागानगर पादशाहींत आपला मनोगत चालणएकांत एक विरुद्ध
... जाणून आमचे लिहिलेप्रमाणें येऊन भेटी जाहली ... होईल, मर्यादा राह-
...नें जसें समाधान करावें त... करावें. कनिष्ठांनीं त्यांचे आज्ञेत चालून
... विजापूरची पाद... ता राज्यधर्म; तो योग दिसत नाहीं. शत्रूस संधि होईल.
...डला. या... दवाचें देणें, नाश होईल. वडील संभाजीराजे, याजकरितां
...पा... यांजकडेच सर्व लोक पाहातील, व पाहणें प्राप्त. परंतु त्याची चाल एक प्रकार. सरकारकून व योग्यतेचीं माणसें ज्यांणीं जीवामय श्रम राज्यवृद्धीसाटीं केले, त्या थोर थोर माणसांच्या अप्रतिष्ठा करील, नाश करील, राज्याचा व द्रव्याचा नाश करील, बुडवील, लहान माणसांचे सहवास करून थोरांच्या अप्रतिष्ठा होतील, निर्भयकी होईल; आह्मीं पाया घातला, माणसें गुणसंपन्न मेळविलीं, वाढविलीं, तीं राहणार नाहींत, द्रव्य व खजिना सर्व नाश पावेल. मोठा सवल शत्रु औरंगजेब तो आपलें स्थळ सोडून निघाला असतां, आमचे राज्यप्रभावें आपले राज्यांतच राहिला आहे, तो पुढें चाल करील. विजापूर, भागानगरपादशाही कमजोर पडल्या त्या घेऊन हें राज्य इच्छील; तेव्हां संभाजीचे हातें रक्षवणार नाहीं. परंतु हें होणारच असें दिसतें.' ह्मणून एक घ... त नेत्र झांकून स्तब्ध झाले आणि मुखांतून अक्षरें आलीं कीं, ... ती दगा पावेल. राजाराम चंदीकडून पुनः राज्य रक्षील. मोरो ...त, निराजी रावजी, रामचंद्र नीलकंट, संताजी घोरपडे, धनाजी जाधव पुनः राज्यवृद्धीस कारण होतील. पुढें शिव न... जा होईल तो दिल्लीपर्यंत राज्य करील.' इतकें वोलोन. सर्व यथा... राहिलें. ते समयीं ... पर्यंतमा... आले ... कोणास... गें आमचें सर्वांचें ... केला.' यानंतर मत... कळविलें कीं, 'या मृत्युलोक... मोठे अवतारादिक ... होणार अवश्यमेव. उत्तरकाल तसें होतच असतें. तुह्मी सर्व पराक्रमी आहां. कळेल तसा प्रयत्न करून राज्यधर्म रक्षण करावा, एकविचारें सर्वांनीही चालावें.' ह्मणून सांगून सर्वांचें समाधान केलें. आणि 'बाहेर जवळ वसावें' ... सर्वांस आज्ञा केली. त्याप्रमाणें सर्व उठोन बाहेर वसले आणि आपण श्रीगंगोदक आणवून स्नान केलें. प्रायश्चित्त विधियुक्त करून, भस्मधारण रुद्राक्ष, तळशीमाळा धारण केल्या, आणि

संकल्प केला,

गीता' 'सहस्रनामे' याप

असतां शके १६०२ रौद्रनाम संवत्सर चैत्र शु...

रायण दोनप्रहरीं देहत्याग करून अवतार समाप्त 'श्रीर...

केला. ते समयीं दुश्चिन्हें, दिशा धूम्र, व नक्षत्रपात, भूमिकंप,...

रात्रीस, ऐसे उत्पात होते जाहले. शंभुमहादेव येथील तळ्याचें पाणी

रक्ताप्रमाणें तीन दिवस जाहलें. जळचरें फार मेलीं. अनर्थ झालियावरी

कारभारी, कार्याध्यक्ष, आबालवृद्धस्त्रीजन यांचा मोठा हाहा:कार जाहला. नंतर सर्व प्रधानादिक मिळोन, दरवाजे बंद करून, बातमी बंदोबस्त होय न फुटावी असें करून, शिबिका आणून सर्व राजचिन्हें उपचार करून यथाविधि मंत्राग्नि करविला. सहगमन पुतळाबाईसाहेब यांणीं केलें. उत्तरक्रिया साबाजी भोंसले शिंगणापूरकर यांजपासून राजाराम यास समीप बसवून करण्यास प्रारंभ केला. बहुत दानधर्म महादानादि करिते झाले. याप्रकारें करून महाराज पुण्यश्लोक, योगीयासही जी गति असाध्य ती चतुर्विध पुरुषार्थ साधून मोक्षाचे अधिकारी जाहले.

याप्रकारें करून महाराजांनीं अवतारचरित्र करून वैकुंठवास केला. ही कथा श्रवण मनन पठण केली असतां सर्व विघ्नें दूर होऊन पुण्य व यश प्राप्त होईल, आणि सर्वगुणसंपन्नता प्राप्त होऊन सकलैश्वर्य लक्ष्मी प्राप्त तात्काल होईल.

पुढें सर्व अष्ट प्रधान यांणीं विचार केला जे, 'संभाजी महाराजांची मर्जी यथास्थित मार्गावर येण्याचे उपाय करून, होय तोंपर्यंत संभाजी ...राज यांस आहेत तसे बंदोबस्तानें राखून, सर्व राज्याचा बंदोबस्त ...रामसाहेब येथें आहेत यांस मंचकारोहण करून करवावा.' नंतर ...वानीं महाराजांकडे जाऊन त्यांची मर्जी प्र...

करणें तसें करावें, असा संकल्प करून क्रियाप...

साहेबांस सुमुहूर्तें शके १६०२ रौद्र नाम

यास मंचकारोहण करविलें. येथून पुढें च...

चरित्रांत वर्णन केलें आहे. राज्याभि...